web : www.vinimaypublications.com
(visit and Get Free download Books)

रमाई

बंधु माधव

.....

...

पवित्र गाथा (कादंबरी)

विनिमय प्रकाशन, मुंबई

फूल फुलावं म्हणून झाड रात्रं-दिवस धडपडत असतं. लोकांना ते फुललेलं फूल तेवढंच दिसतं. वर्षानुवर्षे झाडानं त्यासाठी केलेली धडपड मात्र लोकांना दिसत नाही. म्हणूनच महामाता रमाबाई आंबेडकर यांच्या चरित्राचा प्रचार आणि प्रसार वाढविण्यासाठी वाढदिवस, लग्न, बक्षिस वितरण आणि इतर मंगल प्रसंगी हा ग्रंथ एकमेकांना भेट स्वरूपात अवश्य द्यावा.

रमाई :
बंधु माधव

ISBN : 978-81-910979-1-7

© श्रीमती गीता माधव मोडक

प्रकाशक :
विनिमय प्रकाशन
राजरत्न ठोसर
उदयनगर, सुर्यनगर,
पोलीस स्टेशनच्या बाजूला,
एल.बी.एस.मार्ग,
विक्रोळी (प.),
मुंबई - ४०० ०८३.
Cell : 9969198821

website : www.vinimaypublications.com

पुनर्मुद्रण :
१४ एप्रिल २०११

अक्षर जुळवणी :
विनिमय प्रकाशन

मुखपृष्ठ :
राजेश जगताप, पुणे

मुद्रक :
रश्मी इंटरप्रायजेस, पुणे - २

किंमत : १५० रु.

रमाई.....

माझं एक पावनतीर्थ.....
माउलीहून मवाळ, चंद्राहुनि शितल,
मायेचा जणू कल्लोळ!
तीर्थस्वरूप मातोश्री रमाआई,
तथा
'रमाई'
तथा
रमाबाई भिमरावजी आंबेडकर.....
त्यांचीच ही —
त्यांच्याविषयींच्या मातृ-प्रेमानं,
ममहृदयीच्या बाग मळ्यात
फुलून आलेल्या
भावफुलांनी, मी गुंफलेली,
त्यांचीच ही —
पवित्र पावन "जीवन-गाथा"
त्यांच्याच
शुभ चरणकमलावर.....
बालके,

- बंधु माधव

मनोगत

जेष्ठ आंबेडकरवादी लेखक दिवंगत बंधु माधव यांनी लिहिलेल्या माता रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनावरील 'रमाई' या पवित्र पावन गाथेच्या सुधारीत तिसऱ्या आवृत्तीच्या निमीत्ताने मी बंधु माधवांची धाकटी कन्या माझे मनोगत व्यक्त करीत आहे.

बंधु माधवांनी रमाई नामक पवित्र गाथा वाचकांच्या सेवेशी सादर केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर, कतृत्वावर बरेच काही लिखाण झाले आहे. परंतु बाबासाहेबांसाठी चंदनासारख्या झिजलेल्या रमाईच्या बाबतीत तसे फारसे लिखाण झालेले नव्हते. तेव्हा प्रथमच बंधु माधवांनीच 'रमाई' ही पवित्र गाथा लिहिली. यापूर्वी रमाईच्या दोन आवृत्या निघाल्या आणि आकाशवाणीवरुन १७ भाषांमध्ये रमाईचे नभोनाट्य प्रसारण झाले होते. त्याचे लेखन देखील बंधु माधवांनीच केले होते.

'रमाई'वर टेलीफिल्म सुद्धा निघणार होती. परंतु तीन-चार एपिसोड नंतर बंधु माधवांच्या आजारपणामुळे पुढील चित्रण स्थगित करण्यात आले. ते त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच त्यांचे देहावसन झाले.

आता विनिमय प्रकाशनचे प्रकाशक आयु. राजरत्न ठोसर व त्यांचे सहकारी आयु. आर. बी. वानखडे हे मला येऊन भेटले व त्यांनी मला रमाईची तिसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्याचा मनोदय व्यक्त केला. तेव्हा मी आणि माझ्या आईने हे पुस्तक प्रकाशित करण्याची अगदी मनापासून त्यांना परवानगी दिली.

रमाईची तिसरी आवृत्ती निघते म्हणून मला फार आनंद झाला. तिसरी आवृत्ती वाचकांच्या हाती देताना मला एक विनंती करावी वाटते. रसीक वाचकांनी बंधु माधवांच्या लिखाणाला भरुभरुन प्रेम दिले. त्यांच्या साहित्यिक योजदानाबद्दल आदर दाखविला आहे. तसेच प्रेम व आदर या ग्रंथास देऊन रमाई घरोघरी वाचली जावी ही विनंती.

तसेच प्रकाशक राजरत्न ठोसर व त्यांचे सहकारी आयु. आर. बी. वानखडे यांनी अथक परिश्रम करुन रमाईची तिसरी आवृत्ती सुबक व सुंदर केली याबद्दल त्यांचे आभार व धन्यवाद!

सौ. शशिकला मोडक/कारंडे

सुभेच्छुक

प्रत्येक महापुरुषाला घडविण्यात स्त्री चा हात असतो. शिवाय स्त्री ही दोन कुटूंबांचा उद्धार करते. ज्या कुळात जन्मते त्या कुळाचा आणि आपल्या पतीच्या कुळाचाही उद्धार करते. परंतु त्याही पलीकडे न भूतो न भविष्यती असा समाजाचा उद्धार करते. माता रमाईने जीवनात खडतर हालअपेष्टा सहन करुन, प्रपंच नीटनेटका चालवून बाबासाहेबांना कसल्याही प्रकारचा त्रास होऊ न देता रामजीबाबांचे स्वप्न साकार करुन दाखविले.

रमाई या फक्त तीनच शब्दांवर बंधु माधवांनी हा मोठा पवित्र ग्रंथ लिहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र अनेक विद्वानांनी लिहिले होते. पण माता रमाईच्या जीवनावर विशेष असे कोणीच लिहिले नव्हते. सत्य प्रसंगांवर आधारीत अत्यंत सोप्या भाषेत बंधु माधवांनी रमाई लिहिली. रमाईची ही गाथा घराघरात पोहचवण्याचा त्यांचा संकल्प होता. या पवित्र गाथेतील प्रसंग वाचताना ते चित्रपटातील दृश्यांप्रमाणे डोळ्यापुढे सरकू लागतात. माता महामाया, यशोधरा, सावित्री यांच्याच तोडीची नव्हे तर कांकणभर अधिक रमाई माताची ही हृदयस्पर्श गाथा ह्या लेखकाने डोळ्यासमोर आणून ठेवली आहे. प्रत्येक बौद्ध बांधवांच्या नव्हे तर जे वाचक आहेत त्यांनीसुद्धा हा ग्रंथ आपल्या संग्रही जरूर ठेवावा.

या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीमध्ये लेखकाने काही प्रेमप्रसंग दिले होते. सहाजिकच वाचकांना ते आवडले नाहीत. नंतर काही भाग वगळून दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. पण तरीसुद्धा क्वचित प्रेमप्रसंगाच्या घटना होत्याच. जेव्हा आम्ही श्रीमती गीता मोडक यांना त्यांच्या निवासस्थानी भेटलो तेव्हा चर्चेनंतर आम्ही त्यांच्या समक्ष दुसऱ्या आवृत्तीमधील निवडक काही भाग वगळला. तसेच त्यांनी बंधु माधवांच्या हस्ताक्षराने मुद्रित शोधन असलेली प्रथम आवृत्ती आम्हाला दाखविली. त्यात बंधु माधवांनी या गोष्टीचा खुलासा केला होता. तेथे पेन्सिलीने लिहिले होते ते असे, "मी पुस्तकात काही प्रेमप्रसंग दिले होते ते लोकांना आवडले नाहीत. मी ते यासाठी दिले होते की बाबासाहेब सुद्धा आपल्यासारखेच जिवंत हाडामासाचे माणूस होते. त्यांनाही खाजगी जीवन होते. तसेच ते फार विनोदी होते."

वाचक या पुस्तकाचे भरभरुन स्वागत करतील हीच अपेक्षा!

आयु. आर. बी. वानखडे

मालाड, मुंबई

प्रकाशकीय

सन १९९७ साली रमाई या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली होती. तेव्हापासून ते आजपर्यंत ही पवित्र गाथा कालबाह्य झाली. आजही या पुस्तकाची मागणी आहेच. ती एवढी की पुस्तकाची फोटोकॉपीसुद्धा वाचक जास्त किंमतीला विकत घेत आहेत.

रमाई ही पवित्र गाथा आज पुन्हा प्रकाशित करताना विशेष आनंद कोणाला होणार नाही ? अगदी दोन वर्षापूर्वीच हे पुस्तक प्रकाशित व्हायला हवे होते. दोन वर्षापूर्वीच मी बंधु माधवांची कन्या सौ. शशिकला कारंडे यांना भेटलो होतो.

बंधु माधवांच्या कुटूंबाचा पत्ता आम्हास माहिती नव्हता. ते पूर्वी राहत असलेल्या ठिकाणी त्यांच्याशी संपर्क साधता येईल असा कोणताही पुरावा नव्हता. अशातच मालाडचे रहिवाशी आयु. आर. बी. वानखडे यांच्याशी माझा संपर्क झाला. आम्ही दोघांनी मिळून लेखकाच्या कुटूंबाचा शोध घ्यायला सुरूवात केली. खूप कष्टाने व प्रयत्नाने त्यांची धाकटी कन्या सौ. शशिकला कारंडे यांच्याशी संपर्क झाला. तेव्हा आम्ही त्यांच्याशी हे पुस्तक प्रकाशित करण्याची इच्छा दर्शविली. अधिक चर्चेनंतर पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरले.

मी पुढील काम चालू करणार तेवढ्यातच माझ्यापुढे एक घटना 'आ' वासून उभी राहिली. काही आपल्या पुस्तक विक्रेत्यांनी माझ्याशी दगाबाजी केली. खूप उशिराने मला माहिती झाले की बाबासाहेबांच्या नावावर हे विक्रेते ग्राहक, प्रकाशक व लेखकांना लुटण्याचा धंदा अगदी सर्रासपणे करतात. हजारो, लाखो रूपयांची पुस्तके उधारीवर घेतात आणि मग मात्र तोंड लपवून फिरतात. या काही नालायक विक्रेत्यांमुळे समाजाचे मोठे नुकसान झाले आहे व चांगल्या विक्रेत्यांचेही नाव बदनाम होत आहे. नवीन लेखक व प्रकाशक यांना तर हे विक्रेते अगदी भिकेला लावतात. तसे पाहिले तर प्रकाशक हा काही कच्चा खिलाडी नसतो. तो का फसतो तर हे विक्रेते बाबासाहेब आंबेडकरांच्या नावावर त्यांना फसवतात. त्यांना अक्कल मात्र ती काहीच नसते तरीही साहित्य विक्री करताना बढाया मात्र भरपूर मारतात. अशा विक्रेत्यांच्या वाऱ्याला उभे राहिल्याने माझे हजारो रूपयांचे नुकसान झाले व उधारीवर दिलेली पुस्तकेही परत मिळाली नाहीत. असो.

हे सर्व सांगण्याचं तात्पर्य हे की त्यामुळेच माझे बाल्यावस्थेतील प्रकाशन अगदी डबघाईला आले. म्हणूनच रमाई ही पवित्र गाथा प्रकाशित करण्यास विलंब लागला.

रमाई ही गाथा खरोखरच पवित्र व सुंदर आहे. कादंबरी वाचत असताना बंधु माधवांची ही भाषाशैली माणसाला पकडून ठेवते. मुद्रित तपासणी करत असतानासुद्धा डोळे शतवार ओले व्हायचे. ते आज आपल्यात नाहीत, पण ते कलाकृतीने अमर आहेत.

मालाडचे रहिवाशी आयु. आर. बी. वानखडे यांनी ही कादंबरी लवकर प्रकाशीत व्हावी म्हणून मला अत्यंत अशी कधीही न फेडता येणारी मोलाची मदत केली. मी जेव्हा जेव्हा श्रीमती गीता मोडक व शशिकला करंडे यांना भेटावयास जात असे तेव्हा तेव्हा ते माझ्यासोबत यायला सदैव तप्तर असत. हे पुस्तक प्रकाशित करण्यात त्यांचा खूप मोठा मोलाचा वाटा आहे. शेवटी श्रीमती गीता मोडक, सौ. शशिकला कारंडे यांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच सुनिल गायकवाड यांनी सुद्धा बरेच मार्गदर्शन केले, त्यांचेही आभार मानतो. सुहास ओहोळ, सरपंच अशोक गायकवाड आणि सिद्धार्थ कॉलेजचे प्रा. संजय बोरसे सर या सर्वांचे आभार मानतो.

वाचकांना विनंती आहे की, आपण आपल्या प्रतिक्रिया प्रकाशक या पत्त्यावर किंवा फोनद्वारे अवश्य कळवा. तसेच काही सूचना असतील तर त्या सुद्धा कळवा!

प्रकाशक

राजरत्न ठोसर

मो. 9969198821

अंतरीचे गुज

रमाई नामक पवित्र गाथा आज रसिक व चोखंदळ वाचकांच्या हाती देताना, माझे हृदय आनंदाने भरुन येत आहे. मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्यावर आजपावेतो विशेष असे कोणीच काही लिहिलेले नव्हते. डॉ. आंबेडकर-चरित्र ग्रंथाचे प्रसिध्द लेखक कै. चां. भ.खैरमोडे यांच्या ग्रंथांतूनसुध्दा रमाबाई आंबेडकरांच्या जीवनाबद्दल त्रोटक अशीच माहीती असल्याने, त्यांच्यावर लिहावयाचे म्हणजे रमाईच्या नातलगांच्याकडे चौकशी करुनच लिहावे लागणार होते. चौकशी करता मला असे आढळून आले की, त्यांच्याकडे रमाबाईच्याविषयी कोणालाच विशेष अशी माहितीच नव्हती. अशा स्थितीत, रमाईंच्यावर लिहायचे म्हणजे मला ते एक मोठे आव्हानच होते. पण ते आव्हान-माझ्या हृदयातील रमाई विषयीच्या आत्यंतिक मातृप्रेमामुळे, अपरंपार आदरभावामुळे व त्यांच्यावरील माझ्यातील उत्कट भक्तिभावामुळे; ते आव्हान मी स्वीकारु शकलो. मग कल्पनेचे पंख लावून, त्या पंखात प्रतिभेची शक्ती उभवून, परकाया प्रवेश करुन, रमाईच्या प्रति-प्रेमाच्या व मातृ-प्रेमाच्या विशाल नभोमंडलात मी अक्षरश: स्वैर-संचार केला, उंच उंच भराऱ्या मारल्या, खूप गिरक्या घेतल्या, खूप खूप अवलोकन-चिंतन केले आणि त्यामुळेच रमाईंच्या भावमय व कष्टमय जीवनावर ही एवढी पवित्र गाथा मी लिहू शकलो. अशा पवित्र वस्तूला प्रस्तावनेची तरी काय जरुरी ?

पूज्य साने गुरुजींच्या शब्दांत सांगायचं झालं. तरी असं म्हणता येईल की, अशा सुंदर, सुगंधी वस्तूचा परिचय कशाला करुन द्यायला हवा ? रमाई हे पुस्तक सुंदर, सुगंधी व सुरस आहे की नाही, ते मला माहीत नाही, परंतु ते पवित्र आहे, असं मी विनयाने, निश्चयाने म्हणू शकतो. माझ्या हृदयातील सारा जिव्हाळा मी येथे ओतलेला आहे. ही पवित्र गाथा लिहीत असताना माझे डोळे शतवार ओले झाले होते, हृदय गहिवरुन व उचंबळून आले होते. रमाई वाचून जर वाचकांचेही हृदय असेच भरुन आले, उचंबळून आले, तर हे पुस्तक कृतार्थ झाले असे म्हणता येईल. हे पुस्तक वाचून वाचकांची हृदये ही जर कोरडीच राहतील तर, हे पुस्तक त्याज्य, व्यर्थ व नीरस समजावे.

रमाईचे मोठेपण तिच्या पतिभक्तित पतीनिष्ठेत व पतिसेवेत सामावले आहे. सीतेला पती-श्रीरामाच्या इच्छेसाठी जन्मताविरुद्ध महान् दिव्य करावे लागले, सावित्रीला पति - सत्यवानाच्या मृत्यूविरुद्ध चिकाटीने लढावे लागले, तर साध्वी रमाईला संन्याशी होऊ घातलेल्या आपल्या पतीला, कर्तव्यनिष्ठ बनविण्यासाठी, तिला तितकेच कर्तव्यकठोर बनावे लागले आहे. रमाई म्हणजे कठोर कर्तव्य निष्ठेचे मूर्तिमंत प्रतीक. तिच्या कर्तव्यकठोर निष्ठेतूनच, भारत देशात ललामभूत असा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सारखा दैदीप्यमान सूर्य प्रकटला.

रमाई च्या सारखी नि:स्वार्थी माणसं स्वत: अंधारात राहतात. प्रसिद्धीच्या प्रकाशात त्यांचं नाव फारच कमी झळकतं. पण त्यांचे सारे जीवन उदात्ततेने, त्यागाने भरलेले असते. रमाई म्हणजे आदर्श गृहिणी, कर्तव्यदक्ष व प्रेमळ पत्नी. स्त्री-मुक्ती चळवळीच्या या युगात रमाई सारख्या पतिपरायण स्त्री च्या जीवनावर मी लिहितोय म्हणून काही सुशिक्षित स्त्री-मुक्ती चळवळीच्या विदुषी कदाचित माझ्यावर रुष्ट होतील. पण आजच्या आधुनिक युगातील स्त्री-मुक्ती चळवळीतील रमाईची ही पवित्रगाथा, अधिक स्फूर्तिदायी, अधिक बोधप्रद व अधिक क्रांती-प्रवण अशीच वाटेल, अशीच ठरेल, असे मला आत्मविश्वासपूर्वक वाटते.

तशी रमाईची चरित्रात्मक कांदबरी मला ता. २७ मे १९८६ रोजी रमाईंच्या ५१ व्या पुण्य-स्मरण दिनी प्रकाशित करुन, मला रमाई पुण्य-स्मरण दिनाची सुरुवात करावयाची होती. पण प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे, मला ते जमले नाही. तथापि, गणपतराव बादोडकरांच्या प्रोत्साहनामुळेच ही कादंबरी लवकर लिहून झाली. ती लिहीत असताना माझे परमस्नेही सिध्दार्थ कॉलेजचे मा. घन:श्यामजी तळवटकर व त्यांचे चिरंजीव श्रीकांत तळवटकर ह्यांचे व सिध्दार्थ कॉलेज लायब्ररीच्या सेवेतील मंडळींचे मजला बहुमोल असे साहाय्य झाले, त्या साऱ्यांचा मी ऋणी आहे. रमाई ही चरित्रात्मक कादंबरी लिहिण्यासाठी संदर्भग्रंथ म्हणून, जगप्रसिध्द चरित्रकार मा. धनंजय कीर, आंबेडकर चरित्र ग्रंथांचे मा. कै. चां. भ. खैरमोडे, रत्नाकर गणवीर यांच्या पुस्तकांचा व मा. शांताबाई दाणी यांच्या वक्तव्याचा, मला अतिशय उपयोग झालेला आहे. त्यांचाही मी

अतिशय ऋणी आहे. तसेच, माझे सहित्यिक मित्र प्रा. अरुण कृष्णाजी कांबळे, चंद्रहास गम्ब्रे, जी. जी. भातखुडे आणी सुंदरनगर (मालाड) चे एल्. आर्. कदम व बी. बी. साळवे आदींच्या सहाय्याचाही मी अत्यंत आभारी आहे.

माझ्या कुवतीप्रमाणे जेवढे मला करणे शक्य होते, तेवढे रमाईचे चरित्र - चित्रण या पवित्र गाथेत मी केलेले आहे. माझी ही रमाई महाराष्ट्रातील असंख्य वाचनालयातून, मुलांच्या पाठशाळांतून, तसेच शाळा-कॉलेजांतून नव्हे तर गरिब-श्रीमंतांच्या घराघरांतून झोपडपट्टीतून ती जाईल, रसिक चोखंदळ वाचक व रमाईचे निष्ठावंत, तिच्या या पवित्र गाथेचे सहर्ष स्वागतच करतील, अशी सश्रद्धा, आशा मी उरी बाळगून आहे.

- बंधु माधव

१

ट्याँऽऽ ह्याँऽऽ ट्याँऽऽ ह्याँऽऽ

वणंद गावच्या गावकुसाबाहेरील वस्तीत, एका चंद्रमोळी झोपडीत, एका गोऱ्या गोऱ्या, मुलायम अर्भकाचा जन्म झाला. आईच्या उदरातून बाहेर पडताच, ते अर्भक जोरजोरानं आक्रंदू लागलेलं... ट्याँऽऽ... ह्याँऽऽऽ...

'ट्याँऽ ह्याँऽ' हा या पृथ्वीच्या पाठीवर प्रथम निघणारा उद्‌गार.... जणु ॐ...कार! मानवी कंठातून पहिल्या प्रथम निघणारा तो स्वर... स्वर कसला, सप्त सुरातील सरगमच. आरोह-अवरोहासह, ताना-आलापासह नवजात जीवाकडून जगाच्या अंतापर्यंत आळविली जाणारी ती अमर सुरावट...

ट्याँऽऽ.. ह्याँऽऽऽ.. ट्याँऽऽ..ह्याँऽऽ..

पूर्वेला त्या वेळी कुठं कुठं तांबडं फुटत होतं. दुसऱ्यांदा कोंबडं आरवत होतं. पहाटे साडे पाचचा सुमार असावा. हा काळ १८९९ सालचा असावा. वणंद गावदेखील हळूहळू आळोखे-पिळोखे देत जागं होत होतं. शेजारच्या मंदिरातून काकड - आरतीचे सूर येतच होते. तरीही आकाशात चंद्र अजून कसा रेंगाळला होता. तो त्या अर्भकाच्या जन्माची तर वाट पाहत नव्हता ना? हो, जन्मलेल्या त्या अर्भकाचं आगळं रुप तो वरुन कसा न्याहाळीत होता. त्याला त्याच्या चांदणीसारखंच ते अर्भक गोंडस वाटत होतं. लोभस भासत होतं. म्हणून आनंदीत होऊन की काय, तो आपल्या शीतल किरणांची हळूवार बरसात त्याच्यावर करत होता. तरीही ट्याँऽऽ.. ह्याँऽऽ.. ह्याँऽऽ.. त्या अर्भकाचं चालू होतं.

तसं त्या अर्भकाचे माता-पिता... भिकू नि रुक्मिणी.... कुणी त्या माउलीला रखमा म्हणत, तर कुणी सावित्री म्हणत. भिकु रुक्मिणी म्हणजे दाभोळजवळील वणंद गावच्या गावकुसाबाहेरील वस्तीत राहणारं एक अत्यंत गरीब असं कुटुंब. काबाडकष्ट करावं, तेव्हा खावं. नाहीतर कधी पाणी पिऊन उपाशीच जगावं, असं त्याच्या कपाळी लिहिलेलं. अशा निर्धन आईबापांच्या पोटी, असं अत्यंत रुपसंपन्न अर्भक जन्माला घालून, ह्यात देवाला काय साधायचं होतं? देवाचं कोडं ते, मानवाला कळणार थोडं? ते सारं त्या देवालाच ठावं!

तसा वणंदगाव म्हणजे शंभर दोनशे उंबरठ्यांचा गाव. गावात साऱ्या जाती-जमातींची घरं. घालून दिलेल्या पायरीप्रमाणं एकमेकांसाठी राबायला नि एकमेकाला पायरीप्रमाणं राबवून घ्यायला सदा तत्पर अशी तिथली माणसं. तिथला हा भिकु धोत्रे... जवळच्या दाभोळ बंदरावरील माश्यांच्या टोपल्या, बंदरापासून मार्केटपर्यंत धावत धावत वाहून आणण्याचं, मोठ्या कष्टाचं, श्रमाचं व अत्यंत दगदगीचं काम त्याला करावं लागत असे. तरीही तो होता पंढरीच्या वारकरीपंथाचा. माश्यांची टोपली वाहताना गळ्यातली पंढरीची तुळशीमाळ विटाळली जाऊ नये म्हणून, तो काळजीनं बाजूला काढून ठेवीत असे.

भिकु-रखमाचं होतं चंद्रमौळी घरच. पण म्हणतात ना, घराची कळा अंगण सांगतं. अगदी तसं. त्याच्या घरापुढं होतं एक लहानसं ओबडधोबड पण पवित्र तुळशी वृंदावन. त्याला लागूनच चाफ्याचं भरलेलं झाड. दुसऱ्या बाजूला तगरी फुलांची दोन उंच रोपटी, कर्दळी, कण्हेरीचीही झाडं लावलेली. झेंडू-मखमल सर्वत्र फुललेली. देवाच्या पूजेला नित्य ताजी ताजी नि सुंगधी फुलं लाभावीत म्हणून रखमानं आपल्या अंगणी फुलांचा हा प्रपंच मांडलेला. भिकू पंढरीच्या पांडुरंगाचा वारकरी, तर रुक्मिणी सीतासावित्रीप्रमाणं पतिपरायण अशी. नित्य उपासतापास करणारी, देवाला आळवणारी, देवाला साकडं घालणारी, पण अब्रूपाण्यानं जगणारी, सात्त्विक अशी साध्वी पतिव्रता होती.

त्या अर्भकाचं अजून 'ट्याँऽऽ ह्याँऽऽ... ट्याँऽऽ ह्याँऽऽ...' चालूच होतं. ते तसं सारखं रडत, आक्रंदन होतं. तरी भोवतीची माणसं त्याचं ते रुदन, ऐकत ऐकतच, आनंदानं जणू नाचत होती. जल्लोष करीत होती.

त्यात झोंबणारा पहाटेचा गार वारा सुटलेला, वाकळंच्या गरम उबेत झोपलेले शेजारीपाजारी 'ट्याँऽऽ ह्याऽऽ' च्या आवाजानं हळूहळू उठू लागलेली. वाकळ तोंडावर तशीच ठेवून, वाकळंतूनच ते एकमेकाला बोलू लागलेली, 'सुटली एकदाची बिचारी रुक्मिणी. कालपस्नं अवघडलेली... ह्या येळंला लई लई दमवलं बाळंतपन रखमाला...'

'व्हय वं... काल संध्याकाळपस्नं, सारी रात रखमा कशी माश्यावानी तडफडत हुती बगा... चांगलं नऊ महिनं, नऊ दिस भरलेलं. गर्भ उदरात पोसलेला.... लई अवघडली... कालपस्नं येणा घालत हुती...'

रखमाच्या नवऱ्यानं हे आधीच हेरलेलं. आळा बगून पेंडी बांधावी, म्हणून आधीच गावच्या सुईणीला घरी बोलावून घेतलेली...

तशी रुक्मिणी... रखमा पहिलटकरीण नव्हती. तिला पहिली एक मुलगी आक्का नावाची झालेली. आता आईच्या जवळच बसून ती राहिलेली. रात्री नऊ-दहा-अकरा वाजेपर्यंत शेजारणी आया-बाया रखमाजवळ बसून, तिला बोलून धीर देऊन जात होत्या.

रात्री अकरा वाजून गेल्यावर सगळीकडं निजानीज झाली. नाणु सुईण व शेजारची जिव्हाळ्याची ठमाकाकू तेवढ्या रखमाजवळ शेवटी राहिलेल्या. रखमाईची लहान मुलगी आक्का पेंगळून झोपी गेलेली. घराभोवती, भिकू मात्र घारीसारखा तळपत होता. रखमाच्या काळजीनं त्याचा जीव खालीवर होत होता. 'पांडुरंग...' 'पांडुरंग...' सारखा आळवीत होता.

रात्री बारानंतर रखमाच्या पोटात असह्य वेदना होऊ लागल्या. रखमा जोरजोरानं कण्हू लागली. कुथू लागली. भिकूला राहावेना. त्यानं नाणु सुईणीला बाहेर बोलावून हळूच विचारलं,

'नाणुमावशे, जमल ना, हुईल ना सारं बराबर. का हिला दापोलीला दवाखान्यात न्यावं लागेल? आमचं रयत बापू पाटील पाहिजी तर बैलगाडी देतो म्हणालेत... मला तिची तळमळ बघवत न्हायी...पांडुरंग... पांडुरंग...'

'भिकूऽऽ लेकाऽऽ, नाणु सुईण म्हणत्यात ना मला. गावच्या पाटील कुलकर्ण्यापासून ते कडंच्या मांगा-म्हारापर्यंत समद्यांची बाळंतपनं मीच एकटी करत्येय म्हटलं. माझ्यावर इसवास हाय की न्हायी तुजा? आताच सांग?'

'हे काय बोलणं झालं व्हय, नाणु मावशेऽऽ, इसवास असल्याबिगर का म्या बोलावलयं व्हय तुला? पर तिचं बाळंतपन लई अवघड म्हणून...'

'कितीही अवघड असलं, तर सवघड करायला म्या फंची हाय नव्हं! तुला त्याची नगं काळजी. ऐकलसं का? असा घराभवतीनं तू आता परदक्षणा घालत बसू नगस. पुरुषाच्या वासानं बाळंतपण अधिक दमवतं, तू तकडं त्या झाडाखाली असा दूर जाऊन बस.... तसं वाटलंच तर, हाक घालीन तुला. कसं? लई गुनाचा माझा भिकूऽऽ!'

भिकू तिथून मग मनातल्या मनात चरफडत पण नाइलाजानं दूर जाऊन घरापुढच्याच झाडाखाली घोंगडी टाकून बुंध्याला टेकून बसला. घराकडं एकटक लावून बघत. त्याची छाती अजून उडत होतीच.

बुंध्याला टेकून बसल्या बसल्या भिकू मनातल्या मनात विचार करू लागला. कोण कुठली रखमा नि कोण कुठला भिकू .... पण लग्न-बंधनानं जोडलेले हे दोन जीव... आता एकजीव होऊन गेलेत. रखमा तिकडे तळमळतेय, तर ती रखमा तळमळतेय म्हणून हिकडे भिकू असा तडफडतोय. देवानं काय हा 'पिरतीचा' गुंताळा केलाय... भिकूला संत तुकोबाचा अभंग आठवला -

"नाही काष्टाचा गुमान, गोवी भ्रमरा सुमन
प्रेम प्रीतीचे बांधले, ते न सुटे काही केल्या!...."

भिकू धोत्रे तसा दिसायला असा तसाच. पण गोरा गोमटा. कष्टानं शरीर थोडं काळवंडल्यासारखं दिसे. पण धोतर.... शर्ट.... अशी कोकणातल्यासारखी साधी राहाणी. टोपल्या वाहताना, तो डोक्याला टापरं बांधी... बस्स. तसा भिकू अडाणीही नव्हता. त्याला लिहिता वाचता येत होतं. तुकोबाच्या गाथांतील अभंग वाचून पाठ करीत असे. गाऊन अर्थ लावून तो सांगत असे. संत चोखोबा तर त्याला प्राणाहून प्रिय. चोखोबाच्या वारकरीपंथाचाच वारसा त्याच्या धोत्रे घराण्यानं चालविलेला. वर्षातून एकदा तरी 'आषाढी' नाहीतर 'कार्तिकाची' वारी करायची, असा त्या घराण्याचा रिवाज होता. त्याच्या वडिलानंच त्याला गाण्या-भजनाचं 'बाळकडू' बालपणापासून पाजलेलं.

त्या काळच्या जुन्या पध्दतीप्रमाणंच त्याचं रखमाशी बालपणीच लग्न झालेलं. त्याची माघारीण रखमा.... दिसायला सुंदर. लिंबुसारखी गोरी गोरीपान. वागायला मेणासारखी गोड गोड छान. संसाराच्या तापानं वाळलेली दिसायची. पण जिथल्या

तिथं. साधंच जाडंभरडं लुगडं, साधीच चोळी. हातभरून मात्र काचेच्या बांगड्या... गळ्यात मंगळसूत्रमणी... काळी पोतं फक्त. भिकूचं घराणं वारकरीपंथाचं, तर रखमाचं घराणं रामानंदपंथी, संतांची ही 'घराणी' चालविणारी अनुयायी मंडळी म्हणजे भिकू-रखमाच्याच महार जातीतील सारी होती. त्या वेळी इंग्रजी राजवट होती. मुळातच महार ही इमानदार शूरवीरांची जात म्हणून ओळखली जाणारी. महारांचा हा इतिहास धूर्त इंग्रजांनी पूर्ण जाणलेला. महारांची लष्करात भरती करून घेतली. आणि लष्करात प्रवेश मिळाल्यामुळे मराठी व इंग्रजीचे प्राथमिक शिक्षण त्यांना सढळपणे मिळू लागले. त्या शिक्षणाच्या जोरावर, आधीच जातीवंत हुशार, वीरवृत्तीची महार जमात, लष्करात मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या जागा भुषवू लागली. मग इतरांप्रमाणेच त्यांच्या हुद्याप्रमाणं दापोली लष्कर कँपमध्येच मोठमोठे बंगले त्यांनाही रहावयास मिळू लागले. त्यामुळं सारा दापोली लष्कर कँप परिसर म्हणजे अधिकाधिक भिकूच्याच जाती-जमातीतील लोकांनी गजबजलेला असे. सुशिक्षित झालेले हे लष्करी अधिकारी, सेवानिवृत्त झाल्यावर, दापोली कँपमधील आपल्या प्रशस्त बंगल्यांवर राहायला येत. वृध्दापकाळी मनाला सुख-शांती लाभावी म्हणून, सहाजिकच ते देव-धर्माकडे, भक्तीमार्गाकडे वळत. त्यासाठी गुरूमंत्र घेऊन, एखाद्या गुरूचा पंथ स्वीकारीत. कुणी मग कबीरपंथी होत, कुणी रामानंद, कुणी नाथ पंथी, तर कुणी वारकरी पंथी. त्या त्या पंथाप्रमाणे ते ध्यान-धारणा करीत, आचरण करीत. आपापसांत परमार्थिक, आध्यात्मिक अशा गहन विषयावर ते वादविवाद करीत. रामायण, महाभारत, संतांचे अभंग व ज्ञानेश्वरी ह्या ग्रंथांचा त्यांचा दांडगा अभ्यास असे. जप-तपात, भजन-कीर्तनात ते सकाळ-संध्याकाळ निमग्न असत. त्यात दाभोळ बंदर कँप दापोलीपासून फारसे दूर नाहीच. त्यामुळे तो सारा परिसर म्हणजे या मंडळींचं संतसमागमाचं एक पावनतीर्थ झालेलं. लोकांतही भक्तीभाव संचारलेला, वाढलेला.

भिकू धोत्रेचं वास्तव्य तर याच परिसरात. वावरणं संतांच्या सहवासात. भिकूचा मूळचाच गोड गळा, भजनी गाण्यात सरावलेला, या संतसमागमाने तर अधिकच तयार झालेला. उठता बसता त्याच्या मुखी असे 'पांडुरंग... पांडुरंग...'

'***धाव घाली विठू आता चालू नको मंद***' असं आळवून आळवून म्हणत त्याचा डोळा लागला. मधून मधून तो दचकून उठे. आपल्या घराकडं पाहून, दुरूनंच कानोसा घेई. पुन्हा तेच भजन आळवीत, तेच देवाला साकडं घालीत पडून राही. पडल्या पडल्या डोळाही लागे.... पण सबंध रात्र रूक्मिणीला मात्र कशी ती झोप आली नाही. कशी येणार? पोटात असह्य कळा घातलेल्या. तिची मुलगी आक्का डुलक्या घेत झोपी गेलेली. सुईण मात्र तयारीची. डोळ्यात तेल घालून बसलेली. ठमाकाकूही खांबाला टेकून, रखमाची पाठ धरून बसलेली. रखमानं हंबरडा फोडलेला, 'देवाऽऽ आता लई झालं. कर बाबा आता मोकळी मलाऽऽ.... आता सोसवनाऽऽ मरतेऽऽ मीऽऽ.'

एवढ्यात कोंबड्यानं पहिली बांग दिली.

रखमाच्या कळा वाढत होत्या. वेदना असह्य होत होत्या. तरी ओठावर ओठ दाबून, रूक्मिणी कळा दाबत होती. तिची ती तळमळ नि हाल पाहून सुईण व ठमाकाकू देखील मनातून घाबरल्या. मोठ्या चिंतेत पडलेल्या.

इकडे भिकूच्याही जीवाची तगमग वाढलेली. त्यानं घराचा कानोसा घेतला, काही हालचाल नाही, म्हणजे रखमाची अजून सुटका झाली नाही. ती तळमळत असणार, म्हणून भिकू जीव तुटेल अशा शब्दांत आपल्या पांडुरंगाला आळवू लागला,

"प्रेमळ माय तू विठाई माऊली
धाव तू पाव गे, पाहतो वाटुली..."

एक एक घटका युगासारखी लोटत होती. सैतानासारखी भेडसावीत होती. एवढ्यात कोंबड्यानं दुसरी बांग दिली.

सुईण बोलली, 'ठमाताई पहाट झाली वाटतं?'

'कवाऽऽ ची!' ठमाकाकू दीर्घ श्वास घेत काळजीनं उत्तरली, 'अगोऽऽ बाई देवळात काकड-आरतीबी चाललीया नव्हं... त्ये बगा.... ऐकू येतीया का?.... जात्यांची घरघरबी सुरू झालीया.... ऐकू येतीया?'

'येतीया!' सुईण दीर्घ श्वास सोडत बोलली.

त्याच वेळी रूक्मिणीला ओटीपोटी पिळवटून जबरदस्त कळ आली. सुईणीनं चपळाई केली. रखमांच्या पोटातलं बाळ तिनं अलगद हातावर धरलं.... फुलासारखं उचललं.

या बाळाचा जन्म झाला तो १८९९ सालचा काळ असावा. निश्चित जन्म-तारीख माहीत नाही.

आईपासून दूर झालेलं ते बाळ आक्रंदून रडू लागलेलं....

'ट्याँऽऽ ह्याँऽऽऽ... ट्याँऽऽ.. ह्याँऽऽऽ!'

रूक्मिणीचं अंग कसं घामानं चिंब भिजलेलं होतं. वेदनांनी खूप त्रास झाल्यानं, ती दमलेली होती, तरी ती अधिरतेनं पाहात होती.... इतक्या कष्टानं, सायासानं तिला लाभलेलं ते 'फळ...' ती निरखू इच्छित होती. असं पाहातच तिनं सुईणीला क्षीण आवाजात विचारलं,

'मुलगीच ना वोऽऽऽ!'

'हो... हो...मुलगीच झाली हो!' ठमाकाकू तोंड वेडवाकडं करीत, आपली नापसंती व्यक्त करीत मध्येच बोलली.

रखमानंही आपलं तोंड नापसंतीनं दुसरीकडं वळवलं. अन् उदासवाणे डोळे मिटून ती शांत पडली. सुईण उमजून बोलली,

'मुलगी झाली म्हून काय झालं गोऽऽऽ बोल काय झालं? मुलगा काय अंबारीत बसवतो नि मुलगी काय त्या अंबारीतनं ढकलून देतेय गोऽऽऽ? बोल? तसं पाहिलं तर गोऽऽऽ आईबाला बघते मुलगीच वोऽऽ. मुलगा होतोय आपल्या बाईलीचा दास...'

'ट्याँऽऽ ह्याँऽऽ ट्याँऽऽ ह्याँऽऽ....'

जन्मलेल्या अर्भकांच आक्रंदन चालूच होतं. सुईण बोलली, ठमाबाई... चुईकी कुठं मिळती काय बगा...वार पडली... नाळ कापाया होवी. चुईकी आणाऽऽऽ.

'हीऽऽ घ्याऽऽ रातीपास्नं जपून ठिवलीया म्या...' ठमाकाकू उतरल्या. नाळ कापीत कापीत सुईण बोलतच राहिली,

'बगा वो... ठमाबाई... बगा जरा... या पोरीचा नखरा. कशी परीगत सुंदर सुंदर इवली इवली.... फुलागत कोमल कवळी कवळी.... ठमाबाई, असं पोरीकडं भान इसरुन बगत काय राहिलायसा... घंगाळ वाजवा घंगाळ... आनंद गगनात घुमवा... गाव सारं जमवा...'

ठमाकाकू घंगाळ शोधीत शोधीत म्हणू लागली —

'बगा... बगा वोऽऽ आभाळी तांबडं फुटू लागलंय... घरोघरी जाती घुमाया लागलीत. देवळात आरती म्हणाया लागलीत... अशा शुभ येळंला पोरीचा जलम झालाय ऽ ऽ'

ठमाकाकू बाहेर येऊन घंगाळ वाजवू लागली.

'हौसे येऽऽ हौसे... आगं... ऊठ... रखमाच्या घरी घंगाळ वाजतंया... बाळंत झाली बग... सुटली एकदाची.' शेजारणी कुडाला कान लावून कुजबुजू लागल्या.

'आरंऽऽ घंगाऽऽळ वाजतंऽऽ य ऽऽ आपल्याच घरापुढंऽऽ'

घंगाळ वाजत असलेलं ऐकून, भिकू असं ओरडत ठणकन् उठून बसला. घराकडं त्यानं बारकाईनं कान लावला.

'ट्याँऽऽ ह्याँऽऽ ट्याँऽऽ ह्याँऽऽ' अर्भकाचा हा, 'टाहो' त्याच्या कानी आला. तो स्वतःच मग 'ट्याँऽऽ.... ह्याँऽऽ.... करीत आनंदानं ओरडत नाचू लागला, 'देवाऽऽ पांडुरंगाऽऽ माझ्या रखमाची सुटका केलीस म्हणायची... देवाऽऽ, पांडुरंगा, तुझं हे उपकार मी किती मानू? किती वानू?'

आणि तो तिथंच आनंदानं गात नाचत राहिला.

रखमा परत डोळं उघडून आपल्या मुलीकडं एकटक पाहू लागली. सुईण बोलली,

'अगं, अशी एकटक लावून काय बगतेस? शंभर नंबरी सोनं हाय सोनं... ही इवली इवली मुलगी म्हंजी, भारताची भरली भरली कणगी हाय... आईला मिळणार सोन्याचा घागरपेटा, नि बापाला मिळणार जरीचा मंदील... ठमाबाई... बाळ - बाळंतिणीच्या आंघोळीचं काय केलंय?'

'पानी तापून तयार हाय... तुमी नुसत्या उठा...'

बाळ-बाळंतिणीला सुईणानं रीतसर आंघोळ घातली. त्यांना निजवत सुईण बोलतच होती, 'ठमाबाई, त्या भिकूला उठवा... बोलवा... म्हणावं, तुला मुलगी झाली.... हत्तीच्या अंबारीत बसून, साऱ्या गावाला साखर वाट म्हणावं...'

'हत्तीच्या अंबारीत बसून साखर...'

'ठमाबाई, काय झाल... बोलायचं आपलं तसं... त्यासाठी मोजायचं असतं चार चव्वल थोडंच... अवं, मातीच्या माठातलंच पाणी, पण थंड सरबत म्हणून प्यायचं... सुईण परत आठवण करीत म्हणाली, ठमाबाई, भिकू अजून कसा आला न्हायी ? परत घंगाळ वाजवत, त्येला हाक द्या... साखर वाटा.'

घंगाळ वाजवीत परत ठमाकाकू भिकूला बोलवू लागली,

'भिकूऽऽअरे ऽऽ ये भिकूऽऽ'

बाहेर सारं भगाटलं होतं. सारं स्पष्ट स्पष्ट आता दिसू लागलं होत. ठमाकाकूलाही दिसू लागलेलं. त्या झाडाखाली रूक्मिणीचा भिकू एकटाच आनंदानं नाचत गात होता.

"वानू किती रे सदया, विठूराया दीनवत्सला"

ठमाकाकू मग जास्तच मोठ्यानं हाक घालीत बोलली,

'अरेऽऽ येऽऽ भिकूऽऽऽ काय झालंय रं तुला ? असा काय नाचाय लागलायास... बस्स तिथंच तसा नाचत.'

ठमाकाकू घरात गेली. एवढ्यात शेजारणी जमू लागल्या. घरात सुईणीनीचं, ठमाकाकूचं चाललेलं बोलणं त्या ऐकू लागल्या.

'अगोऽऽ ही लेक म्हणजे असतं जाईचं नाजूक फुल. त्येच्या नुसत्या सुगंधानं येडं व्हावं.'

'पण म्हणत्यात, लेकीचा जनम जसा गाजराचा वाफा... माया लावून काय त्येचा नफा.'

'असं म्हणून दुनिया कशी चालंल ?'

'लेक हाय म्हनून ही दुनिया चाललीया. रानच न्हाय तर, पिक येईल कुठून ? लेक म्हंजी रत्नांची खाण. या या खाणीतून ही... ही रत्नं जन्माला येत्यात. खाणचं नसंल तर कुठली ही रत्नं.'

'व्हय.... व्हय... खरं हाय तुमचं...'

जमलेल्या शेजारणी खळाळून हसत बोलल्या. जन्मलेल्या मुलीचं कौतुक चाललं होतं.

'पोरगी कशी चांदणीवानी हाय. दिव्याशिवाय उजेड पडलाय.'

'आंबा मोहरला गं पानोपानी... उगवली आज सुक्राची चांदणी.'

'चांदणी उगवलीया.... दिवा मालवा गं बायांऽऽनोऽऽ!'

'दिवा हायचं कुठं... तिचाच उजीड पडलाय नव्हं!'

परत साऱ्याजणी कौतुकानं हसू लागल्या. सुईण बोलली, 'ठमाबाई, शेजारणी जमल्या... साखर वाट म्हणावं भिकूला. कुठयं तो भिकुऽऽऽ ?'

ठमाकाकूनं बाहेर येऊन जरा जोरात, काहीशा रागाने परत भिकुला हाक घातली, 'येऽऽऽ भिकु आरं, तिकडं काय नाचत बसलायास. जरा हाकडं ये कीऽ ऽ'

'ठमाकाकूऽऽ मी येईल... पण नाणूमावशीची परवानगी पाहिजेऽऽऽ'

'आरं, नाणू मावशीनचं मला सांगितलयं, जरा भिकुला बोलावून घे म्हणून... येऽऽ येऽऽ परवानगी हायऽऽ'

भिकू धावतच ठमाकाकूजवळ आला नि म्हणाला,

'रखमाची सुटका झाली. काय झालं ?'

'मुलगी झाली!'

'मुलगी! वा... वा... देवा पांडुरंगा तुझी किरपा... तु दिलंस, ते घेतलं पाहिजी... पांडुरंग.... पांडुरंग....'

'हे बघ, पांडुरंग ठेव बाजूला जरा... साखर आण अगुदर.... परथम थोडी देवापुढं ठेव... मग साऱ्यांना वाट. कसं? दिस उगवल्यावर पाहिजे तर जिलेबी आणून वाट साऱ्यांना.'

'जिलेबी बी आणू या की... तुम्ही सांगावं नि आम्ही न्हाय म्हणावं. असं कंदी झालंय? काकू... कालच साखर आणून ठेवलीया... पण मी घरात येऊ शकतो ना?'

'ये आत... पुरं कर नखरं. शोध साखर. वाट साऱ्यांना.'

भिकू साखर शोधू लागला. रखमानं कुठं ठेवली, ती सापडेना. घरातलं बोलणं त्याच्या कानावर येऊ लागलं. नाणू सुईण बोलत होती, कशी सोन्यासारखी हाय वो ही मुलगी... सोन्याचा वळसा चाखवा हो मुलीला. रखमा तुझ्या गळ्यातलं डोरलं दे बगू जरा... सहाणेवर सोनं उगळून चाटवते, तुझ्या या लेकीला.... सारा जनम सोन्याचा होऊ दे तिचा.... दे बगू. सोन्याचं डोरलं.... गळ्यातल्या डोरल्यात सोन्याचा एकही मणी नाही, हे माहीत असूनसुद्धा मंगळसुत्रावरुन रखमा हात फिरवीत राहिली. गळ्यात होतं फक्त मंगळसुत्रात गुंफलेलं सौभाग्याचं काळं मणी. रखमा पुटपुटली,

'नाणू मावशी.... माझं डोरलं... डोरल्यात न्हाय...'

'समजलं....' असं म्हणत लगेच ठमाकाकूनं आपल्या गळ्यातला सोन्याचा सर काढून देत सुईणीला म्हणाली,

'हा माझा सर चालेल का?'

'का नाही चालणार? तू तर या बाळाची आजी लागतीयास?'

'व्हय... माझ्या नातीला सोन्याचा वळसा चाटवा वोऽऽऽ. आमच्या जातीतील मुलांना कोण चाटवतंय सोन्याचा वळसा... पण या बाळीच्या नशीबानं तुम्ही भेटला.... सोन्याचा वळसा चाटवा... माझा सर हिरा-माणकांचा होऊ दे!'

रखमाच्या डोळ्यांत त्या वेळी चटकन् पाणी आलं. टप्टप् ओघळलं. सुईणीला ते दिसलं. ती लगेच म्हणाली,

'रखमे.... अगं.... येडे.... आनंदाच्या परसंगी असं पाणी काढू नगंस. आज सोन्याचा दिस सोन्याच्या पावली उगवलाय.'

ठमाकाकूच्या सरातील सोन्याचे मणी सहाणेवर घासत घासत नाणु मावशी पुढं सांगू लागली,

'माझा ह्यो सुईणीचा अनुभव हाय. दिस उगवता उगवता जलमलेली पोरं... आईबापाचा जलमबी उजळ करत्यात.'

'त्यात ही मुलगी अक्षी राजबिंडी दिसते वोऽऽ गोरीगोरीपान... फुलासारखी छान!'

'अगदी खरं...' अगदी खरं जमलेल्या साऱ्याजणींनी उचलून धरलं.

'घ्या साखर.... अगं राजाची राणीच होईल हो ही.' नाणुमावशी स्वर उंचावून आत्मविश्वासानं बोलली.

'साखर पडो तुझ्या तोंडात, नाणुमावशेऽऽऽ' मध्येच रखमाई आनंदानं उर भरून बोलली.

'साखर तोंडात पडो कशाला? परत्यक्ष घ्याच की साखर नि घाला पाहिजी तेवढी तोंडात.... घ्या... तोंड गॉड गॉड गुळमाट... घ्या साखर... घ्या साखर... पांडुरंऽऽग.... पांडुरंग....'

मोठ्या थाळ्यात साखर घेऊन भिकू मोठ्या आनंदानं, जमलेल्या साऱ्यांना तो साखर वाटू लागला. एव्हाना बऱ्याच शेजारणी व शेजारी मुलं-मुली जमल्या. आनंदी आनंद उसळलेला.

तेवढ्यात सुईणीनं अर्भकाच्या जिभेला सोन्याचा वळस चाटवला. ती आनंदून बोलली,

'बगा, सोन्याचा वळसा चाटवला. झाला किनई, लेकीचा जलम सोन्याचा!'

'अवोऽऽ असते एकाएकीची वैशी... साखंरच खानार, त्येला देव देनार'

'हे मातुर अक्षी खरं. एवढी बाळंतपन मी करतेय, पन सोन्याचा वळसा चाटवयचं माझ्या कंदी, सोताहून ध्येनात येत न्हाय. पण या पोरीच्या येळंला, कसं ध्यानात आलं. वाटलं, ह्या पोरीला सोन्याचा वळसा चाटवावाच.'

'एकाएकाचा जलम असतू, चांगल्या महुतरावर... त्येचं घडत जातं असं चांगलंच!'

भिकूनं मोठ्या आनंदानं सुईणीच्या ओटीत ओंजळभर शिधा घातला. ती आनंदून बोलली,

'मुलगी मोठी पायगुणाची होऽऽ बगा, सगळीकडं कसा आनंदी आनंद चाललाय... सगळ्याजनी बगा कशा हसतात, खिदळतात. भिकू, येते रे... संध्याकाळी. सहज चक्कर मारीन हं मी.'

'का? पोरीनं येड लावलं की काय तुला मावशे?'

'तसं म्हण पाहीजे तर! येड्या लाडीनं येड लावलं. खरं!'

'बघा, हा नागू शिंगे.. शिंग वाजवायला कसा आला आपोआप?'

'व्हय! कुणी न्हायी बोलावलं मला, माझं पाय हाकडं वळलं आपोआप!'

'ऐकलं?'

'हो! असते एकाएकीची वैशी!'

• • •

२

का कुणास ठाऊक, घरादारात, शेजाऱ्यापाजाऱ्यांत, मुलांमुलींत, रखमाच्या मुलीच्या जन्मापासून कसा आनंदीआनंद चाललेला. घरापुढील मोगऱ्यावर रात्रीतून एखादं टपोरं फुल उगवावं, त्याचा सुगंध साऱ्या वातावरणात पसरावा, तसं रखमाला 'एक सुंदर मुलगी' झाल्याची गंधीतवार्ता साऱ्या वणंद गावच्या गावकुसाबाहेरील वस्तीत कशी दरवळली. परिमळलेली. वस्तीत राहणारे कसे त्यामुळे उत्साहित झालेले...

सकाळ होताच, शेजारच्या लहानसहान पोरा-टोरांनी शेजारच्याच लिंबावर, कसं मर्कटासारखं सरसर चढून त्या लिंबाच्या डहाळ्या खाली पाडलेल्या, गावात चाल असते ज्या घरी 'बाळंतीण' होते; त्या घराच्या दारावर लिंबाच्या डहाळ्या लावतात. त्याच घराच्या उंबरठ्यावर एक पाण्याचं भरलं भांडं ठेवून, त्या पाण्यात लिंबाचा पाला टाकून त्या भांड्यात एक-दोन लिंबाच्या डहाळी ठेवतात. एवढ्यासाठीच की, या 'बाळंतीणी'च्या घरात येणाऱ्यानं त्या लिंबाच्या डहाळीच्या सहाय्यानं भांड्यातील लिंबजलाचं सिंचन, स्वतःच्या पायावर, तसंच अंगावर करुन घेऊन, पूर्ण शुचिर्भूत होऊनच, मग त्या घरात प्रवेश करावा. म्हणजे त्या 'बाळ-बाळंतिणीला' त्यामुळं कसलीही बाधा होत नाही. शेजारच्या मुलांनी स्वयंस्फूर्तीनं तशीही खास व्यवस्था भिकूच्या घरी करुन ठेवलेली... एवढ्याशा लहान सहान मुलांनी? का न कळे, अशी कोण भिकू धोत्र्याच्या घरी 'कोणा राजाची राणी' जन्मास आली म्हणून हे चाललंय?

मोठ्या तरुण मुलांनीसुद्धा, कसल्या आनंदाच्या भरात, कुणास ठाऊक? पण दूरदूर रानावनात जाऊन, उन्हातान्हात खपून, आंब्याच्या डहाळ्या भिकू-रखमाच्या घरासाठी तोडून आणलेल्या. त्यांच्या घरापुढील लतावेलीच्या उघड्या मंडपावर व चंद्रमौळी घरावर त्या आंब्याच्या डहाळ्यांचा पाला असा बेमालूम अंथरलेला... जणू हिरव्याहिरव्या 'पताका' नि 'फराऱ्या' लावल्यासारख्या भासत असलेला.... का कुणास ठाऊक, रखमा भिकूच्या त्या घरात कोण अशी 'राजाची लेक' जन्मास आलीय म्हणून हा आनंदोत्सव साजरा केला जातो आहे?

गावचा नागू शिंगेच घ्या... मुळात किती आळशी नि किती चुकार... दहांदा बोलवायला गेलं तर 'आलू चलाच' म्हणणार. पण नाही तो पहा, कसा ना बोलावता, ना सांगता आपलं रणशिंग घेऊन येऊन रुखमाईच्या दारात वाजवत बसलाय, किती तरी वेळ! कुणी तरी त्याला टाकून टोकलचं,

'काय शिंगेमामा, स्वारी आज लई खुशीत दिसतेय. निवांत शिंग वाजवत बसलाय! कवाच नव्हतं, गाढवाला पवतं?'

'काय कळत न्हाय बाबा... पण रखमाला पोरगी झाली एवढं कुठं ऐकलं रं ऐकलं... मला कुणी तरी हाताला ओढून आणून हाथं शिंग वाजवत बसवलंय बघा... आकाशीची कुणी तरी पतिव्रता देवीबिवी या पोरीच्या रुपानं धरणीवर आवतरलीया की काय, कोण जाणं! पर पोरीनं जीव भारुन टाकलाय खरा!'

नागू शिंगेचं काय घेऊन बसलाय... आई रखमादेखील कशी भारल्यासारखी त्या पोरीकडं एक टक लावून पाहत बसलेली... पापणीदेखील हालत नव्हती. असं पहाताना, गरोदरपणात तिला नित्य पडत असलेलं ते एकच स्वप्न... त्यामुळं तिला परत परत आठवू लागलं... ते स्वप्न... त्या स्वप्नात... अशीच एक सुंदर मुलगी तिच्या पोटी जन्माला येत असे. सारेच जण तिला पाहून असेच म्हणत असत.

'रखमा, तुझी ही मुलगी राजाची राणीच होणार बघ!'

'तुमच्या तोंडात साखर पडो! रखमा साऱ्यांना मग आनंदून असंच म्हणत असे, अगदी असंच?'

आणि खरंच, स्वप्नातल्याप्रमाणेच, एक दिवशी ती मुलगी वयात येते. तारुण्यानं मुसमुसते. मग तर ती अधिकच सुंदर दिसू लागते. जणू स्वर्गाची स्वप्नील परीच!

गुलबक्षीचं रोपटं फुलावं, त्याचा सुगंध चौफेर भरावा. परिसरात दरवळावा, अगदी तसं तिचं झालेलं. तिच्या त्या अप्रतिम सौंदर्याची कीर्ती ऐकून, एका राजानं, आपल्या राजपुत्रासाठी तिला मागणी घातली. त्यासाठी तो आपल्या हत्ती-घोडेस्वार, पायदळ इत्यादी लवाजम्यासह रखमाच्या दारी आलेला... ते पाहून रखमाच्या आनंदाला व आश्चर्याला पारावारच राहत नाही. ती आपल्या नवऱ्याला मोठ्या आनंदानं, कौतुकानं सांगू लागली,

अवोऽ ऐकलं का... राजानं आपल्या मुलीला मागणी की हो घातली... हे बघा हे... हत्ती अंबारी... आपल्या दारी झुलू लागलीया... अवोऽऽ ऐकलं का... राजानं आपल्या लेकीला राजपुत्रासाठी पसंत की होऽऽ केली... चांगल्या चांगल्या घराण्यांतल्या मुली चालून आलेल्या, त्या साऱ्यांना डावलून राजानं आपल्याच मुलीला पसंत केली... सुपारी फुटली... अन् मुलीच्या जन्मापासून 'ही मुलगी राजाची राणी होणार' हे लोकांनी केलेलं भाकीत असं खरं ठरलं... अवोऽऽ ते बगा ना... आपल्या मुलीचं लगीन किती थाटामाटानं चाललंय... बगा... ऐका ऐका... किती वाजंत्री... रणहालगी... बँड... लेझीम, दांडपट्टा... ताशेऽऽ व्हलर बाजेऽऽ हत्तीवरनं सनई-चौघडा वाजतो आहे... बघा... लग्न झालं, आता वरात चाललीय... वरातीसाठी रथाला शंभर घोडे की हो जुंपलेत... बघा... लग्नानंतर राजानं राजदरबार भरविलाय... सरदार, दरकदार, हवलदार, चोपदार, ठाणेदार, भालदार साऱ्या साऱ्या मानकऱ्यांना राजानं दरबाराचं आवातणं दिलंय... आमा उभयतालाबी आवातणं दिलंय... सारी सारी दरबारी मानकरी जमलेत... सारा दरबार कसा माणसांनी फुलून गेलाय... आपल्या चंद्रमौळी झोपडीतील आपली ही मुलगी... त्या एवढ्या मोठ्या राजवाड्यात जाऊन, 'राजाची राणी' म्हणून गादीवर बसलीया हे जगायेगळं व्हईक झालंय... ऐकाऽऽ सर्वांनी तिच्या व युवराजाच्या नावानं एकच जल्लोष केला... एकच जयजयकार केला... साऱ्या दरबारात, साऱ्यांसमक्ष त्या राणीची आई रखमा हिच्या गळ्यात सोन्याचा उंची घागरपेटा घातला. राणीचा पिता भिकू धोत्रे डोईला मानाचा जरतरी मंदील चढविला...

गरोदरपणात रखमाला असं स्वप्न सारखं पडत असे. तेच स्वप्न तिला आता जसंच्या तसं आठवू लागलं... तिला परत दिसू लागलं. तिच्या त्या स्वप्नातील ती राणी होणारी मुलगी होती ती अशीच चेहऱ्या मोहऱ्याची... स्वप्नात आपण तिची आई झालेली... ती आपली लेक स्वप्नातल्याप्रमाणेच, ही जन्मलेली आपली लेक पाहूनसुद्धा सारे लोक आता असंच बोलतात, 'ही मुलगी राजाची राणी होणार... राजाची राणी होणार...'

रखमा मनोमनी पुलकित होऊन, आपल्या या मुलीचा चेहरामोहरा सारखा न्याहाळीत राहू लागली. न्याहाळता न्याहळता तिचा डोळा लागला. पण खूप उशिरा.

'आक्काऽऽ येऽ आक्काऽऽ अजून झोपल्यात काय सारीजणं? दिस कासराभर वर आलाय... भावोऽजी, आवोऽजी, कामावर गेलेत वाटतं...'

दार लावलेलं पण उघडचं होतं. पुढं ढकलून, आत जात परत भाऊनं हाक घातली, 'आक्काऽऽऽ ये आक्काऽऽ'

अन् अशा सारख्या हाका रखमाच्या कानावर पडल्यानं, आवाज ओळखीचा वाटल्यानं, रखमा हळूहळू चावळून उठू लागली. डोळं उघडून सभोवार बघू लागली. बघते तो समोर तिचा मुंबईवाला धाकटा भाऊ उभा असलेला दिसला. डोक्यावर मोठं बांधलेलं गाठोडं नि हातात किटली घेऊन उभा असलेला. तिला आज पहाटेचं असंच स्वप्न पडलं होतं- तिचा मुंबईवाला भाऊ असाच अचानक घरी येतोय... तिला क्षणभर वाटलं, आपण त्या स्वप्नात अजून तर नाही ना? तरी ती बोलली, 'कोण? भाऊ... तू? खरंच तू आलायस?'

'खरं सांगू? खरंच मी आलेलो न्हायी!'

'तरीच!'

'तरीच काय... मला कोणी तरी माझ्या हाताला धरुन खेचून आणलयं.'

रखमाक्काच्या कुशीत एक लहानसं बाळ झोपलं असल्याचं त्यानं पाहिलं. म्हणाला, 'अरेऽऽ च्याऽऽ आपून तर परत मामा झालोय की... वाऽऽ वाऽऽ खरं सांगू आक्का दोन दिस झालं. तू सारखी माझ्या स्वप्नात येत हुतीस. मुंबईहून आलेलाच हुतो. तुझं बाळंतपण जवळ आलेलं मला चांगलं ठाऊक हुतं. रात्रभर स्वप्नात आक्का येतीया.... तवा वाटलं, कशामुळं का होईना, आक्का माझी वाट बघतीया. आतड्याला असं आतडं बोललं. काळीज हाललं. जीवाला वढ लागली. मुंबईहून खारका, खोबरी, साखर आणली हुतीच. ती घेतली. गावातनंच आंबेमोहर सुवासिक तांदुळ घेतलं. डिंक लाडू घेतलं. गावातच साजुक लोणी मिळवलं. त्येचं तुझ्या वहिनीनं तूप बनवलं. म्हटलं चांगल्या कामाला आता येळ कशाला? हे सारं सामान घेऊनश्यान तडक आक्काकडं जावं... वड लागली. त्याबिगर जिवाला चैन न्हाय पडायचा... आक्का, कदाचित् बाळंत झाली असंल. आमचा भावोजी कुठं भटकत असंल... वाटलं, आक्काचा संसार असाच नाचारगत. आणावं तवा पोटाला खावं. भावोजी, असा वारकरी. संसारात असून नसल्यासारखा... कामाच्या चार टोपल्या टाकून. भजान म्हणत फिरणारा... आक्काची जरुर जरुर ओढाताण... चालली असंल... त्या ओढीनं ओढून आणलं मला...'

असं बोलता बोलता भावाच्या डोळ्यात गंगा भरुन येऊ लागली. आक्काच्या डोळ्यांतली यमुना केव्हाच दुथडी भरुन वाहू लागलेली.

बाजाराच्या वाटं, भाऊ बहिणीला भेटला,

वळवाचा पाऊस, ढग अस्मानी फुटला,...

'नगं... नगं... डोळ्यातनं पानी काढू नगस अशी आक्का... पुढ्यात बाळ हाय तुझ्या...'

'भाऊ... आरं... हा भाऊ बहिणीच्या मायेचा दुधा-तुपाचा उमाळा हाय...'

घरासमोरचं चाफ्याचं झाड एकदम सळसळलं. भाऊ बहिणीची ही भावमय भेट बघून तर त्याला असं प्रेमाचे भरतं आलं नसेल ना?

एवढ्यात भिकू दारात आला. तो सुद्धा मनोमनी आनंदित होता. आत डोकावून पाहतो तो, बहिण भाऊ आपापल्या डोळ्यांतील मायेनं दाटलेलं अश्रू पुसत असलेली त्याला दिसली. तो तिथंच थबकला. बहीण-भावाचा मायेचा संवाद तो लांबूनच ऐकू लागला. रखमा भाऊला विचारीत होती; 'भाऊ, आता आपली आई कशी हाय रे? तिच्या छातीत अजून दुखतयं? बाबा आता खूप थकलं असतील न्हाय?'

‘आई आता चांगलीच बरी हाय. बाबा मात्र... वय झालं. सारखं खोकलत असत्यात... मी मुंबईहून त्येंच्यासाठी औषधं आणल्यात!’

‘लई गुणाच माझा भाऊ... असंच... असंच... आईबाला... बहिणभावाला बघत जा. देव तुला कशात कमी पडू देणार न्हाय. देवाचा न्याय हाय तसा. मानसाला ते उमगत न्हाय. आरं, आईबाला, बहीणभावाला असा बगशील तर, हा देव, तुझ्या घरी कुबेराला चाकरी करायला लावंल... हा, देवाचा न्याय हायच तसा... आज माझ्यासाठी, बहिणीसाठी तू असा धावून आलास, केवढा आधार दिलास तू मला... माझा आत्मा तुला आशिर्वाद देईल ना! अशा आशिर्वादाचं तुळशीपान पृथ्वी मोलाचं असतं... हे जल्मात तू इसरु नगंस...’

बहिण-भावाचा हा सुख-संवाद भिकू धोत्रे लांबूनच ऐकत होता. तो सुद्धा ‘आनंदाच्या डोही-आनंद तरंग’ प्रमाणे त्या मायेच्या डोहात पुरता न्हाऊन निघाला होता. त्याचंही डोळं कधी पाण्यानं भरुन आलेलं. आत येत भिकू म्हणाला, ‘काय बंबईवाले मेव्हण्यानू, तू कंदी आलास? तुला मी उद्या सांगावा देणारच होतू!’

‘सांगावा दिल्यावरचं यायचं असतं का? एका आतड्याला अशी वड लागली की, दुसरं आतडं असं दावं तोडून धावत येतंच की, त्येला सांगावा कशाला पाहिजी?’

‘व्हय... व्हय... जिथं प्रेमाचीच झाली भेटी... तिथं कशाला नसती उठाउठी. मी आज बघीतली... डोळं भरुन बघीतली... भावा-बहीणीची ही वेडी माया... आज माझे हृदय कसं भरुन आलयं बघ. अशीच माया ठेवा एकमेकांवर. काय मिळवायचं असतं मानवावं या जिंदगीत येऊन? आमचा पंढरीचा वारकरी पंथ हेच सांगतो. एकमेकाला येळपरसंगाला व्हायचं... एकमेकावर निष्काम माया-प्रेम करायचं-’

“तेची सर्वसुख, तेचि सर्व काही

जग निर्मियेले देवें, पाही याज साठी”

‘भाऊ आज मला लई लई आनंद झाला बघ. मला ही जन्मलेली, ही पोरगी लई पायगुणाची दिसते रे.’

‘असणारच बग. घरी धान्याचा कण नव्हता. त्यात मी अशी बाळंत झालेली. हिचा वडील कामावर जाऊन खर्ची आणणार, तवाच आमची चूल पेटणार हुती. पण तु असा अचानक देवासारखा धाऊन आलास.’

मध्येच भिकूला भजनाची लहर आली,

“नामा म्हणे जगी, लाभ अलभ्य झाला

हरि दिसला हो मज, तुमचिया रुपे...”

‘आक्का, मी बघतोय मघापासून... पन माझं डोळं काही हिच्यावरुन बाजूला वळत न्हायी... आक्का, माझी भाची लई लई सुंदर हाय बग. भावोजी, तुमी कायबी म्हना, छातीला हात लावून मी सांगतो, माझी ही भाची, राजाची राणीच व्हणार बगा...’

‘तुझ्या तोंडात साखर पडो... आरं, हिच्या जल्मापास्न सारी मानसं असंच बोलतात, ‘ही राजाची राणीच होणार!’

‘व्हणार... व्हणार... व्हणार!’ पाचामुखानं परमेश्वर बोलत असतू म्हणत्यात.

‘खरंच!’ आनंदानं हृदय दाटून रखमा बोलली.

मध्येच भिकूनं सांगायला सुरुवात केली,

'खरंच भाऊ, तुझी ही भाची हायीच तशी भाग्यवान. आज कामावर खर्ची मागून आणाया गेलू हुतू. मुकादमाला जोहार घातला. मुकादम बोलला, 'कामावर येत न्हायीस ?'

मी म्हटलं, 'घरी सकाळी बायकू बाळंत झाली जी. मुलगी झालीय.'

'मग काय विचार हाय तुझा ?' मुकादमानं मला विचारलं.

'खर्ची पाहिजे हुती जी.'

'खर्ची ? किती पाहिजी ?'

मी आपलं बोलावं म्हणून बोलून गेलो, 'पाच रुपये जी.'

'पाच रुपये ?'

मुकादमाला हा आकडा मोठा वाटला, तरी म्हणाला,

'पाच रुपये, अच्छा-अच्छा ! हे घे पाच रुपये.'

असं म्हणून मुकादमानं माझ्या अंगावर चलनी पाच रुपये भिरकावलं. मी सारं गोळा करुन मुकादमाला जोहार घालून निघालो.

परत मुकादमानं मला हटकलं, 'ये भिकूऽऽ इकडे ये असा... दूरदूर उभा राहा... शिवशील-शिवशील... हे बघ, तुला मुलगी झाली. पन मला तिचा शुभशकून झालाय. आज सकाळी सकाळीच मला असंच कुणीतरी हे पैसे चालून आणून माझ्या हातात दिलं... आज त्यातलं काही पैसे तुला मी असंच बक्षीस देतोय... अंगावर नव्हं, तसंच... दान... बक्षीस... फुकट... त्या पापाबद्दल ह्ये असं पुण्य मी जोडतोय. कसं ? जा. तुझी मुलगी मोठ्या पायगुणाची हाय. तिनवी घाल, पाचवी कर... बारसं घाल. तुमी गोडधोड खावा... लोकांनाबी खिलवा...'

'देव पावला ! मुकादमाला जोरात जोहार घातला नि अस्सा तडक धावत आलो.'

'खरंच, देव पावला. ह्या मुलीचा पायगुण फळाला आला.'

'रखमेऽऽ ऽ, परवा तिनवी घालू, लगेच पाचवी घालू. पाचवी झाली की, बारशाचा बार उडवू !' भिकू बोलला.

'भावोजीऽऽ माझ्या भाचीचं बारसं थाटामाटात करायचं. त्यासाठी माझ्याकडं तीन रुपये लागले.'

'भाऊ, किती रे करशील माझ्यासाठी !'

'तुझ्यासाठी... आता माझ्या या चिमुरड्या भाचीसाठी सुदीक... अरे, थोरली आक्का अजून झोपलीयाच वाटतं ? तिची आठवण न्हायी कुनाला... कळपात एक मेंढरु इसारलं. '

रखमाची थोरली मुलगी आक्का अजून एका बाजूला झोपलेली होती. तिला पाहून भाऊ म्हणाला, 'ह्या बाळीच्या कौतुक जगंत, आक्का चुकलीऽऽ'

सर्वजण गमतीनं हसू लागले. भाऊ थोडा गंभीर होत म्हणाला,

'पण आक्का, मला हिच्या बारश्यापर्यंत थांबता येणार न्हाय बग. सात दिसांनी माझी रजा संपेल. जावं लागंल...'

'व्हय नोकरी हाय तर, सारं हाय' भिकू बोलला.

'पन माझ्या भाचीचं काय नाव ठेवलंय, हे मातूर मला म्हमईला पत्रानं कळवायचं हं !'

‘तूच नाव सांग पाहिजी तर’ रखमाई म्हणाली.

‘मी सांगू...? नाव... नाव... पार्वती ठेवायचं. आवडलं? आपल्या आजीचं नाव चालवायचं. आक्का, पार्वतीचं बारसं राजाच्या राणी गत कसं धुमधडाक्यात घातलं पाहिजी हं!’

अन् भाऊमामानं ‘पार्वतीचा’ हळूच गोडसा गालगुच्चा घेतला.

• • •

३

‘**पो**रगी मोठी भाग्याची हो... सारी मानसं कशी झुलत्यात हो तिच्यासाठी...’

जमलेल्या शेजारणी, सुवासिनी आपापसांत गमतीनं बोलू लागलेल्या. बाळ-बाळंतिणीसाठी कुणी दुरुन पाणी आणीत, कुणी त्यांच्या आंघोळीसाठी पाणी तापवत, सुईण दररोज येऊन त्यांना आंघोळ घाली. कुणाचं अळंटळं नाही की कुरकुर नाही. सारं कसं आनंदानं, प्रेमानं नि अहमहमिकेनं चाललेलं... घरात एक एक मंगलकार्य विधीप्रमाणे पडू लागले...

तिनवी, पाचवी पुजली. पाचवीला तर भिकूने साऱ्या ज्ञातीबांधवांना पुरण-पोळीचं जेवण दिलेलं. जेवून जाताना एकजण म्हणाला, ‘भिकू पाचवी तर फसकलास घातलीस. मुलीचं बारसं...?’

‘तसं नव्हं मुलगी म्हणून...’

‘मुलगी म्हणून... आरं, मुलगी काय वाटेवर पडलेली असती व्हय? तीबी आईबाच्या काळजाचा एक तुकडा असतू नव्हं?’

‘व्हय तेबी खरंच.’

‘बारसं घालनारचं! जेवायला यायचं... आताच आवातणं देतो.’

सातवीला सटवाईची पूजा केली. बाळीच्या सटवाईची प्रतिकृती बांधली. कुंवारणी पुजून एक दिवशी बाळीच्या हातात दृष्टीचे काळेमणी घातले. पायात पंचधातूचे वाळे बांधले.

बारशाच्या आदल्या दिवशी भिकू धोत्रे- शेरभर तांदूळ, एक रुपया, एक नारळ, पानसुपारी एवढी बिदागी घेऊन, गावच्या भिकंभटाच्या वाड्यात गेला. वर्दी दिली.

दार उघडून भिकंभट बाहेर आले. भिकूनं लांबूनच त्यांना लवून जोहार घातला. आणलेली बिदागी त्यांच्या पायाजवळ ठेवली आणि नम्र होऊन दूर उभा राहिला.

‘कोण? भिक्या म्हार काय? का आला होतास रे?’

‘मुलगी झालीया जी मला...’

‘मुलगी? अर्थो हि कन्या परकीय एवं... भिकंभट उवाच’

‘तवा उद्या बारसं घालावं म्हणतो.’

‘उत्सव प्रिया: मनुष्या: भिकंभटनी आत हाक घातली, येऽऽ राम्याऽऽ राम्या... शिंदळीचा कुठे गेलाय?’

‘जी... जी...’ करीत रामा कुणबी गडी धावतच आला.

‘हे बघ भिक्यानं काय आणलं आहे ते बघ. घरात ते नेण्यापूर्वी जरा गोमुत्र त्याच्यावर शिंपड... शिवशिव बाधेल हो... मगच ते आत ने.’

‘तवा तिचं पोथीतलं नाव तुमाला इच्यारावं म्हणून आलूया... उद्या रविवारी बारसं घालावं म्हणतो.’

‘असं... असं... भिक्या, अरे! तू जरा या बाजूला उभा रहा बघू... तुझी सावली माझ्यावर पडेल रे... मग स्नानसंध्या केल्याशिवाय पंचांग हाती धरता येणार नाही.’

भिकू दूर सरत त्या बाजूला झाला आणि नम्रपणे हात जोडून भिकंभटापुढे उभा राहिला.

‘मुलीचं उद्या बारसं घालणार म्हणजे मुलीचा जन्म... भिकंभट आपल्या बोटावर वार मोजता मोजता बोलले, मुलीचा जन्म बुधवारी झाला असला पाहिजे.’

‘जी बराबर... बुधवारी पहाटेला... कोंबड्याच्या दुसऱ्या बांगेला.’

‘म्हणजे, पहाटे साडेपाचच्या सुमारास म्हण... असंच ना?’

‘असंच... असंच जी.’ भिकू उत्तरला.

‘शुभं भवतु... शुभं भवतु’ असं पुटपुटत भिकंभटजीनं पंचांग काढलं. पोथी सोडली. न्याहाळली. वाचली. लगेच स्लेट पाटी घेतली. स्लेट पाटीवर खूप वेळ त्यांनी बरीच आकडेमोड केली आणि भिकंभट बोलला,

‘भिक्या, ऐक! फलं भाग्यानुसारेण... तुझी मुलगी चांगल्या राशीवर, उत्तम ग्रहावर जन्मली आहे, भवन्ति भाग्येन सुखानि देहिनाम्... ही मुलगी वृत्तीनं सालस आहे, सुशील आहे, स्वाभिमानी आहे... भवितव्यता बलवती... सारा संसार स्वतः सांभाळेल. पतीची खूप सेवा करील... पतीच्या कार्यात सहाय्य करील. साध्वी पतिव्रता म्हणून तिचं नाव होईल. शुभं भवतु. ज्योतिष शास्त्राप्रमाणे अशा शुभ व उच्चीच्या ग्रहावर जन्मलेल्या मुलींना राजघराण्यातील नवरा मिळत असतो. तुझ्या जातीत कुठला असणार राजा म्हणा! तरी पण ह्या मुलीला नवरा मिळेल तो राजासारखा मोठा कर्तबगार, शूरासारखा महत्वकांक्षी, नाही तर तो खाऊन पिऊन सुखी असणारच असणार. हे ज्योतीष शास्त्र आहेऽ तंतोतंत नसले, तरी बारा आणे सत्य होणारच. ‘भवितव्य भवत्येवऽ’ मुलीचं तसं भाग्य आहेच. तिचं पोथीतलं नाव ‘भ’ या अक्षरात येतं तेव्हा तिचं नाव भऽ भऽ भागीरथी ठेवाऽ भाग्याची भागिरथीऽ शुभं भवतुऽऽ शुभं भवतुऽ।’

‘साखर पडो देवा... तुमच्या तोंडात... तुमच्या मुखानं परत्यक्ष देव बोलतो जी.’ ‘भाग्याची भागिरथी...’ असं म्हणत मोठ्या आनंदानं पण लांबूनच भिकंभटजीला परत जोरदार जोहार ठोकून, भिकू घराकडं धावत सुटला. तोंडानं सारखं पुटपुटतं, ‘भाग्याची भागिरथी... भाग्याची भागिरथी... माझी भाग्याची भागिरथी...’

धावत धावत येत आनंदाच्या भरात भिकू तसाच एकदम घरात घुसला. तोच रुक्मिणी ओरडली, ‘ओ... हो... हो... हो... थांबा तिथचं. तुमच्या गाडीला बिरीक लावा. आता पायावर लिंबाचं पाणी शिंपडून मगच आत यावं. इसरलासा व्हय? बाळी जन्मलीया. तवा, बाहेरचा इटाळ चंडाळ बाहीर ठिवूनच आत यायला होवं.’

‘चुकलो... चुकलो...’ चुक झाली, म्हणून स्वतःच्या गालावर चापट्या मारीत भिकू बोलला.

लगेच घरावरली लिंबाची एक डहाळी घेऊन, लिंबाचं पाणी भरुन ठेवलेल्या भांड्यात ती डहाळी बुडवून भिकूनं मग एक दोनदा आपल्या अंगावर व पायावर झडून त्यातलं शुद्ध पाणी शिंपडून घेतलं. असा शुचिर्भूत होत ‘शद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी’ हा अभंग गुणगुणत तो घरात प्रवेशला. पहातो तो, रुक्मणी आपल्या कुशीतल्या मुलीला, बाळीला सारखी निरखीत, एकटक न्याहाळीत असलेली त्याला दिसली. भिकू लटक्या रागानं तिला म्हणाला, ‘अगं... अगं... किती बघायचं ते... तुबी अशी लेकीच्या तोंडाकडं सारखी बघत राहिलीस, तर तिला दिष्ट न्हाय का लागणार?’

'आईची कंदी दिष्ट लागती व्हय मुलाला ?'

'मग बा ची लागती वाटतं ? काल तू मला काय म्हणालीस ? असं बाळीकडं सारखं बघू नगासा, दिष्ट लागील. तशी तुझी दिष्ट लागलीच असणार. माझ्या लेकीची मी दिष्ट काढणार !'

'अवं... अवं... तुमी नि दिष्ट काढणार ?'

'का ? मला दिष्ट काढता येत न्हाय, असं म्हणतीस काय ? अगं, मी जरी वारकरीपंथाचा असलो, तरी तुझ्या रामानंदपंथाचं सारं मंतर-तंतर मला येतयां म्हटलं...'

लगेच गाडग्यातलं मीठ-मिरची घेऊन, भिकू दिष्ट काढण्याचा मंत्र जपू लागला. 'भुताची, खेताची, वाटंची, तिटंची, आल्याची, गेल्याची, सगळ्यांच्या डोळ्यात माती पडू दे... माझ्या बाळाची दृष्ट लागलेली जाऊ दे...'

आणि हातातल्या मीठ-मिरच्या बाळीवरुन तीनदा ओवाळून त्यानं त्या चुलीत टाकल्या. म्हणाला, 'बघ... बघ... रखमे, मिरच्याचा जराबी खाट उठला नाही... म्हंजी तुझी दिष्ट बाळाला लागली हुती...'

'बरं... बरं... झाली हुती तर झाली हुती. मघाशी भटाकडं गेला हुता त्याचं काय झालं... भट काय म्हणालं ?'

'घ्या सारचं मुसळ केरात. तुला ते सांगायचंच इसरलो की... मुख्य गोष्ट सदाचुकून राहिली, म्हणत्यात ती अशी.' आपलं भिकंभट म्हणालं, 'आपली मुलगी लई लई भाग्याची भागिरथी हाय.'

'भाग्याची भागिरथी ?'

'हां... हां... भाग्याची भागिरथी... आपलं भिकंभट तिच्यायेकी म्हणालं...'

'आणखी काय काय म्हणालं भिकंभट तिच्यायेकी ?'

भिकंभट म्हणालं, 'तुमची ही मुलगी लई चांगल्या ग्रहावर नि उत्तम राशीवर जलमली हाय... तिच्या पतीची ती खूपखूप सेवा करंल... पतिव्रता म्हणून तिचा साऱ्या लोकात नाव होईल... पतीचं नाव उजळ करील. उदंड करील.'

'आणखी... आणखी काय म्हणलं भिकंभटजी ?'

'आणखी काय बरं... हं... पोरीचं पोथीतलं नाव 'भ' अक्षरात येतंया... पोरगीबी मोठी भाग्याची हाय... तवा तिचं नाव ठेवा, भाग्याची भागिरथी...'

'आणखी... आणखी काय म्हणालं ते ?'

'आणखी काय म्हणणार ? पोरीचं भाग्य लई लई चांगलं हाय म्हणालं.'

'तसं नव्ह जी... आणखी... आणखी काय म्हणालं ?'

'तू हे 'आणखी... आणखी' काय लावलयास ?'

'अवं, मला एवढचं म्हणायचं हाय की, भिकंभटानी आपल्या पोरीच्यायेकी जे जे सांगितलया, तेचा शबूद न् शबूद मला ऐकायचा हाय.'

शब्द न् शब्द तुला ऐकायचा हाय. भिकू क्षणभर विचार करीत बोलला, 'हां... हां... आठवलं, ज्योतीषशास्त्रापरमानं अशा ग्रहावर जलमलेल्या मुलींना राजघराण्यातील राजपुत्र नवरा मिळत असतू असंबी भिकंभट म्हणालं. आणखी लई लई संसक्रूतातही बोललं. त्याचा अर्थ काही लागला न्हाय...' भिकभटं पुढं म्हणालं, 'तुझ्या जातीत कुठला असा राज्य

घराण्यातला नवरा असणार? तरीपण, तिचा होणारा नवरा निश्चित खाऊन पिऊन सुखी असणारच! मुलीचं ग्रह तसं हायंतऽऽऽ ग्रहात तसं भाग्य हाय... सामर्थ्य हाय.'

'हांऽ हांऽ मघापास्नं माझं 'आणखी काय' चाललं हुतं ते एवढ्यासाठीच... आणखी तुमी महत्वाचं तेच सांगायचं इसरत हुता. माझ्या मुलगीला राजपुत्र नवरा मिळणार नि ती 'राजाची राणी' होणार, असंबी भिकंभट म्हणाले हे तुमी सांगतच नव्हता.'

'व्हय की... मुख्य गोष्ट सदा चुकूनि राहिली...!'

दोघंही नवरा बायको मग एकमेकाकडे बघून दिलखुलास हसले.

'अवं... उद्याला बारसं... ठमाकाकूला घेऊन, आजचं बाजार कराया जावा? का ऐन वेळी हरि खोदत बसणारऽ ?'

'छानऽ छान पांडुरंगा, तुला काळजीऽ. बरी आठवण दिलीस. उद्याची धावपळ आज कमी केलीस. पोराचा मामा कामामुळं मुंबईला परत गेला नसता, तर मला ह्यो एवढा ताण पडलाच नसता.'

'पोरीचा मामा तुम्हाला पैसे देऊन गेलाय नव्हं? तुमचं किती वझं उचललंय माझ्या भावानंऽ जलमभर तुमाला असंच उचलू लागंल होऽऽ'

'व्हयऽ पोरीचा मामा तसा लई रतन माणूस हाय. येळ परसंगाला होणारा.'

• • •

४

बारशाचा तो शुभ दिन. शुभ सोहळ्याचं मंगल आमंत्रण देतच उगवला. बारसं अर्भकाला पाळण्यात घालून नाव ठेवण्याचा मंगल दिवस आईबापांच्या सौख्याचा, मोठ्या आनंदाचा दिवस.

सकाळपासून भिकू-रुक्मिणीच्या घरात कोण धावपळ चाललेली. रुक्मिणीची भावजय लक्ष्मी भाचीच्या 'बारशासाठी' खास आलेली. भिकूचा म्हंमईतील एक भाऊ बारशाला आला होता. जवळपासची नातनातलगं जमलेलं. पाहुण्या-मित्रांनी चंद्रमौळी झोपडं, झोपडीपुढचा मांडव व तो वृक्ष पाहुण्यांनी भरलेला. आनंदीआनंद चाललेला.

शेजारच्या भावबंधातील बायका सकाळपासून पोळी-पुरण लाटण्यासाठी कशा झुलत होत्या. मोठी माणसं खीर, आमटी व भात करण्यात दंग झालेली. प्रत्येकजण झटून काम करीत होता, उत्साहानं आनंदानं झटत होता. त्यामुळं संध्याकाळच्या आतच सैंपाक तयार झालासुद्धा.

इकडे धाव, तिकडे पळ, भिकूच्या पायाला तर दम नव्हता. पण मनातून एक प्रकारचा आनंद ओसंडून जात होता.

संध्याकाळ होताच, बाळीचा पाळणा शृंगारण्यात, त्याची आरास, थाटमाट करण्यात काही रसिक मंडळी गुंतलेली. गावच्या एका जिनगारानं मोठ्या हौसेनं, भिकूच्या या मुलीच्या खास बारशासाठी, खास सोनेरी कागदाच्या सुंदर नक्षीनं बनविलेला 'खेळणा-पाळणा' पाळण्यावर टांगण्यासाठी करुन दिलेला होता. रंगीबेरंगी कागदाचे बनविलेलं राघू, मोर नि चिमण्या पाळण्याच्या चारी बाजूला बसविण्यासाठी दिलेले. शेजारच्या तरुण मुलांनी दूर रानामाळातून तोडून आणलेल्या रंगीबेरंगी फुलांच्या माळा केलेल्या आणि त्या आकर्षकरीत्या पाळण्यावर सोडलेल्या होत्या. अंगणातल्या पांढऱ्या तगरी फुलांनी संबंध पाळणा असा मढवून टाकला होता की, पाळण्यातल्या मुलीचं तोंडदेखील कुणाला सहज दिसत नव्हतं. तरुण मुलांनी दुकानातील रंगीत पातळ कागद आणून त्याच्या 'फराऱ्या' व 'पताका' बनवून सर्व घरांतून व घराबाहेरील त्या उघड्या मांडवावर शोभिवंत रीतीनं लावलेल्या होत्या. भिकू-रुक्मिणी या आईबापापेक्षा तिथल्या भाऊबंधांनीच, का न कळे, या

मुलीच्याच बारश्याच्या वेळी, स्वयंस्फुर्तीनं पुढाकार घेऊन, बारशाचा हा एवढा सारा थाटमाट घडवून आणला होता. का न कळे, या गावच्या ज्ञातीबांधवांना या मुलीच्या जन्मापासून एक प्रकारचा आनंद झाला होता. अन् असा आनंद आपणास का झाला आहे, हे त्याचं त्यांनाही कळत नव्हतं. कदाचित् ते एका परमेश्वरालाच काय ते ठाऊक!

आताच पहा ना, न बोलताच नागू शिंगे यानं, स्वतः होऊन तिथं येऊन, आपलं मंगल रणशिंग जोरात फुंकून, त्या द्वारे या मंगल सोहळ्याची सुरुवात झाल्याची शुभवार्ता साऱ्यांना त्यानं दिली.

शेजारपाजारच्या ज्ञातीतील सुवासिनींनी आपले सौभाग्याचे असतील ते अलंकार लेऊन व खास ठेवणीतल्या साड्या व पातळ नेसून मोठ्या उल्हासित मनाने... त्या रखमाच्या घरी या सोहळ्यासाठी जमू लागल्या होत्या. या मुलीच्या बारशाच्या आनंदात त्या अधिकच भर घालीत होत्या.

आणि त्या बारशाचा आनंद लुटण्यासाठी वा आणखी दुणावून सोडण्यासाठी, तिथल्या नथवर तरुण कुमारीकासुद्धा कशा हसत-नाचत, लचकत मुरडत या आनंदी सोहळ्याला नमून चिवचिवाट करु लागल्या होत्या.

शेजारच्या भाऊबंधांनी एकत्रित जमून, बाळंतिणीसाठी 'ओटी-भरणाचं सामान' व बाळीसाठी 'बाळलेणी' आणलेली होती. अन् हा शुभमंगल सोहळा सुरुवातीला उरकून घेण्यात आला.

रुक्मिणी व भिकूनं केवळ मुलीच्या बारशासाठी हा केलेला एवढा थाटमाट पाहून आश्चर्यचकित होत, ज्ञातीतील एक वृद्ध भिकूला म्हणालीच, 'भिकू... आरं, अक्षी मुलाच्या बारशासारखा मोठा थाट केलायास बघ, लेकीच्या बारशाचा.'

'आऊमावशेऽऽ, मुलं ही देवाची देणं हाय, हे तुला का मी सांगाया नगं. देव कुठं म्हणतो, पुत्र श्रेष्ठ नि कन्या कनिष्ट, ते तुमी, आमी मानसांनी केलंया तसं. पुत्र तेवढा मोठा सोन्याचा गुंडा, अन् कन्या काय आभाळातनं पडलेला धोंडा हाय व्हय.' भिकू उद्‌गारला.

एवढ्यात काही सुवासिनी रखमाईच्या कानी कुजबुजल्या, 'सांग... सांग... रुक्मिणे, काय नाव ठिवायचं गं तुझ्या या बाळीचं?'

'तुमीच कोणीतरी सुचवा ना, तिला एखादं सुंदरसं नाव?' साऱ्यांची मनधरणी करीत रखमाई बोलली.

'हेऽऽ बयाऽऽ मघापास्नं आमी इचार करुन करुन आमचं टकूरं दमलं... तुझ्या ह्या लेकीचं सुंदर रुप बघून आमच्या तोंडात येणारं नाव तिला थिटंच पडतंय. ती जितकी सुंदर हाय, तितकंच सुंदर नाव तिच्यासाठी सुचवायला पाहिजी नि सुचलं तर मनाला ते ठसायला पाहिजी ना... ते काय आमाला जमंना. आमी हात टेकलं. तवा आता तूच सांग तिचं काय नाव ठेवायचं... का भिकू भावोजीला इच्चारु...' साऱ्याजणींच्या वतीनं एकजण बोलली.

रखमाई विचार केल्यागत करीत म्हणाली, 'मी सांगते, यावर एक युगत तुमाला. पटते का बघा?'

'सांग... सांग...' साऱ्याजणी कशा उतावीळ होत म्हणाल्या.

रखमाई युगत सांगू लागली, 'तु साऱ्यांनी आमच्या या मुलीसाठी एवढं केलंयसा. एवढं झटलायसा... ते सांगून सोय न्हाय. आमी दोघांनी मिळून ठरवलंय. भाऊबंध जे नाव सुचवील, तेच नाव या मुलीला ठेवायचं. तसं, कन्या ही असतेच साऱ्यांचीच कन्या. त्यांच्यानं ते जमलं न्हाय तर आपलं मनचं मग बोलायचं.'

'सांग... सांग... ऐकाया जीव कसा अधीर झालाय!'

रखमाई पुढे सांगू लागली, 'तुमी साऱ्यांनी बघितलयं, ह्या मुलीचा मामा नुकताच येऊन गेलाय... नंतर मुलीचं नाव 'पार्वती' ठेवा असं सांगून गेलाय.'

'पार्वती... पार्वतीऽऽ गोड गोड नाव... साखरंवानी, बरफीवानी, गोड गोड नाव.' एकटी टाळी वाजवत बोलली.

ऐका तर पुढं, रखमाई मध्येच तिला थांबवत बोलली,'गावच्या भिकंभटानं हिचं पोथीतलं नाव सांगितलयं, 'भागिरथी.' आम्ही दोघांनीबी हेच नाव ठिवायचं ठरवलंय... पाळण्यातलं नाव भागिरथी...'

नथवर मुलगी रानी उखाणा घेतल्यागत बोलली,

"पाळण्यातलं नाव 'पार्वती' नामी

आमी मात्र म्हणणार, रामी... रामी"

दुसरी नथवर मुलगी त्याच ठेक्यात एका स्वरात म्हणू लागली,

"रामाची 'रामी' हे गोड नाव जागा

पाळण्यातलं नाव असू द्या भागा

पण त्येला दुणीनं तुमी भागा

उगीच कशाला करता ऐशा रागा?

आता झटू कसं, पाळणा म्हणाया लागा..."

सगळ्या सुवासिनी, नथवर मुली खळाळून हसल्या. दुधात साखर पडली. संमत्तीदर्शक अशा काहींनी टाळ्या वाजविल्या. पाळणा हलू लागला. पाळणा थांबवीत एकजण म्हणाली, 'अगं... अगं... पाळणा म्हणणार कोण ?'

'कोण म्हंजी ? आपली ही राणी म्हणेल की. तीच म्हणत असते सर्वीकडं. पण राणी आज पाळणा जरा नवा असं म्हण हं.'

'हे बघा, जुन्या पाळणा गीतालाच रटफ करीत मी नवा साज चढवलाय... ऐका, कसा काय माझा हा प्रयत्न जमलाय तो.'

राणी पाळणा गीताचा स्वर काढू लागली. साऱ्या सुवासिनींनी पाळण्याच्या दोऱ्या धरल्या. पाळणा हलू लागला. राणी पाळणा गाऊ लागली. साऱ्याजणी राणीला, 'जू बाळा जू जू... रे जूऽ ऽ ऽ' हे ध्रुपद धरुन गोड गळ्यानं, साथ देऊ लागल्या. गीत घुमू लागलं --

"जू बाळा जू जू रे जूऽऽ जू बाळा जू जू रे जूऽऽ

पहिल्या दिवशी आनंद झाला। भिकू रखमानं धरम केला।

हत्तीवरती आंबारी घाला...। जू बाळा जू जू रे जू।।

दुसऱ्या दिवशी खांदली न्हानी। जमवूनी साऱ्या सुवासिनी।

लेक जल्मली 'राजाची राणी'। जू बाळा जू जू रे जू...।।

तिसऱ्या दिवशी तिनवी करती। हाती सोन्याची घेतली आरती।

जाती बांधवा जेवण देती। जू बाळा जू जू रे जू।।

पाचव्या दिवशी पाचवी करती। खणा नारळाची ओटी भरती।

आनंदाला उदंड करती। जू बाळा जू जू रे जू।।

बाराव्या दिवशी बारसं करिती। साऱ्या गावाला आवातनं देती।

नाव हौसेनं 'पार्वती' ठेवती। जू बाळा जू जू रे जूऽऽ।।... "

'जू बाळा जू जू रे जूऽऽ' हे शुभमंगल स्वर त्या मंगलमय वातावरणात वेदमंत्राप्रमाणे घुमू लागले... त्यामुळं साऱ्यांच्या हृदयातून त्या मुलीला शुभ आशिर्वाद नकळत निघू लागलं. कुणी म्हणे, 'भागिरथी नाव फारच चांगलं. जसं हर गंगेऽऽ भागिरथीऽऽ!

कुणी म्हणे, रामी नाव एकदम चांगलं... रामनामाहूनही गोड... अमृताहूनही गोड। पार्वती तर त्याहूनही मधूर...'

अन् गाणारी ती राणी मुलगी, 'भागाऽऽ भागाऽऽ भागिरथीऽऽ कुर्रर्र...' असं म्हणून बाळीच्या कानात कुर्रर्र करावयास वाकली, तेव्हा साऱ्या सुवासिनींनी तिच्या पाठीवर हळूवार धम्मक लाडू ची सतत बरसात केली. तशी राणी ओरडली,

'अगंऽऽ अगंऽऽ काय हे माझी पाठ हाय की घण घालायचा लोखंडी पाटा.'

'तू भागाची आत्या हायीस ना? मग सोसलं पाहिजी सारं.'

साऱ्याजणी मग खूप खळाळून हसल्या. काहीजणी मग भागाच्या कानात ओरडल्या.

'राऽऽमीऽऽ राऽऽमीऽऽ कुर्रर्र... पार्वती... पार्वती... कुर्रर्र'

त्यासरशी भागा रडू लागली. ठमाकाकू मध्ये पडून म्हणाल्या, 'आगंऽऽ आगंऽऽ किती छळता त्या चिमूरडीला... पुरं करा आता. बघा रडायला लागली. थांबवा आता ते...'

रखमाकडे वळत ठमाकाकू म्हणाली, 'रुक्मिणी, घुगऱ्या कुठं ठेवल्यात?'

तेवढ्यात भिकू आला धावत घुगऱ्याची दुरडी भरुन. बोलला, 'ही घ्या घुगऱ्याची दुरडी...'

घुगऱ्याची दुरडी राणीजवळ द्या, ठमाकाकू राणीजवळ जात म्हणाली, 'राणी साऱ्यांना तूच घुगऱ्या वाट... घुगऱ्या देताना काय म्हणायचं, ते मी तुला सांगतू. तसं म्हण...'

"मुलीचं नाव ठिवलया 'पार्वती'

तिच्या या घुगऱ्या पिरमानं खाती!

पार्वती नाव कंदी इसरु नगा

बारसं जेवल्याशिवाय जाऊ नगा!..."

राणी आश्चर्य करीत म्हणाली, 'ठमाकाकू, तू कवयित्री कवापासून झालीयास गं?' 'आगंऽऽ जात्यावर बसलं की ओवी आपोआप येते व्हटावर, तसं कवणं करणं नि गाणं म्हणणं, हे आमच्या जातीत उपजतच असतंय बघ.'

मग जेवणाच्या पंक्ती उठल्या सारा गाव जेवून उठला. अन्न सरुन पुरुन उरलं. भिकू-रुक्मिणीच्या उकीरड्यावर उष्ट्या पत्रावळींचा ढीग पडला. भरल्या पोटावरनं हात फिरवत जाताना सारे भाऊबंध आशिर्वाद देत बोलले, 'ही मुलगी जलमलीय नि आमाला केवढा आनंद झालाय, ही मुलगी कुणा एखाद्या राजाची राणीच होवावी! आमचं तिला लाख लाख आशिर्वाद हायती! लाख लाख आशिर्वाद!!'

• • •

५

दिसामाशी भागाचं म्हणा वा रामीचं वय हळूहळू वाढू लागलेलं. तिची थोरली बहीण 'आक्का' निसर्गाप्रमाणे तीही तिच्याबरोबर वाढत होतीच. पण ती नित्य रोगी, आजारी, त्यामुळे थोडी खुरटलेली दिसे. रामी सुंदर, सदाफुली, नित्य हसतमुख टवटवीत, त्यामुळे साऱ्यांचं लक्ष तिच्यावर खिळलेलं. आक्का थोडीशी दुर्लक्षलेली.

रामी तशी मुळात आक्कापेक्षा खूपच देखणी होती. वत्सल रखमामातेनं तिच्या गालावर लावलेली तीट, तिच्या मूळच्या देखणेपणात अधिकच भर घाली. असं देखणं रुपडं कुणाला आवडत नाही? येणाऱ्या जाणाऱ्यांच्या नजरा रामीवरच कशा लागून राहत. नित्य भुरुभुरु उडणारे तिचे काळे कुरळे केस, पाहणाऱ्याला सहज भुरळ पाडीत.

तिला पाहून कोणी म्हणे, 'रुक्मिणी, तुझी पोर किती गोरी गं अशी. शंकराची पार्वती शोभेल जशी.'

कोणी रामीचा गोड गोड मुका घेऊन बोले, किती गोंड गुळमाट हाय मुक्का हिचा. ओठ लाललाल... लोण्यासारखं मऊमऊ... असं कितीबी मुकं घ्या... मन काही भरतच न्हाय बघा....

कोणी म्हणे, 'नवरा जीव टाकील हिच्यावर... हिच्या शब्दात नि मुठीत राहील तो. कोणी बोले, ही अशी देखणी, अशी देखणी जशी राजहंसाची रंभा रानीच! बुरख्यात ठिवा न्हाय तर दिष्ट लागेल होऽऽ राणीला!'

लगेच रखमा आई आलाबाला घेत आपल्या कानशिलावर कड्कडा बोटं मोडीत पुटपुटीत असे, 'इडापिडा टळो, बघणारांच्या डोळ्यांत सात वाटंची माती पडो.' जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरुंची दृष्ट लागावी अशी होतीच रामी!

रामीच्या गोड बाललीलांनी भिकू-रखमाच्या रखरखीत संसारात आनंदाचं शीतल चांदणचं शिपलं जात होतं जणू. रामीच्या जन्मापासून रखमाईला आकाश ठेंगणं झाल्यासारखं झालेलं. रामीकडं पाहता पाहता भिकूबाबाला तहान-भूकेची विसर पडत चाललेली.

एकेक दिवस आनंदानं कसा भिजून चिंब होऊन चाललेला. रखमा भिकूच्या चंद्रमौळी घरात रामीची चंद्रकोर कलाकलानं वाढीस लागलेली.

रामी आता स्वत:च्या पायावर स्वत:हून उभी राहू लागली होती. एक दोन पावलं टाकीत, आता दुडूदुडू चालू लागली होती. गोड गोड मंजुळ बोबडे बोल आता बोलू लागली होती. असं रामीचं बोबडेबोल कौतुकानं ऐकत राहताना रखमाईचं कान तृप्त तृप्त होत असे. भिकूबाबाचं काळीज आनंदानं फुलून जात होतं. अलीकडं कधीमधी आक्काच्या पाठीवरसुद्धा भिकू-रखमाचा मायेनं ओथंबलेला हात फिरत होता. आक्काला तसल्या ममतेची आता जरुरी होती. त्याची जाणीव तिच्या आईबापांना वेळीच झाली होती. रामीबरोबर तिचंही लाड-कौतुक करीत होती. आपल्या या लाडक्या मुलीच्यावर जीवापाड माया करणं, हाच त्या दांपत्याचा एक विरंगुळा होता.

पण भिकूला असं रामी-आक्काच्या अवतीभोवती सदा न् कदा रमत गमत राहणं, फिरणं, खेळणं कसं शक्य होतं? दापोली बंदरातून मार्केटपर्यंत माश्यांच्या टोपल्याच केवळ धावत आणण्याचं एकुलतं एकच असं कष्टाचं काम भिकूला नव्हतं. त्यालाच नव्हे, त्याच्या पिढ्या न् पिढ्यांना, शिळ्या भाकरीच्या तुकड्यावर, साऱ्या गावाची सांगतील ती फुकट हमाली करीत जगण्याचं, महारकीचं; 'बेहिशोबी' कष्टसुद्धा त्याला त्याबरोबर उपसावे लागतच होते. दिवसरात्र राबराब राबायचं, रक्ताचं पाणी पाणी करायचं, तेव्हा कुठं शिळ्या तुकड्यानं त्याची व त्याच्या समाजाच्या घटकांची हातातोंडाची गाठ पडत होती. एवढ्या अमानुष, नरकयातना सहन करुनही भिकू रखमा आपल्या नशिबी आलेल्या जीवनात सुखी, समाधानी व आनंदी राहत होती. दु:ख काय त्यांच्या पाचवीलाच पुजलेलं होतं. त्याची कोण करत एवढी तमा? रोजचं मढं, त्याला कोण रडं? असा त्यांचा व त्यांच्या समाजाचा स्वभावधर्म होता.

"ठेविले अनंते तैसेचि रहावे

चित्तिं असू द्यावे, समाधान"

ह्या साधूसंतांच्या उपदेशाप्रमाणे ते व त्यांचा समाज दु:खातही समाधान मानून जगत होता. रामीकडं पाहून, आक्काकडं पाहून, एकमेकाकडं पाहून ते दांपत्य सुखा-समाधानात राहात होतं.

दिवस आपल्यापरीने चाललेच होते... भिकू धोत्रे दापोली बंदरावर काबाडकष्ट करुन, दमून-भागून घरी येई. तेव्हा रखमाचं रामी व आक्काबरोबर, मुलात मूल होऊन, खेळणं, नाचणं, बोबडं गाणं चाललेलं असायचं. रखमाचा आवाज मुळात गोड, त्यात नाचून गाऊन म्हणताना, दुधात साखर पडत असे. कधी कधी भिकू असा कामावरनं आला नि रखमाचं मुलींच्यासोबत असं खेळणं-गाणं चालू लागलं की, ते सारं तो लांबूनच पाही, लांबूनच ऐके. त्याला ते दृश्य स्वर्गीय वाटे. रुक्मिणीचा आवाज त्या वेळी अमृताहूनही गोड भासे. भिकूचं दमूनभागून गेलेलं मन, मग समाधानानं फुलून निघायचं. बहरुन जायाचं, क्षणभर त्याच्या साऱ्या कष्टाचा, दु:खाचा त्याला विसर पडायचा. त्याचा शीणभाग जायचा. रखमासुद्धा मुलींच्याएवढी लहान होऊन नाचत असे. गात असे --

"अडगुळं मडगुळं... सोन्याचं गुंफलं

डोंगरी बिंगरी... वाजवितो हरी...

गजानन मिल, तरानान चोळी, अंग अंग जाळी

नानी नानी कांकण, कप न बशी, लेकराची खुशी

बंडू कासार बोंऽऽबलऽत बशी..."

गाणं संपताच आक्का व रामी टाळ्या वाजवीत. टाळ्या वाजवीत कधी कधी उड्या मारीत नाचू लागत. रखमाही त्यांच्याबरोबर नाचत असे. तेव्हा लांब उभा राहून हे पाहत असलेला भिकू प्रेमात येऊन म्हणे, 'रखमेऽऽ तुझा किती गं आवाज गोड... आजपातूर मला वाटत हुतं, माझाच आवाज गोड... तुझा आवाज तर साळुंखीच्या आवाजापेक्षाही गोड, त्यापरास तूबी गोड, वाटतं गोड काकडीवानी तुलाबी करकर चावून खाऊन टाकावी...'

'इश्श ? काय तरीच काय बोलता ?'

'हे काय तरीच काय ? अगं, तुझ्या पोटी आलेली ही मुलं, मुलं कसली गुलाबाची फुलं.'

'अवंऽऽ खाण तशी माती ?'

तेवढ्यात आक्का म्हणाली, 'आई, कान धरुन खेळूया का ?'

'म्हण ---'

"आपडी थापडी... गुळाची पापडी

धम्मक लाडू... तेलंगीचं तेल काढू

तेलगीचं एकच पान... धर गंड बिब्बि हाच कान..."

आक्का, रामी व रखमा एकमेकांचा असा कान धरीत, असं काही तालबद्ध डोलत की, ते दृश्य बघण्यासारखं शोभनीय असे. मग रखमा-भिकूच्या आनंदाला पारावार राहत नसे, या दोन मुलींचं त्यांना किती कौतुक, त्यांना कुठं ठेवू, कुठं नको असं झालेलं.

चांदण्यारात्री उघड्या मांडवाखाली भिकू व रखमा आक्का रामीला घेऊन कधी कधी झोपत असत. त्या वेळी आकाशातल्या चंद्राला पाहून दोघांही मुलींना गाण्याची लहर येई. त्या नाचत डोलत गात –

"चांदोबा चांदोबा भागलास का

लिंबोणीच्या झाडावर लपलास का

लिंबोणीचं झाड करवंदी

मामाचा वाडा चिरबंदी

मामाच्या वाड्यावर येऊन जा

तूप रोटी खाऊन जाऽऽ"

असं या बाल-गोपालाचं बोबडे बोल, बाललीला पाहत ऐकत रखमा भिकू एकमेकांच्या कुशीत आनंदानं झोपी जात.

दिवस कसे आनंदानं भरभरुन वाहून चाललेलं. एक दिवस रुक्मिणी आपल्या नवऱ्याला हळूच बोलली,

'अवं, ऐकलं का... आज मला पाच महिने झालं जी!'

'म्हंजी... आगंद ? आज पाच महिन्याची झालीस तू ?'

'येडा गं येडा, माझा ह्यो धनी, अवं! पाच महिन्यांची आज मी पोटुशी झाल्येऽऽ'

'मला ही भानगड... तू मला अजून जरा सुदीक सांगितली न्हायीस ? मोठी आतल्या गाठीची दिसतेस की गं ?'

'त्यात काय सांगायचं ते... पण तुमची घाई नडली. रामी अजून लहान होती... नगं हुतं एवढ्यात हे मूल! आता माझ्या दुधात चिक पडील, रामीला तो नडील.'

'अगं, ती देवाची करणी. तुझ्या माझ्या हातात काय हाय त्यात रुक्मिणेऽऽ अगं, मुलं हीच गरीबांची धन-दौलत. त्यांच्या संसाराची सुखसंपत्ती, जेवढी मुलं जादा, तेवढं पाठबळ जादा, पण... पण रुक्मिणेऽऽ तुला आज बजावून ठिवतो, या वेळी पोरगाच झाला पाहिजी बघ.'

'अवंऽऽ ते काय माझ्या हातात हाय व्हयं. ती तर देवाची करणी. तो पोटात काय घडवंल, ते गोड करुन घ्यायला पाहिजी.'

'ते काय न्हाय चालणार बघ... या वेळी काय बी करुन तुला पोरगाच झाला पाहिजे बघ, न्हाय तर... गट्टी फूऽऽऽऽऽ'

एके दिवशी रखमाच्या पोटात आत्यंतिक वेदना सुरु झाल्या. सातवा महिना भरलेला. आठवा नुकताच लागलेला. पण अचानक रखमाला अशा बाळंतपणाच्या कळा घातलेल्या, भिकूच्या तोंडचं पाणी पळालं. तो धावतच सुईण नाणु मावशीकडं गेला. धावत धावत नाणु मावशी आली. उमाकाकू व इतर शेजारणी रखमाच्या दिमतीला हजर होत्याच. नित्याप्रमाणे रखमा बाळंपणाच्या वेदना सहन करीत होती. उठलेल्या कळा दाबीत होती. कण्हत कुंभत होती. सारे हवालदिल झालेली.

दिवस पाण्यात पडला नि रखमानं परत एका मुलीला जन्म दिला. 'परत मुलगी झाली ?' जमलेल्या साऱ्याजणी मग नाराज झाल्या, भिकू तर आत्यंतिक निराश होऊन त्या झाडाखालीच, मान खाली घालून बसून राहिला. रखमाईसुद्धा मनोमन दु:खी झालेली. बाळ-बाळंतिणीचं सारं करुन निपडून जाताना नाणु मावशी म्हणाली, 'रखमेऽऽ असा जीव टाकू नये माणसानं. माणसाच्या हातात काय हाय ? अगं, देणारा देव आभाळाच्या छतावर बसून सगळं बघतोय. अशी नाराज का हुतेस ? गावच्या महादेवाला नवस कर... महादेव, देईल तुला मुलगा...'

घरात रीतसर एकेक मंगलविधी उरकला जात होता. कसला गाजावाजा न करता, केवळ देवापुरता नैवद्य, घरापुरतं गोडधोड, बारावा, बारशाचा दिवस आला तसाच गेला. राणी व दोन नथवर मुलींना बोलावून राणीकडून पाळणा गीत म्हणावयास लावून जन्मलेल्या मुलीला पाळण्यात घातलं. मुलीचं नाव ठेवलं गौरा. 'गौरीऽऽ गौराऽऽऽ' म्हणून कानात कुर्रर्र केलं फक्त. त्यात बाळंत झाल्यापासून रुक्मिणी आजारीच होती. अंगात सारखा ताप भरत होता. त्यामुळे स्तनातलं दूध आटलं होतं. दूध नसल्यानं लहान गौरा सारखी किरकिर करी. रखमा वैतागून जाई. तिची अन्नावरली वासना उडालेली. अंगात त्राण नसल्यासारखं तिला वाटायचं. पिवळीधमक रखमा आता पांढरी फटक दिसू लागली होती.

भिकूला रुक्मिणीची ही लक्षणं काही बरी दिसत नव्हती. त्यामुळं काळजीनं तो सैरभैर झालेला. बेचैन झालेला.

एकदा तर रुक्मिणी घरतल्या घरात चालता फिरताना एकदम कोसळली. बेशुद्ध पडली. आरडाओरड झाली. आक्का-रामी रडू लागली. शेजारीपाजारी जमले. कुणी रखमाच्या तोंडावर पाणी मारु लागले, कुणी कांदा फोडून नाकाला लावू लागले.

ते पाहून भिकूला तर ब्रह्मांड आठवले. त्यानं धावत जाऊन गावच्या वैद्याला बोलावून आणलं. वैद्यानं रखमाला तपासलं. वैद्यानं विचारलं, 'हे हिचं कितवं बाळंतपण?'

'तिसरं,' ठमाकाकूनं उत्तर दिलं.

'मग फारच सिरीयस. लागोपाठ बाळंतपणामुळं रक्त कमी झालंय, तापामुळं अशक्तपणा येतोय. लवकर योग्य इलाज केला नाही तर हे दुखणं मोठ्या भयंकर आजारावर जाईल.' वैद्यानं सल्ला दिला.

वैद्याचा हा असला सल्ला ऐकून भिकू सर्दच झाला. गांगरला. तो धिटाईनं बोलला,'वैद्य महाराज, आपण औषधं द्यावीत... मी माझा जीव गहाण ठेवून, हिला औषधं आणून देईन, तुमची लागेल ती फी देईन पण माझी कारभारीन वाचली पाहिजे... अंग झाडून उठली पाहिजे.'

'ठीक... ठीक... ही चिठ्ठी घे. यात लिहिलेली औषधं दापोलीला वा दाभोळीला मिळतील. औषधे आणून मला दाखव. कशी घ्यायची ती मी सांगेन.' आणि वैद्यानं भिकूला बाजूला घेऊन कानात सांगितलं.

'असं कर भिक्या, या औषधाबरोबर तुझ्या बायकोला पौष्टीक जेवण देत जा. तिला बाळंतपणानंतर चांगली विश्रांती घेऊ देत जा... भिक्याऽऽऽ कसं सांगू तुला? तू एकदम तरुण आहेस. तरी आपल्या घोड्याची लगाम जरा आवरुन धरत जा, भांडं आपलं आहे, पण ते कसं नि किती वापरावं हे समजलं पाहिजे. पाळणा लांबव. नाहीतर अशी ही... सोन्यासारखी देखणी बायको, फुकाफुकी गमावून मग रडत बसशील. माणसानं मनावर थोडा संयम ठेवला पाहिजे. संयम हाच या आजारावर एकमेव रामबाण उपाय. कसं?'

'समजलं, समजलं, सारं काही समजलं. ते काळजापर्यंत जाऊन पोचले.' भिकू कानाला हात लावून, पिरंगाळून मान डोलावीत बोलला.

सात आठ नऊ महिने त्यानंतर गेले असतील... नसतील... गावच्या महादेवाची वर्षाची यात्रा उद्यावर आलेली. गावचा भोळा शंकर जागृत दैवत म्हणून प्रसिद्ध होतं. पुत्रप्राप्तीसाठी रुक्मिणीच्या मनानं घेतलेलं. पतिदेवांनाही पुत्र पाहिजे. नाही तर, त्यांची मर्जी खप्पा होणार होती. त्यामुळे रुक्मिणी काळजीत... गावच्या महादेवाला नवस कर, महादेव देईल तुला मुलगा... मागा म्हंजी मिळंल. सुईण नाणु मावशीचा बिनतोड सल्ला रुक्मिणीच्या हृदयात पक्का ठसलेला. रात्रंदिवस त्याच विचारात निमग्न.

भरपूर चांगली औषधं, चांगलं चुंगलं जेवण आणि भरपूर विश्रांती यामुळं रुक्मिणीची प्रकृती आता चांगलीच सुधारलेली दिसत होती. तीही आता घरात चांगली उठाबस करीत होती. सारं काही करीत होती.

आज सकाळी उठल्यापासून रुक्मिणीचं लक्ष भिकूच्या हालचालीवर होतं. संध्याकाळचं जेवण करुन भिकू कुठंतरी बाहेर जाण्याच्या बेतात दिसला. ही संधी साधून रुक्मिणी जास्तच लाडात येऊन बोलली, 'ऐकलं का... कुठं निघालायसा आता?'

'भजनाला... दापोलीकरांनी आज रात्री मला भजनाला बोलावलंय. रामानुजपंथी कोणी आपल्यांतला मोठा साधू आलाय म्हनं, त्येच्यापुढं आज भजान हाय आमचं. काय काम हुतं?'

'जावा वोऽऽऽ तुमी भजनाला. देवाधरमाच्या कामाला का आड येतेय मी. पण उद्या गावच्या महादेवाची वरसाची जत्रा हाय म्हटलं मी.'

'ती काय मला माहीत न्हाय व्हय? पालं पडायला लागल्याती... मेवामिठाईची दुकानं थाटल्याती... रोज बघतुया... त्यात एवढं काय विशेष?'

त्यावर लाजत लाजत रुक्मिणी बोलली,'व्हयं... यंदा हाय तसं इसेस... यंदा जावं म्हणते महादेवाच्या दरशनाला जोडीनं...'

'जोडीनं? नवल वर्तले गेऽऽऽ मायेऽऽ मुंगी... उडाली आकाशी... तिणे गिळले सूर्याशी... विठ्ठल रखुमाई... विठोबा रखुमाई... भिकोबा रखुमाई... भिकोबा रखुमाई...'

'ईश्श! काही तरीच... तुमच्या तर जिभेला हाडच न्हाय. बायकोला कुणी माई म्हणत्यात?' लटका राग दाखवीत रुक्मिणी बोलली.

'नव्हं गं... जोडी जोडीची नावं निघाली... चरणाचा यमक साधण्यासाठी रखमा ऐवजी रखमाई केलं... कवीला हे सारं माफ असतं, पण नवल विशेष अजून न्हाय सांगितलंस?'

'सांगते... पण अशी चेष्टा करायची न्हायी गडे... उद्या आपून जोडीनं महादेवाच्या दरशनाला जाऊन, जोडीनं नवस बोलावं म्हणते मी... महादेवा, तीन मुली दिल्यात पुरं झालं आता. आता आमच्या वंशाला दिवा दे...'

हे ऐकून भिकूला आश्चर्याचा मोठा धक्काच बसल्यासारखं झालं. तो ओरडलाच. 'काय... काय... म्हणालीस? वंशाला दिवा दे? महादेवा एवढ्यात नगं देऊस. हो, त्या वैद्याला कळलं, तर तो पायातली काढून तोंडात ठेऊन देईल माझ्या.'

'म्हंजी? असं वैद्यानं तुमाला काय सांगितलंय तरी काय... म्हंजी, आमा दोघांच्या सुखात ह्यो मिठाचा खडा... ह्यो जुलूम झाला की भोग?'

'जुलूम न्हाय नि भोग न्हाय. कसं सांगायचं? आमा पुरुषा-पुरुषांचं ते बोलणं... तुमा बायकांना कसं उलगडून सांगायचं?'

'काय नको मला उघडं करुन सांगायला... वैद्याला म्हणावं, आता माझ्या बायकुला चांगलं बरं वाटतयं... खरचं सांगा? आता मी कशी दिसते? चांगली झालेली दिसते ना मी? दिसते ना वोऽऽ'

अन् भिकू तिच्याकडं वेड्यासारखा पाहातच राहिला --

खरंच, रुक्मिणीला परत बहर आल्यासारखं दिसत होतं. ती दोन मुलांची आई, पण नव्या तांड केळीच्या फोकाप्रमाणे ती करकरत होती. मुसमुसत होती. तिचा पिवळाधमक रसरशीत देह भिकूला आता आव्हान देत होता.

रुक्मिणीनं ओळखलं की, नवरा आपल्याला बघून पाघळू लागला आहे. अन् हीच वेळ आहे की त्याला आणखी आग्रह करुन आपल्यात गुंतवायचे. त्याच्या अगदी जवळ जात लाडे लाडे ती म्हणाली, 'धनी, आपल्या वंशाला दिवा नगं का? माझ्याकडं काय असं बघता? कुठं लक्ष हाय तुमचं?'

'तुझ्याकडंच!'

'ईश्श! एवढी का मी आता सुंदर दिसू लागलीया? म्हटलं, आमा बायकांची ती येडी आशा...'

'व्हय... तुमा बायकांची ती येडी आशा... कशाला करावी निराशा... कसं? खुलली ना कळी? जाऊ या हं जोडीनं, पहिल्या गोडीनं... पांडुरंग... पांडुरंग... नको नको मना गुंतू मायाजाळी... पांडुरंग... पांडुरंग...'

रखमानं हे ऐकल्या न ऐकल्यागत करुन बोलली, 'हे बघा, गेल्या वर्षी कार्तीक एकादशीला गेला न्हायी पंढरीच्या वारीला... येत्या आषाढीला जावं हं पंढरीला... पांडुरंगाच्या पायावर मस्तक ठेवून म्हणा, देवा भक्याच्या वंशाला दिवा लाव... जलमभर तुझी वारी करीन.'

रखमाला आशिर्वाद दिल्याप्रमाणे करीत भिकू उद्‌गारला, 'अष्टपुत्र सौभाग्यवती भव... नवऱ्याचा ह्यो आशिर्वाद म्हंजी देवाचा प्रसादऽऽ रुक्मिणे... येतो. रात्री लवकर यायला जमलं न्हाय तर माझी वाट बघू नगंस. सकाळी तिकडंच परस्पर बंदरावर रोजचं काम आटपूनच घरी तुझ्याकडं धावत धावत येईन... मग जाऊ जोडीनं महादेवाला. कसं?' रुक्मिणीला हळूच आपल्या मिठीत ओढत भिकू बोलला.

'न्हाय... न्हाय... ते एवढ्यात न्हाय हं चालायचं. अगूदर जोडीनं महादेवाचं दरशान घेऊ या... नवस बोलूया. मग... कस?' छानसा मुरका मारीत रुक्मिणी बोलली.

'अक्षी चोरावर मोर दिसते की! गालावर गोडशी टिचकी मारुन भिकू निघाला. रखमा लटक्या रागानं म्हणाली, 'चला... चावट कुठले... लवकर या हं... वाट बघत बसते, आक्षी वाटंला डोळं लावून... रामीला, आक्काला खाऊ घेऊन याऽऽऽ'

आणि दुसरे दिवशी खरंच धावत धावत भिकू घरी आला. दारात रुक्मिणी त्याचीच वाट पाहत उभी होती. आपला नवरा भिकू धापा टाकीत असल्याचं पाहून, आपल्या पदरानं त्याचं घामाजलेलं तोंड पुशीत, घाबरुन जात ती म्हणाली, 'एवढं धावत, धापा टाकीत येणं कुणासाठी जी?'

'रुक्मिणे... तुझ्यासाठीच!'

'द्वाडाचं...'

'तूच म्हणाली हुतीस, वाट बघत बसते आक्षी वाटंला डोळं लावून, म्हणून मी घाबरलो. वाटलं, असं धावत गेलो न्हायी तर आपली रखमी आपलं सुंदर डोळं काढून वाटेला लावून बसंल!'

'चला... किती चेष्टा करायची ती. म्हटलं एवढं धावत यायला मी सांगितलं नव्हतं. तुमाला चांगलाच दम लागलाय की... ऊर बघा कसा भात्यावानी उडतोय... बरं लक्षण न्हाय हे... वैद्याला तब्येत दाखवा.'

'पुन्हा काढलंस त्या वैद्याचं नाव. अगं तुझं माझं हे गुपीत चाललेलं त्या वैद्याला कळलं तर बचकभर शेण तोंडात घालीन माझ्या.'

'जावा... जावा... हे कुणाला तर शिकवा. नवरा बायकोच्याऐवजी असं कोण बोलतयं व्हय? मग देवानं नवरा बायको ही जोडी केलीया कशापायी वोऽ? पाहिजी तर दुसरा वैद्य बघा... पण तब्येत दाखवाच.'

‘तुमा बायकांना उगीच नवऱ्याची काळजी करायची सवय असते.’

‘सवय न्हायी. आमा बायकोचं ते सती-सावित्रीचं व्रत असतं. नवऱ्याची जर बायकूनं मनोभावे सेवा केली तर ती वरती देवापाशी रुजी व्हती म्हणतात.’

‘मग मलाच देव्हाऱ्यात बसंव ना!’

‘माझ्या काळजाच्या देव्हाऱ्यात तुमालाच मी देव म्हनून कवाच बसवलाय जी.’

‘अस्सं? मग माझी रोज पूजा करीत जा, मी म्हणेन ती सेवा करीत जा. म्हणजे एके दिवशी तुझ्यावर प्रसन्न होऊन तुला मी पुत्ररत्नाचा लाभ करवून देईन... अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!’

‘ईश्श!’ म्हणून रुक्मिणी डोक्यावर पदर घेत खूप खूप लाजली. लाजून लालेलाल झाली. भिकू तिच्याजवळ सरकू लागला.

पण एवढ्यात ठमाकाकू आत आली. भिकू दचकून मागं सरला. ठमाकाकू बिचकत बोलली, ‘काय नवरा बायकोचं हितगुज चाललेलं, त्यात माझ्या येण्यानं...’

चांगलचं झालं. जत्रेला जायचा येळ तरी टळला, हजरजबाबी भिकू बोलून गेला, ‘आटपा उन चढाया लागलंय. आमचं कशाचं आलाय हितगुज!’

‘न्हाय? नवरा-बायकोचं हितगुज हेच खरं संसारातलं मीठ असतं. त्यानंच संसाराला गोडी येते... त्याविना संसार आळणी, तीन मुलांचं आईबाप तब्येत तशी अजून बरी न्हाय म्हणूनच तिच्या सोबतीला येतेय हं मी... नवस बोलणार हाय तुझी रुक्मिणी, माहित हाय ना भिकू तुला?’

‘नवस? न्हाय बा! आणि ते कशासाठी?’

‘झाकली मूठ सव्वा लाखाची, उघडली तर फुकाची!’

‘चला, त्येचं काय ऐकता? त्येचं सोंगाडपन हाय हे सोंगाडपन...’

‘मुलींना संगतीनं घ्यायचं?’ ठमाकाकू.

‘व्हय. अजून लहान हायत ती. मुलांची जात. जत्रा बघतील, मेवा मिठाई खातील... घेऊ या.’ रुक्मिणी बोलली, ‘चला...’

--- दूर गावाबाहेरील टेकडीवर महादेवाची जत्रा भरली होती. जागृत दैवत असल्यानं आसपासच्या गावातूनही काही भाविक मंडळी आलेली. कुणी देवाला नवस बोलायला, तर कुणी देवाचं नवस फेडायला आलेली होती. जत्रा पाच हजारावर भरली होती.

या महादेवाला ‘दवणा’ वाहण्याची प्रथा चालत आली होती. जत्रेला आलेले भाविक, या जत्रेला बाजारातून दवणा विकत घेत असत. नंतर नारळ, अबीरबुक्का, गुलाल ज्यांना जसं पाहिजे तसं विकत घेत असत. नंतर तोंडानं कुणी, जय जय भोला शंकर तर कुणी हर हर महादेव अशा ललकाऱ्या देत, घेत त्या टेकडीवर चढून जात. टेकडीवर भलं मोठं टोलेजंग देऊळ उभारलेले होतं, त्या देवळाला समोरुन एकूण पन्नास पायऱ्या होत्या. दहा पायऱ्या चढून अकराव्या पायरीवर आल्यावर महार-मांग-ढोर-चांभार आदी खालच्या जातींतील लोकांनी तिथूनच देवाचं दर्शन घ्यायचं, अशी जणू त्यांना लक्ष्मणरेषाच तिथं आखून दिलेली होती. बारावी पायरी कुणी चढण्याचा प्रयत्न केला तर देवाचा त्याच्यावर भयंकर कोप होतो असा धाक तिथं होता. कोण्या एका चांभाराने म्हणे अशी बारावी पायरी चढण्याचा प्रयत्न केला तेव्हा देव त्याच्यावर भयंकर कोपल्याची, त्याच्या

साऱ्या घरदाराची, वंशाची देवानं राखरांगोळी केल्याची एक भयंकर लोककथाही तिथं चालत आलेली होती. त्यामुळं सारे बहिष्कृत लोक देवाला भिऊन लांबूनच देवाचं दर्शन घेत असत. तिथूनच ते देवाला नसव बोलत असत. देव ऐकत असत.

त्यात रुक्मिणी अत्यंत भाविक स्त्री. धार्मिक संस्कार काटेकोर पाळणाऱ्या रामानंदपंथीय घराण्यात वाढलेली. गरीब असली तरी भक्तीभावानं महासंपन्न, चारित्र्यानं निष्कलंक, निष्पाप. तिनं आपल्या दोन्ही मुलींना प्रथम दवणा वहायास लावून मग देवाच्या पायरीवर मस्तक ठेवायला लावलं. नंतर तिनं त्या अकराव्या पायरीवरच अत्यंत नम्रपणे आपलं डोकं ठेवलं. असं डोकं टेकूनच मनातल्या मनात पण अगदी अंत:करणापासून ती महादेवाच्यापुढं आपलं हृदय मोकळं करु लागली. आपला नवस बोलू लागली.

'भोळ्या शंकरा, देवा महादेवा... तुला डोळं हायती. या जगातलं सारं सारं तू बघतूयास. तुझ्या नजरेला दिसत न्हाय असं या जगात काय हाय? आमी नवरा-बायको... देवा... सदा तुझ्या भाकेत. सदा तुझ्या सेवेत. जानतूयास तू देवा, आमा नवरा-बायकूची अंत:करणं पवित्र गंगाजळासारखी निरमळ. कुणाशी भांडणतंटा न्हायी. कुणाबद्दल द्वेष-मत्सर न्हायी. डोकं धरणं न्हायी. सरळ मार्गानं चालायचं. धरमानं वागायचं. एवढंच आमाला ठावं देवा, महादेवा लागोपाठ आमाला तीन मुलीच तू दिल्या हायीस. तुझं ते देणं आमी नाकारु कसं? पण महादेवा... तुला डोळे हायती. लबाड न्हायी मी बोलत. आत्ता आत्ता माझी तब्येत ही झालीया अशी... तोळा मासा जशी. घटकंत चांगली. घटकंत बिघडलेली. देवा, आता जादा माझ्यानं निबणार न्हायी. तवा देवा... या तीन मुलींच्या पाठीवर तू आता मला फक्त एक मुलगा दे... एकच मुलगा दे... फक्त एकच मुलगा. आमच्या वंशाला दिवा लाव, मग काही काही नगं...'

'देवा... तुझ्या किरपेनं मला मुलगा झाला तर त्या मुलाला घेऊन तुझ्या दरबारी मी चालत येईन. या हिथंच तुझ्या या मानाच्या पायरीवर पाच नारळ, दवण्याच्या राशी, पाच पाच अबीरबुक्का, गुलालाच्या पुड्या वाहीन. तुझ्या या किरपेची जलमभर आठवण रहावी म्हणून, माझ्या त्या मुलाचं नाव तुझंच... महादेव न्हायीतर शंकर ठेवीन. भोळ्या शंकराऽऽ या भोळ्या भगताच्या नवसाला पाव रे बाबाऽऽऽ आमच्या वंशाला दिवा लाव रे... देवाऽऽ दिवा लाव...' आणि रुक्मिणी एकदम उठून जोरात ओरडली, 'जय जय भोळा शंकर...'

ठमाकाकू तिला साथ देत ओरडली, 'हर हर महादेव...' आणि भिकूकडे वळून पाहत म्हणाली, 'ये भिकू, तू इकडे ये बघू. तुमी दोघं जोडीनं आता महादेवाच्या पाया पडा बघू... व्हय, तुमा जोडीच्या मनात महादेव पुरता शिरला पाहिजी... की काम झालंच.'

भिकू नि रुक्मिणीनं मोठ्या भक्तीभावानं, जय जय भोळा शंकर असं तोंडानं म्हणत म्हणत त्या पायरीवरच जोडीनं एकदम डोकी टेकवली. अगदी त्याच वेळी वर मंदिरात मोठमोठ्यानं घंटानाद सुरु झाला. बोलाफुलाला गाठ पडली!

ठमाकाकू खूप आनंदली. म्हणाली, 'भिकू... रखमा... आरं, तुमा दोघाचं नसव देवाला रुजू झाले. तुमी जोडीनं त्या पायरीवर डोकी टेकवायला नि वर मंदिरातली घंटा वाजवायला एकच गाठ पडली होऽऽ म्हंजी, शुभ शकून झाला. शुभ शकून.'

भिकू रुक्मिणी एकदम ओरडली, 'जय जय भोळा शंकर!'

ठमाकाकू त्यांना साथ देत तितक्याच आवाजात ओरडली, 'हर हरऽऽऽ महादेऽऽव!'

• • •

६

गावच्या महादेवाची जत्रा दुसऱ्या वर्षाच्या चार दिवसांवर आलेली. अगदी त्याच वेळी रुक्मिणीला पुत्ररत्नाचा लाभ झाला. सारेजण एकमुखानं म्हणू लागले, 'महादेव नवसाला पावला... रुक्मिणीचं साकडं देवानं ऐकलं... पुत्ररत्नाचा लाभ झाला.'

या खेपेला रुक्मिणीला इतक्या असह्य वेदना होत होत्या, इतका रक्तस्त्राव अजून होत होता, तरी साता नवसांना जन्मलेल्या पुत्राकडं पाहताना, त्याचा कोमल मुखचंद्रमा निरखताना, तिच्या डोळ्यांतून आनंदाच्या अश्रुधारा वाहत होत्या. तिचा चेहरा आनंदानं कसा फुलून गेला होता.

या वेळी सुईण नाणु मावशीनं अनुभवानं ओळखलेलं. तिनं लगेच भिकूला सांगितलं, 'थांबू नका. रखमाला दवाखान्यात घेऊन जा. माझ्या हाताबाहेरची केस आहे. मी नि ठमाकाकू सोबतीला येते पाहिजी तर...' आणि भिकूनं धावाधाव करुन तातडीनं व्यवस्था केली. वेळेवर डॉक्टर भेटल्यानं, त्यातूनही रुक्मिणी वाचली. तिचा पुर्नजन्म झाला जणू!

बाळंपणानंतर सात दिवस रुक्मिणी सरकारी दवाखान्यात ॲडमिट होती. त्यामुळं तिनवी, पाचवी व सातवी आदी धार्मिक मंगलविधी करता आले नाहीत. सात दिवसांनी रुक्मिणी आपल्या पुत्ररत्नासह, ठमाकाकू व नाणु मावशीसह सुखरुप परतली. त्या वेळी तिला कोण आनंद झालेला. ती त्याच आनंदात नवऱ्यास म्हणाली, 'धनी, कायबी करा. पन आपल्या या साता नवसाच्या बाळाचं बारसं घातलं पाहिजी... मुलाला घेऊन एवढ्यात महादेवाच्या दरशनाला जाता येणार न्हायी... पण बारसं... अजून चार दिस हायती. बघा.'

'रखमे... अशी का म्हणतेस? अगं जो चोच देतो, तो चाराबी देतो. पांडुरंग... पांडुरंग... मुलीचं बारसं घालायची शक्ती ज्यानं दिली, तो या वेळीबी धावून येईल... आंधळ्याच्या गाई देव राखतो म्हणतात.'

'व्हय! देव राखतो की... असं म्हणून तिनं भिकूला हळूच विचारलं, काय वं... आपल्या या मुलाचं नाव देवाचंच नाव ठिवावं लागंल... म्हटलं शंकर नाव ठिवावं की महादेव?'

'शंकर ठिव की...'

'आवडतयं तुमाला? मग शंकरच ठिवू या नाव... हे बघा, जाता जाता त्या राणीला सांगा, मी बोलवलयं म्हणून. तिला शंकर नावावरुन नवा पाळणा रचाया सांगणार हाय.'

'व्हय... व्हय! बारशाच्या तयारीला आतापास्नंच लागायला हवं. शुभ कामाला उशीर नगं!'

बारशाचा शुभमंगल दिन उगवला. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी रुक्मिणीचं चंद्रमौळी घर, घरापुढचा उघडा मांडव, आंब्याच्या पल्लवांनी फुलाफळांनी श्रृंगारला होता. परड्यांतील विविधरंगी फुलांनी, तगरीच्या फुलांनी पाळणा सजविला होता. गावच्या जीनगरांनी 'रामी' च्या वेळेला दिलेली कागदी खेळणी, चिमण्या, राघू, मोर घरी भिकूनं तशीच जपून ठेवली होती. ती सारी परत त्या पाळण्यावर लटकावली. संध्याकाळ होऊ लागताच ज्ञातीतील सुवासिनी अंगावर चांगले चांगले कपडे घालून, बारशासाठी, मुलाला पाळण्यात घालून त्याचं नाव ठेवण्यासाठी जमू लागल्या होत्या.

नाणू शिंगे यानं येऊन आपलं रणशिंग फुंकून साऱ्या वातावरणात मंगलमय सूर भरुन टाकले. राणी व तिच्या मैत्रिणी नवीन पाळणागीत तयार करुन, गाण्याच्या मोठ्या तयारीनं तिथं आलेल्या. धार्मिक विधीप्रमाणं जमलेल्या साऱ्याजणींनी बाळंतिणीची खणा-नारळाची ओटी भरली व मुलाच्या अंगावर 'बाळलेणी,' 'दृष्टीचे मणी' चढविले. साऱ्याजणी मग पाळण्याभोवती जमल्या. चिवचिवाट करु लागल्या. पाळणा हलू लागला. राणी व तिच्या मैत्रिणी एकसाथम एक सुरात गाऊ लागल्या. आसमंतात पाळणागीताचं मंगल मधूर सूर घुमू लागले...

"जू बाळा जू जू रे जूऽऽऽ

पुत्र जन्मला देखोनी नयनी। आनंद मावंना आख्खा गगणी।

हिरा शोभला जैसा कोंदणी। पूर्वेचा चंद्र जातो अस्मानी।

जू बाळा जू जू रे जूऽऽऽ...।।

रत्नजडीत पान शोभते भाळी। नयनीचा कोरा काजळ घाली।

दंडी बाजूदंड मुद्रिका करी। पायीचे तोडे पैंजण वरी।

जू बाळा जू जू रे जूऽऽऽ...।।

वाळ्याचा नाद उमटतो दारी। मोत्यांची कंठी त्यावर सरी।

'रुक्मिणी' बैसली मंचकावरी। नाव ठेविले 'शंकर' श्रीहरी।

जू बाळा जू जू रे जूऽऽऽ...।।"

आणि बाळाच्या कानात कुर्रर्र करण्यासाठी राणी खाली वाकली... शंकर... शंकर... कुर्रर्र... केलं... तोच साऱ्याजणींनी राणीच्या पाठीवर बुक्क्यांची खैरात केली. राणी लटकी किंचाळली. साऱ्याजणी त्यावर खळाळून हसल्या. ठमाकाकू म्हणाल्या, 'राणी, शंकर नावानं सगळ्यांना घुगऱ्या वाट बघू... घुगऱ्या वाटताना यांना सांग... घरागणिक एक मनुष्य जेवायला पाठवा म्हणून. पिरमानं गोड धोड केलंय, गोड करुन घ्यायचं मग जायचं...'

भिकूने तेवढ्यात लगबग करुन घुगऱ्याची दुर्डी राणीच्या हातात आणून दिली. म्हणाला, 'राणी, शंकर च्या नावानं वाट साऱ्यांना घुगऱ्या. कुणाला घुगऱ्या मिळाल्या न्हायीत असं व्हायला नगं. देवाऽऽ पांडुरंगाऽऽ ऽऽ' आणि भिकू बाजूला होत मनातल्या मनात पुटपुटला, 'पांडुरंगा, लाज राखलीस या वारकऱ्याचीऽऽ कसं काय हे सारं जमलं नि कसं काय घडलं, हे कळलंच न्हायीऽऽ.'

बारसं तसं ठिकठाक झालं. सुईण नाणुमावशी व ठमाकाकूला भिकूनं हर्षभरानं आहेर केला. कवतीक करीत सारेजण निघून गेले. पण रुक्मिणीनं त्यानंतर अंथरुण धरलं. तिला भूक लागेनाशी झाली. ताप तर सारखा तावत होता. त्यामुळे रुक्मिणीला थकल्याथकल्यासारखं वाटत होतं. कधीकधी अलीकडं रुक्मिणीच्या मनात येऊ लागलं. आता आपण काही जास्त दिवस जगत नाही. आतून सारं आवरत आलंय. पण तिच्या नवसाच्या लहान पुत्रासाठी, शंकरसाठी तिला अजून जगायचं होतं. रखमा आईचा जीव त्यात घुटमळत होता. त्यासाठी तुटत होता. त्यासाठी महादेवाला ह्रदयापासून करुणा भाकू लागली, 'देवा... माझा बाळ शंकर अजून थोडा मोठा होऊ दे रे... तो रांगू दे रे... धाटामोठा होऊ दे... मग तू मला तुझ्याकडे घेऊन जा... देवा... एवढ्यात नको रे...'

मनातली ही घालमेल रुक्मिणी भिकूला सांगू शकत नव्हती. ती आपलं हे अंतरीचं दु:ख झाकून ठेवीत होती. भिकूला उघडून दाखवलं तर भिकू हबका घेईल. मग ज्याच्या आधारावर आम्ही वेली जगतोय, वाढतोय तो वृक्षच त्यानं कोमेजून जाईल असं रखमाला वाटे. भिकूला हे सारं... रुक्मिणीचं दु:ख काही कळत नव्हतं, तरी तिचा उदासवाणा चेहरा पाहून, तो मनोमनी उदास झाला होता. चिंताक्रांत झालेला होता.

नित्यक्रमानं काळ पुढं सरकत होता. तोच भिकूची थोरली मुलगी आक्कास, नात्यातल्याकडून लग्नाची मागणी आली. सहा-सात वर्षाची चिमुरडी आक्का. नवरा मुलगा असेल दहा वर्षाचा. पण भिकू-रखमानं लग्नाला होकार दिला. लग्न म्हणजे काय, हे कळण्याचं वय नव्हतं आक्काचं. त्या काळी लग्नाला वयाचं बंधन नव्हतं. दोन्ही मुलामुलींच्या नवरा-नवरीच्या पाळण्याला बाशिंग बांधून त्या काळी लग्न होत होती. रुप-रंगाचा, पसंती नापसंतीचा प्रश्नच नव्हता. लग्न नात्यातल्या नात्यात

हुंडापद्धत जवळजवळ नव्हतीच. उलट, मुलीच्या आईबापाला-नवरी मुलीला लहानाचं मोठं केलं, म्हणून तिच्या आईवडीलांनाच 'द्याज' दिलं जात होतं. आईबाप ठरवील ते मान्य केलं जात होतं. आईबापानं ठरविलं, सांगितलं म्हणूनच ना, रामचंद्रप्रभू वनवासाला गेले ? तशी आक्का आईवडिलांनी सांगितलं म्हणून ती मुकाट सासरी दापोलीला गेली.

आता राहिली भिकू-रुक्मिणीची तीन मुलं. थोरली रामी, नंतर गौरा, धाकटा आता कुठं उभा राहत असलेला, लाडका शंकर... अंगणात खेळू बागडू लागली की, संसाराच्या रखरखीत वाळवंटीदेखील त्यांना घरात, दारात नंदनवन फुलल्यासारखं वाटू लागे. रखमाई... आपला आजार विसरुन जाई. भिकूला आपल्या कामावरील कष्टाचा क्षीण विरुन गेल्यासारखा वाटे. ती मुलं म्हणजे त्यांच्या दु:खी जीवाचा विरंगुळा होती. आपल्या मुलांचा, आपल्याच पानाफुलांनी फुललेल्या बागेत, चाललेला खेळ पाहून, भिकूच्या ओठावर एकच एक गाणं मधासारखं घोळत राही, आपल्या गोड गळ्यानं तो गुणगुणत राही --

"प्रभू माझी जीवनबाग फुलव ।।धृ।।

कुशल तू माळी, बाग सांभाळी

स्वर्गीय सौंदर्ये ती रे खुलव ।।१।।

उत्साहाची, आनंदाची

थुईथुई कारंजी येथे उडव ।।२।।

बाग सजवूनि, तेथेच निवसूनि

मग गोड गोड तू वेणू वाजव ।।३।।

प्रभू माझी जीवन बाग फुलव ।।"

गाणं संपताच भिकूचं लक्ष रुक्मिणीकडं गेलं. तो आश्चर्य करीत घाबरुन बोलला, 'रुक्मिणे... तुझ्या डोळ्यांत पाणी ?'

या प्रश्नाला कसलंच उत्तर न देता रुक्मिणी अधिकच रडू लागली. भिकू तिला समजावू लागला. ती फुटून फुटून रडूच लागली. भिकू अधिकच कावराबावरा झाला. रुक्मिणीच्या असं रडण्याचं गूढ त्याला काही केल्या उकलेना. मोठ्या कुतुहूलानं त्यान विचारलं, 'रुक्मिणे... असं का रडतेस, कसलं दु:ख झालं तुला असं ? ते मला सांगशील की न्हायी ? अगं, आपण दोघं एकाच सुखदु:खाचे सारखे वाटेकरी. तुझं दु:ख ते माझं दु:ख...'

रुक्मिणीचे डोळे पाणी वाहतच होते. अश्रूंना खळ नव्हता. भिकू तिचं अश्रू पुशीत, परोपरीनं विचारीत होता. अखेर रुक्मिणीनं 'धनी... धनी...' असं म्हणून भिकूला घट्ट मिठी मारली. भिकूनंही तिला तशीच आपल्या उबदार मिठीत अधिकच घट्ट आवळून धरली. बोलला, 'हृदयातलं दु:ख दुसऱ्याला सांगितल्यानं हलकं होतं...'

ती गुदमरली होती. तरी बोलली, 'धनी... आपली ही जीवनबाग देवानं फुलवलीय. पण त्या बागेची मी माळीण... मी माळीन...' आणि तिला एक दाटून हुंदका फुटला. भिकूचे डोळे डबडबले... तरीही ती बोलली, 'मी माळीण मात्र... मला न्हाय वाटत, मी आता फार दिवस तुमची सोबत करीन... मला... मला...' असं म्हणून रुक्मिणी परत रडू लागली. स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

भिकू तिला थोपटीत समजावीत म्हणाला, 'रुक्मिणेऽऽ अगं, तुला काही नाही होत. उगीच तू हे तुझ्या मनानं भूत करुन घेतलयंस. अगं अशी सोन्यासारखी बाळं तुला ज्या देवानं दिली तो देव काय तुला अशी अर्ध्या संसारावरुन उठवून नेईल ? देवावर भरवंसा ठेव. तीच आम्हा दीन-दुबळ्या गरीबांची ठेव. तुला काय व्हणार न्हायी. पांडुरंगाचा मी वारकरी हाय.

त्याचा हा बोल हाय. हृदयापासून निघालेला बोल देवाला ऐकू जातो... अगं, तू महादेवाला मनापासून बोलावलीस, महादेव आला की न्हायी तुला पुत्र घेऊन धावून -- आताही तू असंच देवाचा धावा कर... या आजारातूनही तुला तो उठवेल --'

'असं म्हणतासा धनी... मी धावा केला, तर देव धावून येईल? देव धावून येईल?' रुक्मिणीनं भिकूच्या कुशीत स्वतःला ढकलून दिलं. भिकूनं तिला अगदी आपल्या हृदयाजवळ घट्ट आवळून धरलं. प्रेमभरे तिला थोपटू लागला. तिच्या सर्वांगावरुन प्रेमळ हात फिरवू लागला. क्षणभर दोघं साऱ्या जगाला विसरली.

संध्याकाळ होऊन कडुसं पडलेलं, पण मघापासून भिकू-रखमा तशीच झोपून राहिलेली. आईबापाच्या सुखदुःखाला बघणारी रामी त्यांना कशाला उठवेल? आता चांदणं पडू लागलं होतं. रामीच्या घरापुढं खूप आंगण होतं. रामीकडं साऱ्या मुली खेळावयास येत. रामीचं आकर्षण साऱ्यांना. आपल्या आईबापाची झोपमोड होऊ नये म्हणून शहाण्या रामीनं जरा दूर झिम्माफुगडीचा खेळ मांडला --

"झिम्मा खेळू या गं... झिम्म नाचू या गं

झिम्मा खेळत साऱ्याजणी हसू नाचू या गं

झिम पोरी झिम

कपाळीचं भिंग,

भिंग गेलं उडून

पोरी आल्या पळून -- "

झिम्मा सुरु झाला की खेळाला उधाण येतं. एकमेकीवर झेप घेत झिम्मा चाललेला. हसून खिदळून मुली घर डोक्यावर घेत. पण मोठी माणसं त्याकडं कौतुकानं पाहत राहत. झिम्मा मग चांगलाच रंगात आला. मुली एकमेकीवर झेपावत पुन्हा झिम्मा घालू लागल्या. रामी गाऊ लागली -- इतर मुली साथ देऊ लागल्या.

"नाच गं घुमा...

कशी मी नाचू? नाच गं घुमा ऽ ऽ

या गावचा त्या गावचा

सोनार न्हाई आला

माज्या बाळाला वाळा न्हाई दिला

कशी मी नाचू?... नाच गं घुमा ऽ ऽ

त्यात अंगण वाकडं

भवतनं लाकडं

कशी मी नाचू?... नाच गं घुमा ऽ ऽ ऽ"

नंतर रामीनं 'फू... फू... फुगडी फू...' असं करीत सारं अंगण दणाणून सोडलं. सर्वांचे डोळे तिच्यावर खिळलेले. रामी तशी दिसायला चुणचुणीत नि गायला खणखणीत होती. रामी दुसरं गाणं म्हणू लागली, नाचत नाचत...

"काळी चंद्रकळा नेसू मी कशी?

गळ्यात हार बाई वाकू मी कशी?

पायात पैंजण बाई चालू मी कशी?

बाहेर मामंजी, बाई मी बोलू कशी?"

पहिली मुलगी म्हणाली, 'अगं, अगं कुणाशी गं बोलायचं हाय तुला?'

दुसरी मुलगी म्हणाली,'कुणाशी? तिच्या नवऱ्याशी? तुझी का चौकशी?'

पहिली मुलगी परत - 'गप्प... गप्प... मध्येच उगी बडबडू नगंस!'

दुसरी मुलगी परत - 'आज पावणं आल्याती तुला बघायला!'

मध्येच कुणीतरी बोलली - 'अगं, सर हो बाजूला. उगी लुडूबुडू नगंस!'

साऱ्या मुली मग 'खो... खो...' करुन हसू लागल्या. बघत बसलेली मोठी माणसंही त्या हसण्यात सामील झाली. एव्हाना भिकू-रखमाई उठून आपल्या रामीचा हा झिम्मा-फुगडी खेळ मोठ्या आवडीनं, कौतुकानं पाहत बसलेली.

गोंडस बांध्याची रामी, नाचताना अधिकच लोभस दिसे. तिला पाहून रखमाई आलबला घेत, कानशिलावर बोटं मोडीत म्हणू लागली, 'दिष्ट लागील गं माझ्या रामीला. इटापिटा टळो, बघणाऱ्यांची दृष्टीच जळो!'

भिकू म्हणाला, 'अगं, ती तर आपली भाग्याची भागिरथी हाय... बघ... बघ... सगळ्या मुलींत आपली भागा उजीड पडल्यागत दिसतीया. तिचं खेळणं संपलं की दिष्टच काढून टाकू.'

'बघा... बघा... किती नाचते ती, किती गाते. रामी म्हंजी मागच्या जन्माची किनई देवी असावी म्हणतात. त्याशिवाय का एवढ्या वयात, तिला एवढी समजूत!'

'व्हयं. नागू शिंगे देखील असं म्हणाला हुता. मला वाटतयं आपली भागा मागील जल्मी बामनाची असावी... भाषा कशी मिठ्ठास हाय.'

'असंल... असंल... बामनीणीवानी बोलतीया नि वागतीया बी आक्षी तशीच देवाधरमाचं पुजेचं लई याड हाय हिला. लई औक्ष लाभू दे माझ्या बाळीला. राजाची राणी होऊ दे माझी भागा!'

'आईचा बोल... त्येला देवाच्या बोला इतकं मोल... हुईल... हुईल तुझ्या मनापरमानं सारं हुईल!'

परत रुक्मिणीच्या डोळ्यांत भरकन् पाणी जमलं. टपटप धारा... वाहू लागल्या. ते पाहून भिकू कावराबावरा झाला. म्हणाला, 'हे काय? परत डोळ्यांत पाणी? रखमेऽऽ अशी रडत जाऊ नगंस. लई वंगाळ असतं ते. अशी रडत जाऊ नगंसऽऽ माझी शप्पत हाय.'

'सुटली म्हणा!'

'रडणार न्हाय म्हण?' भिकू.

'न्हाय रडणारऽऽ म्हणा सुटली?' रखमा.

क्षणभर दोघंजण मुलींच्या खेळण्याकडं बघत गप्प बसून राहिली. पण भिकूच्या मनात मात्र रुक्मिणीला काहीतरी सांगायचं असं आलं होतं. त्यानं हळूहळू बोलायला सुरुवात केली. 'कारभारनेऽऽ अलीकडं मला लई वाटू लागलयं की, भागाला बामनावानी लिवनं शिकवावं, शाळंत पाठवावं.'

भिकूला खुळ्यात काढीत जोरात रखमाई बोलली, 'काय व्हईक म्हणायचं की व्हनार? काय तरी काय बोलता? अवं, मुलीला कुनी लिवनं शिकवतंया व्हय? आजवर असं कंदी झालंय? मुलगी लिवनं शिकली तर, तिचं दळा-कांडा, रांधा-वाढा, उष्टी-काढा हे कुणी बघायचं? बाईच्या जलमाला लिवनं कशाला? बामनाच्या बायाबी कुठं शिकत्यात वं?'

भिकू थोडं नमतं घेत पण पटवून देण्याच्या सुरात बोलला, 'पण अलीकडं शिकाया लागल्याती... आपली कुलकर्ण्याची मंदा, बोरकरांची शांता शाळंला जाया लागल्याती...'

'आनंद झालाय म्हणायचं. बायांनी शिकायची म्हंजी पिरथीमीवर पापाची वाटणी येणार... लिवून ठिवलं तस, कलियुगात हे घडणार... कलियुग गं बाई हे कलियुग...'

'अगं, कलियुग नव्हं. हे नवंयुग म्हन नवंयुग. पुण्याला कोण माळ्याचा जोतीबा फुले... नावाचा पुढारी हाय... त्यानं म्हनं, आमा लोकासाठी तिथं शाळा काढलीया...'

'धरम बुडवाया आलाय अन् ह्यो माळ्याचा जोतीबा. अवं मग धरम केलाय कशापायी? देवानं शास्तार लिवलंय कशापायी? धरम कुठं पाण्यात ढकलायचा? ही इद्या घेऊन आमी काय बोंब मारत बसायचं... देवाला न्हायी हे बगवणार. पिरथीमी तो अश्शीच्या अश्शी बुडवलं! पाताळात गाडून टाकंल.'

'मलाबी तुझं म्हणणं पटतं गं... पण काल आपलं गोपाळबाबा वलंकरबी असं म्हणत हुतं.' भिकू पटवून देत म्हणाला.

'काय म्हणत हुतं ते?'

'ते म्हणत हुतं, आपल्या पोरांना-पोरींना शाळेत घाला.'

'तिरडी गेली त्या वलंगकरबाबाची... सांगा, कोण घेणार हो तुमाला शाळंत? सारी बामन मास्तर शिवशिवी न्हाय हा हुनार त्येंना? मला बाई हे पटत न्हायी... देवानं आमाला म्हार म्हणून जलमाला घातलंय, ते काय शिकून बामन हुण्यासाठी? आपला धरम बुडविण्यासाठी?'

'तुझं म्हणणं पटतयं गं मला... पण मी म्हणतो, समजा शिवाशिव हाय कबूल हाय. धरम बुडंल, कबूल हाय. पण बामन नसंल हुता आलं तरी लिहिता वाचता आलं म्हंजी लोकांची कारडं तरी वाचता येतील. जमिनीची कागदं बनविलेल्या हुंड्या फोडून सांगता येतील. मी म्हणतो, काय एवढं वंगाळ हाय त्यात. मला थोडं अभंग वाचण्यापुरतं येतया. त्यामुळे माझं किती चांगलं झालंया. गावचं लोक माझ्याकडं येत्यात. कारड वाचून दाखव म्हणत्यात. कुणी मला मास्तर बी म्हणत्यात. म्हणून वाटतयां आमी साऱ्यांनी आता शिकावं. आपलं गोपाळ बाबा वलंगकर म्हणत हुतं, आमीबी माणसं आहोत... माणसासारखी माणसं आमी. पर आमी जनावरापरास कमी किमतीचं का झालोय? तर आमाला ही 'इद्या' नाही म्हणून. आमी माणसं असून नरकातलं किडं कशाला झालोय तर आमाला ही इद्या जवळ नाही म्हणून...'

याच वेळी रामी आपला झिम्मा फुगडीचा खेळ संपवून धावत आईबापांच्या गळ्यात येऊन पडली. भिकू बोलतच होता. त्यांच्यागत... बामनागत आमालाबी दोन डोळे, दोन कान, हात पाय, जलम मरन सगळं सगळं सारखं हाय. आपलं त्येचं रगातसुद्धा सारखं हाय... आमी कशानं कमी न्हायी. मग आमची ही दशा का झालीय? आमच्या जवळ ही इद्या नाही म्हणून... त्यासाठी तुमच्या मुला-मुलींना शाळंत घाला... मी थोडी शाळा शिकलो, तरी एवढा अधिकारी झालो... तुमची मुलं खूप शाळा शिकलीत तर माझ्यापरास मोठं अधिकारी हुतील... हेची करी मत... जेणे होईल तुझे हित...

मध्येच रामी बोलली, 'बाबा, मी शाळंला जाऊ?'

'येडी की काय भागा? आगं, माणसानं मनात आलं तर सारं करावं पण देवाइरुद्ध काय करु नये' भिकूकडे पाहत रागानं रखमा बोलली, 'आपलं वाडवडील काय करु गाढाव हुतील व्हय?'

‘सात गाढाव होतीत ती...!’ भिकू रागानं उद्‌गारला, ‘ते गाढाव राहिलंत म्हणून आमी गाढाव झालोत?’

‘आत्ता गं बया ह्येंच त्वांड हाय का घोड्यांचा तोबरा. वाडवडलांना गाढव म्हणत्याती...’

‘तसं समज घटकाभर...’

‘हे बघा, माझ्या रामीला मी शाळंत न्हायी घालणार, अशीच ठिवणार पर धरमापरमानं देवाच्या म्हणण्यापरमानंच वागणार. वाडवडलापरमानं वागणार. तवा यावर आता पुढं बोलणंच नगं...’

‘मग बोलणचं खुटलं, नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडून गेले वारे.’

‘आई... बाबांची तशी विच्छाच हाय तर मी शाळंला जाईन. शिकीन.’

‘अगं, तू मुलगी हाईस, मुलीला कोण घेणार शाळंत? मुली कंदी शाळंत जात्याना बघीतलीयास का? आणि मुलीला शाळा शिकून काय उपयोग तरी? तुझ्या बाचं शाळा शिकायचं येड, तुझ्या टकुऱ्यातून काढून टाक बरं! तुझा बाच येडा झालाय देवाधरमा इरुद वागतूया, ते बास झालं तू बी येडी होऊ नगस त्येंच्या बराबर!’

“आता तरी पुढे हाचि उपदेश

नका करु नाश आयुष्याचा”

भिकूनं झक्कपैकी अभंग म्हटला. रामी हसत हसत आईला समजावीत म्हणाली, ‘आई तुझी तशी विच्छाच नसंल तर न्हाय जात मी बापुडी त्या शाळंला, मगं तर झालं?’

‘माझी गुणाची बाळी... माझ्यावरच जाणार.’

एवढ्या रात्रीची ठमाकाकू दापोलीच्या बाजारातून आलेली. येताना तिनं रामीसाठी एक खाऊचा पुडा आणला होता. ठमाकाकू ओरडतच म्हणाली, ‘रा... मी... ए ऽ... रा... मी, अगं हे बघ, तुला काय खाऊ आणलाय मी.’

‘आजे... काय काय आणलयास गं माझ्यासाठी यात?’

‘भेंडबत्तासा... गुडदाऽऽणी, शंकरऽऽऽपाळी.’

‘अबबब... एवढं सारं मला एकटीला?’

‘हां... हां... बाळी, तुला एकटीला... तू माझी गुडदाणी हायीस गं...’

‘आजी काहीतरीच काय?’

अन् रामीचा एक छानपैकी गोडसा गालगुच्चा घेऊन घाईनं ठमाकाकू आपल्या घरी निघून गेली. रामीताईला खाऊ दिलेला पाहताच, गौरा व शंकर खाऊसाठी धावली. त्या वेळी गौरा पाच वर्षाची असेल. शंकर तीन वर्षाचा. रामी काही केल्या त्या दोघा भावंडांना खाऊ देईना. ती म्हणू लागली, ‘आजीनं मला एकटीला खाऊ आणलाय, मी एकटीच खाणार, तुमाला न्हायीच आणलाय आणि हिणवून नाक खाजवल्यासारखं करीत रामी बोलली, टॉक टॉक माकडा... गल्लीच्या खोकडा...’

‘आई, सांग ना गं ताईला... मलाबी खाऊ द्यायला’ गौरी बोलली.

एवढा छोटा चिमुरडा शंकर ताईपासून खाऊ हिसकावून घेण्याचा प्रयत्न करु लागला. पण रामी काही केल्या खाऊचा एक कणही कुणाला देईना. गौरा व शंकर रडू लागली.

रखमाई प्रथम मायेनं बोलून म्हणाली, ‘रामीबाळी, माझी गुणाची रामी, ही तुझी भावंडं ना... तू त्यांची ताई ना... त्यांची वडील बहीण ना... धाकट्यांनी... आई ना.’

‘न्हायी, न्हायी मी कुणाचीच कुणी नव्हं... मी कुणाची ताई न्हायी, आई न्हायी. माझी मी माझ्या मनाची. ठमाआजी म्हणाली, हा खाऊ मला एकटीला आणलाय. मी कुणाला देणार न्हायी.’

गौरा नि शंकर मग भोकांड पसरुन रडू लागली. रखमाई रामीला डोळे वटारुन रागानं दटावून म्हणाली, ‘रामेऽऽऽ त्यांना दे पाहू... थोडा थोडा खाऊ...!’

‘न्हायी देणार... न्हायी देणार...’

त्यासरशी रखमाईनं, कधी नाही ती त्या दिवशी लाडक्या रामीच्या गालावर जोरात थप्पड मारली. रामीनं मग रागानं हातातला सारा खाऊ खाली फेकून दिला नि आदळापट करीत जोरजोरानं रडू लागली.

एवढा वेळ भिकू नुसता पाहात बसला होता. रामीला भिकूनं प्रेमानं जवळ घेतलं. प्रेमानं तिचं डोळे पुसले, आंजारलं, गोंजारलं.

रखमाई रागानं बोलत होती, ‘तुमी... तुमी पोरीला लाडावून ठेवलीया. म्हाराचं लाडकं खेळणं हाडकं. जळलं मेलीचं लक्षण. अप्पलपोटी यमी हा नुसती यमी... सगळं काही हिला एकटीलाच पाहिजी... भावंडांची हाय का थोडी तरी माया... रुपानं हाय, तरी मनानं जरासुदीक मोठी न्हाय. माणसानं मनानं मोठं असावं... मेली, काराट खाऊ मयाची...’

रखमाई रामीला मारण्यासाठी परत उठू लागली. तिला थोपवीत भिकू म्हणाला, ‘हा... हा... बास... बास... लहान मुलावर... असं आरोप करायचं नसतात... या वेळी त्यांची मनं बनत असतात. तू म्हणालीस, रामी काराटखाऊ मयाची हाय... रामी मनातून म्हणणार अस्स काय, मग हायीच ती तसली... लहानांची मनं मग तशीच बनत असतात... तवा हे जपायचं. लहान मुलांना प्रेमानं सांगून शिकवायचं, बोलून असं दाखवायचं न्हाय.’ असं म्हणून रामीला जवळ घेत, तिच्या पाठीवरुन मायेनं हात फिरवीत प्रेमानं बोलला, ‘रामी, तुला आता एक गोष्ट सांगू का मी?’

‘सांगा, सांगा बाबा... आई उगाचीच माझ्यावर रागावते, मला मारते.’

बरं... बरं... आईचं घर उन्हात बांधू... कसं? ऐक... कोण एकेकाळी कोण्या एका गावी सातजण भाऊ राहत होते. त्यांना एक थोरली वडील बहीण होती. सारेजण तिला ताई म्हणत, ताई होती मोठ्या मनाची. मोठ्या दिलाची. कुणी तिला खाऊ दिला तर ती साऱ्या सातही भावांना समसमान वाटून दिल्याशिवाय आपुनहून एकटीच खात नसे. अशी तिची किरती साऱ्या गावातचं नव्हं, वर आभाळापर्यंत पोचलेली...

एकदा त्या सात भावांच्या मोठ्या बहिणीच्या मोठ्या मनाची परीक्षा घेण्यासाठी आभाळातून देव लोकांनी एक परी खाली भुईवर पाठवली. त्या परीनं आभाळातून त्या मोठ्या बहिणीसाठी मोठा खाऊचा पुडा घेऊन आणलेला. तो मोठा खाऊचा पुडा त्या मोठ्या बहिणीच्या हातात देत परीनं तिला बजावून सांगितलं, ‘केवळ तुझ्या एकटीसाठीच हा मी एवढा खाऊचा पुडा आणला हाय हं. यातला दुसऱ्या कोणाला एक कणही द्यायचा न्हायी हं. केवळ तुझ्या एकटीसाठीच. हो तू माझी एकटीच सोनूली हायीस.’

त्या मोठ्या बहिणीच्या गालावर लाडेलाडे टिचकी मारुन परी गुप्त झाली. मोठ्या बहिणीनं त्या परीनं दिलेला तो मोठा खाऊचा पुडा सोडून पाहिला. त्यात फक्त एक तीळ हुता एक तीळ...

‘एक तीळ? तीळ म्हंजी तो काय बाबा?’

एक तीळ म्हंजी... एक तांदळाएवढा, नव्हं त्यापरासबी लहान असा एक कण... आणि आभाळातल्या त्या परीनं खास तिच्या एकटीसाठी केवळ तो आणलेला. तिचं ते सात भाऊ त्या वेळी जवळच बसलेले. तिच्या त्या भावांनी त्या परीनं तिला बजावून सांगितलेलं ते बोलणं ऐकलेलं. पण ती सात भावांची मोठी बहीण एकाही भावाला सोडून कधीच एकटी म्हणून काही

खात नव्हती. तशी तिची साऱ्या गावात किरती हुती. त्यामुळं सारा गाव तिला मानत हुता. त्यामुळं तिच्या मोठ्या मनाची परीक्षा घेण्यासाठी देव लोकांनी आभाळातनं त्या परीला भुईवर पाठवलेली.

त्या मोठ्या मनाच्या मोठ्या बहिणीनं मग काय केलं? त्या एका तिळाचं समप्रमाणात आठ कण केलं, सात कण आपल्या भावांना एक एक असा वाटून दिला. आठवा कण, आपून सोता खाल्ला. तेव्हा एक भाऊ तिला म्हणाला, 'ताई, त्या परीनं तुझ्या एकटीसाठीच आणलेला तो तीळ, तू आमा साऱ्यांना कशाला वाटून दिलास? तुझ्यावर परी रागावेल, शाप देईल.'

तेव्हा ती म्हणाली, 'अरे भाऊ, तुमा सात भावांना सोडून, मला एकटीला सात पृथ्वीच्या मोलाचं ऐश्वर्य जरी कुणी दिलं तरी ते मला नको हाय. मी तुमची थोरली वडील बहीण हाय. तुमच्या आईसमान हाय. आई कंदी एकादा घास आपल्या मुलाला सोडून खाईल?'

तेवढ्यात ती परी तिथं एकदम प्रगट झाली. आनंदून म्हणाली,'हे सात भावांच्या वडील बहिणे... तू खरंच मोठ्या मनाची हायीस. तू धन्य हायीस. मी तुझ्यावर खूष हाय. तुला काय मागायचं ते माग. मी देईन.'

मोठी बहीण मोठ्या मनानं म्हणाली, 'आपल्या सातही भावांना सारखाच वाटा देणारं मोठं मन मला सदैव दे... आणि मनाप्रमानं मागील ते मिळंल, असं वरदान मला दे...'

एव्हाना रामीच्या डोळ्यांत पश्चातापानं अश्रू डबडबलेलं.

ती परी तोंड भरुन आशिर्वाद देत म्हणाली, 'तथास्तू!' आणि ती एकदम गुपीत झाली.

भिकूनं रामीकडं पाहिलं. रामी रडत असलेली त्याला दिसली. रखमाई रामीकडं नजर चोरुन बघत राहिली. भिकूनं रामीला विचारलं, 'रामी बाळ, का अशी रडतेस?'

'बाबा, तुमची गोष्ट मला लई आवडली हो. खरंच, मघाशी माझं चुकलंच. क्षमा करा, माझ्या भावंडांना मी खाऊ दिला पाहिजी हुता, मी त्यांची थोरली बहीण हुती, ताई हुती खरं ना? गौरा... शंकर या इकडं... हा घ्या खाऊ... रागावू नका हं या तुमच्या वेड्या ताईवर, पुन्हा जलमात न्हायी हं अशी चूक करणार मी... हा पहा, कानाला खडा.'

रामीनं कानाला हात लावून आपला कान स्वत:हून पिरगाळला. रखमाईजवळ जात पश्चातापी मनानं रामी बोलली, 'आई, तुझ्या पाया पडते, आता मला कळलं. यापुढं अशी चूक मी जलमांत करणार न्हायी... आई, मला क्षमा कर.' रामी अक्षरश: रखमाईच्या पाया पडली, पायावर डोकं ठेवून बोलली, 'भावंडांना मी इसरणार न्हायी. कंदी... कंदी...'

रखमाईचं हृदय आनंदानं भरुन आलेलं, तिच्यानं बोलवेना. विरघळलेल्या ढेकळाप्रमाणं रामीची स्थिती झाल्याचं पाहून तिला भडभडून आलं. तरी हृदयातील भावना आवरुन ती म्हणालीच, 'माझ्या कशाला पाया पडतेस, देवाच्या पड... मला मोठं मन दे... भावंडावर प्रेम करण्याची वासना दे. असं डोकं घासून देवाला सांग, आपली चूक कबूल कर. पुन्हा असं करणार न्हायी. म्हण.'

खिन्न रामी देव्हाऱ्याजवळ जाऊन उभी राहिळी. अश्रू ढाळीत देवाच्या पाया पडली. पुटपुटली. भिकूनं तिला लगेच उचलून पोटाशी धरलं. माया ओसंडून म्हणाला, 'माझी लाडाची भागाऽऽ माझी शहाणी भागाऽऽऽ'

रखमाईनं तिला जवळ ओढून घेतलं. तिला हळूवार कुरवाळलं. तिच्यावर अश्रूसिंचन केलं. रामीनं ते पाहिलं. म्हणाली, 'आई, का गं रडतेस?'

'रामी, तुला मारलं गं मी, तुझ्यावर प्रथमच मी हात टाकला...'

'आई, तुझ्या मारण्यानं तर माझं डोळं उघडलं. शहाणी झाले गं मी... मला अशीच मारत जा. मारुन शहाणी करत जा... हो, छडी लागे छम छम, इद्या येई घम घम.'

‘माझी गुणाऽऽऽ ची गुणवंऽऽती पार्वती...’

परत ओढून रखमानं रामीला आपल्या कुशीत घेतलं... कडकडून तिचा मुका घेतला. रामीनं प्रेमभरानं रखामाच्या गळ्याला मिठी मारली.

भिकू हे सारं पाहत होता. गदगदत होता. पुटपुटत होता --

“डोळे तुम्ही घ्यारे सुख... पहा विठोबाचे मुख...”

• • •

७

दिवस नि रात्रीचं रहाटगाडगं नित्याच्या गतीनं चाललेलं. तसा, घटका, सेकंद, पळे... या नित्याच्या आखून दिलेल्या चाकोरीतून ते चालेललं असतं. तसं माणसाच्या जीवनाचं नसतं. त्याच्या जीवनात कधी अकस्मात विजेप्रमाणे प्रकाश चमकून जाईल, जीवन उजळून जाईल तर कधी अकल्पितपणे निराशेचा घनघोर अंधार त्याला घेरुन टाकील. कशाकशाचा नेम नसतो. चाकोरीबद्ध जीवन नसतं. तो दोन घडी हसेल, दोन युगे रडेलही. याचंच नाव मानवी जिवन. दो घडीचा डाव.

भिकू-रुक्मिणीचं जीवनसुद्धा दोन घडी असं पण रुक्मिणी होती रामानंद पंथी व भिकू होता वारकरी पंथी. ***देविले अनंते तैसेचि राहावे... चित्ती असू द्यावे समाधान*** ह्या समाधानी वृत्तीनं जगणारं ते सरळ मार्गी सुखी दांपत्य. त्यात त्यांची लेक रामी, रखमाईला घरकामात लावत होती हातभार. चिमुकले हात चिमुकली भावना. चिमुकली जिद्द, गुडघ्याएवढी पोर पण घरकामात बनत होती थोराहुनी थोर! रामी रखमाईच्या पंखाखाली तन-मनानं वाढत होती. नवीन नवीन शिकत होती. फुलत होती. फोफावत होती.

भिकू रुक्मिणीचा संसार नाचारगत. रखमाई पहाटे उठून ‘गायरान’ च्या वाटेवरलं शेण गोळा करायला रोज जायची. आज तिची लाडकी लेक रामी तिला त्या कामी साथ द्यावयास निघालेली. तिला येताना पाहून रुक्मिणीनं विचारलं, ‘रामी, तू एवढ्या पहाटे कुठं निघालीस?’

‘तू कुठं निघालीस तिकडं.’ रामी उत्तरली.

‘नगं बाळ, इतक्यात जुपून नगंस या संसार गाड्याला. आमी आहोत तंवर सुख घे... नगं... नगं. येऊ नगंस.’

‘आई, लेकीनं माईचा कित्ता गिरवायचा असतू म्हणं. आईनं लगनाच्या आधी संसारातलं खाचखळगं दाखवून द्यायचं असत्यात. खाचखळगं चुकवायचं कसं, मोजायचं कसं नि त्यातून जगायचं कसं. सारं सारं शिकवायचं असतं. आई हीच मुलांची पहिली गुरु. आज दे मला या संसारातील पहिला धडा. ही पाटी घेतलीया. इद्या गोळा करुन आणायला...’

रामीच्या या बोलण्यावर रखमाई खळखळून हसली. म्हणाली, ‘रामी, किती गं तू शहाणी. येतेस तर चल. तुझी विच्छाच तशी हाय तर त्यावर म्या इरजान कशाला घालू? चल.’

दोघींनीही आपापल्या पाट्या भरभरुन शेण गोळा करुन घरी आणलं. रखमाई आपल्या लेकीला त्यातील खुब्या, बारकावे सांगू लागली. शिकवू लागली.

‘हे बघ भागा, शेण आणणं, शेणी लावणं, शेणी वाळवून त्या विकणं, असा हा बिनभांडवली, बिनतोट्याचा धंदा हाय. तरीबी एका गरीब कुटूंबाच्या नाचारगत संसाराला टेकू देणारा धंदा हाय. संसार. या संसारात कधी दिस चांगलं उगवत्यात तर कधी वंगाळ दिस पाठपुरवठा करत्यात. त्या वेळी ह्यो बिनभांडवली बिनतोट्याचा खूप फायद्याचा धंदा तुझ्या कामी येईल. त्या

वेळी तू आईची आठवण काढशील. धंदा हलका म्हणून नाकडोळं मोडायचं न्हाय... आळस करायचा न्हाय... मग बघ... आई काय म्हणाली हुती असं म्हणशील...'

'आई हा बिनभांडवली, बिनतोट्याचा व खूप खूप फायद्याचा धंदा मी जलमभर इसरणार न्हायी. कंदी इसरणार न्हायी... आई, तुझ्या, गळ्याची शपथ...'

'सुटली म्हण!'

'सुटली!'

दुपारची वेळ होती. बाहेर उन रणरणत होतं. पण भिकूच्या चंद्रमौळी घरात विशेष उकडत नव्हतं. कुडातून झिरपून झुळूझुळू वारा येत होता. त्यांना उल्हासित करीत होता. दुपारची जेवणं वाढलेली. भिकूबाबा अजून कामावरनं आला नव्हता. बाबाची वाट बघून मुलं जेवायला बसलेली. गौरा नि शंकर एका ताटात, रखमा व रामी मोठ्या थाळ्यात जेवायला बसलेली. रामी हळूहळू एक एक घास सावकाशीनं घेत होती. ते पाहून लटक्या रागानं रखमाई म्हणाली, 'रामी, तुझं अलीकडं जेवताना लक्ष दिसत न्हायी. काय चिमणीच्या चोचीनं चिमणीएवढं जेवतेस?'

एवढ्यात उन्हानं घामाघुम झालेला भिकूबाबा घरात प्रवेशला. रामी आईला उत्तर देत होती. ते ऐकतच राहिला. रामी उत्तरली, 'आई, अजून तुझी मी चिमणी चिटकुलीच लेक हाय. मी कुठं तुझ्यावाणी गगनात फिरणारी घार झालेय? आई, तुझ्या या मायेच्या सहवासानं माझं पोटच भरतं गं...'

रामीच्या अशा या बोलाफुलाच्या गोड गंधीत उत्तरानं, तशा उकाड्यातसुद्धा भिकूचं मन मोहरुन गेलं. प्रेमानं उचंबळून आलं. रामीच्या कुरळ्या केशसंभारावरुन प्रेमभरानं हात फिरवीत तो रखमाला म्हणाला, 'बघ... बघ... तुझी चिमणी कशी चिव चिव बोलते... कुठं कुठं भराऱ्या मारते. काय गं कुणी शिकवलं हे तुला?'

'कोणी म्हंजी? माझ्या गुरुनं, माझ्या आईनं...'

भिकूबाबाला ती म्हणाली, 'बाबा, पाय धुवून जेवाय बसा. ताट धुवून मी जेवण वाढते.'

रखमा भिकूला म्हणाली, 'अस्सं सारखी कामात असते हो. मला हात लावू देत न्हायी कशाला? सारं तीच करु बघते. हृदयात भडभडून येतं हो... वाटतं, ही माझी आई तर नसेल, मला हातभार लावायला पुन्हा जलमलेली!'

भिकू-रखमा रामीकडं कौतुकानं पाहतच राहिलेली. रामी म्हणजे त्यांच्या डोळ्यांतली बाहुली झालेली. भिकूनं तेवढ्यात जेवण आटोपलं. लगेच रामी उठली. जेवलेली खरकटी ताटं, भांडी धुण्यासाठी ती बाहेर नेऊ लागली. रखमाई म्हणाली, 'अस्सं सारखी कामात असते हो पोर... चल, मीही येते तुझ्या मदतीला.'

दोघी मायलेकी चुलीतील राख घेऊन ती भांडी घासू लागली. सांडपाण्यासाठी भरलेला डेरा जवळच होता. त्यात घासलेली भांडी विसळून, रामी एका बाजूला ठेवीत होती. कधी कधी भांड्याच्या व ताटाच्या कडेला कुठंतरी घासलेल्या राखेचं कण, पाण्यात भांडी विसळूनदेखील कुठंतरी राहिलेले असत. ते भांडं उचलून परत स्वच्छ धुवून, दाखवून रखमाई रामीला सांगू लागली. शिकवू लागली, 'हे बघ भागाऽऽ असं भांड्यात राखेचा लेस देखील ठिवायचा न्हाय बग. इतकं भांडं स्वच्छ झकपक निघालं पाहिजी, आयन्यावानी. साऱ्याच गोष्टीत छकपक राह्याला शिकलं पाहिजी. बाईनं तर संसारी कसं चिचुबाग असलं पाहिजी.'

'पण म्हणत्ये... थोडं राहिलं तर...'

‘थोडं राहिलं तर... तर ते बऱ्याच वेळा माणसाला बाधतं. तशी गबाळी सवय लागते मग. कसलीही सवय संसारी चांगली न्हायी. घरात भांडं वा कोणतीही चिजवस्तू कशी आक्षी धुवून-पाकळून साफसूफ करुन स्वच्छ ठेवावी. आपलं मनही तसंच आरशावानी स्वच्छ ठेवावं.’

‘म्हंजी ?’

‘माणसाच्या मनात कसला मळ असू नये. भांडं स्वच्छ तसंच मन.’

‘मनात मळ... ? म्हंजी ?’

‘कुणायेकी मनात संशय धरणं... मनात वैर धरणं... मनातुन जळणं, विश्वासघात करणं... असं माणसाच्या मनात मळ हायती. हे मळ मनात असलं की विषासारखं बाधतं. माणूस त्यानं अक्षी नासून जातोय. जीवनातून उठतोय गं.’

‘अबबब... आई, हा मनातला मळ सगळ्यात वाईट दिसतोय गं.’

‘हा... त्यासाठी मन धुतल्या तांदळासारखं स्वच्छ व निरमळ ठिवायला शिकायचं. कुणायेकी डौग धरु नये, कुणावर जळू नये. भांडण झालं तरी, मोठ्या मनानं ते लवकर इसरुन जाया शिकावं...’

‘आई, अजून कित्ती कित्ती गं शिकायचं हाय. आई, तुझी शपथ मी मनानं स्वच्छ राहीन. आरशावानी. एक तीळ सात भावंडात वाटून खाईल... मोठ्या मनानं, तुझ्या गळ्याची शपथ, आई...’

रामीनं या वेळी आईच्या गळ्याला कडकडून मिठी मारली. मोठ्या प्रेमभरानं रखमाईनं तिचा मुका घेतला. रामीला उमाळा आला. आईच्या कानात ती चिवचिवली, ‘माझे आई... माझे गुरु...’

उनं कलू लागली होती. जिवाची तलकली कमी होत होती. मनाला आराम भासत होता. रखमाईला वाटू लागलं. रामीला बाईच्या जन्मायेकी सांगावं, शिकवावं. वेळ चांगली हाय म्हणून रखमाई बोलली.

‘भागा... तुला आजवर म्या खूप सांगितलं. शिकवलं. पर बाईच्या जल्मायेकी तुला अजून काहीच न्हायी सांगितलं. ते तर लई महतवाचं हाय. ते सारं कसं कान देऊन ऐकायचं. पर जलमभर इसरायचं न्हायी.’

‘न्हायी इसरणार... माझ्या आईनं सांगितलेलं, म्या कंदी कंदी इसरणार न्हायी... गळ्याच्यान...’

‘सुटल्या...’ भागा

परतेक घरात जाऊन तू हळूच डोकावून बघ, तिथं पहाटेपास्न राती अकरा वाजेपर्यंत सदा कष्ट... हसत हसत कष्ट उपसणारी तुला एकच मुरत दिसंल. तिचं नाव बाई. घरची कारभारीन. माघारीन. जलमल्यापास्नं लग्नापर्यंत आईबाच्या घरी, लग्नापास्नं मरणापरयंत नवऱ्याच्या घरी कष्ट उपासणारी, राबणारी, बिनमोबदल्याची कामवाली बाई म्हंजीच आमा बाईची जात. नवरा व मुलांच्या इच्छेपरमानं वागायचं, झटायचं. नवरा म्हंजीच त्या बाईचं सारं काही. त्या नवऱ्याला आवडेल तेच जेवण करायचं. त्याचंच उष्ट खायचं. नवऱ्याला आवडणारं लुगडं नेसायचं, त्येंच्या तब्येतीला नित्य जपायचं. नवरा हाच बाईचा देव. ती सोताला इसरते. पण नवऱ्यासाठी जगते...’

‘आई, बाईनं एवढं सारं करायचं असतं नवऱ्यासाठी... ?’

‘व्हयं... अगं, नवरा कसलाही असो, बायकोनं त्याला सांभाळून घेतलं पाहिजी. कुटुंबाची लाज राखली पाहिजी. सोता उपाशी राहून, दळण-कांडण करुन, शेणी विकून, पडल्यास मोलमजुरी करुन, मुलाबाळाचं पाहिलं पाहिजी... जेवायला नसलं तर मुकं घेऊन, गोड करुन त्यांना रमवलं पाहिजी... आला दिस ढकलला पाहिजी... संसार नवरा-बायकोचा असतो पण संसारात बाईचं काम असं असतं. भागा... तुझं लगीन झालं की, तू सुदिक नवऱ्यात अशीच मिसळून गेली पाहिजीस...

त्येंच्याशी एकरुप झालं पाहिजीस... त्यात आईबापाचं नाव हाय, माझं नि तुझ्या बाचं कसं हाय. आमी शरीरान दोन दिसलू तरी मनानं एक आहोत... तसंच तू जगलं पाहिजेस.

'आई, मी तुझी लेक हाय... तुझ्यागत मी जगणार... तुझ्यागत जगणार... तुझ्यागत संसार करणार...'

'अगंऽऽ हा संसार महा खतरुड हाय. पेटत्या चुलीवरला तवा हाय तवा. हाताला चटकं बसल्याबगर भाकरी खाया देतच न्हायी. भागाऽऽऽ कष्टाला हरायचं न्हाय... संकटाला डरायचं न्हाय. हा संसार म्हंजे असतो वनवास... पण तो वनवास असतो गं सुखाचा. रामीऽऽ अगं, सांज झाली, आपण मायलेकी आज कित्ती कित्ती बोलत बसलो. वेळ कसा गेला ते कळलंच न्हायी बघ.'

'येळ मोलाचा गेला, ग्यान लाखाचं मिळालं. आई तुझा एक एक शब्द माझ्या काळजात खोल खोल रुतून बसलाय. रक्तात भिनलाय बघ...'

'कित्ती शहाणी माझी बाळी. बोलते कशी बामनीनीवानी. ऊठ आता सांज झाली, देवापुढं दिवा लाव, उदकी पेटव. हे बघ... भागाऽऽऽऽ तुळस आज पूज... श्रीकृष्णासारखा नवरा दे, म्हणून मागून घे.'

'नवरा मागून घे' असं आईनं म्हटल्यावर रामी लाजून गोरीमोरी होऊन आत पळाली.

भागा उठली. अंगण झाडलं. तुळशीवृंदावन साफसूफ केलं. देव्हाऱ्याकडं जाऊन देवापुढं दिवा लावला. उदकाडी लावली, देवाचं पाणी व उदकाडी घेऊन भागा परत तुळशीवृंदावनाजवळ आली. हळदीकुंकू तुळशीवर फेकलं. उदकाडी कुंडीत लावली. देवाला पुजून आणेललं पाणी तुळशीला घातलं. पाया पडून पाच प्रदक्षिणा घालू लागली.

रुक्मिणी बसल्या बसल्या भागा तुळशीपूजा कशी करते ती पाहू लागली. भागाकडं कवतिकानं पाहता पाहता तुळशीचं गाणं ती गुणगुणू लागली ---

"तुळशीला घाली पाणी... हात पुरंना नेणतीचा।

लाडकी भागाबाई... जोडा मागती प्रीतीचा।

तुळशीला घाली पाणी... ह्या गं तुळशीला आलं गोंडं

लाडक्या गं भागाबाईला... पतिव्रताचं राज दंडं।।"

आईच्या पाया पडण्यासाठी भागा रखमाईजवळ आली. रखमाई म्हणाली, 'भागा... तू खरी पतिव्रता होशील... माझा आशिर्वाद हाय...'

'आई, थोर तुझे उपकार...' असं म्हणून ती आईच्या पायाला स्पर्श करण्यासाठी खाली वाकली. तिच्या परकराच्या वरच्या खिशातून दोन-चार पैशाची नाणी आवाज करीत खाली पडली. रखमाईच्या समोरच पडली.

रखमाईनं थोड्या उंच स्वरात रामीला दटावून विचारलं. 'रामेऽऽ कुठलं गं हे एवढं पैसे तुझ्याजवळ?'

मला शेजारच्या राधामावशीनं दिलंत. तिला मी दुकानातनं माल आणून दिला. सुटं राहिलेलं पैसे माझ्या हाती देत म्हणाली, 'असू दे तुला. तुझ्या पोटाची हेळसांड व्हतीया. तुझा गोंडाळपणा लई काळवंडलाय. घे. चिरमुरं फुटाणं घेऊन खा जा.' भीत भीत रामी उत्तरली.

'तू ते पैसे का घेतलसं? कुणीबी दिलेलं पैसं असं घ्यायचं असताय?' रखमाई रुद्रावतार धारण करुन म्हणाली आणि रामीच्या श्रीमुखात एक जोरात ठेवून दिली. बोलली, 'म्हंजी, आतापर्यंत तुला सांगितलं, शिकवलं ते सारं चुलीत गेलं? पालथ्या घागरीवर पाणी झालं? बोल, राधाचं पैसं का घेतलंस? जाऽऽऽ राधाला ते परत देऊन ये जा!'

रखमाईचा रागाचा पारा एकदम वर चढला होता. रामीलाही याचं आश्चर्य वाटत होतं. आईचा असा अवतार तिनं यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. आपल्या हातून काय अशी मोठी चूक झाली, ह्याचा तिला उलगडा होईना. रखमाईनं परत रामीला एकदोन थप्पडा लावल्याच.

रामी भीतीनं थरथर कापत होती. धाय मोकलून रडत होती. ती रडत रडत म्हणाली, 'आई, मी हे पैसे राधामावाशीला परत करते. पण तू मला अशी मारु नगंस गं... तिनं खुशीनं दिलं म्हणून मी घेतलं...'

'तुझी चुक तू अजून कबूल करत न्हायीस?' रखमाई सांगू लागली. येडे, असं लाचावून कुणाचंबी पैसं घेतलं तर पुढं तशीच सवय लागते. कुत्र्यापरमानं धन्या पाठीमागून गोंडा घोळायची. अशानं मिंधं होतं, मग मिंधं घोडं पंध खातं. मुलीच्या जातीनं लग्नाअगुदर आईबापाच्या वा सख्ख्या भावांच्या पैशाशिवाय व लग्नानंतर नवऱ्याच्या पैशाशिवाय कुणाच्याच पैशाला लात लावायचा नसतू. लोभानं घेतलेला दुसऱ्याचा असा पैसा बाईच्या अंगावर उठतो. तो पैसा त्या बाईला माणसांतून उठवतो... समजलं?' परत रामीला एक जोरात थप्पड दिली. रामी मोठमोठ्याने हुंदके देऊन रडू लागली. बोलली.

'मार... मा...र... आई, मला पडूस्तर मार, इतकं मार... इतकं मा...र की अशी चूक मी कंदी परत करु नये... चांगली अद्दल घडव मला. इतकं मार... इतकं मार की मी जलमभर ते इसरु नये... मार... का थांबलीस? मार... माऽऽर... मा...र.'

'मलाच उलट म्हणतेच मार... मा...र... अस्सं... घे... मग घे... घे...' असं रागानं म्हणत रागानं बेभान झालेली रुक्मिणी रामीला मारु लागली. तिच्या पाठीवर, तोंडावर, गालावर लागेल तिथं सपासप मारु लागली. 'घे... घे...' असं म्हणत ती वेड्यासारखी मारत राहिली.

असं मारता मारता रुक्मिणीचं ब्लडप्रेशर वाढू लागलं. तिला घेरी येऊ लागली. सर्व अंग अंग थरथर कापू लागलं. ती तोल गेल्यासारखी हालू लागली. ती तोल जाऊन आता जमिनीवर कोसळणार एवढ्यात भिकू बाहेरुन धावतच तिथं आला.

'रुक्मिणेऽऽऽ' असं ओरडत धावत जाऊन तिला अलगद सावरलं.

'आऽऽऽ ईऽऽऽ' अशी किंकाळी मारुन रामीनं घाबरुन जाऊन आईला कडकडून मिठीच मारली.

भिकूच्या कुशीत रुक्मिणी बेशुद्ध होऊन पडली होती!

• • •

८

रात्री अकरा-बाराचा समय झालेला असावा. वणंदगाव आधीच छोटंसं. त्याच्यावर अंधाराचं राज्य आलेलं. सर्वत्र सामसूम झालेली. मध्येच कुठंतरी कुत्र्याचं केकाटणं ऐकू येई. मध्येच मांजराची कळवंड कानी येई. आणि ती निरव शांतता भयासूर भासू लागे. त्यामुळंच भजनाला गेलेला आपला पती अजून आला नाही, याची चिंता रुक्मिणीला अधिकच लागून राहू लागली. पण तसं ती जवळच बसलेल्या आपल्या लेकीला रामीला वरुन दाखवत नव्हती.

रुक्मिणीच्या तब्येतीस तसा म्हणावा तसा आराम अजून पडला नव्हता. औषधपाणी चालू होतं. तरी लाडक्या लेकीला-रामीला झोपण्यापूर्वी गोष्ट सांगितल्याशिवाय तिला झोप येत नव्हती म्हणून जीवाच्या करारानं... हळूहळू थांबत थांबत... रुक्मिणी तिला गोष्ट सांगत होती.

...आटपाट नगर हुतं. तिथं एक राजा ऱ्हायचा. त्याचं राज्य मोठं हुतं पण पोटी मुलबाळ नव्हतं. राजानं मग मनानं ठरवलं. शंकराला साकडं घालायचं. त्यानं शंकराची पूजा आरंभली. कडक तप आरंभलं. बारा वरस असं तप केलं. शंकराला

कोडं पडलं. देवलोक सोडून तो मानवलोकात आला. तप करणाऱ्या राजाला भेटला. म्हणाला, 'राजा, मी परसन हाय. तप बंद कर. पाहिजे ते माग...'

राजानं पोटी संतान मागितलं. शंकरानं बेलाचं फळ तोडलं. त्येचं दोन भाग केलं. ते राजाच्या हातात ठेवलं. म्हणाला, 'राजा, तुझ्या बायकोला सांग ह्यातला उजवा भाग खाल्ला तर पुत्रप्राप्ती होईल. डावा भाग खाल्ला तर कन्यारत्न होईल...'

रानीनं डावा भागच खाल्ला. नऊ महिनं, नऊ दिवसांनी राणी बाळंत झाली. कन्यारत्न जन्माला आलं. मुलीचं नाव पारबती ठिवलं. तिनवी, पाचवी पुजली. हत्तीवरनं साखर वाटली. दारी सनई चौघडा वाजला. सवासणींना गरम पाणी घातलं. दारावार तोरणं लावली. शिंग वाजलं. पारबतीचं बारसं धुमधडाक्यानं झालं...

रामीला वरवर गोष्ट सांगत होती. पण रुक्मिणी आजारी असल्यानं, भिकू रात्रीचा भजनाला जाणारच नव्हता पण तिनंच त्याला भजनाला जाणं भाग पाडलं. वर बोलली, 'भजनाला जावा तुमी. माझ्यापुढं न्हायी म्हणू नगा. भजन म्हंजी देवाचं नाव घेणं. देवाला भजणं. देवाच्या ध्यानात आड येऊ नये. धनी भजनाला जावाच. मला आता थोडं बरं वाटतंया. रामी जवळ हायीच.

'शेजारची ठमाकाकू जागसूद असतीया. धावून येतीया. तुमी भजनाला जावा. दव्याबरोबर दुवाबी घेऊन या... मला बरं वाटंल...'

मगच भिकू भजनाला गेलेला... तरी पण चावडीवरल्या गस्त्याची 'हुऽऽशाऽऽरऽऽऽ' अशी भयानक ललकारी ऐकून नि रुक्मिणीच्या जीवाला चुटपूट लागून राहिली. त्यातच ती व्यग्र होऊन गेली.

'आई... सांग ना गं पुढं! पारबतीचं काय झालं ते? कसला इच्यार करतेस?' रामीनं रुक्मिणीला तिच्या या तंद्रीतून जागं केलं. रुक्मिणी उत्तरली, 'हां... हां... कुठं परयंत आलू होतं गं आपून?'

'शिंग वाजलं. बारसं धुमधडाक्यानं झालं...'

'हां... हां... म्हणता मग अशीच पाच वरसं लोटली. पारबती मैत्रिणीत खेळू लागली. खूप खूप खेळ खेळली... नाना तऱ्हेचं खेळ खेळली... बारा वरसं नंतर आलं नि गेली.'

राजाला मग वाटू लागलं. पारबती आता उपवर झालीय. तिचं लगीन आता करावं. दरबारी, मानकरी बोलावलं. राजानं पारबतीच्या लग्नाचा आपला विचार त्यांच्यापुढं मांडला. 'नवखंड पिरथीमी पालथी घालून, पारबतीला योग्य नवरा शोधून आणा,' असं राजा म्हणाला. पारबतीनं ते ऐकलं. राजाजवळ ती गेली नि म्हणाली, 'बाबा, माझं लगीन असं न्हायी करायचं. मला नवरा असा पाहिजी की, तो माझ्या जलमाचा जोडा होईल, जलमाचा चुडा होईल, कंदी न्हाय राहायचा, कंदी न्हाय डुलायचा, असा मला बिनमरणाचा नवरा पाहिजी...'

--- राजाला मोठं कोडं पडलं. म्हणाला, 'या जगात बिनमरणाचा कोणी हाय का? येडी, हा येडा इच्चार मनातला सोडून दे...'

'न्हायी बाबा... वाटल्यास तुमचं राज्य, तुमालासुदिक सोडीन, पण माझा हा इच्चार मी कंदी कंदी सोडणार न्हाय. ही पहा निघाले...'

राणीनं तिला आडवलं. विचारलं, 'बाळ, तुझं म्हणणं तरी काय?'

पारबती म्हणाली, 'पायात जोडवी, हातात चुडा, गळ्यात डोरलं, कपाळी कुंकू हे सुवासिनीचं लेणं मला दे. पण बिनमरणाचा नवरा मला मिळवून दे. न्हायीतर ही तुझी-माझी शेवटची भेट समज.'

राणी गप्प झाली. पारबतीनं आईला सोडलं. राजवाडा सोडला नि गावात आली. गावाबाहेर हनुमंताचं देऊळ हुतं. तिथं तपाला बसली. अजंनीसुत हनुमंतानं तिला इच्यारलं, 'का येणं केलं हुतंस पोरी आज?'

पारबती म्हणाली, 'जलमाचा चुडा, जलमाचा जोडा, कंदी हालायचा न्हाय-कंदी डुलायचा न्हाय. बिनमरणाचा नवरा मला पाहिजी हाय.'

बरमचारी हनुमंत सटपटलं. म्हणालं, 'खुळी हायीस काय गं पारबती? नवखंड पिरथीमीवर असा नवरा तुला मिळणार न्हाय.'

पारबती म्हणाली, 'तसलं काय मला सांगू नगंस हनुमंता... बिनमरणाचा नवरा मला मिळवून दे, न्हायतर तुझं सतपन गेलं असं म्हणून सांग.'

हनुमंत म्हणाला, 'पोरे... लई कोड्यात घातलंस मला. तू असं कर -- माझी आई... अंजनीमाता. तिलाच भेट. ती तुला मारग दावील.'

पारबती मग अंजनीमातेकडे गेली. तिला पारबतीनं आपल्या मनाची ही गोष्ट सांगितली. अंजनी माता म्हणाली, 'अगं येडे... असं कंदी घडलयं?'

अंजनी मातेला पारबती निक्षून म्हणाली, 'मग तुझं सतपन गेलं असं म्हण. मी निघाले...'

'आगं... थांब... थांब...' अंजनीमातेनं पारबतीला थांबवलं.' म्हणाली, 'असं कर... आटींग्या वनात जा. किर्रदाट झाडीत जा. सुईच्या टोकावर जिभेचा शेंडा लाव. सगळा देह तोलून धर. उफराटं तप मांड... तुझ्या मनाची विच्छा पुरी होईल...'

पारबती 'बराय' म्हणाली. सांगितलेल्या जागी पोहचली. भयासूर वनात गेली. सुईच्या टोकाला जिभेचा शेंडा लावला. सगळा देह तोलून धरला. उफराटं तप मांडलं. घनघोर तप...

दिवसामागून दिवस आलं नि गेलं. पारबतीच्या भवती घनदाट जंगल माजू लागलं. जंगी वारुळ उभं राहिलं. त्यामुळं एक दिवशी सूर्यदेवाचा रथ बंद पडला. हाःहाः कार उडाला.

आभाळावर भोळ्या शंकराला हादरा बसला. त्यानं तातडीनं देवसभा बोलावली. म्हणाला, 'मानव खंडात एवढं तप कोण करतया, ते शोधून काढा.' पैजेचा विडा मांडला. सर्व्यांनी विडा उचलला. पण सर्वांची फजिती झाली तप करणारा कोन त्यो दिसलाच न्हायी.

मग भोळ्या शंकराचा नंदी पुढं आला. त्यानं विडा उचलला. मानव लोकात जाऊन तप करणाऱ्याचा मी शोध लावतो म्हणाला. नंदी मानवलोकात आला. शोध शोधला. तप करणारा कुठंच दिसंना, हवालदिल झाला. नंदीनं मग भोळ्या शंकराचा धावा केला. त्याला मग ते वारुळ दिसलं. त्याला वाटलं तप करणारा या वारुळात असावा. वारुळ फोडावं वाटलं. डाव्या पायाचा झटका त्यानं त्या वरुळाला मारला.

एवढ्यात चमत्कार झाला. वारुळातून आवाज आला. पारबती म्हणाली, 'नंदी महाराज, जरा दम धरा. मागं सरा. माझी एक मागणी ऐका.'

नंदी बरं म्हणाला. 'काय मागायचं ते मागून घे असं बोलला...'

पारबती म्हणाली, 'मला धन नगं. मला जनमाचा जोडा पाहिजी. चुडा पाहिजी. कंदी हलायचा न्हाय. कंदी डुलायचा न्हाय. असा बिनमरणाचा नवरा पाहिजी.'

नंदीला मोठं कोडं पडलं. क्षणभर त्याची बोलतीच बंद झाली. पारबती म्हणाली, 'मग तुझं सतपन गेलं म्हणून सांग.'

असं कसं, नंदी बोलला, 'नेईल तिकडं चल माझ्या बरुबर.'

बराच वेळ झाल्यानं, परत रुक्मिणी गोष्ट सांगायची मध्येच थांबली. नि दाराकडं डोळं लावून, भिकूचा कानोसा घेऊ लागली. मनातून खूप घाबरलेली. रामी थोडा वेळ आईकडं बघतच राहिली. नंतर म्हणाली, 'काय गं हे आई... अशी मध्येच का गं गोष्ट थांबवतेस ? अशानं मनात गुता होतोय नि धागा निसटतोय... धागा निसटला की...'

'हां... हां...' रुक्मिणी तिचं वाक्य पुरं करीत बोलली,

'धागा निसटला की, जीव बेचैन होतोय... असंच ना ? हां... सांग. कुठपरयंत आलू होतं बरं ?'

रामी उत्तरली, 'नंदी बोलला... असं कसं... नेईल तिकडं चल माझ्याबरुबर...'

'हां... हां... नेईन तिकडं चल माझ्याबरोबर' असं नंदी म्हणताच, पारबती त्या वारुळाच्या बाहेर आली. नंदीचं शेपूट धरुन देवलोकात गेली. पारबतीचं रुप बघुनश्यानं तेहतीस कोटी देवाचं डोळं दिपलं. देवलोकातल्या रंभा-मेनका पारबतीपुढं फिक्क्या पडल्या. साऱ्या देवांनी मागणी केली. पारबती आमाला पाहिजी. स्वयंवर मांडलं.

नंदी म्हणाला, 'पारबते, ही सोन्याची वेळ हाय. हा हिऱ्यामाणकांचा हार हाती घे नि या साऱ्या घोळक्यातून तू भोळ्या शंकराला शोधून काढ.'

शंकराचं नाव ऐकताच पारबती हरकून गेली. हिऱ्यामाणकांचा तो हार हाती घेऊन पारबती निघाली. तेहतीस कोटी देवांच्या मधून 'शंकर' शोधीत चालली. पण शंकर तिला कुठंच दिसंना. पारबतीला कोडं पडलं... तपाचं बळ तिच्याजवळ हुतंच.

इतक्यात कसलाचा एकदम उजीड पडला. एका देवावर तिची नजर खिळली. शंकराच्या पायावरची पद्म तिनं वळखली. तसा शंकर तिथून पळू लागला. पारबतीनं मग पुरतं जाणलं. त्याच्या मागून ती पळू लागली. तपाच्या जोरावर चार पावलांतच भोळ्या शंकरला तिनं गाठलं. त्याच्या गळ्यात तो हिऱ्या माणकांचा हार घातला. भगवानशी तिचं लग्न लागलं. पारबतीचा 'पण' असा पुरा झाला. बिनमरणाचा नवरा तिला असा मिळाला.

'मला बी मिळंल का गं आई, असा बिनमरणाचा नवरा ?' चिमुरडी रामी सहज बोलून गेली. बाळाचा बाळप्रश्न. पण त्याचं किती अवघड उत्तर. रुक्मिणी कावरीबावरी झाली. बाळाची बाळ समजूत काढायची म्हणून ती बोलून गेली.

'त्यासाठी तू पारबतीसारखं घनघोर तप करण्याचं मनातून ठरवशील, तर तुलाबी बिनमरणाचा नवरा मिळंल. हां, कडक तप करण्याला सारं काही मिळतं.'

चिमुरडी रामी थोडा वेळ विचारात पडली. नंतर निश्चयी स्वरात ती बोलली, 'आई, खरंच कडक तप करण्याचा सारं काही मिळतं. मग मी... मी त्यासाठी... मी कडक तप करीन. बिनमरणाचा नवरा मिळवीनच मिळवीन.'

रामीच्या शब्दाशब्दांत एक निर्धार होता. मुखावर विश्वास होता. आगळ्या तेजानं तिचा मुखचंद्रमा तेजाळला होता. रुक्मिणी हे सारं बघतच दिपून राहिली. रामी अजून अवघड काहीतरी बोलणार त्या अगोदरच विषय बदलावा म्हणून रुक्मिणी बोलली, 'बरं गं भागा... बारा वाजून गेलंय. सगळीकडं सामसूम झालीय. पन तुझा बा काही अजून आला न्हायी.'

'आई, कशाला एवढी बाबांची काळजी करतेस ? भजनात येळ झाला तर बाबा कंदी कंदी सकाळी येत्यात नव्हं. झोप बघू तू.'

‘झोपते गं. पण मन चिंती ते वैरी न चिंती म्हणत्यात. मनात न्हाय न्हाय ते येतं. आणीक एक गोष्ट तुला सांगू? झोप येईना व्हंय?’

‘येतीय गं. मला आता चांगली झोप यायला लागलीय... गोष्ट नगं नि काय नगं. तुला बरं न्हाय. झोप बघू तू... विसरांती घे...’

‘अगं तू विसरांती घे... पंधरा दिस झालं, मी अंथरुणावर पडून हाय. तुझा इवलासा जीव. घरातलं सारं सारं तुलाच करावं लागतं. बाळ माझी दमते. चल झोप. मी तुला थोपटते... तुझं अंग चोळते.’

‘आई, काहीतरीच काय उलटं करत्येस? अगं, आजारी आईची सेवा तिच्या मुलीने करायची असते.’

‘लेके, किती किती करशील गं माझी सेवा! रुक्मिणीचे डोळे एकदम भरुन आले. रामीला ते दिसले. ती म्हणाली, ‘आई, असं डोळं भरायचं न्हायी हं. मग मी झोपणारच न्हाय.’

‘नगं... नगं, असू म्हणू नगं. माझी शपथ हाय. झोप बाळ तू, झोप.’

रामीनं आईच्या अंगावर व्यवस्थीत वाकळ घातली आणि स्वत: तोंडावर पांघरुण घेऊन आईजवळच झोपली. रुक्मिणीच्या दुसऱ्या बाजूला चिरंजीव शंकर व गौरा झोपलेली. रखमाई वरचेवर त्यांच्या अंगावरुन मायेचा हात फिरवीत राही.

ठावणीवर मंद दिवा तेवत होता. रुक्मिणी सताड डोळं उघडून पडलेली. भिकूच्या वाटेकडं तिचं डोळं लागलेलं. घरात पाल चुकचुकत होती. दूर कुत्रं केकाटत. मधून मधून घुबडाचे धुत्कार कानावर पडत. त्यामुळं रुक्मिणीच्या मनात नाही नाही ते विचार येत --

आपण अशी आजारी पडलेली. औषधपाणी करुनही काही गुण येत नसलेला... आपणास काही बरं वाईट झालं तर...? तर आपल्या भोळ्या नवऱ्यावर संकटाचा केवढा मोठा डोंगर कोसळेल... त्याचा कणाच मोडेल. आधीच त्याची तब्येत ठीक नसलेली, रक्ताच्या वांत्या झालेल्या, त्या ह्या धक्क्यानं तो पुरता कोलमडेल, खचेल.

मग आपली ही तीन लहान बाळं... अजाण... कोवळी रामी, गौरा, शंकर आपल्याच काळजाचे हे घड. त्यांचं पुढं काय होणार? कुणाच्या तोंडाकडं ती पाहणार? काय होणार त्यांचं?

आणि आपोआप रुक्मिणीच्या डोळ्यातून आसवांच्या धारा वाहू लागल्या. झोपलेल्या आपल्या आवडत्या मुलांच्या चेहऱ्यांना ती वेड्यासारखी होऊन न्याहाळू लागली. त्यांना कुरवाळू लागली. रामी एव्हाना गाढ झोपी गेलेली. पण भिकूच्या वाटेकडं रुक्मिणीचं डोळं लागून राहिलेलं. का कुणास ठाऊक, कधी नव्हे, ती आज आपल्या पतीची वाट मोठ्या उत्कटतेने पाहात होती. तिला आज त्याची विलक्षण ओढ लागली होती जणू!

ठावणीवर मंद दिवा जळत होता. रुक्मिणी चिंतेनं जळत होती. एवढ्यात तिचा पती भिकू दार उघडून आत आला. त्याला पाहून रखमाई खुलली. तिची मनातली भयभिती विरघळली. तरी लटक्या रागानं पण काळजीच्या स्वरात ती म्हणाली,

‘एवढ्या मध्यानं रातीचं कशाला यायचं? उजाडल्यावर यायचं हुतं!’

‘तू आजारी हायीस. तरी तुला सोडून भजनाला गेलो. भजनात जीव न्हाय लागला. चैन न्हाय पडली. रातीचं आलं म्हन एवढं बिघडलं काय?’

‘चोर, चिलटांची भिती. त्या वळणाच्या मोठ्या झाडाखाली भुतं, रातीची धुडगूस घालत्यात म्हनं. येळ काळ सांगून येत न्हायी...’

‘रुक्मिणेऽऽ रखमेऽऽऽ अगं, तुझ्यापरास मला कशाची काळजी न्हाय. रखमे, अगं तू माझ्या या संसाराच्या आढ्याचं मेडकं हायीस. तेच मोडलं तर सारं घर माझ्या डोक्यावर कोसळंल... तुझ्या या तीन पोरांची काय तग हुईल -- ?’

त्याच्या तोंडावर बोट ठेवीत रखमा बोलली, 'भरल्या घरात असं वंगाळ... वंगाळ बोलू नये... देवाच्या भजनाला गेला हुता, मंग आपलं कसं वंगाळ हुईल... ?'

'न्हाय ना... तुला बरं वाटतंय ना आता...!' भिकू आनंदानं उद्‌गारला.

'म्हनं या संसाराच्या आढ्याचं मेडकं मोडलं तर... ह्या तुमच्या अशा बोलण्यानं माझं काळीज उडालं हो...'

'म्हंजी, जादा झालं की काय तुला ? हे माझ्या कर्माऽ ऽ ऽ'

एवढ्यात रखमाईच्या छातीत जोरात कळ आली. ती किंचाळली, 'अऽऽय्याऽऽईऽऽगऽऽ'

'काय झालं गं ?'

मुले झोपली होती. बोलायचे तर हळू आवाजात बोलणं भाग होतं. रखमाई विलक्षण कळ सहज करीत बोलली, 'धनी... माझी छाती... छाती गेली धनी... छातीत बाण घुसल्यागत झालंय... धनी...'

भिकू घाबऱ्याघाबऱ्या रुक्मिणीची छाती चोळू लागला. त्याचे डोळे मग भरुन आले. ओसंडू लागले. रुक्मिणीच्या छातीवर, तोंडावर त्याचा अभिषेक होऊ लागला. रुक्मिणी म्हणाली, 'धनी, असं रडायचं न्हाय. डोळे गाळायचं न्हाय. मला काय होत न्हाय. नुसती छातीत दुखतंया. असं रडायचं न्हाय. तुमी रडला तर माझं काळीज फाटेल. आतडं तुटेल. छाती भंगेल...'

'हे बघ, म्या डोळं पुसलं, भिकू आपले डोळे आपणच पुशीत बोलला. तिचा हात आपल्या डोळ्यांना लावून तो पुन्हा बोलला, म्या डोळं पुसलं... माझ्या काळजातली कालवाकालव... एक, शांत झालीय, अगदी शांत... माझी छाती तुझ्या कानाला लावून दाखवू ?'

'धनी, तुमी गप्प बसा बघू... अशानं मुलं उठतील. आता मला बरं वाटू लागलंय. हा... असंच... चोळत ऱ्हा... बरं वाटलं... येड्यागत करुन मलाबी येडी करु नगा...'

पण रुक्मिणीच्या आजारानं भिकू आतून खचला होता. वरुन तसं दाखवत नव्हता. बराच वेळ नवरा-बायको शांत शांत राहिली. नंतर भिकूच बोलला, 'उद्याला दापोलीच्या डागदरला परत घेऊन येऊ का ?'

'इथल्या वैद्याच्या गोळ्या खातेय... त्यो डागदर काय सुई मारणार... फी दाम दुप्पटीनं घेणार. पदरात गुण तर काय न्हाय. त्यापरास हाय तेचा औषीध बरं हाय...'

नकळत भिकूचा हात तिच्या कपाळावरुन, छातीवरुन फिरु लागलेला. त्याला एकदम जाणवलं. म्हणाला, 'आँऽऽऽ मधाशी नव्हता, पण आता तुला ताप चढत चाललेला दिसतुया...'

'हा... हा... घटकेत कळ... घटकेत ताप... त्या परास असं करा ना...' मध्येच रुक्मिणी बोलायची थांबली. आठवल्यासारखं करीत म्हणाली, 'काय सांगणार हुती बरं... अवं, ते इसरलंच की...'

बारीकसं मग दोघंही हसली. परत काहीतरी आठवल्यासारखं करीत रुक्मिणी बोलली. 'मला भेटून जा म्हणून माझ्या भावाला कारड लिवलंय का ?'

'व्हय. लिवून त्येला आठ-दहा दिस लोटलं. अजून उत्तर न्हाय.'

रुक्मिणी कळवळून सांगू लागली. 'माझा भाऊ लई गुणाचा, लई मोठ्या दिलाचा हाय. तुमचं कसलंबी वझं उचलायला तो आपला हातभार लाविल होऽऽ परत लिवा त्येला... बोलावून घ्या. त्येंची मला सारखी आठवण येतीया...

"दिल भाऊचं जनु मऊ मखमली

भावजय माझी कशी कमळकली"

अन् डोळ्यात पाणी आणून दाटल्या कंठानं रुक्मिणी गुणगुणू लागली,

"चाफा चंदन माझा भाऊ

त्याला किती किती ध्याऊ..."

त्याला ध्याऽ ऽ ऊऽ ऽ त्याला ध्याऽ ऽ ऊऽ ऽ...'

'असं एखाद्याचं येड घेऊ नये. अशानं जीव थोडा थोडा हुतोय.'

'झालाय वोऽ ऽ माझा जीव आता थोडा थोडा. धनी, कसं सांगू... मला आता दूरचं दिसाय लागलंय... डोळं पैलथडी लागल्यात... तिथून कुणीतरी मला बोलावतंय... बोलावतंय.'

'रखमेऽ ऽ अगं, असं हाय खाऊ नगंस. पोरांच्याकडं बघ. त्यांच्यासाठी तरी जीवाच्या अवसानानं ऊठ --'

आणि खरोखरच झटकन ती ऊठली. क्षण दोन क्षण ती उभी राहिली. परत तिला सावरली भिकूनं... परत ती भिकूच्या गळ्यात पडली. निष्प्रभ पडून राहिली क्षणभर...

परत दोघंही एकमेकांच्या गळ्यात पडून रडू लागली. धाय मोकलून रडू लागली. फुटून फुटून रडू लागली... दोघंही... एक साथ... एक साथ... अशी किती तरी वेळ... तशी एकमेकांच्या मिठीत पडून राहिली... किती तरी वेळ... किती तरी वेळ...

एवढ्यात बाहेर कोंबडा आरवला. 'अरे बाप रे ऽ ऽ कोंबडा आरवला ? पहाट झाली... अजून झोप न्हाय...'

'झोप उडालीच माझी!' रुक्मिणी चिंताग्रस्त होऊन बोलली.

'तुझी ? हां... हां... आजारी हायेस ना म्हणून...' भिकू बोलला.

'ना... ना... तुमी आजारी हायसा हे ऐकून'

'भलतंच! कोण म्हणतयं ?'

'कळलंय मला. बंदरात टोपल्या वाहता वाहता रक्ताच्या उलट्या झाल्या तुमाला... अजून तुमच्या तोंडानं तुमी मला सांगतलं न्हाय! हेच काय माझ्यावर पिरीम ?'

'कसं सांगणार गं ? तू अशी आजारी... तुझा जीव...'

'तुमचा जीव माझ्या परास भारी. तुमी साऱ्यांचं पोशिंदे... तुमी बरं, तर आमचं बरं. उद्याच डागदराकडं जावा... माझी शपथ... तरच मला बरं वाटंल...'

'तुला बरं वाटंल, तर उद्याच जातो. रखमेऽऽ किती करशील माझ्यावर जीव...'

त्यावर रुक्मिणी खुदकन् हसली फक्त. भिकूनं डोळं भरुन तिला पाहून घेतलं. हृदय भरुन पाहून घेतलं.

• • •

९

रामी... एक चिमुरडा जीव. चिमुकले हातपाय... चिमुकली तिची धाव... तरीही ती धावत होती, धावायचं म्हणून धावत होती, कर्तव्य म्हणून धावत होती...

धावतच शेण आणण्यासाठी नित्यनियमानं ती रानात जात होती. त्यासाठी त्या आधी ती भल्यापहाटे उठून, स्नान करुन, देवपूजा करीत होती. आईबापांच्या पाया पडून आशिर्वाद घेत होती.

धावतच परतत होती. घरचा दुपारचा सारा सैंपाक करुन, साऱ्यांना जेवण वाढणं, जेवणाची खरकटी भांडी घासून मग स्वतः जेवणं. दुपारी घरात गौरा व शंकरवर लक्ष ठेवून घरकाम करणं, शेणी थापणं, वाळवणं. कधी गौरा-शंकरबरोबर खेळणं, बागडणं.

परत संध्याकाळ झाली की सांजवात लावून, परत देवापुढं आरती करणं. परत रात्रीसाठी सैंपाक... रांधणं, साऱ्यांना जेवण वाढणं, भांडी घासणं... शेणी वाळवणं... सदैव हातपाय चालूच... आता आई करीत असे, तसले उपासतापास ती करु लागली. रात्री रखमाईला झोप येईपर्यंत जागत राहू लागलेली...

रामीचा चिमुरडा जीव, चिमुकले हातपाय... हे सारं सारं करी... करायचं म्हणून उत्साहानं, आनंदानं करी. कधी कंटाळा नाही, कधी आळस नाही. आरडाओरड नाही. कर्तव्य म्हणून करीत होती.

सूर्य उगवून आता कासराभर वर आला होता. रुक्मिणी उठली होती. उठता येत नव्हतं, म्हणून अंथरुणात होती. तिचं सारं लक्ष झाडावरच्या कावळ्यांच्या 'काव काव' कडं लागलं होतं. ती पडूनच हाक घालीत होती. 'रामी ऽ ऽ येऽ ऽ रा... मी... कुठं गेलीय... गौरा... ये... शंकर...आरे तुमची ताई कुठं गेलीय ?'

शंकर नाक पुसत उभा होता. गौरा बोबडी बोलली, 'ताई, शेणी थापतीया... बोलवू ?' गौरा ताईला बोलवायला गेली.

रुक्मिणी मनातल्या मनात म्हणाली, 'ताई शेण थापतीया ? ही ताई म्हंजी... शेणी... शेण... शेणी... शेण... आरं, ही तुमची ताई नव्हं, ही साऱ्यांची आई हाय आई. सर्व्यांसाठी राबतीया. जवा बघावं तवा शेणात गुंतलेली.'

रामीच्या या आठवानं रुक्मिणीच्या डोळ्यांत एकदम पाणी तरळलं. तिच्या काळजाचं कप्पं हाललं. पुटपुटली, 'देवाऽऽ माझ्या या देखण्या लेकीचं कसलं हे येडंहेंद्रं नशीब. एवढ्या बालवयात देवाऽऽ माझ्या या कवळ्या लेकराला घराच्या रगाड्याला का म्हणून जुपलास ? गावचा भट म्हणतो, ही भाग्याची भागिरथी हाय म्हणून... अशी असते व्हय भागिरथी ?'

आईनं बोलावल्यावरुन रामी आईच्या समोर आली.

तिने विचारले, 'काय आई ?'

'लेकराऽऽ मघापास्नं आपल्या घरापुढच्या व मागच्या झाडावर कावळं सारखं काव काव करत्यात, तू ते ऐकलंयस ?'

'हां-आई... मी ते ऐकतेय. ते ऐकून मघापास्न माझ्या मनात येऊ लागलंय, आज आपला म्हंमईवाला मामा येणार... आमाला खूप खायला घेऊन येणार. म्हंमईचा मेवा घेऊन येणार. मला-शंकरला-गौराला- ... आणि आई, सात भावांत एक तीळ वाटून खाल्ला ना, तस्सं तिघांत आमी तो मेवा वाटून खाणार.'

'वाऽऽ वाऽ ऽऽ रामीऽऽ अशीच तुझी, तुझ्या या भावंडावर माया असू दे... तू त्यांची ताई नव्हं, आई हो ऽ ऽ देव तुझं भलं करील. रामी, तुझ्या मनात जसं येतंय, तसं माझ्याबी मनात येतंय. म्हमईवाला माझा भाऊ आज येणार... तुमाला

मेवा घेऊन येणारच. आठ दिस झालं, तुझ्या बानं त्येला कारड लिवलंया. पन भाऊ अजून कसा आला न्हायी ? लवकर रजा मिळाली नसंल. तरी आज येणार. रुक्मिणी मनात म्हणत होती. म्हंमईवाला माझा भाऊ आला की, माझा टांगणीला लागलेला ह्यो जीव खाली पडंल, त्याच्या वट्ट्यात ही माझी पिल्लं घालून, त्येंची ही पक्षीन मग उडून जाईल. बिनघोर, बिनघोर उडून जाईल.'

आणि त्याच वेळी रुक्मिणीच्या डोळ्यात पाणी भरलेलं रामीला दिसलं. तिनं विचारलं, 'आई, तुझ्या डोळ्यांत पाणी ? का ?'

'काय न्हाय बाळ... काय न्हाय.'

आईचं डोळं पुसण्यासाठी रामी पुढं झाली. रखमाईच्या कपाळाला तिला कढत स्पर्श झाला. रामीनं विचारलं, 'आई, तुझ्या अंगात ताप भरलाय, ठमा आजीला बोलावू ?'

'कशाला ? रोजचं आजारपन... शेजाऱ्याला किती तरास द्यायचा ?'

पण रामी ठमाकाकूकडं गेलीच. तिला घेऊनच आली. ठमाकाकूनं रुक्मिणीच्या अंगाला स्पर्श केला. तिचा हात पोळून निघावा असा ताप भरलेला तिनं पाहिला. म्हणाली, 'रामेऽऽऽ फडकं घे... भांड्यातून थंड पाणी घे...पाण्यात फडकं भिजवून हिचं अंग पुसते... कपाळावर गार पाण्याची पट्टी ठेवते. तापानं फणफणलीय तुझी आई... रखमेऽऽऽ मला बोलवायचं न्हाय... मग आमी भाऊबंद शेजारी कसलं ?'

'रोजचंच मढं त्येला कोण रडं...' रुक्मिणी बोलली.

'असं वंगाळ बोलू नये. रामी, तू घरातलं बघ... मी हिचं बघत्ये. ठमाकाकूनं रुक्मिणीला विचारलं, 'तापाच्या गोळ्याबिळ्या हायीत का ?'

'हायीत... मला ठावं न्हाय कुठं ठिवल्यात. त्येंनी आलं पाहिजी.'

'भिकू अजून कामावरनं आला न्हायी... ? बारा वाजून गेल्यात बरं. काय हा बिछाना विस्कटीत झालाय.' असं म्हणून ठमाकाकूनं तिचा बिछाना साफ केला. तिचं पातळ बदललं. अंग पाण्यानं पुसून काढलं. कपाळावर पट्टी ठेवली. ठमाकाकू बिछान्याजवळ बसून राहिली.

'ठमा मावशी किती करशील, आता काही माझा भरवंसा...'

'असं बोलू नये... अजून कच्चीबच्ची हायीत... त्येंना कोण बघणार ?'

'आकाशाकडं बोट करुन रुक्मिणी बोलली, 'देव... त्येंचं बा... रामीऽऽऽ तुझा बा आला का गं ? तुझा सैंपाक झाला का गं ?'

'हुतोय गं आई...' रामी आईच्या बिछान्याजवळ येऊन उत्तरली.

'जेवून घ्या,' क्षीण आवाजात रुक्मिणी बोलली.

'आई, तुझ्यासाठी मी आज साबुदाण्याची खीर केलीया. दोन मनुकं, दोन वेलदोडं टाकलेत... गूळ बी... लई चांगली झालीया खीर... आणू ?'

'बाळांनो... अगुदर तुमी खावा... मग म्या खाईन. तुमी माझी पिल्लं... पिल्लाअगुदर पक्षीणीला घास गिळवेल का ? तुमी आधी खावा...'

रुक्मिणीचा अधिकच क्षीणसा आवाज ऐकून ठमाकाकूनं तिचा ताप पाहिला. म्हणाली, 'रखमाऽऽ, तुला लई ताप भरत चाललाय. आता जादा बोलू नगं. शांत पडून राहा. का वैद्याला बोलवावं?'

'ती बघ, त्या वैद्याची औषिध... अजून चालू हायती. गुण काय न्हायी सारी गोरीत ठिवा माझ्या... ती औषधं... देवाघरी निघाली मी...'

'भरल्या घरात असं बोलू नये. तुझ्या पिल्लांनी ऐकलं तर... दिल भंग होईल त्यांचा.'

क्षणभर रुक्मिणी शांत पडून राहिली. पुन्हा रुक्मिणी ओरडली, 'रामीबाळ, तुमी सर्व्यांनी खाऊन घेतलं का गं?'

'खाया लागलोय गं आई!'

'खावा बाळांनो, लवकर खावा... आणि स्वतःशीच गुणगुणली. मी मेली तर... उपाशी पडाया नगं माझी पिल्ली...' रुक्मिणी हळूहळू पण स्फुंदू लागलेली.

ठमाकाकूला वाटू लागलं, रुक्मिणीला तिचं मरण दिसू लागलंय. ती आता फक्त निरवानिरव करीत होती. त्यामुळं तिलाही भडभडून येत होतं.

एवढ्यात कामावरनं मोठ्या ओढीनं भिकू धावत धावतच रुक्मिणीच्या समोर येऊन उभा राहिला. भिकूला समोर पाहताच रुक्मिणीनं त्याला प्रश्न केला, 'डागदरला दावली तुमी तुमची तब्येत?'

भिकू सटपटला. निरुत्तर झाला. रुक्मिणीनं विचारलं, 'मला काल वचन दिलं हुतं तुमी? आज कामावरनं येतानाच डादगरला तब्बेत दावूनच येईल म्हणून. इसरलात?'

'कामात येळ झाली न्हाय... न्हाय गं जमलं. तुझ्याच आजाराच्या वडीनं मी धावत आलूया... तुला कसं काय हाय?'

'मला काय धाड हुतीया. माझं काय ऐकायचं न्हाय, उगीच माझी काळजी करतोय असं दाखवायचं. डागदरला तब्बेत दावून आला असता तर तुमची बायको इकडं मेली असती न्हाय?'

'रखमेऽऽ रखमेऽऽऽ'

'जावा... तब्बेत दावून या... जावाऽऽऽ' आणि रुक्मिणी स्फुंदून स्फुंदून उडू लागली. स्वतःला त्रास करुन घेऊ लागली.

'रखमेऽऽ हा मी निघालो डादगरकडं. पण तु रडू नगंस. निघालोऽऽ' भिकू डोळं पुशीत पुशीत गेला... जड उरानं गेला...

भिकूला तिनं असं बोललेलं ठमाकाकूला आवडलं नसावं, असं रखमाला वाटलं म्हणून तिनं मावशीला खोदून खोदून विचारलं, 'मावशी, माझ्या नवऱ्याला मी वावगी बोलले का? काय चुकलं माझं अशा वागण्यात?'

ठमाकाकू यावर काहीच बोलली नाही. परत रुक्मिणीनं तिला विचारलंच, 'मावशी, काहीच बोलत न्हायीस? मावशी त्येस्नी डागदर न्हायी बगितला तर काय खरं न्हायी... त्येंनी मग धड असायला नगं का? मुलांचं काय? माझ्या मुलांचं माझ्या माघारी काय हुईल? मी मेल्यावर त्येंनी डागदर बगितला व न्हायी बगितला, ते मला कसं कळणार? म्हणून मी त्येंना आता पाठविला... मी मरेपरयंत तरी येतील?

'रखमे... खऱ्या आईबाची परिव्रता लेक तू... म्हणून तुझा हा एवढा जीव नवऱ्यावर, तुझ्या मुलाबाळावर... मानली तुला!'

एवढ्यात रामी आली. म्हणाली, 'आई, आमी सारीजनं खाऊन उठलो. शंकरला मी भरवलं.'

रामीचे हे भावंडावरील मायेने ओथंबलेले बोल ऐकून रुक्मिणीला आनंदाचं भरतं आलं. रामीबद्दलचं प्रेम तिच्या हृदयात उचळंबून आलं...

'रामीऽ भागा... तू आता अशीच या मुलांची आई हो!'

'आई, तुझी शप्पथ...' गौरा शंकरला मी जलमात अंतर देणार न्हाय. कंदी कंदी इसरणार न्हाय.

'बस्स... बस्स!' रुक्मिणीचं हृदय वत्सलतेनं अधिकच भरुन आलं. वत्सलता डोळ्यावाटे वाहू लागली... पाझरु लागली.

रुक्मिणीचा ताप सारखा वाढतच होता. ती कसलं औषधही घेऊ इच्छित नव्हती. कपाळावर पाण्यानं भिजवलेल्या पट्ट्या आवरायचं काम ठमाकाकू मात्र करत होती. तरी ताप काही आटोक्यात येत नव्हता. आता आता तर रुक्मिणी वातात असं अभद्र बडबडत होती. 'मावशे... माझा नवरा येडाबंब हाय बघ. काय अक्कल न्हायी त्येंना... मी आता निघालेय... तर ह्ये येडंबंब गेलंय कुणीकडं... मी गेल्यावर याचं कसं हुणार मावशे...'

'अगं तूच तर त्याला डागदरकडं जाया सांगितलंस?'

'म्या सांगितलं? हां... हां... एव्हाना, डागदरनं त्येस्नी तपासलं असंल न्हायी? म्हणून त्येस्नी उशीर... योऽ बयाऽऽ, ध्यान उडत चाललं... म्हंजी, मराण नरड्याशी आलंय...'

रुक्मिणीची शुद्ध हरपत चालली होती. बोलतानासुद्धा ती अडखळत होती. एवढ्यात तिच्या घरावरुन टिटवी आजाव करीत गेली. त्यानं रुक्मिणी परत हादरली. तिच्याभोवती बसलेले शेजारीपाजारी समजायचं ते समजून चुकले. एकजण हळूच बोलला, 'सारं आता आवरतं आलंय. भिकूला बोलवा.'

रुक्मिणी ठमाकाकूला बोलली, 'मावशेऽऽ, माझ्या... रामीला... बोलव... गं.'

हे ऐकून कुणीतरी बोललं, 'रामे... तुला तुझी आई बोलावतेय. बघ काय म्हणतीया.'

रामी गौरा व शंकरला तिथंच सोडून धावतच आईकडे आली. आईजवळ जाऊन बसली. रामीच्या तोंडावरुन, गालावरुन, केसावरुन माया-ममतेनं रुक्मिणी सारखा हात फिरवू लागली. डोळ्यात पाणी आणून अडखळत बोलली, 'रामी... माझ्या गुणाच्या बाळी... रामी...'

रामी मोठ्यानं रडत बोलली, 'आई... बोल गं... मला कायतरी सांग गं... शिकव गं...'

'सारं सांगितलंय, शिकवलंय... बाळा तुला... शहाणी हायीस... आता... एकच... सांगायचं... तू... तू... आता आई हो... आई हो...'

उंचवट्यावर बसलेला एकजण उठून बोलला, 'ते बघ, रखमाचा म्हमईवाला भाऊ... तिचा दीर यायला लागलेत... रखमाच्या तोंडात थोडं पाणी घाला... तिला काय बोलायचं असेल तर बोलेल.'

कुणीतरी धावत जाऊन पाणी आणलं. रखमाच्या तोंडात घातलं. ठमाकाकू रखमाच्या कानात बोलली, 'रखमा... अगं तुझा म्हमईवाला भाऊ आला... दीर आला बघ... बघ.'

रखमाची कळी एकदम खुलली. ताजीतवानी होत बोलली, 'काय... माझा भाऊ आला... दी... र आला. भाऊ...'

'हां हां... आक्का, तुझा म्हमईवाला भाऊ... मी आलोय.' कंठ दाटून हृदय भरुन तिचा भाऊ बोलत होता.

‘माझा भाऊ आला... येनारच... दुपरती नि किस्नावानी एकमेकासाठी धावून जाणारं आमी बहीणभाऊ आहुत. भाऊ तू आलास... माझ्या साऱ्या चिंता मिटल्या.’

‘बोल आक्का... तुझ्या मनात असेल ते बोल. मी आलोय.’

सारी शक्ती एकवटून अडखळत ती भाऊला कळवळून बोलली, ‘भाऊ... ही पक्षीण... निघाली रे उडून... तिची चिमणी पाखरं तूच आता --- तू आता...’

रुक्मिणीला अधिक बोलवेना. भाऊ डोळ्यात पाणी आणून शपथपूर्वक बोलला, ‘आक्का, पंख न फुटलेल्या तुझ्या चिमण्या पाखरांची मी कंदी वरात होऊ देनार न्हायी... तेंचं सगळं मी करीन... भावोजीच्या वझ्याला मी नेहमीच हातभार लावीन... हा घे हात... तुझी शप्पथ...’

भाऊनं आक्काच्या हातात हात दिला. भाऊकडं पाहून रुक्मिणी आनंदली. बोलली, ‘भाऽऽऊ...’

आणि रुक्मिणीची मान खचकन् एका बाजूला कलती झाली.

ते पाहून तिचा भाऊ जोरात ओरडला, ‘आक्का...’

रामीनं आईच्या अंगावर पडून टाहो फोडला, ‘आ... ई...’

रामीची, गौरा, शंकरची आई त्यांना सोडून गेली. रामीला त्या साऱ्यांची ‘आई हो’ म्हणून सांगून गेली.

थोरला दीर शोकविव्हळ होऊन रडू लागला. साऱ्या भावबांधवांचे डोळे पाणावले. आया-बाया रडू लागल्या. सारा आकांत उडाला. तेवढ्यात धावत धावत भिकू तिथे आला. रुक्मिणीच्या निष्प्राण कलेवराकडं पाहून तो आतडं पिळवटून मोठ्यानं ओरडला, ‘अरे... माझ्या देवा..., पांडुरंगा... का केलंस हे? रखमे मला न सांगताच तू मला अशी एकट्याला सोडून कशी गं गेलीस? रखमे?’ आणि भिकू वीज पडल्या झाडासारख्या जागच्या जागी कोसळला.

• • •

१०

“चक्रवाक पक्षी वियोगे वहाती

झाले मजप्रति तैसे आता... ।।धृ०।।

वत्स न देखता गाई हंबरती

झाले मजप्रति तैसे आता... ।।१।।

जीवना वेगळे मत्स्य तळमळती

झाले मजप्रति तैसे आता... ।।२।।

नामा म्हणे मज ऐसे वाटे चित्ती

करीतसे खंती फार तुझी... ।।३।।”

दररोज भल्या पहाटे उठून, घरापुढच्या तुळशीवृंदावनाजवळ बसून अलीकडे भिकू असा देवाला आळवीत असे. मग तो आपल्या नित्याच्या पोटाच्या कामावर जात असे.

तीन लहान मुलांना मागे टाकून त्यांची अस्तुरी रुक्मिणी अर्ध्या संसारातून उठून देवाघरी नुकतीच गेलेली आहे. त्यामुळं भिकू चक्रवाक पक्षाप्रमाणे विव्हळ झालेला आहे. पाण्याविना तडफणाऱ्या माश्याप्रमाणे भिकू व्याकूळ झालेला आहे. वेडापिसा झालेला आहे. तोंड आहे म्हणून तो खात आहे. हातपाय आहेत म्हणून तो चालत आहे. मरता येत नाही म्हणून तो जगत आहे. त्यात तीन मुलांची जबाबदारी... बोझ... त्यामुळे भिकू अगदी खचला होता. संकटांनी पिचला होता. निष्प्रभ झाला होता. बंदरावरील डोईवर टोपल्या घेऊन धावण्याचं काम त्याला आता रेटत नव्हतं. पण निर्वाहासाठी छातीतलं दुखणं असूनही त्याला तरीही धावावं लागत होतं.

अन् हे सारं सारं दु:ख विसरण्यासाठी, मनाचं समाधान मिळवण्यासाठी दररोज तो असा देवाला आळवीत होता. आळवून झालं की, पत्नीच्या आठवणीनं धाय मोकलून रडत असे. रडून दु:ख हलकं करु पाहत होता.

आताही भिकू असाच हुंदके देऊन रडत होता. आपल्या मेलेल्या प्राणप्रिय पत्नीची आठवण काढून, अगदी उमळून उमळून रडत होता. त्याच्या अश्रूंना खळ नव्हती.

त्याची लाडकी लेक रामी त्याच्या पाठीमागून येऊन हळून भिकोबाच्या पाठीवर पडून, त्याचे वाहणारे अश्रू ती पुसू लागली. म्हणाली, 'बाबा, तुमीचं असं रडू लागल्यावर आमी कच्च्याबच्च्यांनी काय करावं?'

'न्हायी बाळ... न्हायी बाळ... तुमासाठी माझा जीव हाजीर हाय. जगतोय तुमासाठीच. तुमी निश्चिंत असा. मी रडतोय, तुझी आई मला टाकून गेली नि पांडुरंगानं मला असं जलमातून उठवलं म्हणून...'

'बाबा, आमीसुदीक या आगीनं पोळून निघालोय. जे दु:ख एका डोळ्याला तेच दु:ख दुसऱ्या डोळ्याला. बाबा ऽ ऽ असं रडून का, आमची आई आता परत येनार हाय? असं रडून का आपणाला कोणी चार घास खाया देणार हाय? असं रडण्यापरास जे पडलंय ते उठून सावरलं पाहिजी... आई मला म्हणायची, रामेऽऽ, माणसानं रडत बसू नये... दु:ख गिळून टाकण्यासाठी हसतमुखानं जगायला शिकलं पाहिजी...'

'रामे... भागा... तुझं हे किती गं शहाणपण?'

'या शहाणीचं मग ऐकायचं?'

'ऐकलंच पाहिजी.'

'मग डोळं पुसा... न्हायरी करा नि हसत हसत कामाला जावा, बघा!'

रामीला कुरवाळत भिकु बोलला --

'चिमुकला तुझा जीव पण आभाळाएवढं तुझं शहाणपण!'

'बाबा, मरताना आई मला सांगून गेलीय, रामे... साऱ्यांची तू आई हो... आईचं हे सांगणं तळहाताच्या फोडापरमानं मी जपणार हाय... माझ्या भावंडांना मी अंतर देणार न्हाय... सारं घर मी एकटी सांभाळीन... सैंपाक करीन, शेण आणून शेणी थापीन, त्या विकून त्यावर घर चालवीन... हो, आईनं जसं केलं असतं तस्सं मी करीन... तिला एवढंदिकील मी कमी पडू देणार न्हाय... पण बाबा, तुमी असं खचू नका... घराचा खांबच खचला तर सारं घरंच कोसळंल. बाबा, आमाला दिलासा द्या... न्हायतर मी...'

'न्हायतर तू काय करशील? तू काय करशील? तू असं काय करशील, तर मी तडकाफडकी मरुन जाईन!'

'बाबा... तुमाला असं मरता येणार न्हायी... तुमीच जलम दिलेलं तीन जीव, तुमच्या जीवावर हायती. त्यांना वाऱ्यावर सोडून तुमाला असं मरता येणार न्हायी... त्यांचं पालनपोषण हाच तुमचा धरम... देव बी तुमाला मग क्षमा करणार न्हायी... तुमाला वर घेणार न्हायी...'

‘रामी... भागा... काय ऐकतोय मी हे...’ असं म्हणून भिकूनं रामीला कवटाळून घट्ट हृदयाशी धरलं. तिच्या पाठीवरुन हळूवार हात फिरवीत भिकू गदगदून म्हणाला, ‘मला बी एवढी उमज न्हाय, ते माझं लेकरु बोलतंया... माझी बामनीन... संत ज्ञानदेवाची ज्ञानदेवी, मुक्ताबाई... माझी ज्ञानदेव... मुक्ताबाई... माझी मुक्ताबाई...’

या वेळी रामी तथा भागा असेल आठ वर्षाची. गौरा पाच-सहा वर्षांची नि शंकर चार वर्षांचा. केवळ सारी अजाण मुलं... पण आई देवाघरी गेली म्हणजे काय, हेही त्यांना कळण्याच्या पलीकडचं —

आईच्या आठवणीनं मुलांचे चेहरे उतरलेले असायचे. शंकर सगळ्यांत लहान. तो रामीला, तिच्या ताईला कधीमधी सारखा विचारी, ‘ताई, आपली आई कंदी येणार गं? आमाला टाकून कुठं गेलीया?’

‘आपली आई देवाघरी गेलीया,’ रामी सांगे.

‘किती दिवस तू असंच सांगतेच. मग येणार तर कंदी?’

‘येईल... येईल हं, आपली आई. भाऊ, तू मलाच आई समज. मलाच आई म्हण.’

‘तू आमची ताई... आई कशी हुनार?’

लहान जीव रामी, आपल्या लहान भावाला लहान गोष्टी सांगून समजावीत होती. आईविना पोरकी झालेली मुलं, वयाच्या मानानं लवकर समजदार होतात ती अशी.

एवढीशी लहान रामी, घरातली लहानसहान सारी कामं लहानशा हातांनी उचलत होती. पित्याच्या कोसळलेल्या चंद्रमौळी घराला आपल्या चिमुकल्या बाहुवर पेलून धरुन सावरु पाहत होती. तिची आई जसं करीत होती, तस्सं ती करु पाहत होती.

रामी आईसारखीच भल्यापहाटे उठे. थंड पाण्यानं आंघोळ करी. अंगणातली, परड्यातली फुलं तोडून देवाला भक्तीभावाने वाहून ती पूजा करी. लगेच आईसारखीच रानात शेण गोळा करावयाच जाई — शेणी विकून संसारास हातभार लावी.

रामी इतकं कष्ट उपसत होती, पण किती आनंदानं, उत्साहानं... आईबापावरील तिच्या अपरंपार प्रेमामुळं. किती प्रेम? त्या प्रेमाला हे कष्टही आनंदरुप वाटत होते जणू?

“मायबाप केवळ काशी। तेणे न जावे तिर्थाशी।

तुका म्हणे मायबापे। अवघी देवाची स्वरुपे।।...”

एक भिक्षेकरी हा अभंग एकतीरावर गात गात भिक्षा मागत होता. अतिथी रुपात प्रत्यक्ष परमेश्वर रामीला हा आईबापाचा महिमा गाऊन दाखवीत होता. ऐकवीत होता.

भिक्षा वाढून रामी तितक्याच आनंदाने शेण व जळण गोळा करायला दूर रानात निघून गेली. घरात फक्त गौरा व शंकर. त्यांना खाया घालून, समजावून रामी रानात निघून गेली. सूर्य डोकीवर उभा घेऊन रामी रानात निघून गेली.

संध्याकाळ झाली तरी रामी रानातून परतली नव्हती. भिकू कामावरुन येऊन जेवणखान करुन दारातच तिची वाट बघत केव्हाचाच बसलेला. अधिकाधिक बेचैन होऊ लागला. इकडे रानात शेण गोळा करण्यात, जळण जमा करण्यात रामी पुरती गुंगलेली. वेळंकाळंचा नव्हे, तिला स्वत:चा देखील त्यात विसर पडलेला. इतकी तन्मय झालेली रामी.

भिकूला घरी बसवेना. मनात नाही नाही त्या शंकाकुशंका येऊ लागल्या. त्याने तो अधिकच बेचैन झालेला. कशातच त्याचं मन लागेना. त्यानं ठमाकाकूला हाक मारली, ‘मावशे..., रानात गेलेली रामी अजून आली न्हायी?’

'रामी, आज अशीकशी मला न सांगता रानात गेली? भिकू, दोन तीन तरणीताठी पोरं संगती घे... नि धाव चारी वाटनं चारी... रानात... सांज झालीया, तंवर धाव. अंधार पडला तर मोठा घोळ होईल.'

ठमाकाकूनंच आवाज चढवून हाका घातल्या, 'ये गणा... ये... रामज्या, ये राजाऽ ऽ इकडं यारं जरा...'

गणा, रामज्या व राजा ठमाकाकूजवळ धावतच आली. त्यांना काकू म्हणाली, 'भिकू-रखमाची रामी दुपारपास्नं रानात गेलीया... ती अजून आलीच न्हायी. जावा... चारी वाटनं धुंडा तिला... भिकू तू बी एक वाट धर... तवर मी बघते गौरा, शंकरकडं...'

भिकू व ती तीन पोरं निरनिराळ्या वाटेनं रामीला शोधाया धावत रानात निघाली —

रामीची शोधाशोध सुरु झाली.

भिकूच्या पोटात गोळा उठलेला. छाती धडधडू लागलेली. पाय जडशीळ झालेलं... पंढरीकडं तोडं करुन भिकूनं हात जोडले. बोलला, 'पांडुरं...ग ऽऽ माझ्या चुकलेल्या लेकरावर तुझी पाखर ठेव... तिला सुखरुप परत भेटव... पांडुरं... गा...'

आणि पंढरीरायाचा धावा करीत मोठमोठ्यानं गात तो पंढरीभक्त वाट चालू लागला —

"तू धाव सख्या, धाव आता, पंढरीराया

करुनि दया, हरुनि भया, भक्त दीनाच्या..."

दुरुन तिच्या बाबाचा हा आवाज तिच्या कानी पडताच, रानात गुंतलेली रामी एकदम भानावर आली. तिनं पाहिलं. अंधार पडू लागला होता. ती घाबरली. जमविलेलं शेण व जळण घेऊन, बाबाच्या आवाजाच्या दिशेनं, ती धावू लागली; मध्येच भिकू जोरानं हाक घाली, 'भाऽऽगाऽऽ... भाऽऽगाऽऽ काही अवधीतच रामीनं त्या हाकेला 'ओ',

'बा... बाऽऽऽबा... बऽऽऽ.'

रान थोडं जंगलमय. वेली... फुलांनी, काट्या-कुट्यांनी व निवडुंग केकताडीनं भरलेलं. त्यात कडुसं पडत चाललेलं. भयानक वातावरण. रामी धावतच राहिली. हातात शेणाचं भांडं व डोईवर जळणाचा भारा, त्यामुळं तिला जोरात धावता येत नव्हतं. तरी बाबाच्या आवाजाच्या आधारानं, आवाजाच्या दिशेनं रामी आता जोरात पावलं टाकीत होती. मध्येच भिकूची हाक ऐकू येईनाशी झाली. भयभीत रामी ओरडली,

'बाऽऽ बा, आ वाऽ ज द्याऽऽ आवाजऽऽऽ द्याऽऽ'

भिकूनं साद दिली, 'भाऽऽ गा, मी आलोऽऽ'

गणा-रामज्यानं हा भिकूचा आवाज ऐकला. त्यांनी त्या दिशेनं धावायला सुरुवात केली. अचानक भिकूच्या छातीत आता मनस्वी दुखू लागलेलं. त्यामुळं त्याचा धावण्याचा वेग मंदावला, हाक घालणंही त्याला आता अशक्य होऊ लागलं.

बराच वेळ बाबाची हाक नाही. रामी घाबरली. ओरडली.

'बाऽऽ बा मी आऽऽले! तुऽऽऽमी, कुठाय?'

तिच्या हाकेला 'ओ' आली नाही. रामी घाबरली. जोरात पावलं उचलू लागली. तिनं पाहिलं वाटेतच आपला बाबा आडवा पडलेला. घाबरुन तिनं जोरात किंकाळी ठोकली, 'बाऽऽऽबा, माझ्या बाबाला काय झालंऽऽ बाऽऽऽबा बोऽऽला.'

भिकू पडल्या पडल्याच बोलला, 'भागाऽऽऽऽ घाबरु नगं बाळाऽऽ मला काय झालं न्हाय, थकवा आला, जरा पडलो. माझ्या छातीत दुखू लागलं.... मरणाच्या वेदना होऊ लागल्यात.'

भिकूला हात देऊन रामीनं उठवलं. सावरत चालवत घराच्या वाटेनं त्याला हळूहळू नेलं. भिकूला ओकारी येऊ लागली. तो आवरुन धरु लागला. तेवढ्यात गणा, रामज्या ही तरणी पोरं तिथं येऊन भिडली. भागाला पाहून त्यांना बरं वाटलं. त्यांनी भिकूला सावरुन घराकडे चालवत नेऊ लागली.

अंधार पडू लागलेला. चालता चालता रामी भडभडून बोलू लागली.

'बाऽऽऽ बा, तुमी कशाला एवढा तरास घेतलात?'

'रामेऽऽ या साऱ्या जगात केवळ तूच माझा एक आधार. तोच कुठं दिसंना. डोळ्यापुढं अंधारी आली. दाही दिशा धुपल्या... तुझा शोध घेत, आमी चारी वाटंला चारीजणं धावत सुटलो... तुला हाका घालीत सुटलो. एकदम छाती दुखू लागली... हाका घालयचं जमेना, अन् असा आडवा पडलो.'

'पण बाबा,' रामी काळीज पिळवटून बोलू लागली. 'आई मला सांगून गेली हुतीया... भागाऽऽऽ आता तूच या साऱ्यांची आई हो... आई करीत हुती तसं मला आता करायला नगं का? घराचं सारं मला बघायला नगं का? शेण कुठं मिळतंय का, म्हणून शोध घेत घेत शेण गोळा करीत दूरदूर रानात गेले... तिथं मला जळण दिसलं. ते जमा करु लागली... जळणाशिवाय सैंपाक कसा करणार? जळण जमा करण्यात गुंतून गेली. येळचं भान राहिलं न्हाय. तुमची हाक आली नि मी भानावर आली... पाहिलं तर अंधार पडू लागलेला. मी घाबरली... जळण नि शेण घेऊन मी धावतच सुटली... डोक्यावरच्या वझ्यानं, हातातल्या वझ्यानं मला धावता बी येईना... धाव धाव धावत राहिली... वाटंत पडलेलं तुमी मला दिसला. काळीज फाटून गेलं...'

रामज्या बोलला, 'भा ऽऽऽऽ गा मी आलोऽऽऽऽ' ही भिकूदाची हाक ऐकू आली. गणाला शीळ घालून बोलावलं. गणा लगीच माझ्या शिळेच्या रोखानं धावून आला. दोघं भिकूदाच्या आवाजाच्या रोखानं धावत आलू... तुमी दोघं बापलेक हाथं दिसला. बरं वाटलं...'

आता गणा-रामज्या भिकूच्या कमरेत हात घालून, खांद्याचा आधार देत, सावरत भिकूला चालवू लागली... घर थोड्याच अंतरावर आलेलं. तेवढ्यात भिकूला रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या.

रामीनं एकदम हंबरडा फोडला. मोठमोठ्यानं आक्रोश करुन ती रडू लागली. सारा ज्ञातीसंबंध तिथं धावून आला. साऱ्यांनी उचलून भिकूला त्याच्या घरात आणून ठेवला.

रामी तडफडून तडफडून रडत होती. आक्रंदून रडत होती.

घाबऱ्याघुबऱ्या ठमाकाकू बोलली, 'रामज्याऽऽऽऽ गणाऽऽऽ पोरांनू, डागदरला अगुदर बोलवाऽऽऽऽ जावा... पळा...'

रामज्या, गणा व राजा डागदरकडं पळाली. भिकू बेशुद्धासारखा पडलेला. कुणाला काही कळत नव्हतं. सारे डॉक्टरच्या वाटेकडे डोळे लावून बसलेले. डॉक्टरला यायला वेळ लागला. कोण भिकूला वारा घालत होतं. कोण हाका मारुन उठवू पाहत होतं. एवढ्यात डॉक्टर आला. त्यानं भिकूची नाडी पाहिली. क्षणभरच डॉक्टर एकदम उठला. खुणेनंच त्यानं सांगितलं, 'सारा कारभार आटोपलाय.'

मग एकच आकांत! एकच हलकल्लोळ उडाला!

रामी हमसून हमसून रडत होती. साऱ्या भाऊबंधांच्या डोळ्यांतून आसू वाहत होते. घडू नये ते अकल्पित घडलं होतं. काळीज फाटावं, त्याच्या चिंध्या चिंध्या व्हाव्या, असं अचानकपणे सारं घडलं होतं.

म्होरक्या नागू शिंगे ओरडून बोलला, 'भिकू-रखमाचं घर आज ढाणकला लागलं. तीन कवळी पोरं मागं टाकून भिकू गेला. तवा आमी साऱ्या भाऊबंधांनी, थळपांढरीनं, सामाईक पैका काढून, भिकूचं आता सारं कराया होवं...'

'मंजूर... मंजूर...,' थळ पांढरीतले म्होरके एकमुखानं बोलले.

परत नागू शिंगे बोलला, 'देवाऽऽऽ एवढं वंगाळ कुणाचंबी करु नगंस... रामज्याऽऽऽ गण्याऽऽऽ घ्या लागंल तो पैका थळपांढरीतून... आणि भिकूच्या म्हंमईवाल्या भावाला, रखमाच्या म्हंमईवाल्या भावाला... दापोलीच्या भिकूच्या थोरल्या लगीन झालेल्या मुलीला 'तारा' ठोकून बोलावून घ्या... मातीला यायचं त्यांना जमलं न्हाय, माती लोटायला तरी जमतील सारी... मग ही सारी कवळी पोरं त्येंच्या वट्यात घालू... तंवर थळपांढरी त्येंना सांभाळील... लागू या पुढच्या तयारीला...'

रामी धाय मोकलून रडत होती. तिला समजावीत, गौरा-शंकरला जवळ घेऊन वर आकाशाकडं डोळं लावून ठमाकाकू मोठ्यानं रडत बोलली,

'देवाऽऽऽ ह्या पोरक्या पोरांचं पुढं कसं हुणार ? कसं हुणार ?'

• • •

११

भल्या पहाटे कोंबड्याच्या पहिल्या बांगेला सुभेदार रामजी सपकाळ (आंबेडकर) निद्रेतून जागे होत. जागे झाले की, लगेच आठवतील ते श्लोक वा अभंग पुटपुटणं त्यांचं चालू होत. हा त्यांचा नित्यनेम.

संस्कृत श्लोक ते अशा खणखणीत व शुद्ध उच्चारासह म्हणत की, ते ऐकून काशीक्षेत्राच्या षड्शास्त्र संस्कृत पंडीत गागा भटानं देखील चाट पडावं.

"मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम्।

यत्कृपा तमहं वंदे परमानंद माधवम्।।"

अगदी सोप्या व सुमधुर वाणीनं ईश्वरस्तवन करीत —

"डोळ्यांनी बघतो, ध्वनी परिसतो कानी, पदी चालतो।

जिव्हेने रस चाखतो, मधुरही वाचे आम्ही बोलतो।।

घेतो झोप, सुखे फिरुनि उठतो, ही ईश्वराची दया।।..."

रामजी सुभेदारांचे घराणे अस्पृश्य गणल्या गेलेल्या महार जातीचे. हिंदू समाजाने देवाधर्माच्या व शास्त्राच्या नावाखाली ह्या त्यांच्या समाजाला दु:ख, दारिद्र्य नि विषमता ह्यांच्या रौरव नरकात युगानुयुगे कुजत, पिचत ठेवून, त्यांचं जिणं पशूपेक्षाही हीन अवस्थेत नेलेलं. 'आपण माणसं आहोत' याचीही कल्पना त्यांच्या समाजबांधवांना नव्हती. महात्मा ज्योतीराव फुले व छत्रपती शाहू महाराजांच्या 'अस्पश्योद्धारा' च्या चळवळीमुळे व स्वत:वर शिक्षणाचे मौलिक संस्कार झाल्यामुळे, इतर समाज बांधवांपेक्षा याची तीव्र जाणीव त्यांना झालेली. आपल्या अस्पृश्य समाजाचा उद्धार करुन घ्यायचा असेल तर आपल्या समाज बांधवांना 'तुम्ही माणसं आहात' याची जाणीव प्रथम करुन दिली पाहिजे. तदनंतर आम्हीही माणसं आहोत म्हणून मानवाचे माणुसकीचे हक्क हस्तगत करण्यासाठी झुंज द्यावयास त्यांना शिकवले पाहिजे. त्यासाठी 'उद्धरेदात्मनात्मातम्' हे त्यांनी आपल्या जीवनाचं एकमेव ध्येय ठरविलेलं. त्या दृष्टीनं ते नित्य कार्यरत, दक्ष व बद्धपरिकर झालेले.

रामजी सुभेदार तसा लष्करी शिस्तीचा करडा माणूस 'सुभेदार' म्हणून लष्कराची पेन्शन घेतलेला. पण रहाणी कमालीची साधी, पण विचारसरणी मात्र अशी उच्चतम. त्यांचा स्वभाव आदरशील, प्रयत्नवादी पण वृत्ती वादविवादकुशल. कबीरपंथी संत कबीराप्रमाणेच त्यांना कणखर बाणा. उन्यायाविरुद्ध खवळून उठणारा. दैवाविरुद्ध झगडणारा.

"विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी

न दिसे एकहि वस्तू, विद्येनेहि असाध्य आहे जी..."

हे रामजी सुभेदारांच्या जीवनाचं सारसर्वस्व होत. आपल्या तिन्हीही मुलांनी खूप विद्या संपादन करावी, त्यांनी विद्याविभूषित व्हावे, आपला व आपल्या अस्पृश्य समाजाचा त्यांनी उद्धार करावा, या भवोदात्त ध्येयानं प्रेरित होऊ रात्रंदिवस जागृत राहून झटत होते. स्वत: रात्रंदिवस जागून मुलांचा अभ्यास करवून घेत होते. त्यामुळे त्यांना शिक्षणाचं महत्व कळत होतं, संस्काराचं महात्म कळत होतं. अभ्यास करवून घेण्याचं महत्वही ते समजत होते. त्यामुळे सर्वस्व समर्पून ते झटत होते.

रामजी सुभेदारांनी आपल्या छोट्याशा घरातील छोट्याशा खिडक्यादारांवर, घराच्या चारीही भिंतींवर अतिशय सुंदर अक्षरात नित्य जीवनोपयोगी सुभाषिते कागदावर लिहून चिकटवली होती.

१) साधी रहाणी पण उच्च विचारसरणी असावी.

२) न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमहि विद्यते।

३) दैवायत्तं कुले जन्म: मदायत्तं तु पौरुषम्।

४) विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी।

५) मरावे परी कीर्तिरुपे उरावे

अशी ही घरभर सुभाषिते लिहून लावण्याचा, त्यांचा एवढाच उद्देश होता की, आपल्या होतकरु विद्यार्थी मुलांनी तो मौलिक उपदेश, उठता-बसता, वावरता वाचावा. वाचता वाचता तो उपदेश त्यांनी आचरणात उतरवावा, आपल्या जीवनाचं भलं करावं.

एवढे श्लोक गुणगुणूनही आपली विद्यार्थी मुलं अभ्यासासाठी उठली नाहीत तर लगेच उपदेशपर श्लोक मोठमोठ्यानं गाऊन म्हणावयास सुरुवात करीत —

"मुलांनो, तुम्ही आळस सर्व सोडा

मनी काळजी बाळगा, ज्ञान जोडा

असा काळ कैसा तुम्हाला मिळेल

पुढे दु:ख होता तुम्हाला कळेल...

मुलांनो, तुम्ही तेच सर्वस्व भूचे

तुम्ही राष्ट्रनेते, तुम्ही वीर साचे

तुम्ही शासिते, राज्यकर्ते तुम्हात

असे शिका तुम्ही दृढ ध्यास घेत..."

एवढं करुनही विद्यार्थी मुलं उठलीच नाहीत तर त्यांना ते हालवून उठवीत, म्हणत- उठाऽऽऽ उठाऽऽऽ आळस झाडा, देवाला स्मरुनी अभ्यासाला लागा. मुलांनो, शिक्षण हे या जगीचं अमृत आहे. तो जो प्याला, तो झाला भला. शिक्षण घेणं ही एक तुम्हाला या जन्मी लाभलेली एक सुवर्णसंधी आहे, तुम्ही माणसं असूनही तुम्हाला हा देश पशूसारखं, गुलामासारखं

वागवीत आहे. आणि केवळ हे शिक्षणच तुमची ह्या गुलामगिरीतून मुक्तता करु शकेल... म्हणून खूप अभ्यास करा... खूप वाचा... वाचा... नाही तर मरा...

बाळाराम, आनंदराव व भीमराव मग खडबडून उठत. त्यातून त्यांनी आळस केलाच तर रामजी सुभेदार त्यांना छडीनं फोडून काढायला मागं पुढं पाहणार नाहीत, याची त्यांना मनोमनी भिती असेच. त्यामुळं ते लगेच उठत. उठून मुखमार्जन करुन, देवापुढं उभं राहून प्रार्थना म्हणत —

"नमस्ते शारदे देवि वीणा पुस्तक धारिणी

विद्यारंभ करिष्यामि प्रसन्न भव सर्वदा...

जमो मातृभूमी जिथे जन्मलो मी

नमो पुण्यभूमी जियेच्याच कामी

पडो देह माझा सदा ती नमी मी।

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।

गुरुः शाक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः।।"

एवढी प्रार्थना म्हणून झाल्यावर, ती तिन्ही विद्यार्थी मुलं, मग व्यायामाकडे वळत, जोर बैठका काढण्यापूर्वी ते प्रार्थना म्हणत —

"मनोजवं मारुततुल्य वेगं, जितेंद्रिय बुद्धिमंता वरिष्टम्।

वातात्मजं वानरयूथ मुख्यं, श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।..."

जोर-बैठका काढून झाल्यावर थोडंसं दूध पिऊन ती तिन्ही विद्यार्थीमुलं अभ्यासाला बसत. तोपर्यंत रामजी सुभेदार स्नानपूजादी कार्यक्रम आटोपून विद्यार्थी मुलांच्याजवळ येऊन बसत. बसल्या बसल्या बजावीत – 'मुलांनो, लक्ष देऊन एकाग्र चित्तानं अभ्यास करा. काही समजत नसेल तर मला विचारा, पण जेव्हा मी तुमचा अभ्यास घेईन तेव्हा हे मला समजलं नाही, असं म्हटलेलं मला खपणार नाही. समजलं?...'

या तिघा विद्यार्थी मुलांपेक्षा भीमरावावर त्यांचे विशेष लक्ष होतं. त्याची कारणंही तशीच होती. ज्योतिषशास्त्रात वर्णन केल्याप्रमाणे काही चिन्हं-लक्षणं धाकट्या भीमरावाच्याच मुद्रेवर, हातावर व पायावर उमटली असल्याचं ज्योतिषशास्त्र जाणते रामजी सुभेदार यांनी चांगली निरखली होती, पारखली होती. त्यामुळं भीमरावाच्या भावी काळातील 'मोठेपणा' बद्दल त्यांचा पक्का विश्वास होता.

त्यातच त्यांना त्यांच्या संन्याशी चुलत्यानं असाच आशिर्वाद दिला होता – आपल्या कुळीचा उद्धार करील, दिगंत कीर्ती मिळवील व इतिहासात आपलं नाव चिरंतन करील, असा कुलदीपक सुपुत्र तुझ्या पोटी जन्मास येईल...

त्यानंतर दोन वर्षातच रामजी सुभेदाराच्या पोटी हा भीमराव नामक सुपुत्र जन्मलेला. त्यामुळे विश्वास अधिकच बळावलेला. त्यामुळं भीमरावावर त्यांचं अधिक लक्ष.

— असं प्रार्थना-सत्र सकाळचंच होत असं नव्हे, सकाळची त्यांची जशी काकडआरती होत असे, तशीच संध्याकाळी दिवेलावणीच्या वेळी 'सांजवात' करुन शुभं करोति सुद्धा (ते रामजी सुभेदार) आपल्या विद्यार्थी मुलांकडून म्हणवून घेतली जात असे.

रात्री जेवणानंतर भजनाच्या वेळी भजन, त्यात प्रामुख्याने चोखोबा-तुकोबाचे अभंग, कबीराचे दोहे म्हटले जात असत. कधी कधी रामजीच म्हणत, 'मुलांनो, आज तुम्हाला आपल्या कबीरांचा एक नवीन पण महामौलिक असा दोहा मी ऐकवीत आहे. काळजीपूर्वक ऐका...

"जिस पारस से कांचन निपजा वो पारस कच्चा

जिस पारस से पारस निपजा वो पारस सच्चा।।..."

ह्या दोह्यात आपले संत कबीर आपणास काय उपदेशितात? म्हणतात, ज्या परीसाच्या स्पर्शानं लोखंडाचं फक्त सोनं होतं, तो परीस कच्चा. ज्या परीसस्पर्शानं परीस होतो तो परीस सच्चा. जर परिसानं परीसच निर्माण केलं तर खूप परीसच निर्माण होईल. मन अशा परीस-स्पर्शानं म्हणजेच आपल्या आदर्श चारित्र्यानं, दिव्य शिकवणीनं राहिलेल्या असंख्य लोकांच्या जीवाचं ते मग सोनं करुन टाकतील. सगळ्यांचे जीवनं सुख-समाधानानं भरुन टाकतील. मुलांनो, विद्येच्या परीसानं जीवनाचं सोनं होतं, हा भाग थोडासा कच्चा पण खूप विद्या-पदव्या-विभूषित अशा जीवनानं, माणसाचं जीवन परीसमय होतेच पण तो इतरांचेही जीवन तसेच परीसमय करुन टाकतो, हे जीवन सच्चा जीवन, तसं तुम्हीही जीवन जगा. आदर्श जीवन जगा. जगानं धडा घ्यावा, असं जीवन जगा...

अशा प्रकारच्या उपदेशामृताचे घुटके रामजी सुभेदार नित्यरोज आपल्या होतकरु विद्यार्थी मुलांना पाजीत असत. त्यांना अशा सुसंस्कारमय जीवनात वाढवीत असत. अशी सुभेदारांची जीवन क्रमणा चालू होती. त्यांच्या विद्यार्थी मुलांची विद्यादेवीची आराधना तितक्याच भक्तीभावानं चालली होती. त्यात खंड नव्हता. अळंटळं नव्हती. बेपर्वा नव्हती. निष्काळजीपणा नव्हता.

मनी धरावे ते ते होते... हे तत्व सुभेदार चांगले ओळखून होते. हृदयी बिंबवून होते. सुशिक्षित रामजी सुभेदारांना नित्य वाटत असे... आपली व श्री छत्रपती शिवाजीची आई जिजामाई यांची जीवन ध्येयं व ध्येय निष्ठा सारखीच आहेत. इतिहासकालीन जिजामाता यांची भूमिका आज आपण जगत आहोत. आपलं हिंदवी स्वराज्य स्थापनेचं स्वप्न बाल शिवाजी राजाच्या करवी साकार करुन घेण्यासाठी ते जसं त्याच्यावर 'तो एक आदर्श राजा व्हावा' म्हणून पद्धतशीरपणे संस्कार करीत राहिले. राज्यशास्त्र, युद्धशास्त्र आदी विद्यांत पारंगत करीत राहिले. अखेर त्यांच्याकडून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करुन घेतलीच. अगदी तस्सच, बाल भीमरावावर तो एक आपल्या समाजाचा महान उद्धारक व्हावा म्हणून आपणासही अगदी पद्धतशीरपणे त्याच्यावर संस्कार करीत राहिले पाहिजे. घटनाशास्त्र, समाजशास्त्र आदी विद्यांत त्याला पारंगत करीतच राहिले पाहिजे. अखेर त्याच्याकडून 'अस्पृश्योद्धाराचं' महान कार्य करुन घ्यावंच लागले. केल्याने होत आहे, आधी केलेच पाहिजे.

म्हणून रामजी सुभेदार सर्वस्व समर्पून भीमरावाच्या शिक्षणात लक्ष घालीत होते. अनंत अडचणींच्या सहाणेवर आनंदानं चंदनासारखं स्वतःला घासून घेत होते. त्या वेळी रामजी सुभेदार परळ विभागातील डबक चाळीत राहात होते.

कालचक्र नित्याप्रमाणं चालू होतं. विद्यार्थी भीमरावात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी त्याच्या अभ्यासात उत्तरोत्तर प्रगती व्हावी म्हणून रामजी सुभेदारांचे त्याच्यावर-हिऱ्यावर 'पैलू' पाडण्याचे काम अविरत चालू होते.

भीमराव प्रत्येक वर्षी परीक्षेत पास होऊन, वरच्या वर्गात जात होता. कलाकलानं त्याच्यात विद्येची अभिरुची वृद्धिगत होत होती. आणि १९०७ साली रामजी सुभेदारांचा आदर्श विद्यार्थी भीमराव मॅट्रीकची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाला. केवढा मोठा आनंद झाला त्या वेळी रामजी सुभेदारांना! केवढा आनंद! अत्यानंदानं ते ओरडले, 'वेल बिगिनिंग इन हाफ डन! आला आहे... आला आहे... अवतरला आहे... अस्पृश्यतेचा समूळ नायनाट करणारा अवतारी पुरुष भारतात अवतरला आहे!'

आणि थोड्याच दिवसांनी —

विद्यार्थी भिमरावाच्या लग्नाचा बेत रामजी सुभेदारांच्या मनात झुंबरासारखा झुलू लागला. त्यातच ते व्यग्र झाले.

आज रामजी सुभेदार तसे थोडे घाईतच होते. स्नान करताच त्यांनी न्याहारीचं लवकर करावयास फर्माविलेलं. घाईघाईनंच त्यानी न्याहारी उरकली. अन् घाईघाईनंच बाहेर पडताना त्यांची थोरली बहीण मीराबाई त्यांना म्हणालीच, 'काय भाऊ, आज तू एखाद्या लगीनघाईत असल्यासारखा दिसतोस रे ?'

'शोभलीस माझी थोरली बहीण, तू मला शोभलीस! पोथीपंचांग वाचून मी भविष्य सांगणारा. तू माणसाचा केवळ चेहरा पाहूनच भविष्य सांगणारी दिसतेस!'

'म्हणजे ? यात मी भविष्य असं काय सांगितलं ? सहज बोलले.'

'सहज बोलण्यातसुद्धा भविष्यशास्त्रात अर्थ आहे. हो, लगीनघाईतच मी चाललल्याचं तू तंतोतंत ओळखलंस... आपल्या भीमरावासाठी नवरी मुलगी... लगीनघाईनं बघायला चाललोय... तशी नवरी मुलगी मी प्रत्यक्ष कालच बघितलीय!'

'अस्सं... अस्सं...' मीराबाई नवल करीत उद्‌गारली.

'कालच त्या मुलीला तिच्या मामाबरोबर रस्त्यातच मी पाहिली. आपल्या गावाजवळच्या वणंदगावची. भिकू धोत्र्याची मुलगी... भिकू धोत्रे नुकताच वारला. तिच्या मामाकडे ती आहे. वयानं थोडी लहान आहे, पण मुलगी काय लाखांत एक आहे. फुलण्याची वाट पाहात असलेल्या टपोऱ्या गुलाबाच्या कळीसारखी राजबिंडी! क्षणभर जणू साक्षात् एखादी देवीच आपल्यासमोर उभी असल्याचा आभास झाला... ती सून म्हणून एकदम मला आवडली. मॅट्रिकवाल्या तुझ्या लाडक्या भीमासाठी योग्य बायको... एकदम लावण्यवती. जगातल्या सर्व लावण्याचं लावण्य वस्त्रगाळ करुन विधात्यानं तिची लावण्यमूर्ती घडविली असावी. मी जागच्या जागी खिळून राहिलो... तिच्या मामानं तिचं पोथीतलं नाव... चालू नाव... तिची रास... गावच्या भटानं सांगितलेलं तिचं भविष्य... भाग्याची भागीरथी... सारं ऐकविलं. ते सारं माझ्या डायरीत टिपून घेतलं. मी तिला विचारलं. बाळ, तुझं नाव काय?... तिनं खाली मान घालून लाजत उत्तर दिलं, भाऽऽऽ गाऽऽऽ पन सर्वी मला रामीच म्हणत्यात... वाऽऽऽ वाऽऽऽ किती मधूर आवाज... वागण्यात... बोलण्यात किती विनय! किती आदब! तिचा मामा मला सांगू लागला, गावचा भट म्हणाला, 'ही मुलगी लई भाग्याची हाय... भाग्याची भागिरथी नाव ठिवायला त्यानंच सांगितलेलं. भट म्हणाला, तिचा नवरासुद्धा तिच्याइतकाच भाग्यवंत असंल.' मग मी म्हणालो, 'आमचा मुलगाही आहेच तसा भाग्यवंत... आमच्या समाजातील तो पहिलाच मॅट्रिक झालेला... म्हणजे भाग्यवंतच... आक्का, तुला माहित आहे. मी सुद्धा चांगलो भविष्य जाणतोय. घरी आलो. तिचं नाव... ग्रह... नक्षत्र... काढून बसलो... पोथी चाळली... पंचांग पाहिलं... ज्योतिषशास्त्रानुसार गणीत मांडून तिचं भविष्य आजमावलं... आणि एकदम पटलं... गावच्या भटानं सांगितल्याप्रमाणं मुलगी एकदम मोठी भाग्याची आहे... भीमाच्या व भागिरथीच्या पत्रिका जुळवून पाहिल्या... तर तंतोतंत छत्तीस गुण जमले... आपल्या भीमाचं जर तिच्याशी लग्न झालं तर दुधाचं अमृत होईल. तो तसा अमृतयोग आहे, अधिकस्य अधिकं फलम्... त्या मुलीच्या तोंडात साखर घालायलाच मी एवढा लगीनघाईनं निघालोय...'

'पण भाऊ या आधी तू दोन मुली पहिल्या हायीस. एकीला तर नक्की करुन पंधरवड्यात साखरपुडा करावयास तू सांगितला हायीस... तवा आपलंच लोक तुला काय म्हणतील ? जात-काशी काय म्हणेल ?'

'आक्का, माझं हे वागणं, करणं चुकीचं आहे. मी ते समजतो. पण हे पृथ्वीमोलाचं माणिक तोपर्यंत माझ्या दृष्टीस पडलंच नव्हतं. दैवयोगानं काल माझ्या ते दृष्टीस पडलं... मला रस्त्यात सापडलं... मी ते माणिक ओलांडून पुढे जाणार नाही... तसं त्येला वाटतही पडू देणार नाही. भले, मग माझी जात-काशी त्यामुळं मला दंड करील. मी तो दंड भरीन... त्यांची सफशेल माफी मागीन... पण 'रामी' माणिक असं सोडणार नाही... आता माझी सून तीच... माझ्या भीमाची गृहलक्ष्मी तीच...'

‘थांब... थांब... जरा घोडं बांध... रामजी सुभेदाराला असं थांबवीत मीराबाई म्हणाली, ‘त्या मुलीला सून करुन घ्यायला एवढा का उतावळा झालायास? पण नवरा मुलगा- भीमाचा काय इच्चार घेतलायसं का? भीमा म्हणतूया आपून आजून कालीजचं शिक्षण घेणार हाय. एवढ्यात लग्नाची घाई कशाला?’

‘त्याचं म्हणणं बरोबर आहे पण आक्का, ती मुलगी एकदा आपल्या हातनं गेली तर आयुष्याला फार मोठा भाग्याचा किमती ठेवा आपण गमावल्यासारखा होईल. लग्न झालं म्हणून शिक्षण थांबत नाही. शिक्षण घेणं हे शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीच्या मनाच्या खंबीर निश्चयावर अवलंबून आहे. आपला भीमा म्हणजे — *‘खंबीर निश्चयाचा महामेरु! अखंड स्थितीचा निर्धारु’* असा आहे. या लग्नानं त्याचं काही वाकडं होणार नाही. आक्का, ही मुलगी भीमाची पत्नी म्हणून घरात आली तर तो दुप्पट उत्साहानं परीक्षा देत राहील. त्याचा विकासच होत राहील. हे माझं भविष्य आहे. जिकडं मी निघालोय ते काम यशस्वी होणारच, असं नाकपुड्याच्या श्वासोश्वासानं मला कौल दिलाय. हा मी निघालो...’

अमृतात न्हाऊन निघालेला तो मंगलदिन त्या दिवशी उदेला, रा. रा. रामजी मालोजी सकपाळ (आंबेडकर) माजी सभेदार आंबावडेकर यांचे सुपुत्र चि. भीमराव यांचा शुभविवाह रा. रा. कै. भिकाजी धोत्रे, वणंदगावकर यांची सुकन्या चि. सौ. रामी हिचेशी त्या दिवशी निश्चित झाला.

शुभस्य शिघ्रम म्हणून धावाधाव सुरु झाली. योग्य वेळी आमंत्रणे गेली. पण हे लग्न रामजी सुभेदारांच्या नातलगांना तितकंसं आवडलं नाही. ऐकलं का दोन साखरपुडं मोडून पाच रुपये दंड भरुन रामजी सुभेदार आपल्या मॅट्रिक झालेल्या हुशार मुलाचं लग्न एका अडाणी खेडवळ मुलीशी लावणार आहेत म्हणे! ऐकावं ते एक एक नवलच!

‘कुठं समाजातला पहिला मॅट्रिकवाला भीमराव आंबेडकर नि कुठे भिकू धोत्र्याची निस अडाणी आंगठेबहाद्दूरवाली रामी... जोडा शोभाया तर नगं का? कुठं इंद्राचा ऐरावत तर कुठं श्यामभटाची तट्टाणी...!’

‘नवरी मुलीचं नशीब बलवत्तर असेल हो, म्हणून तिला असला तालेवार नवरा चालून मिळाला!’

दहा तोंडे दहा रीतीनं बोलत होती. त्यावर रामजी सुभेदार एवढंच म्हणे, ‘कुत्रे भुंकतात भुंकू देत, गजराज चालतो आपल्या चालीनं...’

शुभ दिनी देवक बसलं. कुलदेवता भवानी पूजली गेली.

शुभविवाह स्थळ भायखळ्याचा बाजार निश्चित केलेलं. सायंकाळी तेथील एका छपराच्या एका कोपऱ्यात नवरी मुलीकडील वऱ्हाडी जमले. त्याच छपराच्या दुसऱ्या कोपऱ्यात नवऱ्या मुलाकडील मंडळी जमली. पायाखालील गटारातून घाण पाणी झुळूझुळू वाहत असलेलं. त्याची दुर्गंधी सर्वत्र सुटलेली. चबुतऱ्याचा उपयोग बाक म्हणून करण्यात आलेला. संबंध भायखळा बाजार प्रमुख विवाहस्थळ म्हणून वापरात आणलेला. ना भांडं ना देणं, ना काही.

मंगल वेळा भरत आली. सनई आलाप घेऊ लागली. छप्पराच्या समोर चौघडा घडघडू लागला. नवरा-नवरी विवाहस्थळी आली. प्रथम नवरी मुलीच्या चुलत्यानं-मामानं सालंकृत कन्यादान केलं. सर्व गहिवरली. जरुर तेवढेच विधी केले गेले. अनावश्यक विधींना फाटा देण्यात आला. अंतरपाट धरुन मंगलाष्टके म्हटली गेली. शेवटचं मंगलाष्टक आशिर्वादाचं, म. ज्योतीबा फुले रचित म्हटलं गेल...

“शुभ मंगल सावधाऽऽऽऽऽन...

आभारा बहु मानिजे आपुलिया माता पित्यांचे सदा।

मित्रांचे तुमच्या तसेच असती जे इष्ट त्यांचे तदा।

वृद्धां पंगुस साह्य द्या मुलीमुला विद्या तशी शीकवा।

हर्षे वृष्टी करा फुलांची अवघे टाळी अता वाजवा।।...

शुभ मंगल सावधा ऽऽऽ ऽ न"

भीमानं रामीच्या गळ्यात व रामीनं भीमाच्या गळ्यात माळ घातली. अक्षता उधळल्या. वधुवरांवर फुलांची वृष्टी केली. भीमा-रामी त्या मंगलक्षणी लग्नानं एकरुप झाली. जमलेल्या निमंत्रितांनी हर्षभरांनी टाळ्यांचा कडकडाट केला. समस्त लोकांच्या साक्षीनं भीमा-रामीचं लग्न लागलेलं... सगळीकडं आनंदी आनंद उसळलेला. शुभलग्नाच्या निमित्ताने आलेल्या पाहुणे मंडळींना गोडधोड जेवणाचं सुग्रास भोजन घातलेलं. नवऱ्या मुलाचं बंधुद्वय बाळाराम व आनंद वाढपी झालेले.

त्यानंतर गॅसबत्त्याच्या उजेडात वधु-वराची वरात थाटामाटात निघालेली. एकानं वराला, एकानं वधूला खांद्यावर घेऊन वरात निघालेली. जातीतील तालीमबाज मंडळींनी उत्स्फूर्तपणे टिपऱ्या, लेझिमचे विविध आकर्षक खेळ खेळून समस्त पाहुणे मंडळीचं मनोरंजन करुन वधु-वराच्या शुभमंगल वरातीला शोभा आणलेली. आनंदात अधिकच भर घातलेली. नवरी मुलीच्या मामानं तालीमबाज मंडळीला खुषीनं एक चांदीचा बिल्ला बहाल केला...

सकाळी भायखळा बाजारात कोळणी येण्यापूर्वीच सारं वऱ्हाड वरातीसह नवरा-नवरीसह रामजी सुभेदारांच्या घरी परतलेलं. उंबरठ्यावरील भरलेलं माप पायांनी उलथून वधू रामी... वराच्या... भीमरावाच्या घरात प्रवेश करती झाली. लगेच रामीचं सासरचं नाव 'रमा' ठेवण्यात आलं. रमाऽऽ रमाऽऽ रमाबाई!

एवढ्यात भीमरावाच्या बहिणीपैकी एक बहीण पुढं येऊन म्हणाली, 'आधी नवऱ्याचं नाव घे. मग नवऱ्याच्या घरात वावर.' असं म्हणून तिनं नवरा–नवरीला आडविलं. भीमराव हे सारं ऐकून गालांतल्या गालात हसत होता. नऊ वर्षांची बालीश रमा एकदम घाबरली. खूप लाजलीही. तिला उखाणा आठवेना. तिच्या मामीनं लगेच कानात हळूच सांगितलं. रमानं नाव घेतलं —

"सोन्याच्या कानफुलांना मोत्याचं झुबं, भीमरावांची वाट बघत सारं गाव उभं..."

'वाऽऽऽ गं ऽऽऽऽ वहिनी, भलतीच ही दिसतेय की, आमच्या बंधुराजाला येड लावणारी...'

जमलेल्या साऱ्याजणी खळाळून हसल्या. भीमरावही हसला. लग्नात सुभेदारानं - रामजीबाबानं नवरी मुलीसाठी-सुनेसाठी किंमती पातळ घेतलं होतं. ते पेहरल्यावर रामी-रमा एखाद्या परीसारखी दिसत होती.

रामजीबाबा, सासुबाई व मिरा आत्या दुसऱ्या खोलीत बसली होती. वडीलधाऱ्यांच्या पाया पडण्यासाठी वधुवर तिथं गेलीत. तिघांच्या पाया पडलीत. तिघांनीही मुक्तकंठानं आशिर्वाद दिला. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!' आणि वधुवर तिथंच त्यांच्या पायाशी बसलीत.

रामजीबाबा रमाला म्हणाले, 'रमाऽऽऽ मुली, तुझी निवड ती माझी एकट्याची निवड आहे. तुझ्या निवडीमुळं जात-काशीत मी दंड भरलाय. तुझी निवड ही माझी अती योग्य अशीच होती, हे तुझ्या वागण्यानं सिद्ध करुन साऱ्यांना तू तसं दाखवून दिलं पाहिजेस... ते पाहण्यात मी असेन-नसेन, पण रमाऽऽऽ तुझा नवरा भिमा हा माझा सगळ्यात मोलाचा ठेवा आहे. त्याच्या संबंधी माझी काही स्वप्नं आहेत. तुला मी कधीतरी निवांतपणे सांगेन. पण आज तुझ्या कोवळ्या हातात तो मोलाचा ठेवा मी सोपवीत आहे. त्याला चांगला सांभाळ... त्याला खूप वाढव. खूप खूप मोठा कर... तो मोठा महान होणार आहे... अन् ते तुझ्या हातूनच होणार आहे... हो, मी भविष्य जाणतोय. तू अजून लहान आहेस. मी काय म्हणतोय, हे आज तुला कदाचित विशेष कळणार नाही... पण हे तू करणार आहेस, तुझ्या हातूनच ते होणार आहे. मग जगाला माझ्या निवडेची थोरवी कळणार आहे. तुझं मोठेपण तेव्हाच जगाला उमगणार आहे.'

आणि एकाएकी रमा रडू लागली. साऱ्यांनाच आश्चर्य वाटलं. मिराआत्या तिला म्हणाली, 'अगं... अगं... रमाऽऽऽऽ अगं आज तुझा शुभमंगल दिस, आज असं रडायचं नसतं! हास!'

'मामंजी, आई, आत्याऽऽ मी एक आडाणी आईबापाची मुलगी हाय. मामंजी तुमी लष्करातलं सुभेदार... शिक्षाण झालेलं... शानं-सुरतं. मला कसं रहावं... वागावं कळत न्हाय. कळतं पण वळत न्हाय. तुमच्या पायापाशी बसून तुमच्याकडून मला सारंसारं शिकायचं हाय. तवा, कंदी चुकलं माकलं तर मला सांभाळून घ्या... तुमच्या लेकरापरमान... मामंजी, मला आई न्हायी. बाप न्हायी. तुमीच माझं आईबाप... आजपास्नं मामंजी न म्हणता, तुमाला बाबा म्हणावं म्हणते मी.'

'जरुर म्हण... मला ते आवडेल!'

सवाष्णींचा एक घोळका वधुवर बसली होती तिकडे हसत खिदळत आला. रामजीबाबा, भीमाई, मीराआत्या आश्चर्यानं पाहतच राहिले...

एक चेष्टेखोर सवाष्णी म्हणाली, 'नवरीनं नवऱ्याचं नाव घेऊन घर परवेश कसा केला ते आमी काय ऐकलं न्हायी. तवा नवरीनं परत नवऱ्याचं नाव घेऊन आमाला एकवावं.'

'कशाला छळता तिला... कसं घेणार ती नाव... ती अजून खूप लहान आहे,' रामजीबाबा बोललं.

'असं कसं... लगीन झालंय तिचं... ती कशी आता लहान?'

रमाची मामी पाठीवर होतीच. तिच्या कानी ती क्षणभर हळूहळू कुजबुजली. म्हणाली, 'रमाऽऽ घे गं नाव. ऐकव साऱ्यांना... टिच्चून!'

रमा लाजत लाजत बुरख्यातूनच बोलली, **'खुतणीच्या चोळीवर पुतळीचं लेणं... भीमरावांच्या जीवावर मला काय उणं...'**

सारेच मग जोरजोरानं खुदूखुदू हसू लागले. नवरा मुलगा भीमरावही खूष होऊन त्या हास्यकल्लोळात सामील झाला. सगळीकडं कसा आनंदी आनंद ओसंडून वाहू लागला.

एव्हाना पहाटे चारचा सुमार होत आलेला. वरातीबरोबर चालून फिरुन सारेच दमलेलं... जमिनीवर पडताच झोपी जाऊ लागलेले... सोळा-सतरा वर्षाचा नवरा मुलगा भीमराव आपले भाऊ-बाळाराम आनंद यांच्याजवळ जाऊन झोपला. नऊ वर्षांची अजाण नवरी रमा... आपल्या काकी-मामीबरोबर, शंकर-गौरा या भावंडांच्या गराड्यात आडवी झालेली. काकी-मामी पडल्या पडल्या आईच्या नात्यानं रमाला सासरच्या घरात कसं कसं रहावं सांगू लागल्या. 'पतीची सेवा, हा पत्नीचा धरम. पती हाच परमेश्वर... आणि पत्नी ही त्या घराची लक्ष्मी असते. पती-पत्नीत जिथं पिरीम असतं... तिथं आनंदाला तोटा नसतू बघ... या घरची तू आता झालीस. या घराची आबरु आता तुझ्या हातात. या घरची लाज तू कंदी उघडी पडू देऊ नगस. पतीशी निष्ठेनं वाग. यातच तुझ्या मामाचा आमच्या घराचा मोठेपणा हाय... तू लहान जीव... आज एवढंच पुरं. मधून मधून मी येईन... आई होऊन तुला सांगत जाईन... तुझा मामा, सुपाएवढ्या काळजाचा हाय... काय कमी पडू देणार न्हाय... सुखानं राहा...'

मामी असं बोलत असताना, रमाला आपल्या रखमाईची सारखी आठवण येत होती. हृदयात दाटून येत होतं. तरीही वरुन ती आनंदित दाखवून, हसतमुख राहत होती... ही तारेवरची कसरत होती, तरी ती करीत होती... गौरा-शंकर... भावंडांच्या अंगावरुन मायेनं सारखा हात फिरवीत राहत होती. आई-वडीलांची आठवण काढीत राहिली होती. कितीतरी वेळ...

अन् असा कधी डोळा लागला, हे तिला कळलं देखील नाही!

• • •

१२

रामजीबाबांच्या घराचा खाक्या काही निराळाच होता, ते स्वतः सुशिक्षित, धर्मशील व भजनशील होते. लष्कराच्या कडक शिस्तीचे ते भोक्ते होते. सकाळी उठून आपल्या मुलामाणसांनी देवाची प्रथम प्रार्थना करावी, नंतर मुलांनी व्यायाम करावा अशी शिस्त त्यांनी लावलेली.

त्या घरात भल्यापहाटे जाग यायची ती रामजीबाबांच्या भुपाळ्यांनी...

"ऊठ गोपालजी, जाय धेनूकडे

पाहती सवंगडी वाट तुझी...

ऊठ, पुरुषोत्तमा, वाट पाहे रमा

दाखवि मुखचंद्रमा, सकलासी..."

पुत्र आनंदराव, भीमराव तर कधीकधी त्यांची एखादी बहीणसुद्धा या सकाळच्या प्रार्थनेत सामील असायची. पण त्या सर्वांच्या अगोदर रामजीबाबांची नूतन लाडकी सून रमाबाई उठलेली असायची. ती पूजेची सर्व तयारी करीत असे. आरतीत तेल-तूप घालणे. घरासमोर अडकवलेल्या कुंड्यातील ताजी फुलं तोडून आणून, नित्य रतिबाची फुलं घेऊन ती फुलं करंडीत ठेवीत असे.

रामजीबाबा स्नान करुन देव्हाऱ्यापुढं आले की, आरतीतल्या वाती व अगरबत्ती पेटवणं तीच करीत असे. रामजीबाबांना त्यामुळं तिचं फार कौतुक वाटे. दुसरी सून लक्ष्मीबाई तिला मदतनीस म्हणून असे.

एवढ्यात आनंदराव, भीमराव खडबडून उठत असत. घाईघाईनं मुखमार्जन करुन प्रार्थनेसाठी उभे राहत असत. नित्याची प्रार्थना म्हणत.

रामजीबाबा आल्यानंतर देवाला फुले वाहून, आरती ओवाळून झाल्यानंतर ते स्वतः एखादा तुकोबा-चोखोबाचा अभंग म्हणत —

"... याती हीन मज म्हणती देवा।

न कळे करु तुमची कैसी सेवा।।

मज दूर दूर हो म्हणती।

तुज भेटू कवण्या रीती।।..."

सर्वांबरोबर रमाबाईसुद्धा भक्तीभावानं त्यात भाग घेत असे. नित्याचं झालं. प्रथम प्रथम रमाबाईला हे अवघड वाटलं, पण नंतर सरावाचं झालं. नित्याचं झालं.

कधी भीमराव, आनंदराव तर कधी भीमरावाची एखादी बहीण, तर कधी स्वतः रामजीबाबा महाभारतातील एखाद्या कथेवर वा भगवद्गीतेतील एखाद्या अध्यायावर प्रवचन करीत असत. रमाबाई अडाणी, त्यांना वाचता येत नव्हतं. त्या दुःखी होत, पण एकचित्तानं ऐकत बसत. उपास-तापास व्रत-वैकल्य करण्यात मात्र त्या सर्व घरात आघाडीवर असत. रामजीबाबांच्या घराचा नित्याचा खाक्या असा... यात खंड नाही, हयगय नाही.

लष्करी सेवेतून निवृत झाल्यापासून गावी-दापोलीला घर बांधून रहावं, असं खूप दिवसांपासून रामजीबाबांच्या मनात खूप होतं. पण त्यांना ते करता आलं नाही. केवळ पन्नास रुपये मासिक निवृत्ती-वेतनवर एवढ्या मोठ्या कुटुंबाची गुजराण त्यांना करावी लागत होती. त्यात त्यांचा आतिथ्यशील स्वभाव, दुसऱ्यासाठी झीज सोसण्याची वृत्ती व मुलांची शिक्षणं... त्यामुळं एवढ्याशा पेन्शनीत संसाराचा बोजड गाडा चालविणं त्यांना अवघड होऊन जात होतं. थोरला मुलगा बाळाराम

नोकरीस लागून वेगळं कुटूंब करुन राहात होता. त्याच्याकडून त्यांना विशेष काही मदत होत नव्हती. म्हणून त्यांनी दुसरा मुलगा आनंदराव यास नोकरीस लावलं व सर्व लक्ष भीमरावाच्या शिक्षणावर केंद्रित केलेलं. त्यामागं त्यांचं एक विशाल स्वप्न होतं.

रामजीबाबा पद्धतशीरपणे बाल व तरुण भीमरावाच्या मनावर हळूवार संस्कार करीत होते. जेव्हा संधी मिळे तेव्हा ते नित्य म्हणत, 'भीमा, तुझ्या शिक्षणासाठी मी एवढं तनमन धन, सर्वस्व समर्पून एवढा का मी झिजत आहे? एवढा का व्याकूळ आहे? ते केवळ एक पुत्रप्रेमानंच नव्हे वा वडिलांचं एक कर्तव्य म्हणूनही नव्हे, तर आमच्यांतला तू एक मोठा विद्याविभूषित व्हावास, आपल्या अस्पृश्य समाजाच्या उद्धाराचे महान कार्य तुझ्याकडून व्हावं म्हणून ही माझी सारी धडपड, तळमळ. कर्मधर्मसंयोगानं मी सुशिक्षित झाल्यानं मला हे कळत आहे. महात्मा फुले, शाहू राजे यांच्या विचारांनी मला ही दृष्टी लाभली आहे म्हणून मी धडपडतोय, तडफडतोय. आम्ही अस्पृश्य नाही, पशूही नाही, हीनही नाही, आम्हीही साऱ्यांप्रमाणंच माणसंच आहोत, हे जगाला तू तुझ्या शिक्षणानं, विद्वत्तेनं नि तुझ्या कतृत्वानं दाखवून द्यावंस. श्री रामचंद्र प्रभूला... श्री कृष्ण भगवानला जे शक्य झालं नाही ते तुझ्याकडून शक्य व्हावं म्हणून माझा जीव असा तीळतीळ तुटतोय रेऽऽ. पळपळ त्याच्यासाठी झिजतोय रेऽऽऽ. रमाऽऽऽ मुली, माझं हे स्वप्न अधुरं राहिलं तर ते तू पुरं करायचंस...'

'मामंजी, तुमच्या शब्दांत मी हाय. माझ्या पतीसाठी सारी जिंदगी उगाळून टाकीन, पण मामंजी तुमचा शब्द पुरा करीन...'

'वा! मुली! देव तुला तशी शक्ती देवो!'

रमाबाईला यातलं इंगित अजून काही समजलं नव्हतं, पण ती मामंजीला विश्वास देत होती. दिलासा देत होती.

त्या काळच्या एकंदर अंधरुढिग्रस्त बिकट समाज-परिस्थितीत हजारो वर्षे गुलामीत खिचपत पडलेल्या, आपल्या अस्पृश्य समाजाचा उद्धार करणे म्हणजे किती महाभयंकर, किती अवघड काम होतं ह्याची जाणीव रामजी सुभेदारांना निश्चितच होती. पण त्याच वेळी महाराष्ट्रातच्या काही भागात महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू राजे, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे या समाज सुधारकांचेही आपल्या परीनं अस्पृश्योद्धाराचे प्रयत्न चालूच होते. अस्पृश्य समाजात हळूहळू जागृती होऊ लागली होती. पण स्वत:च्या अस्पृश्य समाजातूनच असं एखादं प्रभावी नेतृत्व जर उदयास आलं तर अस्पृश्योद्धाराचं कार्य अधिक जोमानं, अधिक द्रुतगतीनं व आईच्या ममतेनं घडून येईल असा रामजीबाबांचा खंबीर व रास्त अंदाज होता. प्रबळ आत्मविश्वास होता. त्यांच्या जीवनातलं त्यांचं ते एक प्रमुख स्वप्न होतं. आणि ते महान जीवन-स्वप्न आपल्या सुपुत्र भीमाच्याद्वारेच शक्य करण्याचे त्यांनी मनोमन निश्चित केलं होतं. त्यासाठी ते चंदनासारखे झिजत होते. संकटांसमोर नित्य छड्डू ठोकून उभे होते.

हिंदवी स्वराज्याचं स्वप्न उराशी बाळगून आई जिजाबाईसाहेब बाल शिवाजीराजाला जसं घडवीत होते, सकल विद्येत तरबेज करीत होते, अगदी तसंच रामजीबाबासुद्धा आपलं, अस्पृश्योद्धाराचं हे महान स्वप्न उराशी धरुन, आपल्या बाल-तरुण भीमाला ते घडवीत होते; त्याला अधिकाधिक विद्याविभूषित करण्यासाठी झटत होते. जीवाचं रान करीत होते... रामजीबाबा म्हणजे भीमरावांचे गुरु व आई जिजाऊसुद्धा!

रामजीबाबांच्या घराच्या या शिस्तीच्या खाक्यात वितळल्याप्रमाणं लहान रमा आता पूर्ण एकरुप झाली होती. रामजीबाबाला ती देवाइतकंच पूज्य मानी. वडिलांच्या इतकाच आदर देई. त्यांचा शब्द म्हणजे रमाचं वेदवाक्य प्रमाणम्. ते काही असं सांगू लागले की, रमा एखाद्या विनम्र शिल्पाप्रमाणं कानात प्राण आणून ते ऐकत राही.

तिचा भीमाशी शुभ-विवाह होऊन आता बरेच दिवस झालेले. दररोज, सकाळी, कधी दुपारी तर कधी संध्याकाळी रमा पतीदेव भीमासाठी कधी चहा घेऊन, तर कधी जेवण घेऊन त्याच्या अभ्यासिकेत येई. पण डोईवर ओढून घेतलेला तिचा पदर, कधी खाली ढळला नव्हता. ढळत नव्हता. पतिदेव भीमास तिचा, पत्नीचा चेहरा बघावयास मिळतच नसे. भीमराव-रमा एकमेकांस बघत नसत. काही बोलत नसत. त्या काळी वडीलधाऱ्यांपुढं नव्या नवरा-नवरीनं बघायची-बोलायची प्रथा नव्हती.

भीमरावाला तिचा चेहरा बघावयास मिळत नसे. प्रथम प्रथम लाजेमुळं, वडीलधाऱ्यांच्यापुढं बायकोकडं कसं बघायचं, कसं बोलायचं, त्यात ते नित्य अभ्यासात व्यग्र झाल्यानं, दुर्लक्ष केलं जात होतं. पण तरुण मनाला असं किती दिवस संयमाचा लगाम घालून बसणं शक्य आहे? त्यात परीक्षा उरकली की, विद्यार्थ्याचं मन हलकं हलकं होतं, पाखरु बनतं. विद्यार्थी भीमरावाचं मन असंच पाखरु बनलं होतं.

आज त्याची बायको रमा नित्याप्रमाणे कांदेपोहे, चहा घेऊन आलेली. वडीलधारी माणसं कुठं बाहेर गेलेली. वहिनी लक्ष्मीबाई मंडईत भाजी आणायला गेलेली, घरात ही दोघंच. नवरा-बायको. दोघांना हे माहीत होतं जणू!

कांदेपोहे, चहा टेबलावर ठेवून आज का न कळे रमा धिटाईनं प्रथमच आपल्या नवऱ्यापुढं बुरखा घेऊन उभी होती... आज प्रथमच भीमराव तिच्याकडं टक लावून पाहण्याचं धाडस करीत होता. काहीतरी लिहिण्यात गर्क झालेलं पेन, रमाला पाहून प्रथमच स्तब्ध झालं होतं.

भीमराव पाहात होता... रमाची, आपल्या पत्नीचा शुभ्रवर्ण, शुभ्रसाडी व त्यावर चढवलेली तंग शुभ्रच चोळी... अत्यंत बाधेसूद... प्रमाणबद्ध बांधा... टापटिपीची वेशभूषा... पण... पण पदराच्या डोक्यावरुन ओढून घेतलेल्या बुरख्यातून तिचा मुखचंद्रमा काही त्याला स्पष्ट दिसत नव्हता. पाहता येत नव्हता.

क्षणाक्षणानं कापरासारखा वेळ उडून जात होता. असा एकांत, अशी सुवर्णसंधी पुन्हा दोघांना लाभणं अवघड होतं. संधीचा फायदा उठवण्यात भीमराव लहानपणापासून वाकबगार होता... लहानपणापासून भीमराव थोडा अधिक हूड, खोडकर व गंमत्या होता. उच्च शिक्षणाच्या संस्कारामुळं अलीकडं सज्जनपणाची पुटं त्याच्यावर चढलेली... पण रमा पत्नीच्या अस्तित्वामुळं, ती पुटं धडाधड पुसून गेली... त्याच्या आतला हूडपणा जागृत झाला... मूळ स्वभाव कुठं जाणार? भीमरावाला रमाची गंमत करण्याची हुक्की आली. म्हणाला, 'ए ऽ ऽ ए ऽ ऽ ऽ किंवडी आहेस काय? कुणाची ही पोरगी...? अन् माझ्यासमोर अशी बेधडक उभी आहेस? ए ऽ ऽ... कोण, कुणाची गं तू?'

'गळ्यात एवढं मोठं मंगळसूत्र घातलेली बाई, ही नवऱ्याची बायको असते... ती मग कुणाचीच पोरगी राहत न्हायी... बायको ही अशी वस्तू हाय की, ती केवड्याबी मोठ्या वाघासारख्या नवऱ्यापुढं अशी बेधडक उभी राहू शकते. ज्यांच्या नावानं आभाळाएवढं कुंकू लावते कपाळावर... विचारा की त्या वाघासारख्या नवऱ्याचे नाव काय ते म्हणून?'

'विचारतो. भितोय की काय तुझ्या त्या वाघोबा नवऱ्याला? का गं तुझ्या त्या नवऱ्याचं नाव?'

'ऐकायचंय?'

'म्हणजे हे काय बोलणं झालं?'

"चांदीच्या निरांजनात तुपाची फुलवात... भीमरावाचं नाव घ्यायला करते आजपासून सुरुवात..."

'अरे ऽऽ एवढं सुंदर बोलतेस... म्हणजे रुपा-चेहऱ्यानं तू सुंदरच असली पाहिजेस... हो शितावरुन भाताची परीक्षा करता येते... पण आम्हाला तुझा तो चेहरा कसा दिसणार? काय गं, तू एवढं तुझ्या नवऱ्याचं कौतुक करतेस... मग मध्येच हा बुरख्याचा पडदा त्या चेहऱ्यावर कशाला धरतेस?'

'पत्नीचा रुप-चेहरा, ही पतीची खाजगी इस्टेट हाय. कुणाबुणाची त्याला दृष्ट लागू नये म्हणून पदराच्या बुरख्याचा त्या चेहऱ्यावर असा पडदा धरावा लागतो स्त्रीला... स्त्रीची आबरु असते काचेच्या भांड्यावानी... आपल्या पतीसाठी खास राखून ठेवलेला लाखाचा खजिना!'

'अरे वाऽऽ तू लई हुश्शार दिसतेस... तत्वज्ञानाची भाषा बोलतेस...'

'मी काय एक अडाणी... ज्ञानाची काडी बी कळत न्हाय बघा मला... पण पतीवर जीवापास्नं पिरीम करायचं, त्येच्या आनंदासाठी काय बी करायची तयारी ठिवायची, एवढंच काय ती मला माहीत हाय बगा...'

‘फारच चांगली गोष्ट आहे ही... पतीच्या आनंदासाठी काय बी करायची तयारी आहे म्हणायची तुझी ?’

रमा नुसती मान डोलावत पुटपुटली, ‘व्हय... पतीच्या आनंदासाठी काय बी...’

‘मग त्या पतीच्या आनंदासाठी तेवढा चेहऱ्यावरला तो बुरखा काढून आताच्या आता ते काय बी तेवढं कर बघू ?’

हळूहळू रमा आपल्या चेहऱ्यावरील तो पदराचा बुरखा वर करु लागली.

रमाचा-आपल्या पत्नीचा तो अतिशय सुंदर चेहरा पाहून भीमराव चिकतच झाला... एवढी सुंदर आपली बायको ? भीमराव मनातल्या मनात विचार करु लागला. कितीतरी दिवस असलं झगझगतं माणिक आपल्या घरात, आपल्या भोवती वावरतंय, पण आपणाला त्याची दादही नसावी ? वेड्यासारखा भीमराव तिच्याकडे पाहत एकटक पाहत राहतो. नंतर उद्‌गारतो, ‘वाऽऽवाऽऽ खुंटून घ्यावं असं रुप!’

लाजेने रमाचे गाल लालेलाल झाले होते. कसल्यातरी भितीनं ती घामाघूम झाली होती.

‘ए पोरीऽऽ मी तुझा नवरा ना ? मग नवऱ्याला बायको इतकी का घाबरते ? इतकी का लाजते ?’

काहीतरी बोलायचे म्हणून रमा बोलली,‘तुम्ही बोलला म्हणून पहिल्यांदाच लाजेचा पडदा मी आज दूर सारला... म्हणून माझी छाती भितीनं उडतेय.’

असं म्हणून चटकन् टेबलावरील कपबशी नि कांदेपोह्याची ताटली घेऊन रमा सैंपाकघरात धावतच गेली... भीमराव कितीतरी वेळ तिकडं बघत हसत बसला होता. प्रथमच नवरा-बायकोचं असं आज जवळून बघणं, बोलणं झाल्यानं तो मनोमनी सुखावला होता. रमा मोहरली होती, फुलली होती.

त्यानंतर दोघांच्या सुदैवाने आणखी एके दिवशी रमा-भीमरावाला असाच मखमली एकांत लाभलेला...

त्या दिवशी भीमरावानं डोकं दुखीचा बहाणा केलेला. रमाही आली लगेच, पतीसाठी चहा-शिरा तयार करुन घेऊन.

रमाला आपला पतीदेव भीमराव डोकं दुखीनं अंथरुणावर पडलेला दिसला. जवळच मलमची बाटली पडलेली होती. भीमरावानं मनस्वी डोकं दुखत असल्याचं सोंग घेतलेलं. तरुण मन एकमेकांच्या स्पर्शासाठी आसुसलेली. रमाला मोठी अडचण पडलेली. आता आपला एकमेकाशी प्रत्यक्ष स्पर्श होणार. पुरुषाचा प्रथम स्पर्श. कल्पनेनं रमा घामाघूम झालेली. तरी भीमरावावर तिचं अपरंपार प्रेम होतं. धिटाई करुन तिनं विचारलं, ‘असं काय होतंय जी ?’

‘डोकं फार दुखतंय गं... घणाचे घाव बसत आहेत डोक्यात!’

‘बाई... बाई, किती वेंधळी मी... मलम लावून चोळू का कपाळ ?’

‘चोळू शकशील तू ? मग लवकर बरा होईन होऽऽ’

रमा अक्षरशः थरथर कापत होती. भीमराव ते पाहत होता. तो म्हणाला, ‘घाबरु नकोस... वहिनी... बाबा व आत्याकडं लक्ष ठेव... नाहीतर, आपलं भांडं फुटेल... मग साराच ब्रह्मघोटाळा होईल!’

रमानं वरुनच डोकावून खाली पाहिलं. कोणाची चाहूल नव्हती. लगेच तिनं जवळच पडलेली मलमाची डबी घेतली. मलम लावून भीमरावाचं कपाळ चोळू लागली. भीमराव आनंदातिशयानं म्हणाला, ‘अरेऽऽ ? आता एवढ्यात बरंही वाटू लागलं की मला... तुझ्या या मऊमऊ हातात जादू दिसतेय हं...’

‘खरंच, बरं वाटू लागलंय तुमाला ?’ रमानं आनंदानं विचारलं.

‘हो... आणखी जरा कपाळावर हात ठेव ना ? तुझ्या हाताच्या स्पर्शानं मला फार फार बरं वाटतंय गं!’

‘खरं सांगू,’ भीमराव म्हणाला.

‘म्हंजी आतापर्यंत तुमी मला खोटं सांगत हुता की काय!’

‘तसं नव्हे गं... तुझी ही कांकण मंजुळ मंजुळ रुम झुम रुम झुम... वाजू लागली की, माझ्या काळजाचा ठेकाच चुकतोय बघ. तुझी पायांतली नादमधुर जोडवी छन् छन् करुन माझ्या अवतीभोवती वाजू लागली की, ह्रदयात कसं घण् घण् होतंय बघ... मग माझं अभ्यासावरलं लक्षच उडतंय बघ.’

‘माझ्यामुळं तुमचा अभ्यास होत नसेल तर ती मोठी वंगाळ गोष्ट म्हणावी लागेल. आपलं एकमेकांवर खरं पिरीम नसावं मग... खरं पिरीम ते... जे एकमेकाला अमृतावाणी संजीवक ठरावं...’

‘अगं, उगी थट्ट केली तुझी. रमेऽऽऽ खरं सांगू? आपलं प्रेम संजीवनीच्या मात्रेप्रमाणं एकमेकांस संजीवक आहे गं... मला तू तोंड दाखवून गेलीस की, अभ्यास करायला मला दुप्पट बळ येतंय बग... प्रत्येक यशस्वी पुरुषामागं त्याची स्फुर्तीदात्री स्त्रीच असते म्हणतात... रमा, तशी तू मला... माझी स्फुर्ती तूच...’

‘अस्सं?’ रमाबाई एकदम हरकून बोलली, ‘मग मधून मधून येऊन तुमाला माझं तोंड दाखवून जाईन मी... म्हंजी तुमाला मग सारखी सारखी अभ्यासाची इच्छा व्हावी... तुमी खूप खूप मग अभ्यास करावा... तुमी खूप खूप शिकावं... जगात कुणी न्हायी शिकलं एवढं तुमी शिकावं...’

संध्याकाळ झाली. आनंदरावांची पत्नी लक्ष्मीबाई मोठ्या विचारात पडली. दिवे लागणीच्या वेळी घरात सांजवात करायला, भीमा-रमाशिवाय दुसरं कोणीच नव्हतं. वाट बघून लक्ष्मीबाई भीमरावाच्या खोलीत येऊन म्हणाली, ‘भाऊसाहेब, तुमी नि रमा मिळून आज देवापुढं सांजवात लावा. अजून मामंजी, आत्या नि त्येंनी सुदुक आलं न्हायीत... तवा, तुमी पुढं अभंग सांगायचा, तुमच्या मागून रमानं तो अभंग म्हणायचा... तंवर, मी सैपाकाचं बघते.’

रमा लटक्या रागानं म्हणाली, ‘लक्ष्मीबाई, तुमी बी माझी थट्टा करताय व्हय. मला अडाणीला काय येतंय हो, पुजेतलं अभंग म्हणायला... तुमी म्हणतच असाल तर पूजेला बसते पाहिजे तर त्येंच्याबरोबर... त्येंना येतंय सारं पूजेचं...’

‘म्हणूनच म्हणते तुमी आज जोडीनं बसा पूजा करायला’ लक्ष्मीबाई गालातल्या गालात हसत म्हणाल्या.

मनातल्या मनात रमा मात्र लाजली. संकोचली. तरी पूजेसाठी देवापुढं बसली.

भीमराव उंच स्वरात म्हणू लागला.

“शुभं करोति कल्याणं, आरोग्यं धन संपदा

शत्रु बुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोस्तु ते।।...”

रमानं पाहिलं. भीमरावाचं सारं लक्ष तिच्याकडं होतं. ती हळूच कुजबुजली, ‘अवोऽऽ प्रार्थना देवाकडं बघून म्हणा. माझ्याकडं काय बघताय.’

‘तूच मला देवतेच्या ठिकाणी दिसतेस... म्हणून तुझ्याकडं काय बघूनच प्रार्थना म्हणतोय मी —’

“नेत्री शुक्र-हिरे, शशांक वदनी, चाफेकळी नासिकी।

ओष्टी कुंदकळ्या, गुलाब अधरी, कायेवरी केतकी।

ऐशी ती लतिका (मघा) बिलगता, आनंद मनी दाटला।

स्त्री वाचून खेळ इथला, नित्य सुना वाटला।।...”

‘झालं! प्रार्थना मध्येच सोडली. कुठला तरी अभंग म्हटला!’ रमा बोलली.

‘तुझ्यावरुन, तुला प्रसन्न करण्यासाठी अभंग म्हटला,’ भीमराव म्हणाला.

‘इश्श! देवघरात हा काय चहाळटपणा... म्हणा बघू आरती —’

“घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यानं पाहीन रुप तुझे

प्रेमे अलिंगन, आनंदे पुजिन। भावे ओवाळीन, म्हणे भिमा।।”

‘काही तरीच काही बरळू नगा हो असं... पूजेकडं थोडं लक्ष असू द्या... तुमची आरती पार चुकली... आटपा,’ रमा रागारागानं बोलली.

भीमरावांनी फुलकरंडीतील फुलं घेण्याचं निमित्त करुन रमाचाच हात हातात धरला. रमा बोलली,‘काय येडबिड लागलंय की काय, साहेब तुमाला? सोडा बघू माझा हात... लक्ष्मीबाई हायीत... पाहिलं तर काय म्हणतील? घंटा वाजवा... पूजा संपवा. चला उठा. अभ्यासाला लागा!... बायकोच्या मागं असं सारखं गुलूगुलू करणं बरं न्हायी...’

त्यावर भीमराव रमाला म्हणाला, ‘शोभतीस खरी रामजी सुभेदाराची सून... चला उठा... अभ्यासाला लागा... तोच रामजी सुभेदाराचा आवाज... तीच बोलण्याची ढब... तीच लकब! हे ठीक... ठीक.’

आणि दोघंही एकमेकांकडे पाहून खळाळून हसू लागली. ते हास्य ऐकून सैपाक घरात बसून लक्ष्मीबाईही हसू लागल्या. आनंदून गेल्या.

त्या वेळी ‘धरेवर स्वर्ग जणू पातला’ असंच क्षणभर विद्यार्थी भीमरावाला वाटलं असावं आणि तो आनंदानं गुणगुणू लागला, ‘धरेवर स्वर्ग जणू पाऽऽतऽऽलाऽऽ!’

• • •

१३

ऋतुचक्र नित्याप्रमाणं चालूच होतं... वसंत ऋतूत कळी बहराला येते. कळीची पाकळी न् पाकळी उमलून येते. पान न् पान मोहरुन जातं. परिमळून निघतं...

हळूहळू कळीचं फुलात रुपांतर होतं. सुरवंटाचं फुलपाखरु होतं. रमाच्या जीवनात असा बदल होऊ पाहत होता. बाल्यातून ती आता तारुण्यात प्रवेश करु पाहत होती.

रमा वयात येत होती. पूर्ण फूल होत होती. तिच्या नवतीचा बहर आंगोपांगी भरुन ओसंडून जात होता. तिचे आधीच सुंदर डोळे, आता अधिकच पाणीदार दिसत होते. तिचं चाफेकळी नाक आता अधिकच धारदार दिसत होते. आधीच तिचं गुलाबी अंग, आता सर्वांगावर नवी तारुण्याची तजेलदार झळाळी पसरलेली... कधी कधी रमा आरशासमोर येऊन आपलंच सौंदर्य न्याहाळू लागकी की, तिलाच वाटे आपलीच नजर लागेल... आपल्याच या देखण्या रुपड्याला...

रामजीबाबांच्या घरात काहीतरी विशेष अशी धुमधाम चालली होती. नित्य अभ्यासात वा वाचनात गर्क भीमरावाला याचा काहीच अर्थबोध होत नव्हता. तेवढ्यात त्याच्या खोलीतून रमा चाललेली त्या दिसली. भीमरावानं तिला टोकलं, ‘ए ऽ ऽ रमे ऽ ऽ इकडं ये बघू?’

‘बोला ऽऽ आ ऽऽ ली ऽऽ’

‘तू कालच्यापेक्षा आज अधिकच सुंदर दिसतेस.’

रमाला आज आतून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. तरी वरुन तसं न दाखवता, लाजत लाजत ती उत्तर देत होती.

एवढं मोजकं बोलून रमा झटक्यात निघाली. तिला अडवीत भीमराव बोलला, 'एऽऽ ऐऽऽ रमेऽऽ अशी काय करतेस ? माझं जरा ऐक... मी नवरा आहे तुझा...'

'ते सारं जग जाणतंय. पुढं बोला. झटपट बोला.'

'अगं, कशाची चालली, घरी आज एवढी झटपट... खटपट ?'

'म्हंजी ? राजाला दिवाळी माहीतच न्हायी ? अवोऽऽ, आज आपली दोघांची... वटी भरणी हाय...'

तसं भीमरावाला ओटी भरणी का आहे हे कळलं. पण त्याची विनोदवृत्ती उचळंबून आली. शब्दाला पाणी पाजत त्यानं रमालाच विचारलं, 'ओटी भरणी ? म्हणजे ? हे काय प्रकरण ?'

'अवोऽऽ मला काय ठावं ते ? मामंजी सकाळीच कुठं त्यासाठी मकर मिळतंय का बगायला गेलेत.'

'त्यासाठी मकर ? म्हणजे ? काय चाललंय हे ?'

'जग रहाटी परमानं चाललंय...'

'बस्स... बस्स... मी पुरता बंदीवान झालो, त्या मकराच्या कारागृहात... आता तुझ्याबरोबर माझी जन्मठेप...'

बराच वेळ रमा केवळ एकटक पाहतच राहिली. नंतर ती कळवळून बोलली. 'ही जन्मठेप तुमाला का म्हणून ? का म्हणून ?'

आणि खरोखरच मग रमा न राहवून, रडू लागली... हां हां म्हणता ओक्साबोक्शी रडू लागली... हुंदके देऊन रडू लागली.

भीमराव आश्चर्यानं ते सारं पाहत राहिला. ऐकत राहिला.

'ही जल्मठेप तुमाला का म्हणून ? तुमची ही जल्मठेप मी भोगणार... तुमी असं मोकळं रहा... तुमी बंदीवान का हुता ? तुमची जल्मठेप मी भोगणार... माझ्यामुळे तुमाला का जल्मठेप ? जल्मठेप मी भोगणार... तुमच्या सुखासाठी मी परान देईन... तुमाला दु:ख झाल्याचं मला न्हाय सहन हुनार... न्हाय सहन हुनार...'

असं म्हणून आक्रंदून, दु:खातिरेकानं रमा रडत रडतच भीमरावाच्या खोलीतून तडकाफडकी बाहेर पडली...

भीमराव आश्चर्यचकीत होऊन पाहतच राहिला. हळू आवाजात बोलला, 'रमे ऽऽ ये ऽऽ येडपट... विनोद तुला कंदी कळायचाच नाही... ये ऽऽ येडपट...!'

आणि भीमराव स्वत:शीच पुटपुटला, आज रमीची समजूत काढलीस पाहिजे...

- भीमराव संधीची वाट पाहत बसला... रमाच्या पातळीवर... दबा धरुन...

पोयबावाडीच्या इंप्रुव्हमेंट चाळ नंबर एक मधील दुसऱ्या मजल्यावरील समोरा समोरील पन्नास व एकावन्न क्रमांकाच्या खोल्यांमध्ये सारं आंबेडकर कुटूंब राहत होतं. खोली क्रमांक पन्नास मध्ये विद्यार्थी भीमराव आंबेडकर अभ्यास करीत असत व खोली क्रमांक एकावन्नमध्ये स्वयंपाकघर होतं. तिथं साऱ्यांचा वावर असे.

स्वयंपाकघरातून तांब्या पाण्यानं भरुन घेऊन, सोबत पेला घेऊन रमानं आज रात्री प्रथमच भीमरावाच्या अभ्यासिकेत धडधडत्या अंत:करणानं प्रवेश केलेला. स्टूलवर पाण्याचा तांब्या, दुधाचा पेला ठेवून, तिथंच रमा लाजून चूर

होऊन उभी राहिलेली. भीमरावानी तिला जवळ बोलावलं. भीत भीत हळूच सरकत रमा त्याच्याजवळ गेली. जवळच थबकली. परत खूप लाजली. लालेलाल झाली. परत पुढील हुकमाची ती वाट पाहत राहिली. भीमरावाचा हुकूम झाला.

'अशी उभी का? बस ना जवळ. काल लग्न झालेल्या नव्या नवरीसारखी करतेस अशी... अगं तसं आपलं किती लहानपणी लग्न झालंय... त्यानंतर कितीतरी दिवस आपण एकत्र राहिलोय. वाढलोय... अन् मग अशी लाजतेस?'

त्यावर रमा नुसती गालांतल्या गालात हसली. किती गोड हसली. आतापर्यंत अनेक वेळा त्यानं तिला पाहिलेली, पण आजच्या इतकी सुंदर ती त्याला कधीच दिसली नव्हती.

समईच्या मंद उजेडात रमाच्या डोळ्यात भीमरावाला चांदणं पडलेलं दिसलं... त्या ब्रह्मानंदात कधी उजाडलं, हे त्या दोघांना कळलं देखील नाही. सकाळ झाली. सगळीकडं उजाडलं. गिरीणीचे भोंगे घोंगावू लागले. कामगार शर्यतीच्या घोड्याप्रमाणं गिरणीच्या फाटकाच्या दिशेनं ऊर फुटेस्तो धावत होते. रमापत्नी भल्या पहाटे उठलेली. स्नान करुन शुचिभूर्त झालेली. नित्याप्रमाणं रामजी सुभेदाराच्या सकाळच्या पूजेची सारी तिनं तयारी करुन ठेवलेली.

पण तिचा पती भीमराव त्याच्या अभ्यासिकेत अजून डाराडूर झोपलेला. रमानं त्याला उठविण्यासाठी खूप टूरटूर करुन पाहिली, पण ढम नाही. डाराडूर. रामजीबाबांनी व आनंदरावांनी यथासांग पूजा आटोपली. रमाची साथ होती.

एव्हाना दिवस कासराभर वर आलेला. लक्ष्मीबाई व रमाबाई स्वयंपाकघरात तांदूळ निवडीत बसलेल्या. स्टुलावर शिऱ्याची बशी तशीच पडलेली. लक्ष्मीबाई म्हणाली, 'रमा... भिमूभाऊसाहेबांनी शिरा न्हायी खाल्ला आज. तसाच परत केलाय. तू खाऊन घे. मला बशी धुवायला दे...'

'लक्ष्मीबाई, मला जेवायचं न्हाय!'

'का? उपास धरलाय? काय झालंय गं?'

'माझं मंगळसूत्र तुटलंय वो ऽऽ... ते ओवून परत गळ्यात बांधेपरयंत कसं जेवायचं सवाष्णीनं? गाठवून आणलं पाहिजी...'

'समजलं... कसं,' लक्ष्मीबाई हसू लागल्या.

रमा खूप लाजली. खाली मान घालत हसत राहिली. लक्ष्मीबाई खोचून बोललीच, 'रमाऽऽ कुठं गं शिकलीस ही कला?'

'तुमाजवळ... थोरल्या जाऊबाईंच्यावळ...'

'म्हंजी... माझंच दात... माझ्याच घशात?'

आणि दोघीही मग खळाळून हसल्या.

रमा कृतज्ञतापूर्वक बोलली, 'कंदी कंदी वाटतं, लक्ष्मीबाई खरंच मी किती होऽऽ मोठी भाग्याची. माझी कसली लायकी नसताना, देवानं मला एवढा मोळा जल्माचा जोडीदार-पती दिला. मी अडाणी अशी दगूड... अन् ते शहाण्याचं मेरु परवत. आपलं हातबी पोचत न्हायी तिथं. पण एवढ्या मोठ्या मेरु परवताची मी धनीनं झालीय. मामंजीनं माझं पुण्यं बांधून घेतलं... म्हणून हे घडलं... माझं आई-वडील कंदी कंदी म्हणायचं... रामी म्हंजी भाग्याची भागिरथी हाय... वडील भागिरथी म्हणून मला बोलावयाचं... ते पटतंय मला... तुमच्यासारखी जाऊ... वडील बहीण मला मिळाली... तुमची अपरंपार माया मी जलमभर इसरणार न्हायी...' रमाचं डोळं टचकन् पाणावलं.

'राहू दे... राहू दे... मला हरभऱ्याच्या झाडावर अशी चढवून नगंस... भिमू भाऊसाहेबांच्या चहाची वेळ झालीया. आदण ठेवा... चहा देऊन ये... न्हाय तर रागवतील.'

‘त्येंनी... तुमचं भिमु भाऊसाहेब... कसं फणसासारखं हायीत बगा. फणसाला वरुन कसं काटं दिसतात... पण आत...त्येंच्या हुर्धात.. अमृताचं गरं हायीत... गोड गोड गरं... अमृताहून गोड...’

‘वा... ग... वाऽ नवऱ्याची तरफदारी करत्येस की... चहा घेऊन जा बघू. मोठमोठ्यानं कवीता म्हणत हायेत म्हंजी... ही चहाची सूचना...’

कॉलेजकुमार भीमराव आंबेडकर आपल्या अभ्यासिकेत टेबलाचा तबला करुन ठेका धरुन एक कविता मोठमोठ्यानं म्हणत होता,

“हा न्याय असे जगताचा... अहोऽऽ हा

न्याय असे जगताचा।।धृ।।

रात्रंदिन ज्यांनी भ्यावे

पदतळी चुरडूनि जावे

त्यांच्याच कपाळी यावे

उन्मत करुनि अन्याय, उरावरी खुशाल नाचायाचा।।१।।

मेंढरे, वासरे, गाई

कुणि त्राता ज्यांना नाही

कापिती अशांस कसाई

जंगलात घुसूनी परी कुणि उतरीना नक्षा वनराजाचा।।२।।”

रमा चहा घेऊन अभ्यासिकेत आली. तिथं साहेबांच्या टेबलावर चहा ठेवून घाईघाईनं निघाली. भीमरावाला तिला काही सांगायचं होतं. त्यानं तिला जोरात हाक घातली, ‘एऽऽ एऽऽ रमाऽऽ एऽऽ रमूऽऽ रमेश्वरीऽऽ’

‘हेऽऽ हेऽऽ हेऽ ऽ काय हेऽ ऽ ? एवढं मोठ्यानं बायकोचं कुणी असं बहुमानानं हाक मारत्यत व्हय ?’

‘गेली दोन वर्षे तुला ‘रमा’ च म्हणतोय मी.’

‘तवाची गोष्ट निराळी... आता आपून नवरा-बायकू म्हणून झालोय... मला यापुढं तुमी रमी म्हणून हाक मारत चला...’

‘का बुवा ? चांगलं नाव घेताना ऐकलं, तर कुणाचे कान बहिरे होतात काय ?’

‘तस्सं नव्हं जी... नवऱ्यानं बायकूला असंच एकेरी नावानं बोलावयाचं असतं... शेजारच्या सिताचा नवरा तिला सिती म्हणून बोलावतोय... पलीकडच्या राधाचा नवरा तिला राधी म्हणून हाक घालतो... तुम्ही मला रमाऽऽ रमूऽऽ असं बामनावानी हाक घालू लागला तर, चाळीतल्या साऱ्या बाया म्हणतील, रमाचा नवरा अक्षी बाईलवेडा हाय. बायकोला आवोजावो म्हणतुया!’

‘म्हणजे ? बायकोला उठता बसता लाथ नि बुक्की घातली पाहिजे म्हण की...’

‘अगदी माझ्या मनातलं बोलला. अवोऽऽ पायातली चेप्पली पायातच बरी. ती डोक्यावर घेतली तर लोक हसणार न्हायीत का, ते बघून? मग चाळीतल्या बाया म्हणतील, रमाचा नवरा बामनावानी लई शामळू हाय. तसं तुमाला कुणी म्हटल्याचं मला न्हायी हं खपणार... मग म्हणा बघू मला एऽऽ रमीऽऽ रमीऽऽ’

‘हे बघ... मी कडक मनुष्य आहे... लोकांच्या ओंजळीनं पाणी पिणारा मी नाही ... मी म्हणेन तीच पूर्व... असा मी आहे... यापुढं मी तुला रमी म्हणणार नाही. रमा म्हणणार नाहीच, रमेश्वरी तर नाहीच नाही म्हणणार... तुला मी आजपासून ‘रामू’ म्हणणार. रामूऽऽ राऽऽमू ऽऽ राऽऽ मूऽऽ!’

‘म्हंजी?’ रमानं आश्चर्य करीत विचारलं.

‘म्हणजे... रा ऽऽ मूऽऽ ही हाक ऐकूनच साऱ्या बायांची मग चांगलीच दातखिळी बसेल... त्यांची बोलती बंद होईल... कसं राऽऽमूऽऽ’

“.... झालो घावाविण घायाळ

टाहो फोडे दिलाचा कोयाळ...”

‘राऽऽ मू ऽऽ राऽऽ मूऽऽ... आवडलं तुला मी ठेवलेलं हे नाव? राऽऽमूऽऽ’

‘इश्श!’ असा लाडीक उद्‌गार काढून रमा दिलखुलास हसत स्वयंपाकघरात धूम पळाली.

स्वयंपाकघरात मामाकडून आलेली तिची शंकर व गौरा ही भावंडं तिला तिथं दिसली. ती एकदम आनंदून म्हणाली, ‘अरे, तुमी कधी आलात?’

‘आत्ताच!’ लहान बहीण गौरा उत्तरली.

‘मामा-मामी कशी हायीत?’

‘ठीक हायेत!’ तिचा लहान भाऊ शंकर बोलला, ‘मामानं ही तुला फळं दिली हायते... मामीनं तुझ्यासाठी बोंबिलाची चटणी करुन दिलीय... आन् हा चोळीचा खण...’

ते सारं पाहून रमाच्या डोळ्यांत टचकन् पाणी आलं. म्हणाली, ‘आमची ती मामा-मामी नव्हंत... आपली ती आईबाप हायीत... किती करतील आमच्यासाठी-’

भावंडांना मायेने हृदयाशी धरुन रमा मग अश्रू ढाळू लागली. तेवढ्यात रामजीबाबा अचानक बाहेरुन आले. रमा आपल्या भावंडांना जवळ घेऊन अश्रू ढाळत असलेली त्यांना दिसली. त्यांनी विचारलं, ‘रमा, मुली तू का रडतेस? काय झालं?’

घाईघाईनं पदराने डोळे पुशीत रमा उत्तरली, ‘कुठं कुठं रडयेय?’

‘पण डोळे पाण्याने भरलेत ते कसं लपणार? समजलो... रमा, तू या घरची आता मालकीण आहेस... तुझी दोन भावंडं आमाला जड नाहीत होऽऽ होणार. इथंच राहू दे त्यांना... सात भावांत एक तीळ वाटून खाल्ला... तसं प्रेमानं जगू... भावंडं लहान आहेत... स्वतःच्या पायावर ती उभीराहीपर्यंत, तु तुझ्याजवळ त्यांना ठेवून घे... थोरली बहीण आईसमान असते... तू त्यांची आई हो... त्यांच्यावर मायेची पाखर घाल.’

‘मामंजी, तुमी देव आहात... कसं होऊ उतराई? तुमच्यामुळं... वळचणीचं पाणी आढ्याला गेलं...’

'तसं काही नाही हं मुली! तू हिणकस नाही. शंभर नंबरी सोनं आहेस. तुझी योग्यता आहेच तेवढी, म्हणून तुला मी भीमासाठी निवडली... भीमाच्या योग्यतेची आहेस... तुझ्या मनातून हे काढून टाक...'

रामजीबाबांच्या अशा एकेक बोलाने संसाराच्या जिव्हाळ्याची एकेक चंद्रज्योत उजळत होती रमाच्या नथवर मनात. अशानं द्विगुणीत होत होतं, रमाची कुटुंबावरील माया, पतीवरील प्रेम... मामंजीवरील भक्तीभाव... ज्यांच्या घरची लक्ष्मी अशी संतुष्ट आहे, तिथं सुखासमाधानाला काय तोटा?

— रात्री सर्वांची जेवणं नि निजानीज झाल्यावर पाण्याचा तांब्या भरुन घेऊन, रमा पतिदेवाच्या अभ्यासिकेत चोरपावलानं येत होती... भीमराव तोवर अभ्यासात मग्न असे. आज भीमरावानं रमा आत येताच, त्यांची जवळीची सुरती रुपयांची एक पुरचुंडी तिच्यापुढं टाकली. ते पाहून रमाचे डोळे आश्चर्याने विस्फारले.

'साहेब, एवढं कशाचं हो हे पैसे?'

'माझ्या स्कॉलरशिपचे. स्कॉलरशिप म्हणजे माझ्यासारख्या शिकाऊ विद्यार्थ्याला शिक्षणासाठी सरकारातून देण्यात येणारी मदत... मला ही मदत बडोदा सरकार-श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्याकडून मिळते... तुला माहीत असेलच, कॉलेजातली दोन वर्षे मी कशीतरी रखडत काढली. बी. ए. च्या वर्गात मी आलो. शिक्षण वाढलं. तुझ्या मामंजींना तो खर्च वाहणं, डोईजड होऊ लागलेलं... गुरुवर्य केळूसकर म्हणून तुझ्या मामंजीचा एक खास मित्र आहे... त्यानं बडोदा सरकारकडून ही स्कॉलरशिप मिळवून दिली. गुरुवर्य केळूसकर यांचं नाव तू लक्षात ठेव... कधी इकडे आले तर तुझी ओळख करुन देईन हं... ग्रेट माणूस! मागील जन्मीचे लागेबांधे असावेत... म्हणून एवढं प्रेम... जिव्हाळा... मदतीसाठी धावून येणं...'

'साहेब... लई लई आनंद झालाय बघा मला... वेळेवर मदत झाली की, त्या मदतीचं सोनं हुतंया म्हनं.'

'तुला सोनं मिळालं?'

'व्हय... सोन्याची रास मिळालीय?'

'म्हणजे?'

रमा त्यावर नुसती हसली नि लाजत बोलली, 'साहेब... साहेब, कसं सांगू हो ऽऽ तुमाला... मला बाई लई लाज वाटते...'

'झालं! सोन्याची रास तुला मिळालीय म्हणतेस नि वर हे?'

'साहेब, मला... मला दिस गेलेत!'

'काय काय... दिस गेलेत? म्हणजे?'

'म्हणजे... लवकरच मी नि तुमी... आई नि बाप हुनार हाय.'

'काय म्हणतेस काय तू?'

रमा परत गालात हसली नि गोड गोड लाजली. भीमरावच बोलला, 'ओ ऽऽ हो ऽऽ आपण खलास झालो... रा ऽऽ मू ऽऽ, तू... तू... फार फार घाई केलीस बघ.'

'म्हंजी? मीच घाई केली? तुमी काय केलं न्हायी वाटतं?...'

भीमा रमाचं दिवस असं आनंदानं भरुन जात होतं...

एक दिवस बी. ए. चा रिझल्ट लागला. भीमराव त्यात चांगल्या गुणांनी पास झाला...

सगळीकडं त्यामुळं आनंदी आनंद चालला असतानाच, भीमरावाला पुत्ररत्नाचा लाभ झाला... दुधात साखर पडली. चांदण्याला सुगंध आला... आनंदी आनंद झाला.

आजोबा रामजीबाबांचा आनंद गगनात मावेना. ते आनंदून म्हणाले, 'मुलाचं नाव 'यशवंत' ठेवायचं यशवंत... वडिलांना त्याने यशवंत केले...'

— आणि १९१२ साली कॉलेजकुमार भीमराव आंबेडकर एल्फिन्स्टन महाविद्यालयातून बी. ए. परीक्षेत उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. अस्पृश्य समाजातून ग्रज्युएट होणारा हा पहिलाच कॉलेज विद्यार्थी म्हणावा लागेल. साऱ्या मुंबईतल्या अस्पृश्यांना आपल्यांतला एक विद्यार्थी बी. ए. झाला म्हणून कोण आनंद झालेला. त्यांना अभिमानानं आकाश ठेंगणं झालेलं. समाजाच्या चाळीचाळीतून, गल्ली-गल्लीतून भीमराव आंबेडकरांच्या सत्काराच्या सभा घडू लागल्या. रामजीबाबांच्या प्रयत्नाचं सर्वत्र कौतुक होऊ लागलं. सभेच्या शेवटी प्रत्येक वक्ता हेच कळकळीनं बजावून सांगू लागलेला, रामजी सुभेदारसाहेब काही वाटेल ते करा, पण भीमरावांना अजून पुढील शिक्षण द्या... समाजाचं नाव ललामभूत करा... साऱ्या अस्पृश्य समाजाचा उद्धार घडवून आणा... सारा समाज तुमचं हे ऋण 'यावश्चंद्र दिवाकरो' विसरणार नाही...'

अन् त्यावर टाळ्यांचा एकच कडकडाट होई... रामजीबाबांच्याही पोटात आनंद मावेनसा होई... निश्चयाला त्यांच्या अधिकाधिक बळकटी येऊ लागली... भीमाला खूप खूप शिकवायचं असं त्यांनी आपल्या जीवनाचं अंतीम ध्येयं ठरवून टाकलेलं...

असे सत्कार, अशा सभा, अशी ध्येयं होत असतानाच, भीमरावांनी वडिलांना सांगितलं, 'बाबा मला एक आनंदाची बातमी सांगायची.'

'आनंदाची बातमी ?'

'हा... मला बडोदे संस्थानात चांगल्या हुद्याची सरकारी नोकरी मिळते आहे!'

'नोकरी ? तू करणार ?'

'हां... आपल्या घरची एकंदर परिस्थिती पहता, नोकरी करणं मला अत्यंत जरुर आहे असं वाटतं बाबा.'

'नाही... ते शक्य नाही... अन् आता ते योग्यही नाही. केवळ बी. ए. पास होणं म्हणजे जिवनातलं सारं मिळवलं असं नाही... तुझ्या सत्कार समारंभातून तुला कळलं असेल की, आपल्या अस्पृश्य समाजाला तुझ्याबद्दल काय वाटतं ते? तुझ्याबद्दलच्या त्यांच्या अपेक्षा काय आहेत त्या ?'

'पण बाबा... त्यासाठी प्रथम आपण जगलं तर पाहिजे!'

'भिमा, तुझ्याकडून अशा उत्तराची मी कधी अपेक्षा केली नव्हती... जगण्यासाठी माझी पेन्शन आहे. आनंदही आता नोकरीला लागला आहे.'

'तरीही आपली आर्थिक स्थिती चांगली आहे, असं म्हणता नाही येणार! चूल बंद तर अक्कल बंद' - भीमराव तुटक बोलले.

'भीमाऽऽ कधीरे आपली चूल बंद होती ? आपलं घर चांगलं आहे. पुढंही असंच चालेल... कोंड्याचा मांडा करुन जगायचं आपल्याला माहीत आहे. हेही दिवस जातील... तू अशी डोक्यात राख घालून घेऊ नकोस... ये थमा माम् प्रपद्यन्ते, तानस्तथैव भज्याम्यहम्...ज्याला अनन्यसाधारण व्हायचं आहे, त्यानं असं सामान्यासारखं वागून ते कसं जमेल ?...'

रामजीबाबांची व भीमरावांची बाचाबाच चाललेली ऐकून आनंदराव व रमाबाई दोघंही हळूच भीमरावांच्या अभ्यासिकेच्या दारात येऊन ऐकत राहिले. रामजीबाबा खालच्या स्वरात समजुतीने भीमाला सांगत होते...

‘तुझ्या शिक्षणाबाबतीत माझ्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. तू एम. ए. पीएच. डी. बॅरिस्टर व्हावंस, आपल्या घराण्याचा तू दीप व्हावास, आपल्या अस्पृश्य समाजाचा तू महान उद्धारक व्हावास, विद्याविभूषित होऊन जगात तू दिगंत किर्ती मिळवावीस... असं तुझ्याविषयीचं माझं एक स्वप्न आहे... आपली ओढग्रस्त स्थिती आहे... आपली स्थिती असतेच कधी चांगली...? आपण दु:खातच जन्मतो, दु:खानंच मरतो... पण एकदा का नोकरीच्या मोहपाशात तू गुरफटलास की कायमचा संपून जाशील. ‘थांबला तो संपला’ असं तुझं होईल... नि मग तुझ्यासाठी तुझ्या शिक्षणासाठी मी केलेली एवढी तपश्चर्या, मेहनत व श्रम सारं धुळीला मिळेल...’

‘असं होणार नाही... नोकरीच्या फंदात मी कायमचा अडकून पडणार नाही... केवळ काही दिवसांसाठी...’

‘केवळ औषधासाठी म्हणून घेतलेली दारु, पुढं कायमचं व्यसन होऊन बसणार नाही, याची कोण गॅरंटी देईल?’

‘बाबा ऽऽ तुमची शप्पथ घेऊन सांगतो, नोकरीच्या फंदात मी कायमचा गुंतून पडणार नाही... तुमची ही तपश्चर्या, तुमची मेहनत व श्रम, तुमचं माझ्याविषयीचं स्वप्न मी कधी धुळीला मिळू देणार नाही... केवळ काही दिवसांसाठी नोकरी करु द्या...’

रमाबाईला पतीदेवांचा हा हट्ट आवडला नाही. त्या मध्ये पडून बोलल्या, ‘अवो ऽऽ मामांजीचं थोडं ऐका...’

रमाबाई अगांतुकपणे मध्ये पडल्याने भीमरावांचा रागाचा पारा थोडा वर चढला. बोलले, ‘मला तू शहाणपण शिकवू नकोस. ऐकावे जनाचे करावे मनाचे.’ असे म्हणून भीमराव रागारागाने बाहेर पडू लागले.

रामजीबाबा लगेच म्हणाले, ‘रमाऽ ऽ तू बोलू नकोस... होऊ दे त्याच्या मनाप्रमाणं... होऊ दे... जाऊ दे त्याला बडोद्याला... जाऊ दे... पण तुला रागवायला नको होतं त्यानं.’

रामजीबाबा रागानं लाल होऊन बोलत होते. रागाने त्यांचे सर्वांग थरथर कापत होते आणि ते खाली कोसळणार तोच आनंदरावांनी त्यांना सावरलं. त्यांना त्यांच्या बिछान्यावर आणून ठेवलं. तरी रामजीबाबा रागानं बडडत होतेच, ‘व्यर्थ व्यर्थ, मी एवढे श्रम करुन अखेर व्यर्थ!’

‘बाबा ऽ ऽ शांत पडून रहा बघू. भिमा तुमचे श्रम कधी वाया जाऊ देणार नाही. मला खात्री आहे. रमा, बाबांना चहा घेऊन ये बघू. बाबा, हे विचार डोक्यातून काढा. शांत पडून राहा. तो काय करतोय ते बघत राहा.’

एवढं होऊनही, अखेर भीमराव आंबेडकर बडोद्याच्या सरकारी नोकरीवर हजर राहण्यासाठी तिकडे निघून गेलेच. रामजीबाबांना ते फार लागलं. त्यांनी अंथरुणच धरलं. रमाबाईंच्या तोंडचं पाणी पळालं.

भीमराव बडोद्याला जाऊन पंधरवडासुद्धा झाला नाही तोच - ‘बाबा अत्यंत आजारी. ताबडतोब निघ...’ अशी तातडीची तार त्यांच्या हातात पडली. वाचून ते घाबरले. सटपटले. क्षणभर त्यांना वाटलं, माझ्या या नोकरी करण्याच्या वेडामुळे तर त्यांना धक्का बसला नसेल? अन् मग ते खूपच घाबरले, त्यांनी ठरवलं. आता ताबडतोब घरी जायचं, बाबांची समजूत घालायची, त्यांना परोपरीनं समजावून सांगायचं —

‘बाबा, माझ्या पुढील शिक्षणाची तुम्ही एवढी कशाला आता काळजी करता? मी आता ग्रॅज्युएट झालोय. नोकरी करता करता आता मला पुढील अभ्यास करता येणं शक्य झालंय... ती तुमचा लाडका पुत्र आहे, निग्रही शिष्य आहे... माझ्या कर्तव्यात मी कसलीही कसूर करणार नाही... बाबा, तुम्ही आता खूप थकलात. सुखानं विश्रांती घेण्याचं वय... तुमच्या लाडक्या भिमाच्या कमाईचं चार घास आनंदानं खाऊन, आता सुखानं राहा. बाबा, तुमची शपथ... मी खूप विद्याविभूषित होईन होऽऽऽ आपल्या समाजाच्या उद्धारासाठी माझ्या शरीरातील रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी झुंजत राहीन. झगडत राहीन. हा अरेऽऽ! आपण किती चुकलो! त्या गरीब रमावर, आपल्या रामूवर आपण उगीचच रागावलो! बाबांना ते आवडलं नाही... सारं चुकलंय आपलं...’

धावतच भीमराव मुंबईकडे निघाले –

रामजीबाबांचं डोळं भीमरावांच्या येण्याकडं लागलेलं. रामजीबाबांचे पाय चेपीत बसलेल्या रमाबाईंच्या डोळ्यांतून सारखी आसवं गळत होती... रामजीबाबांच्या पायावर सांडत होती. गालावरुन ओघळणारी आसवं पुसायचंही तिला भान नव्हतं.

पायाला काय ओलं लागतंय म्हणून रामजीबाबांनी डोळे उघडले. लाडकी सून रमाबाई रडत असलेली त्यांना दिसली. ते कळवळले, मोठ्या कष्टानं पण हळूहळू ते बोलू लागले...

'रमा ऽ ऽ बाळ, तू अशी रडू नकोस गं. तू रडू लागली की, मग मी सुखानं मरणार नाही बघ...'

'मा ऽ ऽ मं ऽ ऽ जी!' रमाबाईनं हंबरडा फोडला.

'तू अशी रडू नकोस, हास... माझी आता सारी मदार केवळ तुझ्यावर आहे... तूच आता भिवास शिकवणारी, वाढवणारी, मोठी करणारी... तीच अशी मुळूमुळू रडू लागली तर... काळीज फाडून जातंय... रमा ऽऽ मी आता काही जगत नाही बघ...'

'मा ऽ ऽ मं ऽ ऽ जी... मामंजी, असं काळजाच्या चिंध्या चिंध्या करणारं बोलू नका वो ऽ ऽ ऽ मामंजी तुमी काय कर म्हणाल ते करीन, तुमचं सपान मी खरं करीन... पण तुमी असं बोलू नगा वो ऽ ऽ ऽ तुमी अजून आमच्यासाठी जगाया पाहिजी, अजून आमी लहान आहोत...'

रामजीबाबा आता शेवटची घटका मोजीत होते. डोळ्यांत प्राण आणून ते आपल्या लाडक्या मुलाची, भीमरावांची वाट पाहात होते.

'भिमा आला का?' म्हणून रातभर ते सारखे मधूनमधून विचारीत होते. 'भिमा, अजून का आला नसावा? तार पाठवूनही आला नाही? मी रागाने बोललो म्हणून माझ्यावर रागावला की काय? मग कसा आला नाही? अजून आला नाही?'

'बाबा, भिमा येणार म्हणजे येणार. तुम्ही शांत पडून रहा. डॉक्टरांनी सांगितलंय.' कधी आनंदराव तर कधी थोरले चिरंजीव बाळाराम वडीलांना बजावून शांत करीत.

मिळेल त्या गाडीत बसून भीमराव मुंबईला आले. ट्रॅम करुन घरी आले नि धावतच जाऊन वडीलांच्या गळ्यात पडून रडू लागले...

'बाबा, हे असं कसं झालं हो... मी तुमचं न ऐकता नोकरीवर गेलो म्हणून माझ्यावर रागावलात... बाबा, तुमची तशी इच्छाच असेल तर मी नोकरी सोडीन.'

'ठीक ठीक' म्हणत रामजीबाबा भीमरावांच्या पाठीवरुन मायेनं हात फिरवीत राहिले. अगदी कष्टाने बोलले, 'तू आलास, सारं मिळालं. माझं स्वप्न...' आणि त्यांच्या ओठांत शब्द अडकले. पुढे बोलता येईना.

भीमराव बोलले, 'बाबा माझ्या आईप्रमाणं मी जिद्दी आहे... निश्चयी आहे... तुमचं माझ्याविषयीचं ते स्वप्न मी साकार करणारच, नाहीतर कटून मरणार...'

तेवढ्यात रामजीबाबांनी समाधानानं रमाबाईकडं पाहिलं. भीमरावांना, साऱ्यांना पाहून घेतलं.

आणि एवढ्यात भीमरावांच्या पाठीवरुन फिरणारा तो वत्सल हात एकदम खाली गळून पडला. सारेजण काय समजायचं ते समजले.

तोच त्यांची सून रमाबाई ऊर फुटल्यागत मोठ्यानं किंकाळली, 'माऽऽमंऽऽजीऽऽ, आमाला एवढ्यातच सोडून कसं हो गेलाऽऽ!'

बांध फुटल्यागत भीमरावांच दु:खाचा आवेग अनावर झाला. त्यांनी मोठ्यानं टाहो फोडला. 'बाऽऽबाऽऽ बाऽऽबाऽऽ काय हो हे तुमी केलंत? एवढ्यात कसं हो... आम्हाला सोडून गेलातऽऽ? बाऽऽबाऽऽ बाऽऽबाऽऽ, आनंदराव बाळाराम, दुसरी सून लक्ष्मीबाई यांनी आकांत केला. सारी चाळ जमा झाली.'

एकच हाहा:कार उडाला.

एवढे शिकले सवरलेले भीमराव आंबेडकर मृत रामजीबाबांच्या पायाशी बसून एखाद्या लहान मुलाप्रमाणं रडू लागले... रडून गहिवर घालू लागले... 'आनंद, बाळारामदादा, माझी गुरुमाऊली गेली होऽऽ मला शिकवायचं सोडून मध्येच गेली हो... माझ्यावर रागावली होऽऽ पण बाबाऽऽ असं रागावून जाऊ नका होऽऽ मी तुमची इच्छा पुरी करीन... तुमचं स्वप्न मी साकार करीन...'

रमाबाई गहिवरुन बोलली, 'मामंऽऽजी... मामंजी... ऐका... ऐका... त्येंनी काय म्हणत्यात ते... ऐऽऽकाऽऽ मामंऽऽजी ऐऽऽका वोऽऽऽ'

आणि त्या धाय मोकलून रडू लागल्या. आक्रंदनाचं आभाळ कोसळू लागलं... एकच हाहा:कार उडाला.

• • •

१४

१९१२ साली... विद्यार्थी भीमराव आंबेडकर बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झालेले. बडोदा सरकारची, अधिकाऱ्याची नोकरी सोडून कटू अनुभव घेऊन आलेले... वडील रामजी सुभेदारांचं देहावसान झालेलं. विलायतेला जाऊन पुढील उच्च शिक्षण घेण्याचं ध्येय त्यानं मनात पक्क केलेलं. त्यासाठी प्रयास जारी चाललेले. मोकळ्या वेळात त्याला इतर पुस्तकं, विशेषत: मोठमोठ्या व्यक्तींची चरित्रं वाचण्याचा छंद होता. आजसुद्धा महात्मा ज्योतीबा फुले यांचं चरित्र वाचण्यात ते दंग झालेले. त्यांची धर्मपत्नी रमाबाई काहीतरी महत्वाचं बोलायचं म्हणून त्यांच्या अभ्यासिकेत आलेली... तर तिच्या साहेबाला वाचण्याची तंद्री लागलेली. तंद्री भंग करण्याची तिची हिंमत होत नव्हती. घसा साफ करीत, हिंमत करुन, बोलण्याचा प्रयत्न तिनं केलाच –

'म्हटलं... म्हटलं... ऐकलं का?'

एव्हाना भीमरावाची तंद्री भंग पावली. कपाळाला आठ्या घालीत ते ओरडले, 'म्हटलं... म्हटलं... काय तू म्हटलं, ते नाही ऐकलं?'

मानेला झटका देत, लाडीकपणे रमाबाईनं विचारलं, 'काय हो, माझ्याशी बोलताना तुम्हाला सदा न् कदा चेष्टाच कशी काय सुचते?'

'अगं, मनुष्याला चेष्टा केव्हा सुचते माहीत आहे? प्रेमात आल्यावर... बोल तुझं हे हे 'म्हटलं म्हटलं' ते ते काय, नाही समजलं...'

'बघावं तेव्हा पुस्तकात डोकं खुपसून बसलेले... बायकोशी चार हिता-गुजाच्या गोष्टी बोलायच्या-कधी माहीत आहे? म्हणे प्रेमात येऊन बोलतो!'

'आता प्रेमात नाही, गंभीर होऊन बोलतो...' म. फुले चरित्राचे पुस्तक बाजूला ठेवून बोलले, 'बोला, राणीसाहेबांचं काय म्हणणं आहे, ते म्हटलं?'

‘म्हटलं? पुन्हा चेष्टा! अहो, आषाढी एकादशी जवळ आलीया... पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचं दर्शन घेऊन यावं म्हणते...’ क्षणभर पदराशी चाळा करीत धडधडत्या मनानं रमाबाई सांगू लागल्या —

‘म्हटलं... थोरलं... बाळाराम भावोजी साऱ्यांना घेऊन निघालेत पंढरपूरला म्हटलं...’

‘अस्सं का म्हटलं... साऱ्यांना म्हणजे कुणा-कुणाला घेऊन?’

‘कुणा-कुणाला म्हणजे? अहो, आपलं आनंदराव भावोजी, त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई, त्यांचा मुलगा मुकुंद... थोरल्या जाऊबाईसुद्धा निघालेत... त्यांची मुलं जगत नाहीत, म्हणून त्या नवस बोलायला निघाल्यात...’

‘असं... असं... तुमचं साऱ्यांचं हे असं आधीच सारं ठरलंय, तिथं मला काय ते म्हटलं, सांगायचं ते आता.’

‘म्हटलं... म्हटलं... ते काय सारखं करतायसा? थोरल्या भावोजीनं म्हटलं, आपल्या वडलांचं... मामंजीचं पंढरपूरला जाऊन दिस घालावं... चंद्रभागेकाठी मामंजीच्या नावानं, आंधळ्या-पांगळ्यांना दानधर्म करावा... आणि... आणि मी म्हणते, आपल्या यशवंतासाठी तिथं देव देव करावा... नवस बोलावा... तो अक्षी ठणठणीत व्हावा म्हणून... हो, सदा आजारी पडतो ना तो? आणि कळलं का, थोरल्या भावोजींना आपल्या यशवंताचा भारी लळा आहे... भावोजीला बघितलं की, स्वारी कशी नाचाया लागलीया... आणि... आणि... तुम्ही बी. ए. पास व्हावं म्हणून पंढरीच्या पांडुरंगाला नवस बोललेलं होतं... तुम्ही पास झालात... माझ्या नवसाला देव पांडुरंग पावला... तेव्हा, ते नवसदेखील फेडून यावं म्हणते...’

‘अगं वेडे, असं देवाला नवस करुन कोणी पास होत नसतं त्यासाठी विद्यार्थ्यानं मनापासून खूप अभ्यास करावा लागतो... तुला वेडीला ते काय कळणार म्हणा?’

‘हो, वेडी... दगडी... धोंडी... आमी शाळेत गेलोच न्हायी, मग काय कळणार ते? आणि किनई आमच्या सोबत भजनीबुवा... आपलं ग्यानबुवादेखील येत आहेत...’

‘तो... तो टाळकुट्या... ग्यानबुवादेखील सोबत... वाऽऽ छान! तुम्हा साऱ्यांचा असा खास बेत आहे तर... आता पंढरपूच्या त्या गाडीतच काय ते बसायचं तुमचं शिल्लक राहिलंय... मग मला काय विचारतेस? तुम्हा साऱ्यांच्या बहुमतापुढं माझ्या एका मताला कोण विचारतो? पण रमा, तुम्हाला तिथं पांडुरंगाचं दर्शन घडेल, असं नाही मला वाटत!’

‘प्रत्यक्ष पांडुरंगाचं दर्शन आम्हाला कसं घडणार? आमच्या जातीनं दुरुनच पांडुरंगाचं, त्याच्या कपाळाचंच दर्शन घ्यायचं असतं. त्या देवानंच नव्हं, आम्हाला तसल्या जातीत जन्माला घातलंय, हे काय देवाला माहीत नसंल होय?’

‘वेडी... देव कशाला घालील तुम्हाला तसल्या जातीत जन्माला? तो घालणार तुम्हाला माणसाचाच जन्म... पण इथल्या श्रेष्ठवर्ण ब्राह्मणांनी, तुमच्या जातीला पढवलंय की, देवानंच तुम्हाला असल्या जातीत जन्माला घातलंय म्हणून... म्हणून, तुम्ही असं वेड्यासारखं बोलता... वेड्यासारखं वागता... हजारो वर्षापासून हे असंच चाललंय... असंच चालत राहणार आहे... मंदिरातल्या मुर्तीऐवजी, बाहेरच्या कळसाचं दर्शन घेऊन, देव-दर्शन घडल्याचं खोटं समाधान मानून घ्यायचं, हा शुद्ध वेडेपणा आहे... पांडुरंगानं विठू महाराचं रुप घेतलं म्हणून, ऊर फुटे तो, मोठेपणानं सांगायचं, पण महारांना कुणी पांडुरंगापाशी येऊ दिलंय का? हा अन्याय आहे... हा कधी संपणार? तुम्हाला कधी कळणार?’

‘साहेब, मला ह्यातलं काही कळत न्हायी बघा... वाडवडलापास्नं चालत आलंय, तसंच पुढं चालवायचं... एवढंच आम्हाला माहीत...’

‘इथंच... इथंच आपल्या लोकांचं चुकतंय... आम्हीही इतरांप्रमाणे माणसासारखी माणसं असताना, आमच्या वाट्याला हे दुर्दैव का? याचा विचार आमचे लोक कधी करीतच नाहीत... रमा, एवढ्यात तुला यातलं काहीच कळणार नाही... तुम्ही सारे पंढरपूरला जाऊन या... तिथला अनुभव घेऊन या... त्या अनुभवातून कदाचित तुम्हाला शहाणपणा

येईल... अनुभवासारखा दुसरा गुरु नाही... त्या गुरुनंच अशा अंधभक्ताचं कान टोचलं पाहिजे... तेव्हाच ते जागे होतील... जा तुम्ही सारे पंढरपूरला जाऊन या. तिथं गेल्यावर लस टोचून घ्या. या वेळी चंद्रभागेला पूर येतो... पाणी गढूळ असतं... रोगराई होते...'

'... आणि साहेब, रागावणार नसाल तर सांगते...' रमाबाई मनोमनी भीतभीत बोलल्या, 'विलायतलं शिक्षण घेण्याची संधी तुम्हाला आपणहून चालत यावी म्हणून मी पंढरीरायाजवळ नवस बोलून येणार आहे म्हटलं?'

ऐ ऐकून भीमराव आंबेडकर एकदम रागानं लालेलाल होऊन रमावर ओरडले, 'खरंच, तू वेडी आहेस... दगडी... धोंडी... आहेस!'

पतीदेवांचा हा असा जमदग्नी अवतार बघून रमाबाई घाबरुन आत धुम पळाल्या...

भीमराव रागानं दात-ओठ खात उभे... तिथंच... किती तरी वेळ! किती तरी वेळ!!

• • •

१५

१९१३ साल. वेळ संध्याकाळची. सहा-साडेसहाची...

विलायतेला उच्च शिक्षणासाठी जाण्याच्या प्रयत्नात असलेले विद्यार्थी भीमराव आंबेडकर, धावाधाव करुन, नित्याप्रमाणे संध्याकाळी घरी आले. तो घरात मोठमोठ्यानं रडण्याचा व आक्रोश करण्याचा... काळीज फाडणारा आवाज ऐकू आला. भीमरावांनी पाहिलं, आपली पत्नी, भावाची बायको सारीच रडत होती...

ती सारी आपली कुटुंबीय मंडळी तर पंढरपूर यात्रेला गेलेली नि परत येतात ती अशी रडतात का? काही न कळून, भीमराव क्षणभर हबकून गेले. त्यांनी घाबरुन सर्वांना ओरडून विचारले, 'अरेऽऽ असं काय झालंय? तुम्ही सारे असं रडता का? काय झालंय ते तरी सांगा...? कुणी तरी सांगा ना?'

तेव्हा त्यांची पत्नी रमा रडत रडतच उठली नि मोठमोठ्यानं हुंदके देत सांगू लागली, 'आमच्या थोरल्या जाऊबाई... बाळाराम भावोजींची बायको... आम्हाला साऱ्यांना सोडून... त्या देवाघरी गेल्या होऽऽऽ गेल्याऽऽऽ आम्हाला सोडून कायमच्या गेल्याऽऽ.'

आणि जास्तीच भोकाड पसरुन रमा रडू लागली. त्याचबरोबर सारेही रडू लागले... एकच गोंगाट, एकच आक्रोश... एकाच सुरात आक्रंदन... गलबलून सोडणारं... काळजाचं पाणी पाणी करणारं सारं... तरी भीमराव विचारु लागले — 'अरेरेऽऽऽ अरे, पण असं एकाएकी झालं तरी कसं? आम्हाला काही तरी सांगा... आमची छाती फुटाय लागलीयऽऽ...!'

रमा डबडबलेल्या डोळ्यांनी, दाटल्या कंठानं सांगू लागली, 'काय सांगू...? कसं सांगू...? पंथरीराया... आम्हावर कोपलाय होऽऽ चंद्रभागा आम्हावर कोपलीय होऽऽ!'

'अरेऽऽ काय झालं... ते तर सांगाल की नाही?'

'आपण जाताना सांगितलं हुतं... आषाढी यात्रेच्या वेळी चंद्रभागेला पूर येतो, पाणी बिघडतं... लस टोचून घ्या...' आम्ही साऱ्यांनी लस टोचून घेतली. पण थोरल्या जाऊबाईंनी... नाही घेतली... आम्ही गेलो... त्या रात्रीच चंद्रभागेला पूर आला... चिखलासारखं... राडेराड पाणी आलेलं... बाळाराम भावोजी पुन्हा जाऊबाईंना म्हणाले, 'अगं, लस टोचून घेऽऽ'

पण जाऊबाई म्हणाल्या, 'पांडुरंगाच्या पंढरीत आम्ही आलोय... काही होणार नाही... अन्... काय सांगू... जाऊबाईंना कॉलरा झाला... बघता बघता... त्या देवाघरी गेल्या की होऽऽ गेल्याऽऽ जाऊबाईऽऽऽ'

रमा आक्रोश करीत उन्मळून उन्मळून रडू लागली. भीमराव आंबेडकर मनातल्या मनात पुटपुटले —

'श्रद्धा असावी, पण अशी अंधश्रद्धा नसावी... अंधश्रद्धा कधीकधी अशी घातक ठरते... अरेरेऽऽ काय झालं असं हे...?'

'साहेब... पांडुरंग आम्हावर कोपला होऽऽ. आमच्या बरोबरच्या संत ग्यानबुवा महाराजांना तर, तिथल्या पुजाऱ्यांनी अक्षरश: पायाखाली तुडवला, बेदम मारला...'

आश्चर्यानं भीमरावांनी विचारलं, 'अरेरे... अशा भजनी भक्ताला... पांडुरंगाच्या भक्ताला असा कुणी बेदम मारला... पण का? का म्हणून?'

'तो टाळ कुटत कुटत देवळाच्या दारात लुडबुड करीत होता... तो महाराचा आहे, असं कुणी तरी पुजाऱ्यांना सांगितलं... झालं... ते पंढरपूरचं बडवे... त्यांनी बडवून काढलं होऽऽ ग्यानबुवाला... मग आम्हा साऱ्यांची पाचावर धारण बसली. तिथलं पुजारी... तिथलं बडवं... ही माणसं न्हायीत... बडव्यांच्या रुपात सैनात हायीत सैतान!'

'अगं, केवळ हे पुजारीच नव्हे, सारा सवर्ण हिंदु समाज आम्हाशी वागताना, असाच सैतानासारखा... माणुसकी सोडून वागतो आहे... वागणार आहे...'

'साहेब, तुमी म्हटला ते अगदी बरोबर! त्याचा कटू अनुभव, साऱ्या जत्रंत आम्हाला जागोजागी होऽऽ आला... का म्हणून आमचे लोक जातात, त्या जत्रेला? कुत्र्या-मांजरांच्या जलमाला रया असंल, पण आमा महारा-मांगांच्या, ढोर–चांभारांच्या जलमाला रया न्हायी वोऽऽ ते मी प्रत्यक्ष पाहिलं... ते मी प्रत्यक्ष अनुभवलं... होऽऽ'

रमा परत अगदी आतडी पिळवटून आणखी सांगू लागली होती —

'साहेब, कपाळावर एवढा मोठा गोपीचंदनाचा टिळा लावलेल्या... गळ्यात एकतारी अडकवून, पांडुरंगाचं सारखं नामस्मरण करणाऱ्या, एका चांभाराला तो कुणा एका बडव्याला, भजनाच्या तंद्रीत शिवला म्हणून... त्याचीच ती एकतारी घेऊन... त्यानंच त्याला असा चोपून काढला... असा बडवला की, तो चंद्रभागेच्या वाळवंटात रक्तबंबाळ होऊन पडला. तडफडला... कुणी... कुणी त्याच्यासाठी धावून गेलं नाही... धावून गेलं तर शिवाशिव होईल, धरम बुडल ही साऱ्यांना भिती... अरेरेऽऽ काय ही, आमची दशाऽऽ? काय माणूस जातीची विटंबना...?'

'तुला ह्यातलं इंगीत उमजायला लागलंय म्हणायचं... पुढच्याला ठेच लागली की मागचा शहाणा... होतो, तो असा...'

रमाबाई कळवळून आणखी सांगू लागल्या, 'साहेब, पांडुरंगाचं दर्शन मला न्हायीच वोऽऽऽ मिळालं... देवळाच्या पायरीजवळ देखील आमाला येऊ दिलं न्हायी... विठोबाचं दर्शन मग कसलं मिळणार... घेतलं कळसाचंच दुरुनच दर्शन... तेच आमच्या जातीच्या नशिबी...'

भीमराव आंबेडकर... पत्नी रमाचं अनुभवी बोल ऐकत शांत उभे होते. पण रमाबाई आता अधिकच कळवळून रडत होत्या. त्यांचं आधीच भाव-व्याकुळ नाजूक हृदय... अशी कटू अनुभवाच्या आघातांनी ते अधिकच शतविदीर्ण झालेलं, भरुन आलेले डोळे पुशीत पुशीत त्या दाटल्या कंठानं पुढं सांगू लागल्या...

'साहेब... देवळाच्या लांब उभं राहून, आमी पांडुरंगाला साधा निवद दाखवला... देवळाच्या कळसाला नमस्कार करुन जड पावलांनी आम्ही परतलो... थोरल्या जाऊबाई गेल्यामुळं... मामंजीचं दिस घातलं न्हायी... दानधर्म केला न्हायी...

कसलं नवस बोललो न्हायी... आम्ही मग काहीच केलं न्हायी... काहीच केलं न्हायी... रडत रडतच आम्ही आलो...' परत रमाबाई रडू लागल्या... भीमराव तिला समजावीत म्हणाले, 'वेडेऽऽ किती रडशील...? मी तुला प्रथम जातानाच सांगितलं होतं की, पंढरपूरला जाण्यात काही अर्थ नाही... तुम्हाला विठोबाचं दर्शन मिळणार नाही म्हणून...'

'साहेब... मला आता वाटू लागलंय... आपण कदाचित हिंदु धर्माचं नसावं... म्हणून आमाला, वरचे लोक असे देवाच्या आसपास देखील फिरकू देत नसावंत?...'

'शाब्बास! तुझ्याकडून अशा विचाराची अपेक्षाच नव्हती. पण तू स्वत: हे सारं प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलंस... कानानं ऐकलंस... नि स्वत: ते प्रत्यक्ष अनुभवलंस... म्हणून ते तुला... एवढं तरी कळलं... रमाऽऽ जिथं आपल्याला देवापासून असं दूर दूर लोटलं जातं... त्या पंढरीला जाण्याची एवढी कशाला धडपड करतो...?' भीमराव विषय बदलत बोलले, 'मग रमा, मला हे सांग तु तुझ्याबद्दल ते कसलं नवस, पांडुरंगाजवळ मग बोलून आली की नाही?'

रडत असलेली रमा थोडी गंभीर झाली. क्षणभरच. नि उत्तरली.

'सांगू? एवढ्या दु:खात, एवढ्या शोकातही, मनातल्या मनात मी पांडुरंगाला नसव बोलून आलेय होऽऽ मनात दाट श्रद्धा असली की, दगडाचाही देव होऊन, माणसाला पावतो म्हणतात...'

'श्रद्धा किती चिवट असते नाही? म्हणजे... तू अजून आशा करुन आहेस म्हणायची? नवसाला देव पावणार म्हणून?'

'हो, आशेवरच जगतो माणूस!'

'म्हणजे? सुधारणा नाहीच दिसत तुझ्यात?'

'एक दिवस... माणूस सुधारेल... अशी आशा ठेवून, प्रयत्न चालू ठेवावेत...' असे म्हणत रमा आत गेली.

भीमराव तिकडे पहातच राहिले!

• • •

१६

२ फेब्रुवारी १९१३ रोजी मुंबईत भीमरावांचे वडील, रमाबाईंचे सासरे रामजीबाबांचे निधन झालेले. भीमराव-रमाच्या संसाराचा एकखांबी तंबू अचानक कोलमडलेला. भीमराव आंबेडकर तर हतबद्ध झालेले. त्यांच्या डोळ्यांसमोर सारा अंधारच अंधार दिसू लागला. आपल्या अभ्यासिकेत बसून भीमराव उमळून उमळून रडत होते. त्याचं सारं भविष्य आता अंधारात होतं. रमाबाई त्यांना समजावीत होत्या. दिलासा देत होत्या.

रामजीबाबांच्या निधनाची वार्ता ऐकून पोरक्या भीमरावाचं सांत्वन करावयास आलेल्या केळूसकर गुरुजींना असं अचानक आलेलं पाहून, भीमराव ओक्साबोक्सी रडू लागले. बोलले, 'गुरुजी, मी पोरका झालो होऽऽ, आता मला जीवनाचा मार्गदर्शक, खराखुरा गुरुजी मला सोडून गेला होऽऽ, आता मला कोण शिकवणार? सल्ला-मसलतसाठी आता आम्ही कोणाच्या तोंडाकडं पहायचं?'

भीमराव धाय मोकलून रडू लागले. रमाबाईही एका बाजूला अश्रू ढाळीत उभ्या होत्या.

केळूसकर गुरुजी भीमरावांच्या पाठीवर हळूवारपणे हात फिरवीत त्यांचं सांत्वन करु लागले. बोलले, 'त्यांची प्रकृती तर चांगली होती. मग असं कसं झालं?'

'गुरुजी, मला वाटतं, मी शिक्षण सोडून बडोद्याला नोकरी धरली म्हणून कदाचित त्यांनी धसका घेतली... मी अजून खूप शिकावं, विद्याविभूषित व्हावं, अशी त्यांची आत्यांतिक इच्छा होती... मी नोकरी धरण्याचा मूर्खपणा केला...'

केळूसकर गुरुजी त्यावर म्हणाले, 'भीमराव, तुझी खरीच इच्छा आहे का पुढं शिकण्याची? त्यासाठी वाटेल तो त्याग करण्याची... तयारी...?'

'हो! आकाश कोसळो वा पृथ्वी गडप होवो, मी माझ्या ध्येयाला कदापी सोडणार नाही...!'

'वाहवा! तुझ्याकडून मला हीच अपेक्षा होती. भीमराव, तू असं कर. आजच बडोद्याच्या सयाजीराव महाराजांना तू भेट. त्यांचा मुक्काम सध्या मुंबईत आहे. फॉरेनमधील उच्च शिक्षण घेण्यासाठी म्हणून भारतातील काही हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेस पाठविण्याची महाराजांची एक योजना आहे. महाराजांना तू चांगलाच माहीत आहेस...आजच त्यांना तू भेट. जरुर पडल्यास, मी येईन. कसे? शुभस्य शिघ्रम्!'

भीमरावांनी यावर काही न बोलता, गुरुजींच्या पायावर लोटांगणच घातले आणि आपल्या पत्नीस म्हणाले, 'रमा, हे माझे दुसरे गुरुजी... केळूसकर...'

रमाबाईंनी लगेच त्यांच्या पायावर आपलं मस्तक ठेवलं. बोलली, 'आता तुमीच आमचं मामंजी. आपली किरपा असू द्या...'

केळूसकर गुरुजीनं रमाबाईंना तोंडभरुन आशिर्वाद दिला, 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव!'

— भीमराव-रमाबाई आज भल्यापहाटे उठली. स्नानसंध्या करुन जोडीनं देवापुढची प्रार्थना आटोपली. रमाबाईनं खिडकीतून पाहिलं. पूर्वेला सूर्यदेव आस्ते वर वर चढत होता... तिनं हृदयापासून सूर्यदेवाला नमस्कार घातला. हृदयापासून बोलली, 'देवा ऽ आपल्याही भाग्याचा सूर्य असाच चढता ठेव. पतिदेवांना चाललेल्या कामात यश दे...'

भीमराव-रमाबाईनं जोडीनं रामजीबाबांच्या प्रतिमेचं दर्शन घेतले. भीमरावांनी बाबांच्या त्या प्रतिमेपुढं मोठ्या भक्तीभावानं प्रार्थना म्हटली...

"... गरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर:।

गुरु साक्षात् परब्रह्म तस्मै: श्री गुरवे नम:।।"

भीमराव मग सयाजीराव महाराजांच्या बंगल्यावर जाऊन त्यांना भेटले. प्रथम बडोद्यातील आपल्या नोकरीची सारी हकीकत महाराजांच्या कानी घातली. नंतर महाराजांच्या योजनेनुसार अमेरिकेस जाऊन उच्च शिक्षण घेण्याची आपली इच्छा असल्याची महाराजांना त्यांनी सांगितली.

सयाजीराव महाराज भीमरावांना म्हणाले, 'तुमची उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असल्यास, तुम्ही ताबडतोब आमच्याकडे अर्ज करा. आम्ही त्याचा विचार करु.'

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे भीमरावांनी ताबडतोब तसा अर्ज केला. अंती भीमरावांचा अर्ज मंजूर झाला. भीमरावांचा आनंद गगनात मावेना.

रमाबाई त्यांना म्हणाल्या, 'माझ्या मामंजींच्या पुण्याईनं तुम्हाला यात यश आलंय हं. तुमी महाराजांना भेटायला गेले हुतेत ना, अगदी तवापासून आताच्या घटकापरयंत मी रोज मामंजींच्या फोटोपुढं बसून त्येंच्याकडून तुमाला या कामात यश यायला, आशिर्वाद मागीत हुती. साहेब, आज मामंजी असतं तर? पुढच्या शिक्षणासाठी तुमचं हे अमेरिकेस जायाचे ठरल्याचं

ऐकून, मामंजींना आज किती आनंद झाला असता?' असं म्हणून धावतच रमाबाई मामंजींच्या फोटोपुढं जाऊन नमस्कार करीत म्हणाली, 'मामंजी, त्येंनी शिकायला अमेरिकेला निघालंत... शिक्षणाचा सर्व खर्च सयाजीराव महाराजच करणार हायीत... मामंजी... बाबाऽऽ तुमचीच ही पुण्याई बरं... आमा लेकरावर असाच हात असू द्या...'

भीमरावही रामजीबाबांच्या त्या फोटोपुढं जाऊन नतमस्तक झाले. गदगदून, भरल्या कंठानं बोलले, 'बाबाऽऽ, तुमची आज आठवण येतेय. तुम्ही आज नाही म्हणून, हृदयात कसं भडभडून येतंय. हे घडतंय हा तुमचाच आशिर्वाद. तुम्हीच माझे गुरु... तुम्हीच माझे परब्रह्म...

आज रमाबाईंचे पतीदेव भीमराव आंबेडकर पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस निघालेले. आज पत्नी रमाबाईंना कोण आनंद झालेला. 'आजि दिवस धन्य सोनियाचा' असंच त्यांना वाटत होतं. रमाबाईंच्या परमेश्वरस्वरुप मामंजींची इच्छा आज सुफलित होत होती. त्यांच्या मामंजींनी नित्य उराशी बाळगलेलं भव्य स्वप्न आज साकार होऊ पाहात होतं. म्हणून रमाबाईंना आज सारखं वाटत होतं — 'आजि दिवस धन्य तो सोनियाचा.'

पतिदेवाच्या परदेश-प्रवासाची तयारी करण्यात आज पहाटेपासून त्या लागलेल्या. 'काय करु नि कसं करु?' — 'कसं बांधू नि काय सोडू' असं त्यांना झालेलं. पतिदेवांना परोपरीनं ती बजावीत होती. काहीतरी सांगत होती.

एकदाची बोट मुंबई बंदरातून सुटली. रमाबाईंचं हृदय धडधडू लागलं. डोळ्यांतून आपोआप अश्रू गळू लागले... आनंदाचे अश्रू... साफल्याचे अश्रू. हे सारे अश्रू ओंजळीत घेऊन विद्यार्थी भीमराव आंबेडकर बोटीत जाऊन बसले. बोट अमेरिकेच्या दिशेने निघाली. साऱ्यांनी प्रार्थना केली. अन् बोट भरधाव चालली.

थोड्याच कालावधीनंतर तीच बोट अमेरिकेहून परत हिंदुस्थानच्या दिशेनं निघाली. भरधाव वेगानं नि धडकली येऊन परत मुंबई बंदराच्या धक्क्याला... तिथंच. मग पोष्टाची एकच गडबड उडाली नि त्यातील एक पत्र... न्यूयॉर्कहून आलेलं... पोस्टानं पोचलं. पोयबावाडीतील इंप्रुव्हमेंट चाळ क्रमांक १ च्या मुंबई पत्त्यावर... त्यात होतं. एका हृदयानं दुसऱ्या हृदयाशी केलेलं हृदयापासूनचं हळूवार हितगुज — पत्र म्हणजे दोन प्रेमी जीवांची भेटच. त्यातील मजकूर-एका जीवानं दुसऱ्यास उकलून दाखविलेलं हृदयच...

न्यूयॉर्क: कोलंबिया विद्यापीठ

प्रिय रामूस,

अनेक आशिर्वाद

तुझे आनंदाचे, मायेचे अश्रू हृदयाच्या ओंजळीत येऊन मुंबईहून थेट बोटीनं निघालो. पहिल्यांदा प्रवास असल्यानं, वाटेत भेटणारं सारं काही कसं भव्य दिसत होतं, वाटत होतं. प्रवास अगदी सुखावह झाला. इकडे सुखरुप पोहोचलो. काळजी नसावी. येथील जगप्रसिद्ध कोलंबिया विद्यापीठात एम. ए. साठी नाव दाखल केलं. त्याबरोबर पी. एच. डी करतोय. इथलं रम्य वातावरण बघून माझं मन कसं आनंदानं बहरुन गेलंय. खरंच, बाहेरचं जग किती विशाल, विविधरंगी आहे...

रामूऽऽ अगं, अमेरिका म्हणजे हिंदुस्थानच्या मानानं खूप पुढारलेला वैभवसंपन्न असा देश आहे. इथे प्रत्येक मानवाला लिहिण्याचं, बोलण्याचं, मन मानेल तसं सर्व लोकांत मिळून मिसळून वागण्याचं स्वातंत्र्य आहे. मला 'अस्पृश्य' म्हणून हिणवणारे, 'सावली पडेल' म्हणून 'दूर हो... दूर हो...' म्हणून पदोपदी माझा अपमान करणारे दांभिक येथे कोणीच नाहीत. कसलीही समाजबंधनं इथे आढळत नाहीत. मला इथं सारं कसं मोकळं मोकळं वाटतं. इथं माझ्या मनात येईल ते मी करु शकतो. इथल्या नदीच्या वा तळ्याच्या कुठल्याही पाणवठ्यावर मी जाऊ शकतो. तिथलं पाणी मी पिऊ शकतो. इथं कुठल्याही देवाच्या देवळात मी जाऊ शकतो. देवदर्शन घेऊ शकतो. इथे अस्पृश्य कोणीच नाही. नीग्रो म्हणून आमच्यासारखी गरीब व दास्यातच वाढणारी एक जमात आहे, पण ते अस्पृश्य नाहीत. नीग्रो इथे अगदी स्वच्छंदपणे गोऱ्या लोकांच्या घरादारांत स्वयंपाकघरातून वावरताना दिसतात...

रामूऽऽ, इथं गगनाला भिडतील एवढ्या उंचच उंच इमारती आहेत. विविध आकारांच्या सुंदर मोटारी, ट्रॅम्स् आहेत. नंदनवनासारखे रमणीय बागबगीचे आहेत. इथे डोळे दिपवून टाकणारी भुलभुलावण आहे. सारी सुखं विलास इथं हात जोडून उभी आहेत. पण मला त्यांचा मोह होत नाही. उलट आपल्या गरिबीची, अस्पृश्यतेची जाणीव त्यामुळं मला इथं तीव्रतेने होतेय, गरिबाला कशाला पाहिजेत असले श्रीमंती चोचले? आपण इथं आलोय शिक्षणासाठी, आपल्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी. ध्येयप्राप्ती अशी सुखासुखी होत नाही. त्यासाठी सुख-विलासांची राखरांगोळी करावी लागते. सुखार्थिनः कुतो विद्या, कुतो विद्यार्थिनः सुखम् आणि आपल्या अस्पृश्य समाजाला शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही...

रामूऽऽ, हा देश नीग्रोंची गुलामगिरी नष्ट करणाऱ्या अब्राहम लिंकनचा आहे. हा देश गुलाम नीग्रोंचे नेतृत्व करुन, त्यांना माणुसकीचे हक्क मिळवून देणाऱ्या बुकर टी. वॉशिंग्टनचा आहे. त्याच्या जीवनापासून खूप शिकण्यासारखं आहे. मला इथं मग आठवण येते, शतकानुशतके गुलामगिरीत व अज्ञानांधकारात खितपत पडलेल्या माझ्या ज्ञातीबांधवांची. माझ्या त्यांच्याविषयींच्या कर्तव्याची. कर्तव्यबुद्धी मला सारखी बजावत राहते, 'ध्येयशिखराचा मार्ग कदापि सोडू नये, कारण आत्मोन्नतीही ध्येयपूर्ततेनेच होत असते.' मग मी जोरात अभ्यासाला लागतो...

रामूऽऽ, तुझीसुद्धा मला सारखी आठवण येते गं. मी इकडं येताना, तू काढलेले हे उद्‌गार मी जन्मभर विसरणार नाही... म्हणालीस, 'संसाराला आग लावून पुढं चला. मागच्याचं कसं हुईल, याची चिंता गं. मामंजींचं सपान खरं करायचं असंल तर संसारावर इस्तू ठेवून तुमी बाहेर पडा. आगुदर तुमी बाहेर पडून, मुलुखगिरी करुन मोठं व्हा नि मग माझ्या दारात या. दारात तुमच्यासाठी पंचप्राणांची पंचारती घेऊन ओवाळण्यासाठी उभी असलेली दिसेन मी...

रामूऽऽ, मला आता वाटू लागलंय, माझ्या जीवनाचं सोनं व्हावं म्हणूनच तुझा परीस, माझ्या बाबानं निवडला असला पाहिजे. खरंच, माझं बाबा म्हणजे किती रत्नपारखी होते, हे अनुभवानं पटतंय. रामूऽऽ, तुझ्या कानात सांगू? का, तुला ते कळेल? माझे बाबा जसा माझा स्फूर्तिदाता आहेत, तशी तू माझी स्फूर्तिदेवता आहेस. तुम्हा दोघांचेही फोटो माझ्याजवळ आहेत. तुम्हा दोघांचे फोटो न्याहाळले की, मला रोज स्फूर्ती, नवी चेतना मिळते. रोज सकाळी उठल्यावर, आंघोळ करुन माझ्याजवळ असलेल्या बाबांच्या फोटोला मी प्रथम फुलांचा हार घालतो. प्रार्थना म्हणून रोज माझ्या दैनंदिन कार्यक्रमाची मी सुरुवात करतो. त्यामुळं माझा सारा दिवस कसा उत्साहात आनंदात जातो.

रामूऽऽ, इथं वाचनालयं खूप मोठी व चांगली आहेत. इथं मला पाहिजे ती सारी पुस्तके वाचावयास मिळतात. एखाद्या आधाशासारखा मी वाचन करीत असतो. जेवणाचीसुद्धा शुद्ध राहत नाही. हे वाचून तू मनोमनी रागावली असशील. रामू, इथं सारं मिळतंय. पण तुझी ती बोंबिलाची चटणी, कटाची आमटी काही मिळत नाही बघ! तोंडाला पाणी सुटतं. आठवण काढताना. रामू, तुझी, तशी साऱ्यांचीच मला आठवण येते गं. लक्ष्मीवहिनी, शंकर, गौरा, मुकुंद व यशवंत साऱ्यांची आठवण येते. यशवंतची प्रकृती कशी काय आहे? रामूऽऽ, तू र ट फ करायला शिकली आहेस ना? मग तुला तुझ्या हस्ताक्षरात पत्रोत्तर पाठव. बाकी ठीक.

आपला,

भीमराव आंबेडकर

— साहेबांचं हे अमेरिकेहून आलेलं पहिलंच पत्र वाचून रमाबाई आनंदानं अक्षरशः नाचत सुटल्या. त्यांना इतका आनंद झाला... इतका आनंद झाला की, काही सांगून सोय नाही. येणाऱ्या जाणाऱ्या सग्यासोयऱ्यांना, साहेबांच्या इष्टमित्रांना साहेबांचं पत्र आल्याचं सांगत. साहेब अमेरिकेत खुशाल आहेत, म्हणूनही सांगत. तेच पत्र पुन्हा पुन्हा वाचण्याचा त्या प्रयत्न करीत. जितकं वाचावं, तितकं त्यांना अधिकच गोड वाटे. आनंददायी वाटे. कधी कधी कुणाकडूनही त्या वाचून घेत. रात्री झोपताना आपल्या उशाला ते पत्र घेऊन त्या झोपू लागल्या. अगदी वेड लागल्यासारखं झालं होतं त्यांना जसं काही.

रमाबाईंनी मग एक दिवशी आपल्या साहेबांच्या पत्राला उत्तर लिहावयास बसल्या. एक-दोन दिवस त्या पत्र लिहितच होत्या. लिहिलेला मजकूर पुनः पुन्हा वाचून पाहत होत्या. रमाबाईंना वाटे, आपले साहेब एवढं शिकलेलं त्यांना वेडंवाकडं पत्र

लिहून कसं बरं चालेल ? मजकूर बरा वाटला नाही की, तो परत सुधारुन त्या लिहित होत्या. मन लावून लिहित होत्या, त्यात आपलं हृदय ओतून त्या लिहित होत्या —

मुंबई, पोयबावाडी

आ. साहेबांच्या चरणी

रमाबाईंचा दंडवत.

तुमचं खुशालीचं पत्र मिळालं. मजकूर समजला. आनंद वाटला. तुमी नि मामंजीनं मजला बळेबळे र ट फ करायला शिकवलंत, ते आता कारणी आलं. त्या वेळी मला त्येची अप्रबाई वाटली न्हायी. आता शिकण्याचं मोल मला उमगलं. येडंवाकडं का असेना, पर माज्या मनातलं त्या पत्रातून तुमास्नी मला लिहिता येऊ लागलंय, ह्यो थोडा थोडका का फायदा हाय ?

साहेबऽऽ, का न कळे, तुमी गेल्यापास्नं मामंजीनं दिलेली अंकलिपी मी रोज वाचीत हुती बघा. तुम्ही मला माझ्या अक्षरात पत्र लिवायला लावणार हुता की काय, कुणास ठाऊक ? साहेब, सांगायला मला लाज वाटते, पण सांगतेच. साहेब आमालाबी तुमची भारी आठवण येतीया बघा. तुमाबिगार योक, योक दिस काढायचा म्हंजी, लई अवघड जातंया बघा. पर पुढच्या, उद्याच्या सुखाकडं बघून, आजचं दु:ख गिळाया होवं. घुसळल्याबगार लोणी न्हायी, कष्टाबिगार फळं न्हायी. तरी तब्येत संभाळून वाचन करा. चांगलं चुंगलं करुन घालायला मी तिथं न्हायी, याचं वाईट वाटतं. साहेब, तुमाला मी बोंबीलाची चटणी पारसलनं पाठवू का ? पर कटाची आमटी कशी पाठवावी ? पाठवली बी असती, पर तुमाला तिकडे पोचंपरयंत ती उतरुन जाईल वोऽऽ.

साहेब, तुमच्या पत्रात मला तुमी 'परीस' म्हनतायसा- पर ते खरं न्हायी हां. खरं तर तुमी 'परीस' आहात. मी काय अडाणी लोखंड. पन तुमामुळं माज्या जलमाचं सोनं हुनार हो ऽऽ. मला अभिमान हाय. मी नीस अडाणी दगूड असलू, तरी माझा धनी साऱ्या जगात लई शिकलेला कोहिनूर हिरा हाय म्हनून. मला त्यात सारं काही मिळतंया बघा. तुमी मी काय दोन हावूत व्हय ?

साहेब, आनंदराव अण्णासाबच्या पगारावर व माझ्या इतर काम धंद्यावर घर चालावं तसं चाललंया. इकडची काय बी काळजी करायची न्हाय बघा. तुमी आपलं कोलेज भले की अभ्यास भला. यशवंतची तब्बेत आता बरी हाय. त्येची काळजी करु नका. यशवंतला थोरल्या दादासाहेबांचा फार लळा हाय. ते आलं की, यशवंताला खूप खाऊ आणतात. खेळणी बी आणतात. आपलं लोक बी त्येला खांद्यावरनं खाली उतरवत न्हायीत. लई लाड करत्यात. त्यानं तो खूप लाडावलाय. पण मी एक सांगू ? सांगू ? सांगतेच लष्कर शिस्तीच्या मामंजींची मी सून हाय म्हटलं. त्याला लाडानं येडा न्हाय होऊ देणार. लक्ष्मीबाई, शंकर, गौरा, मुकुंद, आम्ही सारी इकडं खुशाल हायीती. जास्त काय लिहू ? इथंच पत्र पुरं करते. जेवण येळेवर घेत जावा, लई जागू नगा. तब्येतीला जपा. आपली खुशाली कळवा. बाकी ठीक.

आपली,

रमाबाई भ्र. भीमराव आंबेडकर

अमेरिकेत असताना भीमराव-रमाबाईंनी एकमेकांस अशी खूप पत्रे लिहिली असली पाहिजेत. रमाबाई रोज आपल्या पतीदेवाच्या पत्राची वाट पाहत असे म्हणे.

थोरली जाऊ लक्ष्मीबाई आनंदराव हिनं, रमाबाईनं स्वत: –आपल्या हातानं हे पत्र तिच्या पतीदेवाला लिहिल्याचं पाहिलं. वेडंवाकडं अक्षरात... पण पत्र लिहिलं, हे विशेष... त्याचंच त्यांना मोठं आश्चर्य वाटू लागलेलं. त्यावरुन त्या विनोदानं गात, उखाण्यात म्हणाल्या —

"सोन्या चांदीचं घसं, त्येला रुप्याचं कसं?

इठ्ठल मनामंधी हसं, रुक्मिणीनं हे लिवलं कसं?"

तरी रमाबाई म्हणाल्याच, 'आपल्या मास्तरांना हे पत्र मी दाखवलंय. त्यांनी थोडी यात दुरुस्तीही केलीय हं...'

'चालायचं गं... जात्यावर बसलं की ओवी आपोआप सुचते म्हणतात, ती अशी...' लक्ष्मीबाई सहज बोलून गेल्या.

रमाबाईंची व त्यांच्या अमेरिकेतील साहेबांची अशा खुशालीच्या पत्रांची देवाण घेवाण चाललेली... दोन तीन अशी- इकडील खुशालीची पत्रे त्यांनी आपल्या साहेबांना, आत्तापर्यंत स्वत:च्या हस्ताक्षरात पाठविली... रमाबाईंना या गोष्टीचा कोण आनंद झालेला... पण रमाबाईंच्या नशिबात एवढा आनंद, फार काळ कसा टिकून राहील? थोड्या कालावधीनंतरच, त्यांना त्यांच्या अमेरिकेतील साहेबांना, एक अत्यंत दु:खद असं पत्र लिहिणं त्यांच्या नशिबी आलं –

मुंबई, पोयबावाडी

... आ. साहेबांच्या चरणी —

कळविण्यात अत्यंत दु:ख वाटते आहे की, आपल्या वडील बंधूना- आनंदराव अण्णासाहेबांना नुकतीच देवाज्ञा झाली. आपले बंधू- आनंदराव इकडे आजारी पडून, गोमेंडीस त्यांच्या सासुरवाडीस बायको-मुलासह उपचारासाठी म्हणून गेले होत. तिथेच ते निवर्तले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. बातमी समजताच, चि. यशवंतला घेऊन मी तिकडे गेले होते. येताना त्यांच्या पत्नी, लक्ष्मीबाई व चिरंजीव मुकुंदास मी घेऊन इकडे आले आहे. आता ती दोघं माझ्याजवळच असतात. काळजी नसावी. आपली,

रमाबाई भ्र. भीमराव आंबेडकर

पत्नी रमाबाईचं हे असं दु:खद पत्र अमेरिकेतील त्यांच्या साहेबांना मिळालं. ते वाचून साहेबांना मोठा जबरदस्त धक्का बसला. आकाश कोसळल्यासारखे त्यांना झाले. वडील बंधू आनंदरावांच्या आधारावर सारा संसार सोपवून, ते अमेरिकेत पुढील (उच्च शिक्षण घेण्यासाठी) निश्चिंतपणे आलेले. त्यांचा तो एकमेव आधारच असा एकाएकी कोलमडून पडलेला पाहून, त्यांच्या डोळ्यांपुढे अंधार पसरला. लगेच त्यांनी आपल्या पत्नीला साऱ्या कुटुंबियांना सांत्वनपर पाठविलेल्या पत्रात अत्यंत शोकमग्न होऊन, त्यांनी लिहिलं...

न्यूयॉर्क: कोलंबिया युनिव्हर्सिटी

प्रिय रामूस,

तुझं पत्र मिळालं. बंधू आनंदरावास अशी एकाएकी 'देवाज्ञा' झाल्याची वाचून, मला धक्काच बसला. माझ्यावर असलेलं त्याचं कृपा-छत्र दैवानं असं कसं हिरावून घेतलं. दैवलीला विचित्र असते. माणूस योजतो एक नि दैवाच्या वा देवाच्या मनात असतं दुसरंच. 'आले देवजीच्या मना... तिथे कोणाचे चालेना' हेच खरं. माझी तर मतीच खुटीत झाली आहे. आता यापुढं आपलं कसं काय होणार? आपल्या संसाराचं काय होणार? काही कळेनासं झालंय. रामू, आपल्या संसाराचा सारा भार आता तुझ्या एकटीवर पडणार? तू तो भार पेलू शकशील? बाळारामदादा, तुमच्याकडं कधीमधी येत असतो? तुमचं साऱ्याचं तिकडं कसं काय चाललंय, ते सविस्तर नि ताबडतोब कळव. काळजी लागून राहिलीय.

आपला,

भीमराव रामजी आंबेडकर

भीमराव भावोजीचं हे असं पत्र वाचून झाल्यावर, लक्ष्मीबाई रमाबाईंशी डबडबलेल्या डोळ्यांनी बोलू लागल्या — 'बघ... रमा, भीमराव भावोजींना इकडील आम्हा साऱ्यांची कशी काळजी लागून राहिलीय... अगं, घार हिंडते आकाशी, तिचं लक्ष पिलांपाशी...'

रडून रडून रमाबाईंचा डोळं लाल झालेलं, सुजलेलं दिसत होते. त्या हातातलं पत्र उलट-सुलट करीत, सुन्न बसून होत्या. काही बोलत नव्हत्या. पण लक्ष्मीबाई मात्र रडत रडत पण बोलतच होत्या —

'भीमराव भावोजी जाताना घरखर्चासाठी थोडं पैसं देऊन गेलंत खरं... पण मडक्यात साठवलेलं पाणी किती दिस पुरणार? आमचं त्येंनी... मुकुदाचं वडील... पगारदार होतं... संसारात जिवंत झरा होता... तो एकाएकी आटला नि आमच्या तोंडचं पाणी पळालं... आता आमी पुढं कसं जगायचं...? कसं जगायचं? देवाऽऽ काय हा बिकट प्रसंग आणलास...?'

आपल्या पतीचं... मुकुंदाच्या वडिलांचं... नाव आठवताच लक्ष्मीबाईंना परत जोराचा हुंदका आला... तो आतल्या आत दाबत, डोळं पुसत त्या बोलू लागल्या —

'मुकुंदाचं वडील... आमच्यात पुरुष माणूस होतं- साऱ्यांना केवढा मोठा आधार होता त्यांचा... तिकडं विलायतेत भीमराव भावोजीबी त्यांच्या जीवावर सारा संसार टाकून, निस्‌चिंत होतं... सगळं कसं चांगलं चाललं होतं... पण देवाला हे बघवलं न्हायीऽऽ. देवानं आमच्यावर हा असा अवचित घाला घातला होऽऽऽ' असं म्हणून परत लक्ष्मीबाई आक्रोश करीत, हमसून हमसून रडू लागल्या... भ्रमिष्टासारखी त्यांची अवस्था झालेली...

रमाबाईंना आता रहावलं नाही. त्या उठल्या नि लक्ष्मीबाईजवळ गेल्या. त्यांना समजावीत आपल्या पदरानं त्यांचं डोळं पुशीत, धीर देत त्या म्हणाल्या, 'जाऊबाई, आता असं रडायचं न्हायी... असं आसू ढाळायचं न्हायी... देवाला कशाला दोष देता? दोष आपल्या नशिबाला द्या... आपलं नशीब फुटलं होतं म्हणा! दैव कुणाला कळत न्हायी नि दुर्दैव कुणाला टळत न्हायी... देवांना तरी कुठं भोग चुकलंत? रामाला वनवास चुकला न्हायी... पांची पांडवांनाही अज्ञातवास चुकला न्हायी... तिथं आमा माणसांचा काय पाड?'

'पण, आता आपल्या संसाराची गाडी अशी खुंटून बसलीय त्येचं काय?...'

'या खुंटलेल्या गाडीला आता आपण दोघांनी मिळून खांदा देऊ या... गाडी चलती ठेवू या...'

'रमा... माझ्या बहिणेऽऽ असं बोलणं सोपं असतं गं... पण करणं... महाकठीण गं बाई, महाकठीण!'

'असं कच खाऊन कसं चालेल... माणूस संकटांना बघून खचला की, कामातनं गेला, म्हणून समजावं... देव दुःख देतो, त्या दुःखाबरोबर ते सहन करण्याचं सामर्थ्यही देतो म्हणतात. असं खचायचं न्हायी. पदर खोचून संकटाशी झुंजाया उभं राह्यचं?'

'म्हणजे? म्हणजे, काय म्हणतेस?' लक्ष्मीबाईंच्या डोळ्यांतून गंगाजमुना घळघळून वाहू लागल्या... त्या गदगदून म्हणाल्या, 'हे दुःख सहन करण्यासाठी आमी काय करावं? आमाला मोलमजुरी करण्याची तरी सवय होते का गं?'

रमाई गंभीर होत पण निश्चयानं उत्तरल्या, 'आता ती सवय लावून घ्यायला हवी... आपूण कोण एवढं तालेवार लागून गेलोय? मोलमजुरी करुन जगणारीच आपली जमात... आपूणबी त्यांच्याबरोबर...'

'रमा... रमा... असा कसा गं ह्यो बिकट परसंग गुदरलाय आमच्यावर? देवाऽऽ आता तूच मारग दाखव...'

'जाऊबाई, देवावर हवाला ठेवून, मारग न्हायी सापडायचा? देवानं आमाला काय दिलं न्हायी? देव म्हणंल, तुमाला मी हातपाय दिलंत... डोकं दिलंय... जरा हातपाय हलवा नि डोकं चालवा... आपला मारग आपूनच शोधा... शोधा म्हंजी सापडंल... शोधायला बाहेर पडलं पाहिजे... रस्त्यावर गेलं पाहिजे... 'पोट लागलं पाठीशी... हिंडवते दाहीदेशी' —

एवढ्यात निळा लिफाफा हातात घेऊन, ताई पत्र... ताई पत्र... असं म्हणत शंकर तिथं घरात धावतच येतो —

'ताई... ताई... हे भावोजीचं पत्र दिसतंय... निळा लिफाफा... साहेब भावोजींचं पत्र –'

'बघू... बघू... काल परवा तर त्यांचं पत्र आलं होतं... लगेच आज...?'

रमाबाई ते पत्र मोठ्या उत्सुकतेनं, शंकरच्या हातातून हिसकावून घेते नि घाई घाईनं ते वाचू लागते —

न्यूयॉर्क : कोलंबिया विद्यापीठ

प्रिय रामूस, अ. आ.

माझ्या पत्राचे तुझे उत्तर येण्याआधीच, लगेच तातडीने मी हे पत्र लिहित आहे. बंधू आनंदरावांच्या मृत्यूची वार्ता समजल्यापासून गेले दोन दिवस मला झोपच आली नाही... बंधु आनंदरावांच्यामुळे इकडे मी निश्चिंत होतो. त्यांच्या मृत्यूमुळे तुम्ही पोरके झालाहात. तुम्हा साऱ्यांची मला चिंता लागून राहिली आहे. माझं अभ्यासावरलं लक्ष उडालं आहे. खूप विचार करुन, मी ठरविले आहे की, माझ्या पोटाला चिमटा देऊन तुमच्या हाता-तोंडाची गाठ पडावी, असे काहीतरी मला इकडे करावे लागेल. महिन्याला तीन-चारशे रुपये तरी घरखर्चासाठी तुम्हाला पाठवावे लागतील. तेवढाच बुडत्याला काडीचा आधार. मुंबईत एखादा वाणी तुम्हाला 'उसनवारीने' मदत करील असा मी शोधून पाहतोय. म्हणजे तुमची चिंता मिटेल. नंतर कळवीन. तुमचं कसं काय चाललंय ते ताबडतोब कळवा. चिंता लागून राहिलीय.

आपला

भीमराव आंबेडकर

'रमा... तिकडं भीमराव भावोजी, लई चिंतेत पडलेलं दिसतात... लागोलाग त्यांचं दुसरं पत्र आलंय...'

लक्ष्मीबाई असं बोलतेय पण रमाबाईचं लक्ष कुठंतरी होतं. त्या विचारमग्न होत्या. परत लक्ष्मीबाई बोलल्या, 'आँऽऽ तू कसल्या एवढ्या चिंतेत पडलीयास ? रमाऽऽ अगं, बोलत का न्हायीस ?'

रमाबाई विचारतंद्रीतून जाग्या होत उत्तरल्या, 'काय बोलू ? प्रसंग मोठा बाका पडलाय... काही सुचेनासं झालंय... साहेबांना या पत्राचं काय उत्तर द्यायचं, याचा मी विचार करतेय हो...'

रमाबाई परत क्षणभर विचारमग्न होत बोलल्या, 'जाऊबाई, आपून साहेबांना असं पत्र लिहू या...'

लक्ष्मीबाईनं उत्सुकतेनं विचारलं, 'कसं गं ?'

पोयबावाडी : मुंबई

आदरणीय साहेबांच्या चरणी साष्टांग दंडवत:

आपलं तातडीचं पत्र मिळालं. त्यातील मजकूर समजला. आपण आम्हा साऱ्यांच्या विषयी खूप चिंतेत पडलेला दिसताहात. देवाला घाला, कुणा चुकविता आलाय ? तरी आता आपण आमची चिंता करायची नाही. तुम्हाला शक्य असेल तरच आणि तेव्हाच आम्हाला पैसे पाठवा. त्यासाठी तुमच्या पोटाला चिमटा नको. आमची-आम्हा लोकांची उपासमार, ती आमच्या पाचवीलाच पुजलेली असते. त्यासाठी एवढं काय चिंतेत पडायचं ? जिवाची बाजी लावून, आम्ही इकडे तुमचा संसार चालवू... साहेब, आता काहीही होवो, आकाश कोसळो वा धरणी दुभंग होवो, पुढं टाकलेलं पाऊल मागं घ्यायचं न्हायी. तुमच्या पाठीशी मी खंबीर उभी आहे. आपण ही चिंता टाकून, आपल्या अभ्यासाला लागावं. आम्ही इकडील सर्वजण खुशाल आहोत. काळजी नसावी. थोरले बाळाराम-दादासाहेब, अधूनमधून चि. यशवंतसाठी म्हणून येतात. आमची विचारपूस करतात. पण पंढरपूरला त्यांची बायको वारल्यापासून त्यांचं लक्ष कुठं आहे संसारात ? असो. साहेब, कायबी करा... पण मामंजीचं तुमच्याविषयीचं सपान, या जन्मी तुम्ही खरं करुन दाखवा. एवढंच हात जोडून सांगणं.

आपली

रमाबाई भ्र. भीमराव आंबेडकर

रमाबाईंचं वरील पत्र लिहून व वाचून दाखवून झाल्यावर आश्चर्य करीत कौतुक करीत लक्ष्मीबाई उद्‌गारल्या —

'वाऽऽ गं वाऽऽ रमा! आज साधा सुतळीचा तोडाही तुझ्याजवळ नसताना, किती लाखाचा दिलासा, तू तुझ्या चिंताग्रस्त झालेल्या नवऱ्यास दिलास... खरचं, तू किती मोठी धीराची, मोठ्या डोक्याची, मोठ्या जिद्दीची बाई हायीस खरी! साहेब, कायबी करा, पण मामंजीचं तुमच्या विषयीचं सपान, खरं करुन दाखवा... खरंच, रत्नपारखी मामंजीनं, तुझी सून म्हणून केलेली खास निवड... किती योग्य होती, हे आज अनुभवांनी पटतंय गं... धन्य ते मामंजी नि धन्य त्यांची सून... रमा!'

'जाऊबाई, उगीच कौतुक करुन मला हरभऱ्याच्या झाडावर तुम्ही चढवू नका हं! यापुढं आम्ही जगायचं कसं? हा खुटलेला संसार आपण चालवायचा कसा? असा राक्षसासारखा महाभयंकर प्रसंग आपणा सर्वांसमोर 'आ' वासून उभा आहे... त्यावरही जालीम उपाय म्हणून, माझ्या ठेवणीतला, खास तोडगा मी योजून ठेवला आहे... अहो, तो तोडगा कसला? बीन भांडवली धंदाच आहे म्हणा ना तो?'

'आँऽऽ... बीन भांडवली धंदा? हे काय आणखी नवल?'

'नवल नाही जाऊबाई, यावर जालीम उपाय आहे तो... माझ्या आईनं माझ्या बालपणी, मला सांगितलेला, मला शिकवलेला, अगदी रामबाणासारखा अशा वेळी हुकमी उपयोगी पडणारा, रामबाण उपाय... जिथं जिथं गाई-म्हशीचं गोठे आहेत, तिथं तिथं... म्हणजे वरळी, लालबाग अशा ठिकाणी जाऊन... तिथं तिथं गाई-म्हशीचं शेण वाया पडलेलं असतं, तिथलं तिथलं सारं शेण... गोळा करुन आणायचं... रस्त्यावर पडलेलं शेणदेखील गोळा करायचं... त्या शेणाच्या गोल गोल गोवऱ्या करुन, त्या जवळच्या पडक्या भिंताडावर थापायच्या... तिथंच... त्यावरच... त्या गोवऱ्या... शेणी... तशाच वाळत ठेवायच्या... त्या चांगल्या वाळल्यावर, जळणासाठी म्हणून गिऱ्हाइकांना विकायच्या, अशा विकून येणाऱ्या पैश्यातूनच... आपला खुटून पडलेला संसाराचा गाडा चालवायचा... बोला, हाय की न्हायी, बीन भांडवली धंदा...?'

'शोभतेस गं रमाबाई... सुभेदार रामजी आंबेडकरांची... डोकेबाज, धाडसी नि मोठी हिकमती सून...!' लक्ष्मीबाई आश्चर्य करीत बोलल्या.

'आणखी एक माझं धाडस ऐका...' रमाबाई सांगू लागल्या. 'चार-सहा दिवसांनी- या बीन भांडवली धंद्याचं कसब शिकण्यासाठी म्हणून... वरळीला अशा कामाच्या-रोजगारावर मी नि गौरा जाणार आहोत...'

'मी बी येईन की तुमच्याबरोबर!'

'जाऊबाई, तुमी न्हायी यायचं रोजगाराला! मी नी गौराच जाईन... तुमी नुसतं घर सांभाळायचं... मुलाचं सारं बघायचं... कसं?'

रमाबाईंच्या या अजब कल्पनेनं, लक्ष्मीबाई आश्चर्यचकीत झालेल्या- यावर काही बोलायचं त्यांना सुचेना... शब्द फुटेना. लक्ष्मीबाईंची मती क्षणभर खुंटित झाली. त्या नुसत्या रमाकडे कौतुकानं पाहत, केवळ मान डोलावीत राहिल्या... मान डोलावीत राहिल्या...

पण आज रमाबाई वाट पहात होत्या त्या आपल्या पतीदेवाच्या पत्राची नव्हेत, खुद्द त्यांच्या त्या पतीदेवाच्या मुंबईत लवकरच होणाऱ्या आगमनाची.

तशी रमाबाई एक भारतीय स्त्री. हिंदु संस्कृतीत वाढलेली. पती हेच तिचं दैवत, तिचं सारसर्वस्व होतं. पतीला नुसतं लांबून पाहिलं तरी पत्नीला पृथ्वीवरच मोक्ष लाभल्याचा भास होतो म्हणे.

रमाबाईंचा पतिदेव तब्बल चार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आज, उद्या, चार दिवसांत तिच्याकडं येणार होता. पतीची व रमाबाईंची चार वर्षांनी दृष्टादृष्ट होणार होती. तिच्या जीवनाचा एकमेव मोक्ष तिला लवकरच प्रत्यक्ष दिसणार होता,

भेटणार होता. त्यामुळं रमाबाई मनोमनी कोण आतुर झालेली, किती हरखून गेलेली, आनंदून गेलेली. साऱ्या घरात तिच्या रुपानं साक्षात आनंदी आनंद वावरत होता. नाचत हुंदडत होता.

पण नियतीला रमाबाईंचा हा आनंद पहावला नाही की काय, कोण जाणे ? एक महाभयंकर बातमी भुसनळ्यागत घुमत मुंबई धक्क्यावर येऊन आदळली. सारं आंबेडकर कुटुंबीय त्यानं हादरुन गेलं. साऱ्या अस्पृश्य समाजात दुःखाचा एकच हलकल्लोळ उडाला.

'...लंडनहून मुंबईस येणारी आगबोट भूमध्य समुद्रात जर्मन पाणबुड्यांनी बुडविली.' आणि ही भयंकर वार्ता मुंबईतील साऱ्या वर्तमानपत्रांनी मोठ्या टाईपात प्रसिद्ध केली...

योगायोग त्याच वेळी डॉ. भीमराव आंबेडकर आगबोटीनंच मुंबईस येत होते आणि तीच बोट बुडाली असं सर्वत्र झालं. रमाबाईंनी ही भयंकर वार्ता ऐकली.

'अरेऽऽ माझ्या दैवाऽऽ' असं म्हणून मोठ्यानं ओरडून त्या जागच्या जागीच कोसळल्या. त्यांची शुद्धबुद्ध हरपली.

साऱ्यांची धावाधाव सुरु झाली. लंडनला तारातारी झाली. एवढ्या तारांना एकच उत्तर मिळालं. 'भीमराव आंबेडकर दुसऱ्यास बोटीनं मुंबईस सुखरुपपणे येत आहेत...'

आंबेडकरांच्या पोयबावाडीच्या चाळीसमोर जमलेल्या अगणित ज्ञातीबांधवांनी ही आनंदाची बातमी ऐकली आणि एकच हर्षकल्लोळ तिथं माजला. ते सारे ज्ञातीबांधव आनंदानं नाचू लागले. हर्षभरानं उड्या मारु लागले. त्यांनी मग उंच स्वरात घोष करायला सुरुवात केली.

'डॉ. भीमराव आंबेडकरांचा जयजयकार असो!'

'डॉ. भीमराव आंबेडकर चिरायू होवोत!'

या प्रचंड जयघोषानं शुद्धीवर आलेल्या रमाबाई चाळवून एवढंच बोलू लागल्या, 'माझं कुंकू ऽ ऽ... माझं कुंकू ऽ ऽ'

रमाबाई वेड्यासारखं करु लागल्या. रडू लागल्या.

रमाबाईला शांत करीत एक वृद्धा बोलली, 'रमाबाई ऽ ऽ डोळ्यांतन आता पाणी काढू नगंस. अगं, तुझं कुंकू लई बळकट हाय. त्येची दोरी लई दणकट हाय. तुझं कुंकू दुसऱ्या बोटीनं सुखरुप मुंबईला येतंय गं. का रडतेस अशी ? तू मोठी पतिव्रता हायीस. ऊठ. अगं, ती बोट बुडली ती दुसरीच!'

'काय ? बोट बुडली ती दुसरीच ? साहेब मुंबईला सुखरुप येताहेत ? देवा ऽ ऽ परमेश्वरा!'

भावनावेगानं नि मोठ्या आनंदानं रमाबाई एकदम अंथरुणात उठून बसल्या. साऱ्या बायांनी त्यांना घट्ट धरुन ठेवलं.

तेवढ्यात चाळीबाहेर जमलेल्या ज्ञातीबांधवांनी परत घोषणा द्यायला सुरुवात केली. रमाबाई कानात प्राण आणून ऐकू लागल्या —

'डॉ. भीमराव आंबेडकरांचा जयजयकार असो!'

'डॉ. भीमराव आंबेडकर चिरायू होवोत!'

आकाश दुमदुमून गेलं. रमाबाई आनंदानं फुलून गेल्या. पतिदेवासाठी रात्रंदिवस तळमळणारी, केवळ पतीच्या सुखासाठी जगणाऱ्या साध्वी रमाबाई ही आनंदाची बातमी ऐकून आनंदानं मोहरल्या. वर आकाशाकडं तोंड करुन, पाणावलेल्या नेत्रांनी हात जोडून, हृदयापासून देवाची त्या करुणा भाकू लागल्या. देवाऽऽ तुझी लीला अगाध... माझं कुंकू तू सांभाळलंस. यापुढं तुझा गुरुवार मी जलमभर करीन.

एवढ्यात बाहेर मोटार वाजल्याचा आवाज झाला. एकजण ओरडला, आंबेडकर साहेब आलेऽऽ. पुन्हा जयजयकार सुरु झाला. डॉ. आंबेडकरांनी आपल्या घरात प्रवेश केला. रमाबाईंनी उठून धावत जाऊन पतीदेवांच्या पायावर आपलं डोकं ठेवलं. त्यांचं पवित्र पदकमळ आपल्या अश्रुजलांनी धुवू लागल्या... भीमरावांचेही डोळे पाणावलेले दिसले... चार वर्षांनी दोन जीव भेटत होते...

सारा ज्ञातीसमाज आनंदानं, कौतुकानं ते दृश्य पाहू लागला. आपल्या हृदयावर कोरुन ठेवू लागला. साठवून ठेवू लागला.

• • •

१७

सकाळची नऊ-साडे नऊची वेळ, चहापान-नास्ता झालेला. सिडनहॅम कॉलेजचे अर्थशास्त्राचे फॉरेन रिटर्न्ड डॉ. भीमराव रामजी आंबेडकर याचं चाळीतलं घर.

प्राध्यापक महाशय अमेरिका-लंडनच्या वाऱ्या करुन आलेले. त्यात स्वारी अंगावर नीट-नेटके कपडे घालण्याच्या बाबतीत भारी शौकीन. आज कोणता सूट घालावा म्हणून त्यांची मघापासून सुटाची निवडच चाललेली. त्यांची आज्ञाधारक पत्नी रमाबाई त्यांच्या दिमतीला होतीच. तरी अजून निवड निश्चित होत नव्हती, निवड चालली होती. तीसुद्धा संत तुकोबाचा अभंग डुलत डुलत गुणगुणत — ***"गोडे तुझे रुप... गोड तुझे नाम***

देई मज प्रेम... सर्व काऽऽळऽऽ..."

असं डुलत गुणगुणत त्यांचं एकदा सुटाकडं तर एकदा रमाबाईंकडं रोखून बघणं चाललं होतं. पतिदेवाच्या डुलण्या-गुणगुणण्याबरोबर पत्नी रमाबाईसुद्धा त्यांच्या डुलण्या गुणगुणण्याच्या ताला सुरावरच बोलल्या.

'साहेब, कुणावरुन एवढं डुलून डुलून अभंग म्हणणं चाललंय आज?'

'बघा, आमचं मजेत येणं बघवेना की काय? रामूऽ अगं हा... देहूच्या त्या तुकोबा भक्तानं त्याच्या काळ्या तोंडाच्या विठ्ठल देवावरुन त्यानं रचलेला-म्हटलेला हा जगप्रसिद्ध अभंग आहे... आम्ही कशाला म्हणू तो इथं कुणावरुन? चोराच्या मनात चांदणं...'

'म्हटलं, तुमी कुणाचं भगत?'

'आम्ही भगत? आम्ही आमच्या देवीचं भगत... रमादेवीचं'

'इश्श! काहीतरीच काय बोलायचं ते? मी काय तुमची देवी? व्हईक का व्हन्यार?'

'खरं तेच बोललो... मेरी उनकी प्रीत पुरानी... मै उनका प्रेम दिवाना. सदैव माझ्यावर तू प्रसन्न असतेस. म्हणून मीच तुझा भगत...'

अशा स्तुतीनं रमाबाईही मग खुशीत येऊन बोलू लागल्या, 'अस्सं... अस्सं... अलीकडं भलतीच मजेत दिसतेय स्वारी, बडोद्याची नोकरी सुटली म्हणून की काय?'

'तसं काही नाही हं... हा स्वभावगुण... सोबत गुण. माझा स्वभावच असा क्षणात विनोदी... क्षणात तापट जमदग्नी... त्यात सोबतीला तू असली की, कशाचाच धरबंध मग राहत नाही. रामू... खरं म्हणजे बडोद्याची नोकरी ही मला जन्माची वरदान ठरलीय! माझ्या संबंध आयुष्याला पुरुन उरेल एवढं प्रत्यक्ष अनुभवाचं गाठोडं बडोदावासियांनी माझ्या हवाली

केलंय. त्याबरोबरच माझ्या भावी कतृत्वाला आव्हान देणाऱ्या विचारांची पोथडीसुद्धा त्यांनीच मला तोंडातोंड भरुन दिलेली आहे. माझ्या मनाच्या सुपीक जमिनीत क्रांतीचळवळीचं बीजदेखील त्यांनीच रुजवलं आहे... बडोदावासियांचा मी जन्माला ऋणी आहे.'

'बाई... बाई... तुमी पोरफेसर लोक बोलायला लागला म्हंजी कुणाला ऐकणार न्हायी. पण मला बाई समजलं न्हायी, तुमी काय बोलला ते?'

'द गऽऽऽड! बालबोधात सांगू? ऐक- बडोद्यात मला नाना कटू अनुभव मिळाले. आपण दिलेल्या मदतीनं अस्पृश्य समाजाला एक विद्यार्थी- म्हणजे मी हुशार निघाला म्हणून, सयाजीराव महाराजांनी बडोदे संस्थानच्या अर्थमंत्रीपदाची जागा मला देऊ केलेली. पण त्यांच्या दरबारातील सनातनी अधिकाऱ्यांनी, मला अजून कामाचा अनुभव नसल्याचे सांगून, त्यांनी माझी एक लष्करी कार्यवाह म्हणून नेमणूक केली... महाराचा पोर आपल्यापेक्षा अधिक शिकेल नि आपल्या डोक्यावर बसेल. पण महाराजांनी मला एक वर्षाची शिष्यवृत्ती वाढवून दिली होती तरी महाराचा मी पोर त्यांच्या डोक्यावर बसेन म्हणून त्यांच्या अधिकाऱ्यांनी मला तगादा लावून परत हिंदुस्थानात बोलावून घेतलं... माझ्या ऑफिसमधले नेहमीच अंथरलेले एक जाजम, माझ्या पदस्पर्शानं विटाळेल म्हणून दांभिक अधिकाऱ्यांनी ते जाजम पुरते गुंडाळू, कोपऱ्यात एका बाजूला ठेवून दिले, माझ्या हाताचा स्पर्श होईल म्हणून... माझ्या हाताखालील प्यून... शिपाई लोक... सही करण्यासाठी फायली दुरुनच माझ्या टेबलावर फेकायचे... बडोदे शहरातील पारशांच्या वसतीगृहात नाव बदलून मी राहिलो तरी मी अस्पृश्य आहे असे पारशांना कळल्यावर त्यांनी मला वसतीगृहाबाहेर काढले. अन् मी अक्षरशः रस्त्यावर... फुटपाथवर आलो... अन् इथंच माझ्या मनात क्रांती चळवळीची ठिणगी पडली... जगप्रसिद्ध कोलंबिया विद्यापीठाचा एम. ए. पीएच. डी. अशा बहुमानाच्या पदव्या घेऊनसुद्धा माझ्या हिंदुस्थानात मात्र साधे मानवाचे मुलभूत हक्कसुद्धा मला उपभोगता येऊ नयेत... यामुळं माझं डोकं सणकलं, ते अजून सणकलेलंच आहे. जन्मभर तसंच राहील... रामू... असे बडोदेवासियांचे अनंत उपकार आहेत माझ्यावर... असं जे म्हणतो, ते एवढ्यासाठीच...'

'खरचं बाई... माणूस चिंततं एक, देवाच्या मनात असतं दुसरंच... पण साहेब, जे होतं, जे झालं ते बऱ्यासाठीच... तुम्हाला प्रेरणा मिळाली...'

'हो... त्यालाही कारण तूच... तुझ्यासारखी पत्नी मिळाली नसती तर... ही प्रेरणाही मला मिळाली नसती... एवढा मोठा मी झालो नसतो...'

'एवढं काय हाय वोऽऽऽ माझ्यात! मी आपली अडाणी... दगड... धोंडा...'

'अगं... अशा दगडधोंड्यातच देव लपलेला असतो... आपल्याजवळ लाख मोलाची कस्तुरी आहे, हे कस्तुरीमृगाला कुठं ठाऊक असतं? तसं तुझं आहे, रामूऽऽऽ तुझ्या संगतीतला नुसता एकच प्रेमाचा क्षण पण तो मला वर्षभर भरुन उरतोय, हे तुला माहीत आहे काय? विलायतेतील चार वर्ष, तुझा नुसता फोटो बघून मी काढलीत! मैं उनका प्रेम दिवाऽऽना!'

'इश्श! परत तेच. कुणी ऐकलं तर म्हनतील की, एवढा मोठा विद्वान, इलायतहून शिकून आलेला साहेब, पण पुरता कामातनं गेलात वोऽऽऽ अक्षी बाईलयेडा हाय बाईलयेडा.'

'अगं, मला बाईलवेडा कुणी म्हटल्यावर तुला त्याचा अभिमानच वाटायला पाहिजे. साऱ्या बायकांच्या नाकावर टिच्चून तू मग म्हणू शकतेस, म्हटलं, ठेवलाय मी माझा नवरा अस्सा मुठीत —'

साहेबांच्या ह्या विनोदावर रमाबाई खळाळून हसत हसत नकळत त्या साहेबांच्या निकट गेल्या. तेवढ्यात साहेबांनी रमाबाईंच्या गालावर प्रेमभरे टिचकी मारली.

रमाबाईंच्या लिंबू रंगाला लगेच गुलाबी पण आलं, साहेब तिकडं बघतच राहिले.

‘एवढं काय बघायचं टक लावून ते ? कंदी बघितली नव्हती मला ?’

‘सुंदरपण ते... जे कितीही वेळा बघितलं तरी पुन्हा पुन्हा बघावसं वाटतं.’

साहेब परत तो अभंग गंमतीनं डुलत डुलत गुणगुणू लागले —

“गोड तुझे रुप... गोड तुझे नाम

देई मज प्रेम... सर्वऽऽऽ काऽळ...”

‘परत तुमचं तेच. उठरं चिंदा नि तोच धंदा...’ जरा थांबून रमाबाई म्हणाल्या, ‘साहेब, आज तुमचा पगार असेल ?’

‘हांऽऽऽऽ आज माझ्या प्राध्यापकीचा पहिला पगार आहे. तो मी आज माझ्या गृहलक्ष्मीच्याच हाती देणार आहे... जगाला मी एवढा मोठा शिकलेला दिसतोय, पण मला असं मोठं होऊ दिलं माझ्या या रामूनंच... फूल फुलावं म्हणून झाड रात्रं-दिवस धडपडत असतं. लोकांना ते फुललेलं फूल तेवढंच दिसतं. वर्षानुवर्षे झाडानं त्यासाठी केलेली धडपड मात्र लोकांना दिसत नाही... पण त्याची कृतज्ञतेने आठवण ठेवावी लागते त्या फुललेल्या फुलानं...’

साहेबांच्या अशा बोलण्यानं रमाईच्या डोळ्यात पाणी तरारलं. साहेबांना ते दिसलं. रमाबाईंच्या जवळ जात त्यांनी हळूवारपणे विचारलं, ‘रामूऽऽऽमू... तुझ्या डोळ्यांत अश्रू ?’

‘केल्या कष्टाचं चीज तुमी असं केलंत, म्हणून हे आनंदाचं आसरु’ साहेबांच्या विशाल छातीवर डोकं ठेवून डबडबलेल्या डोळ्यांनी रमाबाई सांगू लागल्या.

‘साहेब, आता खरंच होऽऽ पुष्कळ झालं हे... मला आता आपला चिमुकला संसार मांडावासा वाटतो... अजून तुमी कुठेतरी मोठ्या पगाराची नोकरी बघावी... खूप मोठा पगार तुमी मिळवावा... आपलं चिमुकलं घर... पण खूप सजवावं... नटवावं... टेबल, खुर्ची, कपाट, पलंग, अन् मुला-फुलांनी ते घर कसं गजबजून जावं... असं मला आता सारखं वाटू लागलं हाय... साहेब, आता हे पुष्कळ झालं होऽऽऽ.’

अजून शिकण्यासाठी परत आपणास लंडनला जायाचं आहे, हे लगेच आता बोलून दाखवून, रमाबाईंना अशावेळी विरस करायचा साहेबांचा विचार नव्हता. त्यांना हा विषय इथेच बदलायचा होता. ते म्हणाले, ‘अगं... अगं... हे बघ, घड्याळात किती वाजले ? अन् ती बघ ती तुझी जाऊबाई मंडईतून भाजी घेऊन आली. लागा सैपाकाला... मी चलू... ओऽऽ के...’

हसत हसत असं म्हणून साहेब खाड्खाड् बूट वाजवीत कॉलेजला चालले... रमाबाई त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडं तिथंच पहात उभ्या राहिल्या. कितीतरी वेळ... ओठांतल्या ओठांत पुटपुटत.

माझा पती एकदाचा संसाराला लागला. माझा देव माझ्या नवसाला पावला म्हणायचा. माझं उपास-तापास फळाला आलं... रमाबाई आनंदानं फुलून मोहरुन गेल्या. त्यांना काय करु नि काय नकोसं झालं. संसार मांडण्याच्या रम्य स्वप्नात त्या पुरत्या रंगून गेल्या. कितीतरी वेळ, त्या तशाच बाहेर उभ्या होत्या... सुखी संसाराच्या स्वप्नात रंगून...

रमाबाईंचं आज सारं लक्ष आपल्या पतीराजांच्या आगमनाकडे लागलेलं. त्यांच्या कॉलेजातल्या नोकरीचा पहिला पगार आज ते घेऊन येणार होते. तो पगार प्रथम ते आपल्या गृहलक्ष्मीच्या-रमाबाईच्या हाती देणार होते. त्यामुळे रमाबाईंचं सारं लक्ष त्यांच्या घरी येण्यावर एकमेव केंद्रीत झालेलं... जाणारं एक एक मिनिट रमाबाईला अवघड वाटू लागलं. त्यांची हुरहूर वाढू लागली. छाती उगीचच धडधडू लागली. डोळ्यांची पापणीच लवेना. असं डोळे लावून वाट बघत बसलं की, असंच येणाऱ्या व्यक्तीला वेळ होत असतो म्हणून, रमाबाई नाईलाजानं स्वयंपाकघरात गेल्या.

तेवढ्यात साहेब मोठ्या खुशीत पण घाईघाईनं पावलं टाकीत घरी आले.

'ए सुडक्या, ए मक्या! त्यांनी मोठ्या आनंदानं, तेवढ्याच घाईनं मुलांना काहा घातल्या. हाकेसरशी यशवंत व मुकुंद धावून आली...'

'सुडक्या... तुझ्या आईला बोलाव बघू आधी... मक्या तुझ्या आईलाही बोलाव...'

यशवंत आईला घेऊन आला. लक्ष्मीबाई आली. रमाबाईंच्या हातात आपला सर्व पगार देत साहेब म्हणाले,

'हा माझा प्राध्यापकीचा पहिला पगार आहे. गृहलक्ष्मी म्हणून तुझ्या हातात देतो आहे... पोरांच्यासाठी नवीन कपडे घ्या... काही गोडधोड करुन खावा... सर्वांना चारा... आनंद करा.'

रमाबाई बोलल्या, 'हा सारा पगार प्रथम रामजीबाबांच्या, मामंजींच्या प्रतिमेपुढं ठेवू या. त्यांचंच हे कष्ट... आज असं फळाला आलंय... त्यांना प्रथम आशिर्वाद मागू या...'

साहेब हर्षभरित होऊन बोलले, 'बरोबर... रमा, तुझी कृतज्ञता जागी आहेस... तू धन्य आहेस!'

रमाबाईंनी तो पगार रामजीबाबांच्या प्रतिमेपुढं ठेवला. लक्ष्मीबाईंनी उदबत्ती लावली. यशवंत व मुकुंदही हात जोडून उभी राहिली. साहेब प्रतिमेपुढं नतमस्तक झाले.

रमाबाईंनी दुसऱ्या दिवशी साहेबांच्या इच्छेप्रमाणं मुला-बाळांना, जावा-नणंदांना, जवळच्या नातलगांनादेखील स्वत: बाजारात जाऊन नवीन कपडे खरेदी केले. साऱ्यांना गोडधोड खाऊ घातलं. स्वत:च्या संसारासाठी रमाबाईंनी काही शोभेच्या वस्तूही खरेदी केल्या.

शेजारच्या स्त्रियांचे सुखी संसार पाहून सहाजिकच रमाबाईंनाही वाटू लागायचं, आपल्या नवऱ्यानं आपल्या संसारात लक्ष घालावं. कमी-जास्त पहावं, मुलांना आंजारावं-गोंजारावं. नवरा बायकोनं कसं राघू-मैनेच्या जोडीसारखं गुलूगुलू करीत आनंदानं रहावं... सगळ्यांपेक्षा आपला पती अधिक शिकलेला आहे, अधिक पगारवाला आहे. आपला संसार सर्वांपेक्षा अधिक उठून दिसायला हवा.

त्यांना वाटत होतं की, त्यांच्या साहेबांनी आता चांगलंच लक्ष घतालंय. त्यामुळे रमाबाई आपल्या संसाराची रंगीत-संगीत स्वप्न अधिक तन्मयतेनं रंगवू लागलेल्या, रात्रं-दिवस त्या त्यातच तल्लीन झालेल्या...

प्राध्यापक साहेबांना रमाबाईंना सांगायचं होतं. 'रामू, हा माझा पहिला पगार... हा पहिला पगार भुताला गेला असं समज. पण दुसरा पगार... असा बेभानपणे खर्चून चालणार नाही. दुसऱ्या पगारापासून तुला माझ्या बॅरिस्टरीच्या शिक्षणासाठी काहीतरी बचत करुन बाजूला ठेवायला पाहिजे... बॅरिस्टर होण्यासाठी मला अजून लंडनला जायाचं आहे... मला बॅरिस्टर व्हायचं आहे.'

पण रमाबाईंच्या या ओसंडून चाललेल्या आनंदापुढं साहेबांना असं काही बोलताच येईना. याच साध्वीनं, आपण उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस गेल्यावर मोठ्या मुष्किलीनं आपला घर-संसार चालविला होता. त्यासाठी पराकाष्ठेचे हाल तिनं उपसले होते. नव्हे, रोजंदारीवर, मोलमजुरीदेखील त्यासाठी तिनं केली होती. त्या साध्वीचा आता असा कसा विरस करायचा? कसा? स्त्रीसुलभ भावनेप्रमाणे तिला वाटू लागणार की, आपण एवढं दु:ख काढलं... आता आपल्या पतिराज विलायतेहून खूप शिकून आलाय... त्यानं आपल्या पत्नीमुलाबाळांस आता सुखाचं दिवस दाखवायला नको का?

रात्रं-दिवस रमाबाईंचं हेच- असेच विचार चाललेले असायचे... घर कसं सजवायचं?... ह्या खिडकीवर हिरवा, गुलाबी रंगाचा पडदा चालेल. पण त्या खिडकीवर फुलाफुलांचा सुंदर पडदा लावावा लागेल. गादीवर रोज नवनवीन बेड्शीट्स... उशांचे कव्हर्स बदलायला हवेत. अन् त्या कोपऱ्यात... स्टुलावर रंगीबेरंगी टपोऱ्या फुलांची देखणी फुलदाणी ठेवून द्यायची. हां, आणखी एक कपाट घ्यावं लागेल... त्यात साहेबांची सगळी पुस्तकं व्यवस्थित लावून ठेवावी लागतील. हो, खरं कसं प्राध्यापकाला शोभेसं असं नको का सजवायला? त्यात भरीस भर, ते अस्पृश्यांचे पुढारीबी आहेत...

अन् रमाचे साहेब... तिच्या या वागण्याला मनातून जळफळत मनातल्या मनात म्हणत होते... पगाराला अशी खर्चाची अनेक तोंड फुटली, तर आपल्याला ते नियोजित ध्येय- शिखर कसं गाठता येणार? बॅरिस्टरीसाठी परत मला लंडनला मग कसं जाता येईल? मी बॅरिस्टर झाल्याशिवाय मी जगूच शकत नाही... नाही... नाही... नाहीऽऽऽऽ

प्रा. भीमराव आंबेडकरांचे हे असे विचार चाललेले, तर पत्नी रमाबाई आपला संसार यापुढं कसा मांडायचा, कसा सजवायचा, यात दंग झालेली...

पण नियतीच्या मनात होतं तिसरंच!

प्रा. भीमराव आंबेडकर कधी नाही ते, आज खाटेवर आपल्या प्रिय पत्नीच्या अगदी जवळ, चिकटून बसून तिच्या कानात गुलूगुलू गोष्टी करीत होते. रमाबाईंचं डोकं दुखत होतं. म्हणून त्यांच्या कपाळाला अमृत-मलन लावून, त्याचं डोकं ते हळूहळू चोळू लागले होते. शिकण्यासाठी परत आपणाला लंडनला जावं लागणार आहे... असा व्यर्थ खर्च यापुढं करु नकोस हे तिला सांगण्यासाठी ते हळूहळू प्रयत्न करुन पाहू लागले होते. नित्य कष्टलेल्या जीवाला परत कसं दु:खात टाकायचं? म्हणून त्यांना ते काही बोलायचं जमत नव्हतं... अखेर ते हळूवारपणे बोललेच, 'हे बघ रामू, तशी ही... आताची शिक्षकाची प्राध्यापकाची नोकरी म्हणजे माझ्या जीवनाचं काही सारसर्वस्व नव्हे. मला कुठं त्या कॉलेजात सारा जन्म काढायचा आहे?...'

रमाबाई साहेबांच्या या बोलण्याकडं रोखून पाहू लागल्या. कानात प्राण आणून ऐकू लागल्या... त्यांना त्यामुळे आश्चर्याचे धक्के बसू लागले होते.

साहेबांनी ते चांगलं ओळखलं होतं, जाणलं होतं. तरी ते धीटपणे पुढं सांगूच लागले होते, 'खरं सांगायचं म्हणजे... म्हणजे... रामू... अजून मला... मला पुढील शिक्षणासाठी लंडनला... हा... हा... लंडनला जायाचं आहे... अजून जायाचं आहे... अजून जायाचं आहे...'

'साहेब परत... पुढील शिक्षणासाठी... परत लंडनला जाणार?...' अन् हे ऐकताच रमाबाईंना एक मोठा जबरदस्त धक्काच बसला. त्या धक्क्यानं त्यांनी आतापर्यंत उभारलेल्या, रंगवलेल्या साऱ्या स्वप्नांचा चुराडा चुराडा झाल्याचा त्यांना भास झाला. त्यांच्या डोळ्यापुढं एकदम गडद अंधार दाटून आला. त्यावर साहेबांना काय बोलावं हे रमाबाईंना काही सुचेना. बोलण्यासाठी रमाबाईंचे ओठ हलत, पण त्यांतून शब्द काही बाहेर पडत नव्हता. पुतळ्यासारख्या त्या स्तब्ध होत्या. फक्त डोळ्यांतून टपटप आसवं गळत होती.

रमाबाईंची अशी केविलवाणी अवस्था होईल, हे प्रा. भीमरावांनी जाणलं होतंच. ते आपल्या विचारांचं घोडं पुढं दामटू लागले.

'रामू, काय बोलणार तू यावर? तुझ्या संसाराची सारी स्वप्न पार पार हवेत विरघळून गेलीत... तुला यावर काय बोलावं हेच काही सुचत नसेल... सुचत असेल तर, बोलता येत नसेल, खरं आहे ते...'

क्षणभर थांबून रमाईंचा अंदाज घेऊन परत साहेब बोलू लागले.

'आणखी काय शिकायचं राहिलंय... वोऽऽऽ साहेब?' असं मला तू उपरोधिकपणे मनातल्या मनात म्हणत असशील... तुला तसं वाटणं सहाजिकच आहे... खरं आहे ते... पण रामू... संसारसुखाचं तुझ्या डोळ्यावर आलेलं हे मायावी मोहजाल जरा बाजूला सारुन जरा आठव... आठव... तुझ्या परमेश्वर मामंजींची अखेरची इच्छा तू आठव... तुझ्या मामंजींचं माझ्याविषयीचं त्यांचं ते स्वप्न आठव... त्यांची ती इच्छा पूर्ण करण्यासाठी... त्यांचं ते स्वप्न साकार करण्यासाठी मला लंडनला जाऊन बॅरिस्टरची परीक्षा द्यावीच लागेल... कोट्यवधी अस्पृश्यांच्या अन्यायाला जगाच्या वेशीवर टांगायचं आहे... त्यासाठी कायद्याच्या ज्ञानाची, विद्येच्या सामर्थ्याची कवचकुंडले मला अंगावर चढवून घ्यावीच लागतील... बॅरिस्टर झालो तर

नोकरी न करता वकील म्हणून मला स्वत:ला स्वत:च्या पायावर उभं राहता येईल. खऱ्या अर्थानं मला समाजकारण व राजकारणही बिनधास्तपणे करता येईल.

मघापासून मुकस्तंभासारखी आसवं ढाळीत खाटेवर पडून राहिलेली रमाबाई एकदम उठून बसल्या, चढत्या स्वरात बोलू लागली, 'साहेब... मला या अडाणीला यातलं काय कळणार? मला एवढंच कळतं की, तुमच्या इच्छेच्या आड मी यायचं न्हाय. तुमच्या मनात जे जे असंल ते ते तुमी मिळवा... घरच्यांचं मागं कसं होईल, कसं होईल, ते तुमी पाहू नगा... त्येचा विचारबी करु नगा... मामंजींचं स्वप्न... त्येंची इच्छा, तुमाला... मला पुरी करायची हाय... त्यासाठी पडंल ती किंमत द्यायची तयारी आपून ठिवली पाहिजी... आगीतून जाळून घेऊन निघाल्याशिवाय सोन्याची परीक्षा होत न्हायी...'

रमाबाई महापतिव्रता... साहेब हे त्यांचं आराध्यदैवत. पतीच्या सुखासाठी स्वत:च्या सुखी संसाराचं मनात रंगलेलं स्वप्न त्यांनी स्वत:च्या हातांनी पुसून टाकलं. डोळ्यांतून आसवं गळत होती, तरी मोठ्या अभिमानानं त्या म्हणत होत्या —

संसार... संसार... संसार... सारं जगंच करतं. कावळा, चिमणी, पशुपक्षीही संसार करतात... पण आमाला तसला संसार करायचा न्हाय... आमाला साऱ्या जगाचा संसार करायचा हाय... आमाला आमच्या समाजाच्या कल्याणाचा संसार करायचाय. आमाला आमच्या मामंजींच्या सपनाप्रमाणं संसार करायचाय... माझ्या पतिदेवाच्या इच्छेनं करायचाय... साहेब, काळजी करु नगा. मी सांभाळीन.

एखाद्या दीपशिखेप्रमाणं रमाबाई ह्या वेळी दैदीप्यमान दिसत होत्या. तेजस्वी दिसत होत्या. त्यांचा स्वर ठाम होता. विचार दृढ होता.

रमाबाईंचं ते तेजस्वी जाज्वल्यमय रुपडं पाहून प्रा. भीमराव मनातल्या मनात आनंदून म्हणू लागले.

खरंच, मी मोठा भाग्यवान म्हणून मला असली पत्नी मिळाली, असली अनुगामिनी पत्नी मिळाली... म्हणून माझं भवितव्य चतुर्थीच्या चंद्रकोरीप्रमाणं उजळत आहे. रामू... खरचं, तू देवता आहेस देवता!

— साहेबांनी असं सारं समजावून सांगितल्यानंतर पतिरायण रमाबाई आपला संसारगाडा अत्यंत काटकसरीने चालवू लागल्या. पतिदेवाच्या पुढील शिक्षणासाठी त्या पैसा-पैसा साठवू लागल्या. त्यांना माहीत होतं की, साहेबांनी एकदा का एखादी गोष्ट करणार म्हणून ठरविलं की, मग कितीही अडचणींचे डोंगर त्यांच्या आडवे आले तरी ते सारं ओलांडून पुढे जाणारच नि ती गोष्ट करणार म्हणजे करणारच.

साहेब रमाबाईंना दर महिन्यासाठी घरखर्चासाठी ५० रु. देत असत. रमाबाई शिकेलल्या नव्हत्या, तरी खर्चाचा हिशोब ठेवण्याच्या बाबतीत त्या अत्यंत दक्ष होत्या. साहेबांनी दिलेल्या पन्नास रुपयांत महिन्याभराचा घरखर्च सांभाळण्याचा त्यांचा प्रकार गंमतीचा होता. महिन्याला तीस दिवसांसाठी कागदाच्या तीस तुकड्यांत त्या प्रत्येकी दीड रुपया ठेवून तीस पुरचुंड्या करुन ठेवीत असत. अशाप्रकारे साहेबांनी दिलेल्या ५० रु. पैकी ४५ रुपयांची अशी सुरक्षित व्यवस्था केल्यानंतर आणीबाणीसाठी म्हणून ५ रुपयांची एक पुरचुंडी करुन ती बाजूलाच ठेवलेली असायची. अत्यंत निकड लागली तरच ती पाच रुपयांची पुरचुंडी उघडली जायची. ह्या साऱ्या पुरचुंड्या एका कापडात व्यवस्थितपणे बांधून ठेवलेल्या असायच्या. प्रत्येक दिवसाला एक पुरचुंडी उघडून दिवसाला दीड रुपयाच केवळ खर्च केला जायचा. त्यापेक्षा वरचढ खर्च कधीही न होऊ देण्याबाबत रमाबाई अत्यंत दक्ष असत. अशाप्रकारे अत्यंत काटकसरीनं रमाबाई आपला संसार चालवून बाकीचे पैसे साहेबांच्या शिक्षणासाठी, साहेबांना परत लंडनला जाण्यासाठी म्हणून जतन करुन ठेवू लागल्या. एवढेच नव्हे, रमाबाई स्वत: शेणी थापून, त्या विकून नित्य आजारी पडणाऱ्या यशवंताच्या औषध-पाण्याचा खर्च त्यावर चालवी.

अशा स्वत:च्या हातानं शेणी थापताना रमाबाईंना कधी कधी आपल्या आईची प्रकर्षानं आठवण येई. लहानपणी त्यांच्या आईनेच शेणी थापून त्या विकून संसार चालविण्याचा महामंत्र त्यांना दिलेला होता. तो असा कारणी लागत होता.

— रोज रात्री नित्याप्रमाणं जेवळ झाल्यावर अभ्यासिकेत बसून जीवाभावाच्या रोज गप्पागोष्टी चालत. त्यात चालू घडामोडीपासून ते समाजकारण, राजकारण आदी विविध विषयांवर चर्चा चालत. जणू प्राध्यापक महाशय आपल्या अशिक्षित,

अज्ञ पत्नीला आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचे डोस देऊन, नवनवीन विचारांचे घुटके पाजून शहाणे करु पहात होते, प्रबुद्ध करु पाहत होते. तशा, रमाबाई एक चाणाक्ष श्रोत्या होत्या.

आजच प्राध्यापक महाशय, डॉ. आंबेडकर कोल्हापूरजवळील माणगाव येथे भरलेलल्या अस्पृश्यांच्या पहिल्या परिषदेला जाऊन आलेले. डॉ. आंबेडकर आज त्यावर बोलत होते. आपल्या पत्नीला खुलवून सांगत होते, 'छत्रपती शाहू महाराज म्हणजे अस्पृश्योद्धाराचं कंकण बांधलेला महाराष्ट्रातील एक रणझुंजार समाजसुधारक... अस्पृश्य समाजाला प्रथम त्यांनीच आईच्या ममतेनं जवळ घेऊन, त्यांना ते परोपरीनं उत्तेजन देत आहेत. त्यांच्या स्वतःच्या मोटारीचा ड्रायव्हर महार आहे. त्यांच्या सोन्याच्या अंबारीचा माहुत एक महारच आहे. थोडेबहुत शिकलेल्या महार-मांग-चांभारांच्या अर्धशिक्षितांना तर त्यांनी आपल्या राज्यात वकिली करण्यासाठी त्यांना वकीलीच्या सनदा देऊन टाकल्या आहेत... एवढंच नव्हे, अस्पृश्य विद्यार्थ्यांच्यासाठी मोफत जेवणाखाण्याची व शिक्षणाची व्यवस्था त्यांनी केलेली आहे... असा थोर माणूस परिषदेत जणू देववाणी बोलला.

माझ्या बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे, तर अशी एक वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. अशी माझी मनोदेवता मला सांगते. यापुढे साऱ्या अस्पृश्य वर्गांनी एकत्रित येऊन आपली स्वतंत्र अशी एक मजबूत संघटना स्थापन करुन, त्याचा एक स्वतंत्र पक्ष बनवून त्याद्वारे स्वतःचे प्रश्न त्यांनी स्वतःच लढून-झगडून मिळविण्यासाठी, त्यांनीच स्वतःच्या पायावर आता उभे रहावे. आईचं प्रेम, कधी दाई देऊ शकत नाही. त्यांनी स्वतःचा नेता स्वतःच्याच समाजातून निवडून त्याच्याच नेतृत्वाखाली आपल्या हक्कासाठी, आपल्यावरील अन्यायाविरुद्ध सतत लढावे... मेंढ्यांचे नेते कधी खाटीक होऊ शकत नाहीत, हेही अस्पृश्यांनी पक्कं लक्षात ठेवावे...

रमाबाईंना प्रा. आंबेडकर पुढे म्हणाले की, 'महाराजांच्या बोलण्याचा सार रोख माझ्यावर होता असं का म्हणेनास. पण शाहू महाराज किती मौलिक बोलले! किती थोर आहेत त्यांचे हे विचार! रामू, तुझ्या मामंजीच्याच मनातले सारे विचार हा महामानव बोलला! त्यामुळं माझ्यातला आत्मविश्वास अधिकच बळावलाय. परिषदेनंतर संध्याकाळी तो महान छत्रपती राजा आपल्या लवाजम्यासह, आम्हा दीन-दलितांच्या आमच्या पंक्तीला बसून जेवला!'

'ऐकलंय वोऽऽऽ म्याबी खूप ऐकलंय वोऽऽऽ शाहू महाराजांच्या विषयी... आमचं लोक त्यांना देवाचा अवतार म्हनत्यात... बडोद्याच्या सयाजीराव महाराजांचं शाहू महाराज पाहुणे लागतात म्हणे!'

'होय... लागतात नव्हे, हे दोन पाहुणे मनानं एकच दिसतात. सयाजीराव महाराजांनी माझ्या पुढील शिक्षणासाठी, अमेरिकेस जाण्यासाठी मला जशी मदत केलीय, तशीच मदत त्यांच्याच एका पाहुण्यांनी, शाहू महाराजांनी माझ्या बॅरिस्टरीच्या शिक्षणासाठी, लंडनला जाण्यासाठी, मला जरुर ती मदत देऊ केली आहे म्हटलं!'

'काय म्हणताऽऽ यसाऽऽ! खरंच वोऽऽ माझ्या नवसाला देव पावला वोऽऽऽ!' रमाबाई आनंदी होत बोलली.

'अगं, एवढंच नव्हं, माझा तो जीवश्चकंठश्च मित्र... तो नवल भाटेना, त्यानंसुद्धा लागेल तेवढे पैसे, लागेल तेव्हा देण्याचं कबूल केलं आहे... रामूऽऽऽ तुझा हा पतिदेव आता लंडनला जाणार... बॅरिस्टर होणार...'

'अगंऽऽ बाई, मला मग माझ्या शेजारणी म्हणतील, बघा... बघा... हिचं वोऽऽ ही बॅलिस्टरीन बाई... नवरा एवढा मोठा बॅलिस्टर झालाय. पण हिचं काय... शेणी थापायचं काम काही अजूनबी सुटलं न्हायी!'

'कसं सुटणार? आधी होता बाघ्या... दैवयोगे झाला पाग्या... त्येचा येळकोट काही राहिना... मूळस्वभाव काही जाईना...'

दोघंही मग आनंदानं भरतं येऊन हसले. एकमेकांकडे पाहून ते खळाळून हसले. डॉ. आंबेडकर गमतीनं म्हणाले, 'येऽऽ राऽऽ मूऽऽ लंडनला जाण्याच्या माझ्या तयारीला तू आतापासूनच लाग हं... ऐनवेळी तुझी धावपळ होईल...

'व्हवू देऽऽऽ व्हवू देऽऽऽ' असं म्हणत रमाबाई आनंदतिशयानं पतिदेवाच्या कुशीतच एकदम शिरल्या. उर भरुन आलेला आनंद एकमेकांत वाटून घेण्यासाठी रमाबाई तिथंच विसावल्या... तिथंच विसावल्या...

• • •

१८

१९२० च्या जुलैच्या सुरुवातीस साहेब बॅरिस्टरीसाठी लंडनला गेले. लंडनला रवाना होऊन आज चार दिवस झालेले.

साहेब गेल्यापासून रमाबाईंनी चार दिवस अंथरुणच धरलेलं. जाताना साहेब, घरखर्चासाठी काही पैसे रमाबाईजवळ ठेवून गेलेले. त्यामुळं घर चाललेलं.

'रमा, अगं कशाला उठतेस? बरं न्हाय तुला. बाहेर पाऊस हाय. पावसाळी दिवसात तुला बरंच नसतं. थोडं सांभाळायचं ते. मी हाय सैपाकाला. भांडीकुंडी घासेल गौरा. झोप बघू तू.' थोरली जाऊ लक्ष्मीबाई बोलल्या.

झोपून कसं वोऽऽऽ चालंल? झोप तरी येईल कशी? पावसाळा हाय. पर मला अजून बरं हाय. यशवंत, मुकुंद, शंकर... लहान लहान जीव हायीत. पोटार्थी मुलं. वाढतं वय... त्येंना वेळेवर नसलं तरी पोटभर हवं. तुमी, गौरा व मी... तिघी बाया... भरपूर नसलं तरी जगायापुरतं पोटाला हवं... आपल्या बिछान्याची बळकटी वळत रमाबाई बोलल्या.

'म्हंजी? तू शेणी थापायला वरळीला जाणार की काय?'

'आज न्हाय... उद्या, परवा जाया होतं, त्येच्या बिगार निरवा न्हाय.'

'बरं असल्यावर जा... वळकटी का वळलीस? बरं न्हाय, पडून रहा.'

लक्ष्मीबाईनं परत बिछाना केला. उशी दिली. उशीवर कलंडत रमाबाई क्षणभर विचारात पडून बोलली.

'काय वोऽऽऽ जाऊबाई, साहेब... बोटीत बसून नाना इच्चार करत असतील. वर वर साहेब दिसतात बलदंड, उंचापुरी... पर हुर्द्यानं लई लई काकाळू हायीती... बीलबिलीत काळजावानी. आईचं कुणी नाव काढलं, बाबाचं कुणी नाव घेतलं की, स्वारी ढसाढसा रडाया लागतीया, एखाद्या बाईवानी... लई लई मोठं हुर्द हाय त्येंचं... आभाळा एवढं... हा, म्या बगीतलंय ते!' लक्ष्मीबाईचं लक्ष सैपाकाकडे लागलेलं.

'बाई... तुमी ऐकताय नव्हं? आवं, मनाची अशी शिरमंती असल्यावर ही गरीबी काय दूषण न्हायी वोऽऽ आपलं व जगाचंबी भलं व्हावं म्हणून ह्यो वनवास पत्करलाय नव्हं. ह्यो वनवास बी म्हणूनच सुखाच हाय. ही कष्टदशा अशीच राहणार हाय? इकडंची सावली, तिकडे व्हायला कितीसा वेळ लागणार? गौरा मैनेऽऽ, चहा ठेव जरा शेगडीवर... ऊन ऊन घोट जाऊ दे पोटात... जाऊबाई... अवोऽऽ एवढी साध्वी सीतामाई, तिला देखील वनवास चुकला न्हायी... मग आमी कोण? गौरा, शंकर कुठं गेलाय गं?'

'गेला असंल वाती, पीना... वाईसर इकाया' गौरा बोलली.

'सकाळी... सकाळीच...? न्हायारी न करताच? एवढासा जीव, केवढी धडपड!'

‘त्येंचा मेव्हना गेलाय नव्हं विलायतला शिकाया... बॅलिस्टर व्हायला... बॅलिस्टर होऊन आल्यावर मग हा बसून खाईल तो... आधी हाताला चटके, मग मिळते भाकर....’

रमाबाईंचा लहान भाऊ शंकर व बहिण गौरा रमाबाईकडेच रहात असत. रामजीबाबांनीच त्या दोघा भावंडांना आपल्याकडं ठेवून घेतलेलं.

डॉ. आंबेडकर शिकण्यासाठी लंडनला गेले. तेव्हा रमाबाईंचा धाकटा भाऊ शंकर धोत्रे व बहिण गौरा ही दोघंही मिळेल ती मोलमजुरी करीत असत. शंकर अल्पवयीन असल्यामुळं, कधीकधी त्याला मजुरीवर कामाला घेत नसत. तेव्हा स्टोव्हच्या वाती, पीना, वाईसर इ. विकून तो काही पैसे मिळवी व सारे पैसे आपल्या थोरल्या बहिणीकडे, रमाबाईकडे देत असे. धाकटी बहीण गौरा इतर स्त्रियांच्या बरोबरीनं कसलीही मोलमजुरी करायला जात असे. मिळालेली मजुरी संध्याकाळी आपल्या ताईच्या हाती देत असे. मगच रमाबाई रात्रीचं जेवण तयार करीत असे. त्यातलंस काढून सकाळसाठी ठेवीत असे.

अशी कशीबशी सहा माणसांची थोरली विधवा जाऊ लक्ष्मीबाई, पुतण्या मुकुंद, मुलगा यशवंत, भाऊ शंकर, बहीण गौरा व स्वतः रमाबाई अशी त्यावर दोन वेळची गुजराण होई. नित्य रमाबाई त्यावर अशी करायची —

एक नारळ विकत आणायचा. त्या नारळाचे पाणी काढून ते पुतण्या मुकुंदास व चि. यशवंतास देत असत. चार ज्वारीच्या व बाजरीच्या भाकरी भाजून एक यशवंताला, एक मुकुंदाला, एक शंकरला त्या देत. चौथी भाकरी स्वतः रमाबाई, धाकटी बहीण गौरा व जाऊ लक्ष्मीबाई ह्या तिघी मिळून खात. जेवणात कधी कोरड्यास असे, कधी नसे. कधी कांदा-चटणीवरच निभावून न्यावे लागे. कधी रात्रीचं जेवण होई, तेसुद्धा बऱ्याच वेळा अर्धपोटीच.

इतके हलाखीचे दिवस रमाबाई काढत असत, पण त्याचा पत्ता विलायतेत शिकत असलेल्या आपल्या पतिदेवाला त्या कधी लागू देत नसत. त्यांना इकडील सर्व खुशाल आहोत, काळजी नसावी, असंच कळवीत असत. हेतू हा की, साहेबांचं मन शिकत असताना घरच्या काळजीनं व्याप्त होऊन विचलित व्हायला नको म्हणून.

रमाबाईंचा स्वभाव अत्यंत सोशिक, अबोल पण आज्ञाधारक होता. कधी कुणाची अवज्ञा न करणारा, हळुवार स्वभाव आणि मनमिळाऊदेखील. त्यामुळे चाळीतल्या स्त्रियांशी त्यांचे संबंध चांगले होते. एवढ्या मोठ्या शिकलेल्या माणसाची पत्नी म्हणून त्यांनी कधी गर्व केला नाही की नित्याची साधी राहाणी कधी सोडली नाही. त्यामुळे चाळीतल्या बाया रमाईंचा शब्द ओलांडत नसत. कधी रमाईंना पाणी भरु लागत. कधी बाजारातून भाजी आणून देत. रमाबाई सर्वांशी खेळीमेळीनं राहत. अलीकडे डॉ. आंबेडकरांना सारेच ‘बाबा’, ‘बाबासोहब’ म्हणत नि रमाबाईंना आई... ‘आईसाब’ म्हणत.

रमाबाई तशी गरीब घराण्यातली. खेड्यातली खेडवळ मुलगी. पण सुशिक्षित, मामंजींच्या कडक शिस्तीत वागून, आज्ञेत राहून मोठ्या सुसंस्कृत घराण्याचे संस्कार त्यांच्यावर झालेले. मामंजींवर त्यांची देवाप्रमाणं भक्ती होती. त्यांच्या घराण्याची प्रतिष्ठा भक्ताच्या भावाने ती जपत होती. तिच्या साहेबांविषयीच्या तिच्या पूज्य मामंजींचं एक स्वप्न होतं. ते मामंजीचं स्वप्न खरं करण्यासाठी, साहेबांना शिकाया परदेशी पाठवून, स्वतः दुःखमय वनवास आनंदानं भोगीत होत्या. त्यासाठी कष्टत होत्या.

— एवढ्यात बहीण गौरानं गरम गरम चहा करुन, ताईच्या पुढ्यात ठेवला. ते बघून रमाबाईंना बहिणीच्या प्रेमाचा उमाळा उरात दाटून आला. त्यांनी गौराला जवळ घेऊन, तिच्या गालावर मोठ्या मायेनं हात फिरवला. उफाळून बोलल्या, ‘माझी गुणाची बहीण.. थोरल्या बाईंना बी दे ना गं चहा...’

लगेच लक्ष्मीबाईंच्या पुढंही चहाची कपबशी तिनं ठेवली. लक्ष्मीबाई बोलली, ‘रमा, तुझ्या पाठची ही बहीण, सदा तुझ्या पाठीवर असते तुसती...’

गौराकडे पाहत, तिला न्याहाळत रमाबाई सहज बोलल्या, ‘साहेब... बॅलिस्टर होऊन आलं की, लगीन उरकन टाकू गौराचं.’

‘म्हंजी... साहेबांबरोबरच की काय?’ एकदम लक्ष्मीबाई चेष्टेने बोलल्या.

रमाबाई-लक्ष्मीबाई मग पोट धरधरुन हसू लागल्या. गौरा लाजून चूर झाली. म्हणाली, ‘किती चेष्टा करायची ती... ताई... बाई... सांगून ठेवते. अशानं मी रडेन हं!’

— आठ नऊ दिवसांनी रमाबाई-गौरा दोघी बहिणी बहिणी वरळी गावात शेणी थापायच्या कामावर त्या दिवशी प्रथमच गेलेल्या. रमाबाईंच्या अंगात अजून कणकण होतीच. घरी बसून तर काय अंग वाढतंय. पोट पाठीशी लागलेलं आहेच की—

बारा-साडेबाराचा समय झालेला असावा. उन्हाळ्याचेच दिवस. उन कसं रखरखत होतं. दुपारची सुट्टी आता होणार होती. तोच उन्हाच्या तिरपीनं रमाबाईंना घेरी आली. हातातल्या शेणीसह रमाबाई शेणातच पडल्या. बहीण गौरा जवळच होती. आपली ताई अशी शेणात पडलेली पाहून ती मोठमोठ्यानं रडू लागली. साऱ्या कामावरच्या बाया घाबरल्या. धावल्या. कुणी रमाबाईंच्या तोंडावर पाणी मारलं. कुणी नाकाला कांदा लावला. कुणी पदरानं वारा घालू लागलं. असं करता करता रमाबाई शुद्धीवर आल्या. म्हणाल्या, ‘माझी गौऽऽराऽऽ, गौऽऽराऽ...’

असं म्हणून शेणानं माखलेल्या गौराला मिठीच मारली. एकमेकींच्या गळ्यात पडून त्या बहिणी बहिणी रडू लागल्या. साऱ्या कामवाल्या बाया डोळ्यांत पाणी आणून ते करुन दृश्य पाहतच राहिल्या.

— शेणी थापायच्या कामात चांगली मजुरी मिळत नव्हती. राबावं मात्र खूप लागायचं. रमाबाईंना तिथं काम करायला मन लागेला.

शेजारच्या चाळीत हिराबाई नावाची एक वयस्क बाई राहत होती. आपल्या समाजातील बायांना घेऊन, हिराबाई एका फॅक्टरीमध्ये कामास जात होती. कधी कधी रमाबाईंची धाकटी बहीण गौरासुद्धा त्या कामावर जात होती. तिथं मजुरी चांगली मिळत असे. रमाबाईंना वाटलं, आपणही जावं तिथं कामाला. मजुरी चांगली. काम हलकं. आपली गौराबी आहेच बरोबर.

त्या फॅक्टरीचा मालक एक अत्यंत वृद्ध मुसलमान मौलवी होता. अत्यंत सज्जन व उमदा माणूस. सर्व त्याला मामू म्हणून आदरानं बोलवत. त्याच्या तीन पिढ्या मुंबईत गेलेल्या. मराठी मधूनच शिकलेला. त्यामुळे शक्य तो मराठीतूनच बोलत असे. पण त्यात मुसलमानी शब्द घुसडून, धेडगुजरीत बोलायची त्याला आदत होती.

हीराबाई नेहमीच्या बायांना बरोबर घेऊन, त्या दिवशी आपल्या बरोबर रमाबाईंनाही घेऊन कामावर आलेली. बोलली, ‘मामूऽऽ आज आणखी एक बाई आणलीय कामासाठी. चालेल?’

‘चालेल... चालेल...’ असं म्हणत मामूनं नवीन आलेल्या बाईकडं, रमाबाईंच्याकडं पाहिलं नि तो एकदम चमकला. आश्चर्यचकित होत त्यानं हळूच हीराबाईला विचारलं.

‘हिराबाई... ही... ही... बाई तुझ्याच ‘कोम’ची?’

‘व्हयजी.’ असं म्हणून तिनं गौराकडं बोट करीत बोलली, ‘ही गौरा है ना, तिची, ही बाई थोरली बहेन है...’

‘ऐसा... ऐसा... तुम्हारी कोम में इतनी राजबिंडी औरत। कावळ्याच्या कळपात सफेत राजहंसी! किसकी औरत है ये?’

‘मामू... हम तुमको बादमे बताएंगा... अभी काम पर चलते है...’

रमाबाईंकडे बोट दाखवीत हिराबाईनं मामूला विचारलं, ‘लेके जाऊ अंदर इसको भी?’

‘लेके जाव... जाव...’ रमाबाईंच्याकडं पाहत अजून आश्चर्यात बुडालेला मामू म्हणाला, ‘कितनी अजनबी बात है... हीरापन्ना होता है... त्याचं तेज कभी नही छुपता।’ अशा धेडगुजरी भाषेत मामू नवल करीत अजून बोलत होताच. चकीत होऊन तो बोलत होता.

‘जाव... जाव... काम पर जाव...’

रमाबाईंचं डोळं मग पाण्यानं भरलेलं. आलिया भोगाशी असावे सादर, देवाघरी भार ठेवोनिया. डोळं पुसून कामावर जाणं रमाबाईंना भाग होतं. हिराबाईच्या पाठीमागून त्यांची पावलं आपोआप पडू लागली. निघाली.

हिराबाई संध्याकाळी काम संपवून जाता जाताना हलक्या आवाजात त्या मौलवी मामूच्या कानात कुजबुजली.

‘ही... ही नवीन बाई है ना, मामू... आमच्या जमातीत लई शिकेलल्या, एका बड्या असामीकी ये धरम पत्नी है. ह्या नवीन बाईचा पतीदेव बॅलिस्टरीसाठी इलायत को गया है, इलायत हो...’

‘इलायत को गया है? इतना बडा असामी है?’

‘हां... लेकीन मामू, आपको मालूम है... कष्ट करावं, मिळवावं तवा खावं... अशी आम्हा लोकांची हातावरली पोटं असत्याती. मामू... पोटासाठी कसलंबी कष्ट उपसावं. इसमे कुच्छ बुरा नही है... है ना? बुरा इसमे है... याने चोरी या सिंदळकी करके कमाना और खाना... है न मामू?’ हिराबाईनं सांगितलं.

‘हां... हां... ये बात तो सच है... वो तो खुदाकी कही है... लेकीन, वो... बॅलिस्टर की औरत है ना... वो हिरा-पन्ना है हिरा पन्ना... ये मेरी कही है... हीराबाई, ये भी सच है... समझे?’

संध्याकाळी रमाबाईंच्या हातावर रोजी देताना तो मौलवी मामू मोठ्या वत्सलतेनं रमाबाईंना म्हणाला, ‘बेटी, तुम आजसे हमारी बेटी हो गई हो. मेरी बेटी झेलम् वैसी तुम हो... ये फॅक्टरी तेरे अब्बाजानकी है... ऐसाही समजना... रोज आने का. बेटी, तुझे हेही दिवस जातील. घरासाठी, पतीसाठी तू एवढं कष्ट घेते आहेस... खुदा तेरा जरुर भला करेगा।’

त्यावर रमाबाई फक्त कृतज्ञतापूर्वक हसल्या. रोजी घेऊन खाली मानेनं निघाल्या.

मामू बोलण्यात मोठा भडक होता. त्यांच्याकडे कधी कुणी चांगला असामी आला की तो मामू अभिमानानं सांगत असे... वो... वो... गौरी, मोठं कुंकूवाली औरत दिखाई देती है ना... वो... वो मेरी बेटी है... कष्ट उठाना पडता है... पण आपल्या संसारासाठी... नवऱ्यासाठी अशा गरिबीशी झुंजत... काय त्याग करतेय? वा वा... जबाब नही. आखीर मेहनत का फल बडा मिठा होता है...

रमाबाई हे सारं नित्य ऐकत असत. स्तुती त्यांना आवडत नसे. पण गप्प बसावं लागे.

त्या फॅक्टरीत रमाबाईंना चांगलं काम होते. मालक मामू रमाबाईंना ‘बेटी’ म्हणून वागवीत होता. पण रमाबाईंना ते काम फार दिवसासाठी बरं वाटलं नाही. शेणी थापून, त्या विकून, चार पैसे कमी मिळाले तरी चालेल, पण हे पुरुषांतलं काम, बाई लोकांनी करणं एवढं बरं नाही, म्हणून रमाबाईंनी त्या फॅक्टरीतलं काम सोडलं. गौरालाही ते काम त्यांनी त्यापुढं करु दिलं नाही.

रमाबाई तशा खूप दृढनिश्चयी होत्या. त्यांच्या मनाने एकदा घेतलं की, ते काम तडीस जाईपर्यंत त्या स्वस्थ बसत नव्हत्या. चाळीशेजारच्याच पडक्या भिंतीवर शेणी थापून, तिथंच वाळवून, तिथंच शेणी विकायच्या व त्यावरच आपला उदरनिर्वाह चालवायचा असं रमाबाईंनी ठरवलं.

धाकटी बहीण गौराला घेऊन, रमाबाई शेण जमा करण्यासाठी स्वत: कधी दादरपर्यंत झपाटा मारत तर कधी वरळीपर्यंत शोधत धावत जाऊन शेण जमा करीत. दोघी बहिणी पाट्या भरभरुन डोक्यावरुन वाहून शेण आणीत.

जेवणखान करुन यशवंत-मुकुंदला तयार करुन शाळेला पाठविणं, मंडईतून भाजी आणणं, वाण्याकडून धान्य आणणं, आदी घरातली सारी कामं लक्ष्मीबाई पाहत.

त्यात नुकतंच साहेबांचं लंडनहून खुशालीचं पत्र आलेलं होतं. इकडं तर सारं घर कोड्यात पडलेलं. संसार अडून पडलेला. रमाबाई लक्ष्मीबाई रात्री बसून त्यावर गुपचूप बोलत. विचार करत. रमाबाईंनी मग साहेबांना पत्रोत्तर लिहायचं ठरविलं. ते पत्र पुरं करायला, रमाबाईंना दोन दिवस पुरे लागले... पण त्यांनी ते पत्र स्वत:च्या अक्षरात लिहिलंच.

मुंबई : पोयबावाडी

पूज्य साहेबांच्या पवित्र चरणी

शि. सा. न

तुमचं कृपा पत्र मिळाले. आपल्या कृपेनं आम्ही इकडे खुशाल आहोत. काळजी नसावी. तुमची रामू आता मराठीचं पहिलं पुस्तक वाचते. तुम्हाला पत्र लिहिते. चिरंजीव गंगाधर आजारीच असतो. औषध उपचार करीत असते. चि. यशवंताची तब्येत तोळामासा असते. त्याची नेहमीची औषधे आणत असते. मी स्वत: गौरा व शंकर आपापल्या परीनं कष्ट उपसतो. पण त्याचा अर्धा भाग मुलांच्या आजारपणात संपतो. त्यामुळे सकाळची तोंडमिळवणी संध्याकाळी करणे कठीण जाते.

आता आमी तुमाकडे पैसे तरी कसे मागायचे? तुमी तिकडे शिकाया गेलेत. नोकरी कराया नाही. आमचं सारं खुटलंय. संसार-गाडा आडलाय. डागदरची बिले, दुधवाल्याची बिले, वाण्याची उधारी अडलीया. तेबी आडून बसल्याती. नाईलाजाने तुम्हाला लिहितो. पैशाची काहीतरी तजवीज करावी.

आपण कबीरपंथी. तुमी देव सोडलाय. मी मात्र पौर्णिमेच्या दिवशी कडक उपास करते. रात्री चंद्राला ओवाळून उपास सोडते. बरं का वोऽऽऽ साहेब, तुमी परीक्षेत पास व्हावेत म्हणून नवस केलाय मी. तुमी मला वेडी म्हणाल, पण या वेडीच्या प्रत्येक नवसाला देव पावतोय म्हटलं.

यशवंत, मुकुंद, शंकर, गौरा व जाऊ लक्ष्मीबाई आम्ही ठीक आहोत. कष्टात मी पार गढलेली बघून, माझा आजार कुठे धुम पळालाय वोऽऽ. खुशाली कळवावी.

आपलीच,

सौ. रमा भीमराव आंबेडकर

— हे पत्र डॉ. भीमराव आंबेडकरांना मिळताच, त्यांनी त्यावर रमाबाईंना लगेच उत्तर पाठवले.

प्रियतम रामू,

अ. आशिर्वाद

पत्र पोहचले. चि. गंगाधर आजारी असल्याचे ऐकून वाईट वाटले. नशिबाचा ठेवा. त्याची चिंता करण्यात काही फायदा नाही.

तू मराठीचे पहिले पुस्तक वाचतेस. तुझा अभ्यास चालला आहे, ही फार आनंदाची गोष्ट आहे, अशीच पुढे चल! शिक! असंच शिक!

तू पैशासंबंधी लिहिलेस, त्यासंबंधानं काहीतरी तजवीज करीत आहे. मी इकडे अन्नास मोताद झालो आहे. तेव्हा मजजवळ तुम्हाला पाठविण्यास काय असणार? तरी पण तुमचा बंदोबस्त करीत आहे. वेळ जर लागला आणि तुला अत्यंत निकडच वाटली तर तुझे दागिने तू मोडून खा. मी आल्यावर तुझे दागिने तुला परत भरुन देईन. यशवंत व मुकुंद यांचे शिक्षण कसे काय चालले आहे? माझी प्रकृती ठीक आहे. काही चिंता नसावी.

तुझे तिकडे संसारासाठी अपार कष्ट उपसणे, माझे इकडे शिक्षणासाठी अत्यंत कष्टात जीवन कंठणे, आठवले की वाटू लागते आपण दोघे या जगात काहीतरी अपूर्व करीत आहोत आणि त्यामुळे मनास धन्य धन्य वाटू लागते. हे दु:खसुद्धा सुखमय भासू लागते. मग अधिक कष्ट उपसण्यात, अंगाअंगात अधिक उत्साह भरु लागतो. तुला पैसे पोहचल्यावर मंजुळाला व लक्ष्मीच्या आईस प्रत्येकी एक एक लुगडे घेणे, शंकरची काय हालहवाल ?

सर्वांस कुशल

भीमराव

ता. क.

तुझी स्तुती करावी म्हणून मी लिहीत नाही. तुझे मामंजी, माझे बाबा, मला नेहमी म्हणत नर करणी करेगा तो नर का नारायण हो जाय. खरंच माझ्यातला नराचा नारायण करायला निघालेली, तू प्रेरणा आहेस, स्फूर्ती आहेस. रामूऽऽऽऽ माझ्यातल्या नराचा नारायण व्हावा म्हणून तू किती कष्टते आहेस. गुरासारखी राबते आहेस. संकटाचे किती डोंगर तुडवते आहेस. दु:ख सहन करते आहेस. तुझ्या कष्टांना सीमा नाही. दु:खांना अंत नाही. रामूऽऽऽ हेही दिवस जातील. आपलेही दिवस येतील. म्हणतात, प्रयत्न कर नि वाट पहा, प्रकाश तुला खात्रीने दिसेल, असो.

— एवढ्या साऱ्या दु:खात सुख एवढंच की, रमाबाईंच्या साहेबांचा 'कागुद' लंडनहून आलेला होता. खूप खूप खुशालीचं लिहिलं होतं. त्यांच्या साहेबांनी त्यात. संसाराच्या सहारा वाळवंटातून प्रवास करीत असताना, अशी कुठंतरी हिरवळ फुललेली दिसावी. तसा तो कागुद त्यांना वाटला. 'तो कागुद' रमाबाईंनी प्रेमभरे हृदयाशी लावून धरला क्षणभर... त्याचा मुलायम स्पर्श आत हृदयात खोल खोल सुखावत गेला. खोल सुखावत गेला.

त्या दिवशी रमाबाईंचा दिवस कसा उगवला होता कुणास ठाऊक, दिवस उगवल्यापासून नुसती संकट परंपरा-पनवती पाठीमागं लागली जणू काही...

तसं अलीकडं रमाबाईंना बरं नव्हतं. त्यांचा आवडता लहान बाळ गंगाधर आजारी पडलेला, त्यामुळं पोटाच्या उद्योगधंद्याकडं त्यांना लक्ष देता येत नव्हतं. असं बरेच दिवस चाललेलं... नावा न् नावा परिस्थिती अधिकच बिकट होत चाललेली...

आज सकाळी सकाळीच लक्ष्मीबाई वाण्याकडं जाऊन खाली पिशव्या हालवत परत आली. सांगू लागली.

'वाणी, धान्य देत न्हाय म्हनतूय... मागील उधारीचं पैसं आधी मोजा, मग पिशव्या घेऊन या माल न्यायला... दीड दोन महिन्यात एका पैची उधारी दिली न्हाय... न्हाय देणं, न्हाय घेणं हाती पिशव्या घेऊन धान्याला येणं...' लक्ष्मीबाईंचं डोळं पाणावलं.

'मी अशी आजारी, रमाबाई कण्हत बोलू लागल्या. बाळ गंगाधर आजारी... डागदरची बिलं फुगाय लागल्यात. डागदर लई महागडा भेटला. त्येंची औषधंबी लई महागडी... एवढं पैसं जाऊन बी बाळाला अजून काडीचा उतार न्हाय... तिरडी गेली त्या डागदराची... त्या मेल्यानं हे दिस दाखवलं आमाला... गौरा-शंकर राबणार. गौरी शेण विकते, किती मिळणार त्येतनं. शंकर लहान जीव... किती कमवणार स्टोव्ह पीनांवर ? त्यात ही मुंबई... कसं चालणार एवढं मोठं घर... ? तरी घर चाललंय... रखडत... रखडत... ही देवाची किरपाच म्हणायची... डोळं पुसा बघू जाऊबाई... असं अजून किती परसंग येणार हायीत...'

रमाबाई एवढं बोलून परत विचारात पडल्या. त्यांनी जाऊबाईंना हळूच विचारलं, 'यशवंत-मुकुंदच्या सकाळच्या न्याहारीपुरतं तरी पीठ हाय का डब्यात ?'

'तेवढं असंल ज्वारीचं पीठ... हाय... हाय.'

‘लई बेस... तेवढंच मुलांच्यासाठी खरा... त्येस्नी न्याहरीला घालून शाळंला पाठवा. सकाळची येळ निभावली. संध्याकाळचं संध्याकाळी बघू... शंकर तवर काय आणील... शेणी विकून गौरा काय देईल... पण... जाऊबाई, शाळंला जाताना मुलं दूध मागतील... त्येचं ?’

‘हां... कालपास्नं तो दुधवाला भैय्यासुद्धा दूध घालत न्हाय... तू आजारी... म्हटलं, कशाला सांगावं... शाळेला जाताना मुलांनी दूध मागितलं. म्या म्हटलं, आपला दूधवाला भैय्या सकाळी आलाच न्हाय... आता आला तर तुमी शाळेतनं संध्याकाळी परत येईपर्यंत, दूध तयार करुन ठेवीन तुमाला. मुलं बरं बरं म्हणून शाळेत गेली. मग मी एक हिकमत केली. भांड्यात रात्रीचं टाकभर दूध राहिलं हुतं. शेजारच्या मालनबाईकडून चहाला म्हणून कुडचाभर दूध मागून घेतलं. तांदळाच्या पिठात थोडं पाणी घातलं, ते कालवलं, त्यात हे दूध घातलं. मग त्यात थोडी साखर टाकली. असं दोन प्याले दूध तयार करुन दिलं काल संध्याकाळी मुलांना... ती आनंदानं प्यायलीत... पण आज संध्याकाळी मात्र आमची परीक्षा बघणार देव...’

‘म्हंजी, आमचं हे हाल देव बघतोय म्हणायचं.’ रमाबाईंच्या डोळ्यातून आसवं गळू लागली. आसवं पुसत त्या पुढं म्हणाल्या.

‘देव कंदी कंदी माणसाची, भगताची परीक्षा बघत असतो. त्या वेळी आपुन घाबरुन न्हाय जायाचं... धीरानं संकटाला सामोरं जायाचं... परीक्षेला उतरायचं. जाऊबाई, तुमी म्हंजी लई मोठा आधार हाय मला.’ त्यांच्या डोळ्यांतून आसवं गळतच होती... तरी हसतच होत्या.

संध्याकाळ झाली. यशवंत-मुकुंद शाळेतनं परतली. आल्याबरोबर त्यांनी दूध मागितलं. पण दूध मिळालं नाही. मुलं तडफली. गप्प बसली. करणार काय ? पण रमाबाईंच्या जीवाला ते लई लागलं. त्या कळवळल्या.

एवढ्यात शंकर स्टोव्ह पीना, वायसर विकून आला. जमलेली चिरीमिरी ताईच्या हातावर ठेवली. शेणी विकून आलेले पैसे गौरानं दिलं. रमाबाईनं ते सारे लक्ष्मीच्या हातावर ठेवले. त्याचं लक्ष्मीबाईंनी तांदूळ व तुरीची दाळ आणली. भात शिजवला. डाळीची आमटी केली. यशवंत-मुकुंद-शंकर यांना आधी जेऊ घातलं. उरलेलं तिघींत वाटून खाल्लं. अर्धपोटीच... पाणी पिऊन, तिघीबी अंथरुणावर पडल्या.

अर्धपोटी तरुण गौराच्या पोटार मात्र भुकेचे कावळे जोरजोरात कलकलू लागले. गौराला रहावलं नाही. ती रमाबाईंना रागावून बोलली, ‘ताई, फॅक्टरीची नोकरी सोडायला नगं हुतीस तू... चांगला पगार हुता. घरचंबी चांगलं चाललं हुतं. असं पोटाला फाकं पडत नव्हतं... तवा...’

‘सारं खरं गं ते. पण गौरा तिथं मला आपल्या शीलाला धोका दिसला. साधुपणाचा बुरखा पांघरुन तिथं हैवान माणसं आत वावरत हुती. मोका धुंडीत होती. मी ते हेरलं. वेळीच तिथनं बाहेर पडली. गौरा, शीलापरास तिथला तो पगार इतका किंमती न्हायी. बाईचं शील म्हंजी एक पृथ्वी मोलाचा दागिना असतो. तोच बाईनं हरवला की, पुढं तिच्या आयुष्याचं वाटुळं होतंया. गौरा बाळे, माझं हे बोल, माणिक मोत्यावानी तुझ्या हृदयाच्या करंड्यात जपून ठेव. आयुष्यभर ते तुला उपयोगी येईल. लक्ष्मीबाई, तुमीतर सांगा ह्या पोरीला... ?’

‘ताई... ताई... नव्हंस, तू... माझी आई... चुकलं गं माझं. उगीच लहानतोंडी मोठा घास.’

— रमाबाई मोठी निग्रही नि करारी होती. वागण्यात अगदी दृढ होती. अशी माणसं कसल्याही दु:खानं, कधी दु:खी होत नाहीत, उलट दु:खालाच ती दु:खी करतात... दु:खच त्यांच्यापुढं हात टेकतं. शरणागती येतं.

रमाबाईंचं असं चाललं होतं. संकटावर संकटं कोसळत होती. तरी त्या डगमगत नव्हत्या. त्या नित्य म्हणत, अशी संकटे पाठी लावून देव आपल्या भक्ताची परीक्षा घेत असतो. त्या परीक्षेला भक्त उतरला की, देव मग त्या भक्ताला सुखानंदाची कायमची पदवी बहाल करुन टाकतो.

त्यात आज डॉक्टरांनी रमाबाईंच्या आवडत्या मुलाला, गंगाधराला, औषधं देण्याचं साफ नाकारलं. 'मागील बाकी चुकती केल्याशिवाय पुढील औषध नाही' असं रमाबाईंना परत परत बजावलं. त्या व्याकूळ झाल्या. त्यांनी डॉक्टरांना परोपरीनं सांगितलं, खूप समजावलं, पण डॉक्टरांनी त्याचं काहीही ऐकून घेतलं नाही. त्यामुळं रमाबाईंना हबकीच बसली. त्या रडत रडतच घरी आल्या. सारख्या रडत बसल्या.

बाळाचं, गंगाधरचं आजारपण सारखं वाढतच होतं. बाळानं आता मान खाली टाकली होती. रमाबाईंच्या हृदयात कालवाकालव होऊ लागली.

रमाबाईंनी मग देवापुढं धरणं धरलं. त्यांनी मुलाला देवाचा अंगारा लावला. उपास धरला. खूप खूप नवस बोलल्या.

'देवाऽऽ आता तूच माझ्या या बाळाचा सांभाळ करणार. माझ्या मुलाला यातून तू उठव... तुला चार कोंबडं वाहातो...'

रमाबाईंनी मग औषधपाणी करायचं सोडून दिलं. आपण स्वतः आजारी मुलाला घेऊन देवापुढं त्या प्रार्थना करीत बसूनच राहिल्या.

लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'रमा, तू देव देव करतीयास ते ठिक हाय. त्याबरोबर दवाबी कर... मुलाचं लक्षण मला बरं दिसत न्हाय बघ. पैसं न्हायीत खाजगी डॉक्टरकडे जायला पर मुनसिपालटीचा मोफत दवाखाना हाय की... आपल्या सारख्यांना...'

'अगं, व्हय की... माझ्या डोस्क्यामंदी हे आलंच न्हायी बघा. चला मग, दोघीबी जाऊ या तिकडचं—'

दोघी जावा-जावा मग मुसनिपालटीच्या मोफत दवाखान्याकडे धावल्या. औषध आणलं. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. चि. गंगाधर त्या दुपारी औषध घेऊन, जो झोपला तो कायमचाच झोपला.

मग एकच रडारड सुरु झाली. लक्ष्मी-गौरानं हंबरडा फोडला. रमाबाईंना तर ब्रह्मांड आठवलं. 'गरिबी लई वाईट' रमाबाई आतडं पिळवटून बोलल्या. तसा गहिवर घालून रडू लागल्या.

गौराला रमाबाईंच्या देवभोळेपणाचा राग आलेला. ती आक्रंदून वैतागून बोलली, 'ताई, तू देवापाशी एवढं धरणं धरुन बसली हुतीस... देवाची खरी खरी भक्तीण तू... गंगाधरला देवाच्या नावानं अंगारा लावलास तू... त्येच्या पुढं नवस बोललीस... अखेर पदरात काय पडलं? काय झालं? तुझ्या त्या देवानं तुला काय दिलं? तुझ्या त्या देवानं अखेर आपल्या गंगाधरला नेलाच ना? नेलाच ना? थांब, तुझे सारे देवच उचलून मी बाहेर फेकून देतेऽऽ!'

अन् रागानं पेटून गौरा देवघराकडं वळली.

रमाबाई बसल्या बसल्याच एकदम कडाडल्या, 'गौरेऽऽ, अगंऽऽऽ थांऽऽबऽऽ. न्हायी ते करु नगंस... गौरेऽऽऽ मागे फिऽऽऽर... माझी शपथ हाय तुलाऽऽऽऽ...!'

गौरा मग तिथल्या तिथंच थबकली. नाईलाज म्हणून मोठमोठ्यानं गहिवर घालून गौरा रडू लागली.

'गंगाऽऽधरऽऽ माऽऽझाऽऽऽ गंगाऽऽधरऽऽऽ असा कसाऽऽ होऽऽ आऽऽमाऽऽऽलाऽऽऽ सोऽऽडूऽऽन गेऽऽलाऽऽ देखण्याऽऽ वासराऽऽ...'

सारेच मग धाय मोकलून रडू लागले. एकच परत हल्लकल्लोळ उडाला...

एवढ्यात डॉ. आंबेडकरांचा लहान मुलगा गंगाधर निधन पावल्याची वार्ता सर्व मुंबईभर झालेली. तसेच, आंबेडकरांच्या पत्नी रमाबाईंच्या अंगावर सारा संसाराचा भार पडल्याने, त्यांची ओढग्रस्त स्थिती झाल्याचे समाजात बोलले जात होते. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या जीवलग स्नेही सोबत्यांनी व निष्ठावंत कार्यकर्त्यांनी, वर्गणी गोळा करुन दोनशे रुपयांची

थैली जमा करुन ती रमाबाईंच्याकडे घेऊन गेले. सदरची थैली रमाबाईंनी घ्यावी म्हणून आग्रह करु लागले. तेव्हा रमाबाई त्यांना म्हणाल्या.

'असं ऐतं घबाड मिळालं तर ते कुणाला नको असते? पण साहेबांच्या माघारी असं पैसं मी घेणं बरोबर न्हायी. उचीत न्हायी. अन् काय म्हणून आमी ही थैली घ्यावी? आमी अजून तसं समाजाचं काही कामबी केलं न्हायी!'

'तसं न्हायी आईसाहेब... आमाला आपलं वाटलं, तुमाला याची सध्या जरुर हाय... साहेब, लंडनला शिकायला गेलेत... इकडं संसाराची...'

'आमची ओढाताण चालली हाय म्हणून आमाला ही मदत करताय का तुमी? तुमाला कुणी सांगितलं की आमची ओढाताण चाललीय म्हणून? आम्ही अडचणीत आहोत म्हणून? अहोऽऽ तुमा साऱ्यांच्या कृपेनं आमचं ठिक चाललंय. लंडनहून साहेबांच्याकडून आमाला पैसे येतात. आमचं ठीक चाललंय. घेवून जावा बरं ती थैली तुमी परत. पाहिजे तर, एखाद्या आपल्या विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगला ती देणगी म्हणून द्या... ती सार्थकी लागेल... त्यातच आपल्या साहेबांचा खरा गौरव केल्यासारखा हाय... तुमच्या या मनाच्या मोठेपणाबद्दल व साहेबांच्यावरील प्रेमाबद्दल मी स्वतः साहेबांच्या वतीनं तुमचं कौतुक करते... राग मानू नका. या... नमस्कार...'

तसं रमाबाईंची किती किती ओढग्रस्त स्थिती झालेली. गाठी एक पै नव्हती. जवळ पैसे नाहीत म्हणून धान्य विकत घेता येत नव्हतं. धान्य नव्हतं म्हणून पोटाला टाचके पडत होतं. पैसे नाहीत म्हणून औषध घेतलं नाही. औषध घेतलं नाही म्हणून मुलगा गंगाधर प्राणास मुकला. एक एक क्षण त्यांची परीक्षा घेत होता. त्यांना कोणीही कसलंही सहाय्य करीनासं झालेलं, तरीही रमाबाईंनी आपणहून, प्रेमानं देऊ केलेली, दोनशे रुपयांची थैली परत केली. केवढं मोठं मन! मोठं मन म्हणजे मोठं मन. ते कशाही परिस्थितीत विचलित होत नाही. लवत नाही. वाकत नाही. नमत नाही.

थैली घेऊन आलेली साहेबांचे स्नेही व समाज कार्यकर्ता मंडळी पहिल्या माळ्यावरुन खाली उतरुन, आम रस्त्याला लागली असतील-नसतील, तेवढ्यात एक वकीला सारखा दिसणारा रुबाबदार मनुष्य रमाबाईंचा पत्ता विचारीत वरती आला व म्हणाला, 'रमाबाई भ्रतार भीमराव आंबेडकर, कोण आहेत?'

रमाबाई उत्तरल्या, 'मी हाय.'

'तुमचे यजमान लंडनला असतात काय?'

'व्हय. ते बॅलिस्टरी शिकाया गेलेत तिकडं.'

'अच्छा अच्छा! त्यांनी तिथूनच हे शंभर रुपये तुम्हाला द्यावयास सांगितलं आहे. तुम्हाला पत्र आलं असेलच. हे घ्या ते शंभर रुपये... मोजून घ्या हं.'

यशवंत-मुकुंद या मुलांनी पुढं होऊन ते शंभर रुपये मोजले. बरोबर असल्याचे सांगितले.

रमाबाई उत्तरल्या, 'शंभर रुपये पोचले.'

तो मनुष्य म्हणाला, 'हे तोंडी झाले, लेखी पाहिजे. शंभर रुपये मोजून आज रोजी रोख मिळाले. म्हणून त्यावर फक्त तुमची सही करा.'

रमाबाईंनी कागद अडखळत पण काळजीपूर्वक वाचला. त्यावर एवढं एकच ते वाक्य होतं. बाकी त्यावर काही लिहिलेलं नव्हतं, त्यांनी तो कागद वाचून त्यावर सही केली.

'येतो आम्ही!' असं म्हणून तो मनुष्य खाड्खाड् बुट वाजवीत खाली उतरुन, मूळ वाटेला लागला देखील. सारेजण त्याच्याकडे आश्चर्यानं केवळ पाहतच उभे राहिले.

लक्ष्मीबाई बोलल्या, 'रमा, अगं तो माणूस एवढ्या प्रेमानं एवढं पैकं घेऊन, आमासाठी कुठून तरी एवढं चालू आला. पण आपून त्येचं नाव बी इच्चारलं न्हायी!'

'खरंच की वोऽऽ, आपलं लई चुकलं. पैसे बघितल्यावर आमी सारं इसरुन जातोय, असंच म्हणायला मग हरकत न्हाय!'

दोघींच्या चेहऱ्यावर आज प्रथमच नि एकदम एक स्मितरेखा दिसली. आपल्या हातातील काही पैसे लक्ष्मीबाईंच्या हातात देत रमाबाई तळमळून बोलल्या, 'जाऊबाई, हे घ्या पैसे नि आता जावा... त्या निर्दयी वाण्याची, त्या दूधवाल्या भैय्याची, साऱ्या साऱ्यांची उधारी देऊन या... अन् त्या मेल्या डागदरची बी उधारी देऊन या... त्येला म्हनावं, ही घे तुझी उधारी... घे तुझ्या किरडीवर आवळून... नि दे परत माझ्या पोराचा जीव...'

असं म्हणून रमाबाईंना एकदम भडभडून आलं. त्या रडू लागल्या. लक्ष्मीबाईंनी समजावलं. संध्याकाळ झाल्यावर लहान जीव शंकर एक रुपया हातात घेऊन धावत धावत पळत घरी आला व म्हणाला, 'ताई... ताई, आज मला एक रुपया अडवान्स मिळाला.'

'एक रुपया अडवान्स ? तुला कोण देणार बाळा ?'

'अगं, तो वरचा देव. तो द्यायला लागला की खाली मोजशील किती ?'

रमाबाई तो रुपया हातात घेत बोलल्या, 'बघ बाबा, चोरुन तर आणला न्हायीस ना कुठंन ?'

'ताई, तुझा भाऊ हाय मी. सपनात तरी मी चोरी करंन का ? ताई, तुझी शपथ मला एका छापखान्यात नोकरी लागलीय. पडल ते काम करायची, हरकाम्याची. मालक दयाळू दिसला. त्येच्या पायावर मी लोटांगण घातलं नि म्हणालो, 'चार दिस झालं, माझा भाचा देवाघरी जाऊन... घरातली सारी माणसं उपाशी हायीत. पोटाला काय न्हायी. माझ्या पगारातला एक रुपया आज मला अडवान्स म्हणून द्या... लई उपकार होतील तुमचं... आणि मालकानं एक रुपया दिला की मला... वळख-पाळख नसताना...'

रमाबाईंना आता मनोमनी वाटू लागलं की, देवानं आमची परीक्षा बघीतली. तो आता हळूहळू आपल्यावर प्रसन्न होतो आहे. रमाबाई सांगू लागल्या, 'शंकर तुझ्या मेव्हण्यानं लंडनहून शंभर रुपये पाठविलेले, आजच मिळाले... आजच तू हा सोन्याइतका मौलवान रुपया घेऊन आलास... आजच आमच्या साऱ्या शेणी एका भट्टीवाल्यानं विकत घेतल्या... आणखी आजच... आपल्या बहिणीला, गौराला बघायला पाहुणं आलेलं... पण आपण सुतकात असल्यानं बोलणी झाली न्हायीत. पण पाहुण्यांना... साहेबांची मेव्हणी म्हणून मुलगी एकदम पसंत!...'

'खरं ताई ? खरं ? हे बघ ताई, देव एकदा द्यायला लागला की, असा छप्पर का — फाडून देऊ लागतोय... ताई, तुझंच हे सारं सतपन... फळाला आलं.'

'पण, या... पैशाविना पोटचा गोळा गमावून बसले रे मी...'

शंकरला मायेनं जवळ घेऊन, रमाबाई उमळून उमळून रडू लागल्या... शंकरचेही डोळे पाझरु लागले... पाझरु लागले.

• • •

१९

१४ एप्रिल १९२३ रोजी बॅ. भीमराव रामजी आंबेडकर लंडमधील आपला विद्याभ्यास पुरा करुन भारतात परत आले. मायदेशी परतताना प्रवासासाठी त्यांच्याजवळ पुरेसे पैसे नव्हते म्हणून, आपल्या घरी वा कोणा आपल्या इष्ट मित्रांना आपण अमक्या तारखेस मुंबईत येणार असल्याचे त्यांनी कळविले नव्हते. त्यामुळे रमाबाई व इतर कुटुंबीय मंडळी, तसेच खास स्नेही मंडळी चातकासारखी केवळ त्यांच्या आगमनाची प्रतीक्षा करीत घरीच बसली होती. त्यांच्या स्वागतासाठी बंदरावर कोणी गेलं नव्हतं.

अचानक त्या दिवशी सकाळी सकाळी बॅ. आंबेडकर, मुंबईस घरी आले व त्यांनी आपल्या घराचे दार ठोठावले.

'ए यशवंत... ए मुकुंद!' अशा त्यांना हाका घातल्या. तरी कोणी ओ दिली नाही. म्हणून आणखी उंच आवाजात ते ओरडले, 'अरेऽऽए, सुडक्या! ए मक्या! किती वेळ झाला. अजून झोपलाय काय?'

बॅ. आंबेडकरांचा हा आवाज रमाबाईंना प्रथम ऐकू आला. साहेब अचानक येणार म्हणून त्यांचा दाराकडं सारखा कान होताच. आवाज ऐकून त्या खाडकन् उठल्या. खोलीचं दार उघडून रमाबाई घाईघाईनं बाहेर आल्या. पतिराजांना समोर पाहतचा त्या आनंदातिशयानं उद्‌गारल्या, 'साहेऽऽब!'

एवढा एकच शब्द उच्चारुन त्यांनी पतिराजांच्या पायावर आपलं डोकं ठेवलं. दाटल्या अंतःकरणानं त्या आपल्या पतिदेवांचे दोन्ही बूट सानंदाश्रूंनी अक्षरशः भिजवू लागल्या.

रमाबाईंना हलकेच वर उठवीत बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'अगं वेडी, तू कशाला अशी माझ्या पाया पडतेस... खरं तर तुझ्या पायाला मीच स्पर्श करायचा हवा... तु माझी पत्नीच नव्हे, माझ्या शिक्षणासाठी, सर्वस्व समर्पून, माझ्यासाठी तीळ तीळ तुटणारी, चंदणासारखी कण कण झिजणारी... आईसुद्धा तू आहेस... रामू, तुझ्या त्यागाला तोड नाही. तुझ्या अंतः करणाच्या मोठेपणाला जोड नाही...'

'असं बोलू नगा... तुमी नि मी दोन आहोत का?'

साहेबांनी होल्ड-ऑल हातात घेतला व म्हणाले, 'चल... आत चल...'

रमाबाई घरात आल्या. पण साहेबांकडं बघत त्या अश्रू ढाळतच राहिल्या. त्यांना काही बोलताच येईना. साहेबांच्या गळ्यात पडून खूपखूप रडावं असं त्यांना वाटत होतं. पण आज साहेब अत्यंत तेजस्वी व भव्य दिसत होते. विद्वत्तेचं विलक्षण तेज त्यांच्या चेहऱ्यावर आज विलसत होतं. त्यांच्याकडे बघवत नव्हतं. खाली मान घालून, रमाबाई उन्मळून उन्मळून सारख्या रडतच होत्या.

साहेब रमाबाईंना समजावीत म्हणाले, 'रामूऽऽ वर माझ्याकडं बघ बघू? अशी का रडतेस? मी आता आलोय. तुझ्या संसाराचा सारा भार पेलायला मी आज आलोय... हस... हसून माझं स्वागत कर. तुझा नवरा बॅरिस्टर होऊन आलाय... सुहास्य वदनानं माझं स्वागत कर.'

'थांबा... तुमचं मी खरंच स्वागत करते. तुम्हाला मी ओवाळतेच... थांबा हं...'

असं म्हणून रमाबाई देव्हाऱ्याकडे धावल्या. तिथली पंचारती घेऊन त्यांनी त्यातला दिवा लावला. हसतमुखानं त्या साहेबांच्या समोर आल्या. त्यांना ओवाळू लागल्या.

'असंच मोठं व्हा! औषवंत व्हा! स्वतःच्या घराबरोबर... स्वतःच्या समाजाचंही भलं करण्यासाठी देऽऽवा तू यांना सामर्थ्य दे... बळ दे...'

देव्हाऱ्याजवळ ती पंचारती ठेवून दिली. साहेबांच्यासमोर बसून रमाबाई साहेबांना विचारु लागल्या.

‘तुमी कंदी येणार म्हणून, कसं काय कळवलं नाही. आपल्या सर्व्या लोकांची... माझीसुद्धा किती किती इच्छा हुती की, बंदरावर जाऊन, तिथं तुमच्या गळ्यात, भलामोठा हार घालून आरती ओवाळून तुमचं स्वागत करायच म्हणून.’

‘अगं, म्हणतात ना, ठकीच्या लग्नाला सतराशे विघ्ने... माझ्याजवळ मुंबईस परत येण्यास प्रवास खर्चाला पुरेसा पैसा नव्हता. मी मग कमी खर्चाचा प्रवासमार्ग शोधून काढला. त्या मार्गे हालअपेष्टांना तोंड देत मी कसा आलो, ते मी तुला नंतर सांगेन. आधी आपल्या मुलांना उठव. साऱ्यांना बोलव. अगंऽऽ थांब... आधी आपण बाबांच्या प्रतिमेला वंदन करु या. केवळ त्यांच्या प्रेरणेनेच मी आज माझ्या समाजातील पहिला बॅरिस्टर झालो...’

मामंजींच्या प्रतिमेला लवून वंदन करीत रमाबाई म्हणाल्या, ‘मामंजी, आपल्या साहेबांनी तुमची ही एक इच्छा आज पुरी केलीय.... मामंजी... खरंच, आज तुम्ही हे सारं वैभव बघायला असायला पाहिजी हुता... होऽऽ..’

रमाबाईंनी असं बोलायचा अवकाश, पण शिकले सवरलेले बॅ. बाबासाहेब आंबेडकर वडिलांच्या आठवणीनं ढसाढसा रडू लागले. रडत रडत अगदी कळवळून ते बोलू लागले.

‘रामू... तुझ्या मामंजीनं माझ्यासाठी खूप खूप केलं. माझं भाग्य थोर म्हणून मला एवढा थोर पिता लाभला. तशीच, माझी आईऽऽ भिमाईऽऽ मुलांचं हे वैभव बघायला मुलांचं सुख घ्यायला ती राहिली नाही... मी किती दुर्दैवी... किती दुर्दैवी...’

एवढ्यात स्वतःच उठून यशवंत-मुकुंद बाबांना बघायला आले. बाबासाहेब अश्रूभरल्या डोळ्यांनी रडत असलेले त्यांना दिसले. बाबासाहेबांनी लगेच रुमालाने आपले डोळे पुसले; चेहऱ्यावर अगदी आनंदी छटा खेळवीत ते म्हणाले, ‘काय रे सुडक्याऽऽ मक्याऽऽ कसा काय अभ्यास चाललाय?’

लगेच लक्ष्मीबाई, गौरा, शंकर उठून आली. बाबासाहेबांनी साऱ्यांचं कुशल विचारलं, घरभर सगळा आनंदी आनंद कोंदला.

पोयबावाडीच्या त्या चाळी ने बॅरिस्टर भीमराव रामजी आंबेडकरांचे आगमन होत असलेले आपल्या डोळ्यांनी पाहिले. सारी ती चाळ, बायकामुलांसह त्यांना मोठ्या आनंदाने भेटावयास आली. बॅ. भीमराव आंबेडकर लंडनहून मुंबईस आले हे सनसनाटी वृत्त साऱ्या मुंबईभर तासा दोन तासांत पसरले. आंबेडकरांच्या चाहत्यांच्या, अनुयायांच्या व स्नेही सोबत्यांच्या झुंडीच्या झुंडी... ‘बॅ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयजयकार असो’ अशा घोषणा व ललकाऱ्या देत त्यांना भेटावयास त्यांच्या त्या चाळीतल्या घरी येऊ लागल्या.

रमाबाईंनी सकाळी आठ वाजता आपल्या साहेबांनी न्याहारी तयार ठेवलेली, पण भेटीला आलेल्या त्यांच्या स्नेही सोबत्यांनी व जीवलग कार्यकर्त्यांनी अकरा वाजेपर्यंत बाबासाहेबांना काही डोकं वर काढू दिलं नाही. अकरा वाजल्यानंतर शंकरमामांना नाईलाजाने साऱ्यांना विनंतीवजा मोठ्यानं ओरडून सांगावं लागलं.

बाबासाहेब पहाटे प्रवासातून आलेत, ते जसेच्या तसे त्याच जागी बसलेत, अंगावरील कपडे अजून काढले नाहीत की, त्यांनी अजून आंघोळही केली नाही. साधा चहासुद्धा त्यांचा अजून झालेला नाही, तरी त्यांची ही अडचण जाणून घेऊन सर्वांनी त्यांना थोडी फुरसत द्यावी, विश्रांती घेऊ द्यावी. दुपारी चार वाजल्यानंतर सर्वांनी असंच बाबासाहेबांना परत भेटावयास यायचं. आम्ही आताच आपण सर्वांना प्रेमाचं आमंत्रण देऊन ठेवतो... ‘बोला बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर की जय!...’

लंडनहून बॅरिस्टरची खास पदवी घेऊन आल्यामुळे बॅ. आंबेडकरांना वकिलीच्या धंद्याकडेच वळणे क्रमप्राप्त होते. पण कोर्टातून वकिलीची सनद काढण्याइतकेसुद्धा पैसे त्यांच्याजवळ नव्हते. हे त्यांच्या हितचिंतकांना व इष्ट मित्रांना कळताच, त्यांनी लगेच त्यासाठी आपसांत पैसा जमा केला व बॅ. आंबेडकरांना वकिलीची सनद काढून दिली.

१९२३ च्या जुलै महिन्यापासून बॅ. भीमराव आंबेडकरांनी आपल्या वकिलीच्या धंद्यास सुरुवात केली. आपला पतिदेव संसारास लागला हे पाहून पत्नी रमाबाईंना आनंदी आनंद झाला. पण आंबेडकर हा अस्पृश्य समाजाचा बॅरिस्टर

असल्यानं त्यांच्याकडे स्पृश्य समाजातील अशिले आपल्या वकिलीची कामे घेऊन म्हणावी तशी येत नव्हती. त्यामुळे त्यांची बरीचशी कोंडी होत होती.

हळूहळू मग आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य समाजाच्या कल्याणासाठी स्वत:ला वाहून घेण्याचे ठरविले. तशी त्यांच्या वडिलांची सुद्धा तीव्र इच्छा होतीच. त्याची त्यांना पूर्ती करायची होतीच. आंबेडकर पुरते जाणून होते की, अमेरिकेतील निग्रो समाजात जन्मलेल्या बुकर टी. वॉशिंग्टनसारखं आपल्यालाही अस्पृश्य समाजाच्या उद्धारासाठी तसंच जीवाचं रान करावं लागणार. त्यासाठी त्यांनी प्रथम बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. त्या संघटनेच्या प्रचारार्थ त्यांना आपल्या समाजात फिरावं लागलं. भाषणं द्यावी लागली.

त्यामुळे अस्पृश्य समाजातील लोकांनाही कळून चुकले की, आपल्या समाजातसुद्धा आता बॅरिस्टर आंबेडकर म्हणून एक जबरदस्त वकील आहे. तो आपला एक पुढारी आहे. उद्धारक आहे.

अस्पृश्य समाजातील लोकांच्या काही केसीस मग त्यांच्याकडे चालविण्यास येऊ लागल्या. बॅ. आंबेडकरांनी हाती घेतलेल्या बऱ्याचशा केसीस कोर्टात यशस्वी होत असल्याचे लोकांच्या कानी येऊ लागले. हळूहळू बॅ. आंबेडकर म्हणजे एक हुशार वकील म्हणूनही त्यांचा सर्वत्र गवगवा होऊ लागला.

हळूहळू आंबेडकरांचा वकिलीत जम बसू लागला. रमाबाईंचा खूतून बसलेला संसाराचा गाडा हळूहळू आता मार्ग आक्रमू लागला.

सातारा (सांगली) जिह्यातील खानापूर तालुक्यातील गोमेवाडी या गावच्या महारांची महारकी वतनी जमीन एका मराठ्याच्या घराण्यात सत्तर ऐंशी वर्षापासून गेलेली होती. ती जमीन आपणाला परत मिळावी म्हणून ती केस महारांनी आपल्या साहेबांच्याकडे दिली. केस साहेबांनी आपल्या वकिलीच्या कौशल्याने यशस्वी केली. सदर गोमेवाडीच्या समस्त महारांनी साहेबांनी वकील फी म्हणून नगद तीनशे रुपये त्यांच्या (परळ येथीळ ऑफिसातील) टेबलावर ठेवली. ती रक्कम साहेबांनी आपल्या धोतराच्या सोग्यात गुंडाळून तशीच घरी घेऊन आले. घरात पाऊल टाकताच त्यांनी ते नगद रुपये रमाबाईंच्या पुढे उभ्यानेच ओतले व म्हणाले,

'घे हे पैसे! मी संसाराकडे बघत नाही... बायकोकडे बघत नाही... मुलांच्याकडे लक्ष देत नाही... म्हणून तू नेहमी माझ्या नावाने ओरडतेस, तेव्हा तू हे घे नि ते किती आहेत, तेवढे मला मोजून सांग...'

'साहेब, पैसे लक्ष्मी हाय. तिला अशी उभ्यानच उधळायची न्हाय...' असे म्हणून रमाबाईंनी सारे पैसे एकत्र गोळा केले. वीस रुपयांची एक चवड अशा अकरा चवडी त्यांनी रचल्या व साहेबांना त्या म्हणाल्या, 'दोन दहाच्या अशा दहा नि एक चवडी हायीत.'

रागाचा आव आणून साहेब म्हणाले, 'पण ते पैसे एकंदर किती आहेत?'

रमाबाई हसून म्हणाल्या, 'किती ते तुम्हाला माहीत! साहेब, असं रागारागानं अडाण्यात न्हायी हं शिरायचं. मी अडाणी हाय म्हणून तुमी अडाणी न्हायी व्हायचं. हे पैसे एकंदर किती, त्या आकड्याचं नाव मला नाही सांगता येणार. मी अडाणी हाय. हा माझा दोष हाय. पण या सगळ्या रकमेला एकदम काय म्हणायचं, ते मला ठावं न्हाय. हे तुमाला चांगलं ठावं असताना, त्या दोषावर बोट ठेवून, असं मला टोचून इच्यारायचं हे मात्र बरं न्हायी हं...'

'बघ... बघ. माझं आपलं सहज बोलणं, पण त्याला तू काय काय फाटे फोडलेस... नाऱ्याला पारे लावतेस... काय काय कल्पना तू लढवल्यास... रामू, तू अशी अडाणी राहिलीस म्हणून फार बरं झालं हं, तू शिकली असतीस तर बॅरिस्टरीण होऊन मला जास्तच हैराण केलं असतंस...'

'पण मी म्हणते... मला आता कोण बॅलिस्टरीन बाई म्हणत न्हायी, ते तरी मला सांगा...?'

बाबासाहेबांना रमाबाईच्या या नर्मविनोदाची खोच लगेच कळली. ते सुद्धा मग खो खो करुन मोठमोठ्यानं हसू लागले.

बॅ. आंबेडकरांची वकिली आता हळूहळू चालली होती. नाव होत होतं. खिशात पैसा येत होता. हातात पैसा खेळत होता. त्याचबरोबर त्यांचं पुस्तक खरेदी करण्याचं वेडही वाढत होतं. जुणे किंवा नवीन पण उत्कृष्ट पुस्तक त्यांच्या नजरेस पडले की, त्यांना मग पैशाचे मोल वाटत नसे. ते पुस्तक विकत घेतल्याशिवाय बाबासाहेब कधीही स्वस्थ बसत नसत. एकदा नेहमीच्या सवयीप्रमाणे ५०० रुपयास त्यांनी इंग्लंडच्या कायद्याच्या ग्रंथाचे पाच खंड एका पुस्तकाच्या दुकानातून विकत आणले, आणि आपले सारे लक्ष त्यांनी ते ग्रंथ वाचण्यात लावले. जेवणाची वेळ झाली तरीही त्यांचे त्या पुस्तकातून डोके काही बाहेर निघेना. अगदी त्यांच्या टेबलावर, त्यांच्यासमोर ताट ठेवून, जेवणास सुरुवात करा, असे रमाबाईंनी त्यांना पाच-सहा वेळा तरी सांगून पाहिले. पण बाबासाहेबांची वाचन-समाधी काही केल्या भंगेना, अगदी कंटाळून, वैतागून पत्नी रमाबाई त्यांना म्हणाल्या.

'साहेब, वोऽऽ साहेब, एक तास झाला. जेवण आपल्यापुढं म्या वाढून ठेवलंया. आता रात्रीचं बारा वाजलेत. जेवनयेळ टळून गेलीया. किती वाचायचं ते. जेवून घ्या बघू... अजून आमी जेवलो नाही...'

'मी परत परत तुला बजावून सांगितलंय की, जेवणासाठी माझी वाट बघायची नाही म्हणून. मी जेवलो नाही, तर तुम्ही जेवून घ्यायचं...'

त्यावर रमाबाई शांतपणे बोलल्या. 'काय करायचं... जुनं वळण पडलंय ना... पतिदेव जेवल्याबिगर त्याची पायाची दासी कशी जेवणार?'

'हे... हे... अडाणी... अडाणी... दगड... कुणी सांगितलंय तुला, तू माझ्या पायाची दासी आहेस म्हणून? तू माझी पत्नी आहेस. माझ्या बरोबरची आहेस... उगीच जुनं ते सोनं म्हणून असं उगळत बसत जाऊ नकोस? जरा शहाणपणा शिक...'

साहेबांचा पारा एव्हाना बरचा खाली उतरला होता. ते बोलले, 'हे... हे... हे पाहिलंस... हे ग्रंथ फार मौल्यवान आहेत. आजच मी पाचशे रुपये खर्चून विकत आणलेत!'

'काय? पाचशे रुपये दिलंत? एवढ्या एवढ्या पुस्तकांसाठी...? पाचशे रुपये दिलेत?'

रमाबाई आश्चर्याने चकीत होऊन साहेबांकडे पाहतच राहिल्या.

'काय पाहतेस अशी? तुला पाचशे रुपये मोठे वाटत असतील, पण या पुस्तकातील ज्ञानापुढं मला ते पाचशे रुपये काहीच वाटत नाहीत!'

'साहेब, या पुस्तकात काय ज्ञान हाय, हे मला अडाणीला काय कळणार? पण माणसानं नुसतं ज्ञान वाढवून चालत न्हायी, व्यवहारज्ञानसुद्धा मिळवावं लागतं.'

साहेबांचा पारा वर चढत चालला. गगनाला भिडला. ते मोठ्यानं म्हणाले, 'म्हणजे? मी ही पुस्तकं पाचशे रुपयांना खरेदी केली, म्हणून मला व्यवहारज्ञानच नाही, असं तुला म्हणायचंय?'

'साहेब, असं काही मला म्हणायचं न्हायी होऽऽ. मला एवढंच म्हणायचं हुतं की, नवऱ्यानं बायको-मुलांकडे थोडं लक्ष द्यावं असं काही या पुस्तकात छापलंय की न्हायी, तेवढं मला आधी सांगा, नि मग किती वाचायचं तेवढं, खुशाल वाचत बसा...'

'तसलं काही या पुस्तकात छापलं नाही, समजलं? काय गं, माझं संसारात लक्ष असावं म्हणजे मी काय करावं असं तुझं म्हणणं आहे?'

बाबासाहेबांनी सरळ मार्गावर येत रमाबाईला विचारलं. त्याही उत्तरल्या, 'अवोऽऽ, मुलं म्हंजी आपल्याच काळजाचं तुकडं असत्याती नव्हं? त्यांना प्रेमानं जवळ घेऊन आंजारावं गोंजारावं, बायकोला जवळ घेऊन जरा प्रेमाच्या दोन गुलगुल गोष्टी कराव्यात. तुमच्या दोन गोड शब्दासाठी ती बिचारी जगत असते वोऽऽ परंतु तुमचं? ती पुस्तकं नि तुमी... ते वाचणं नि तुमी... बायको समोर येऊन उभी कवापास्नं असतीया... तुमाला बघत पण त्याचा पत्ताच नसतो तुमाला!'

साहेब थोड्याशा रागाने हातातील पुस्तक मिटून रमाबाईंच्याकडे मग बघतच राहिले. रमाबाईही बोलतच राहिल्या.

'साहेब, तुम्हाला आठवतंय? तुम्ही तरुणपणी कॉलीज शिकत असताना तवा अभ्यास करत असताना, मला काय काय म्हणत हुता? आठवा बघू? तवा मला विनवून म्हणत हुता... रामू... लाडके राऽमूऽ रोज रोज, तू अशीच मधून मधून मला तोंड दाखवून जात जा गं. तुझं देखणं तोंड पाहिलं की, मला अभ्यास करायला लई स्फुर्ती येते, चेतना मिळतेय गंऽऽ मग मी जोरजोरानं अभ्यास करतोय बघ... अन् आता... तीच रामू... त्याच रामूचं, आता तेच तोंड तुमाला बघवत देखील न्हायी वोऽऽऽ, एवढ्यात मी कुरुप झाली व्हय?'

रमाबाईंच्या या बोलण्यानं मात्र साहेबांचा पारा एकदम खाली आला. ते खळाळून हसायला लागले. हसत हसत ते उन्मळून बोलले, हृदयापासून बोलले, 'रामू... खरचं तू बोलतेस अगदी मार्मिक... अगदी खरपूस... प्रतिस्पर्धी त्यामुळं एकदम खलास होतो बघ... तू अजून जर थोडी शिकली असतीस तर छत्रपती शाहू महाराजांनी तर तुला वकिलीची सनदच बहाल केली असती, अन् मग माझ्यासारख्या बॅरिस्टरांना देखील तू असंच पेचात धरुन, अक्षरशः फाडून खाल्लं असतीस गंऽऽ... कच्चं... कच्चं!'

'खरं?' रमाबाई मग मोठ्यानं हसून साहेबांशी लाडेलाडे बोलू लागल्या, 'साहेब, ह्या पुस्तकासाठी असं एकदम पाचशे रुपये खर्च करण्याची काही इतकी आजच नि आत्ताच, त्याची एवढी जरुरी होती काय? आवोऽऽ दिसांनी तुमी अजून एका मुलाचं बाप होणार आहात बाप!'

'काय... काय म्हणतेस? मी बाप होणार?'

'आणि मी त्या मुलाची आई होणार!'

'काय गं, हे तुझं खरं का? हे तुझं गुपीत तू मला अजून कसं गं सांगितलंस नाहीस ते? आता तर तुझ्या डोस्क्याला डोस्कं लावून बसलोय नव्हं? सांग?'

'इश्श! मला बाई लाज वाटते.'

'आऽ हाऽ हाऽ, पहीलटकरीन की नाही! म्हणे लाज वाटते!' साहेब जास्तच लाडीकपणे म्हणाले.

'क्षणभर रामू... आपण असं समजूया... आपल्याला मुलगाच झालाय. मग त्या मुलाचं नाव काय ठेवायचं?'

'त्या मुलाचं नाव व्हय... त्या मुलाचं नाव' रमाबाई जणू मोठ्या विचारात पडल्यासारख्या करीत म्हणाल्या, 'चांगलं देवाचं नाव ठेवायचं गडे!'

'काय देवाचं नाव?'

'हां... हां... देवाचं... साऱ्या देवांचा जो देव... तो तो महादेव... साहेब आपल्या मुलाचं नाव महादेव ठेवायचं!'

'काय महादेव?'

'हां... हां... महादेव. किती चांगलं नाव हाय वोऽऽ हे महादेव! नकळत देवाचं नावबी घेतल्यासारखं हुईल... पुण्य महापुण्य दोन्ही पदरात.'

‘धन्य... धन्य... तू... देवींची... देवी... महादेवी... धन्य! रामू, तुझं देवाधर्माचं फॅड अजून काही नाही कमी झालं. ते जाऊ दे. हे बघ, आपल्या मुलाचं नाव ‘राजरत्न’ ठेवायचं.’

‘राज रतन... म्हंजी अर्ध पुरुषाचं अर्ध बाईचं नाव... छे... छे...’

‘अगं, राजरतन नव्हं, राजरत्न... बरं का गं रामु, मुलगा झाला की त्याला आपण खूप खूप शिकवायचं हं... बापसे बेटा सवाई झाला पाहिजे.’

‘अन् मुलगी झाली तर... काहीच न्हाय शिकवायची की काय तिला? अनाडी की बेडी, अनाडी से सात अनाडी, झाली पाहिजे...’

‘ही... ही... चेष्टा जादा झाली हं... पण मॅट्रिकच्या पुढं नको म्हणून?’

‘तसं नाही गं! स्त्रीला निसर्गानच काही मर्यादा घालून दिल्यात. तिनं जरुर शिकावं. स्त्री-शिक्षणाचा मी पुरस्कर्ता आहे. पण चांगली आई होण्याइतपत तिनं शिकावं. कसं?’

बॅरिस्टर साहेबांचं व रमाबाईंचं कौटुंबिक जीवन असं आंबट-गोड अनुभव घेत चाललं होतं. त्यात त्यांची वकिलीही चांगली नसली, तरी बरी चालली होती. रविवारी ता. १५-६-१९२४ रोजी रात्री ९.०० वाजता रमाबाई प्रसूत होऊन, त्याचा पुत्ररत्नाचा लाभ झाला. सर्वांना आनंद झाला. बाबासाहेबांनी मुलाचं नाव आधीच ठरविल्याप्रमाणं ‘राजरत्न’ असे ठेवले.

राजरत्न रंगाने निमगोरा पण चेहऱ्यामोहऱ्यानं थेट वडिलांच्यासारखा होता. हातापायांचे पंजे व त्याची बोटे जणू काही वडीलांच्या पंजाच्या व बोटांच्याच -छोट्या मुसातून ओतविल्यासारखं अगदी तंतोतंत होते. राजरत्न आपल्यापेक्षाही अधिक उजवा होणार असा बाबासाहेबांचा होरा होता.

आतापर्यंत पैशाच्या अभावी आपल्या मुलांच्या जोपासनेची, शिक्षणाची आबाळ झाली, तशी आता यापुढे होणार नव्हती. यशवंत-मुकुंद नित्याप्रमाणं शाळेला जात-येत होते. आता त्यांच्या अभ्यासासाठी बाबासाहेबांनी दोघांत एक टेबल व दोन खुर्च्या घातल्या होत्या. त्यांच्या अभ्यासाकडे साहेब आता जातीनं लक्ष देऊ लागले होते. साहेब आता आपल्या संसारात चांगले रस घेऊ लागलेत, हे पाहून सर्वांना आनंद वाटू लागला. रमाबाईंचा आनंद तर गगनात मावेनासा झालेला.

यशवंताचा संधिवाताचा आजार मधून मधून उचल खाऊन, त्याला अंथरुणावर खिळवून टाकी. त्यात आता राजरत्नाच्या आजाराची भर पडू लागलेली. तेव्हा रमाबाईंचं हृदय खालीवर होई. अशावेळी लक्ष्मीबाई यशवंताकडे पाहत असत. रमाबाई राजरत्नाकडे पाहत असत. साहेब कधी कधी मध्येच येऊन राजरत्नाला आपल्या मांडीवर घेऊन बसत. स्वत:च्या हातांनी औषधं पाजीत. कौतुक करीत. साहेब आपल्या या मुलाच्या उज्वल भवितव्याबद्दल स्वप्न रंगवू लागत. तेव्हा भयभीत होऊन रमाबाई म्हणत, ‘साहेब, नको होऽऽ आताच ही मोठी स्वप्नं उभवणं... बाळ, जगू-वाचू दे... कसा तरी धाटा-मोठा होऊ दे... दैत्यासारखा बाप त्येच्या पाठीशी हाय... त्येला काय कमी पडेल? पण आत्ताच ही मोठी मोठी स्वप्न नगं...’

साहेब संध्याकाळी कोर्टातून आले की, ऑफिसात वकिलीचे कपडे उतरुन, ते नित्याच्या कपड्यात घरी येऊन राजरत्नाला खेळवीत बसत. मुलाला खेळविण्याचे त्यांचे प्रकार अगदी मुलखावेगळे. आपण मुलांना राजा, बाबा वगैरे संबोधून खेळवीत असतो, पण बाबासाहेब दोन वर्षाच्या राजरत्न, पण त्याच्याशी बोलताना साहेब म्हणत...

‘अरेऽऽ, तू सिंहाचा बच्चा आहेस. तू लढवय्याचा वंशज आहेस. तू सम्राटाचा युवराज आहेस. राजरत्न आहेस. तू चालता चालता पडतोस? पडला म्हणून रडतोस? तुला असं रडून चालणार नाही. तू पराक्रम केला पाहिजेस... साऱ्या जगात तुझं नाव झालं पाहिजे...’

तेव्हा रमाबाई हसून गंमतीनं म्हणत, ‘साहेब, दोन वर्षाच्या राजरतनला तुमचं हे आगडबंब बोलणं काय होऽऽ कळणार?...’

राजरत्नाला थोडासा ताप आला तरी रमाबाई घाबरुन, आसपासच्या कुटुंबवत्सल बाया जे जे गावठी उपाय सुचवीत ते ते त्या मोठ्या श्रद्धेनं करीत. बाबासाहेबांना ह्या साऱ्या गोष्टी मुळीच आवडत नसत. पण एकदा रमाबाई कळवळून म्हणाल्या, 'माझ्या देवभोळ्या... भाबड्या भावनेला कंदी झिडकारु नगा. आपल्या पाया मी पडते... मला माझं व्रत श्रद्धेनं करु द्या... त्यात फायदा नसला तर तोटा खास नसतो...' रमाबाईंच्या मानसिक समाधानासाठी साहेब हे सारे गावठी उपाय रमाबाईंना करु देत.

इतके उपाय करुनही राजरत्नाला १९२६ च्या जुलै महिन्यात डबल न्यूमोनिया झाला. साहेब, रमाबाई, लक्ष्मीबाई व रमाबाईंचा भाऊ शंकरमामा रात्रभर जागरण करुन राजरत्नची शुश्रूषा करु लागली. चांगल्या चांगल्या तज्ञ डॉक्टरांना बोलविण्यात येऊ लागले. उंची उंची औषधे दिली जाऊ लागली. दोन दिवस साहेब कोर्टात गेलेच नव्हते. १८ जुलैला राजरत्नला जरा बरे वाटू लागले. म्हणून १९ जुलेला साहेब हायकोर्टात केस चालविण्यास गेले.

साहेब कोर्टात गेले नि राजरत्नाचा आजार वाढू लागला. रमाबाई फार घाबरल्या. रडू लागल्या. साहेबांनी घरी ताबडतोब बोलावून आणण्यास त्यांनी तातडीनं शंकरमामाला कोर्टात पाठविले. राजरत्नाची तब्येत परत बिघडल्याचे शंकरमामांनी सांगताच, साहेब तातडीने घरी आले. घरी येताच त्यांनी राजरत्नाला लगेच रमाबाईंच्याकडून आपल्या मांडीवर घेतले. पुत्रप्रेमानं दाटून येऊन साहेब राजरत्नाच्या कपाळाचे, गालाचे पटापट पापे घेऊ लागले. पण एक क्षणभरच. डोळे वर करुन राजरत्नानं बाबासाहेबांच्याकडे पाहिले नि आपल्या चिमुकल्या पापण्या त्यानं मिटल्या. कायमच्या.

साहेबांना हे जेव्हा उमगले, तेव्हा 'राजरत्नाऽऽऽ' म्हणून त्यांनी जो हंबरडा फोडला, तो साऱ्या चाळभर घुमून दाटला. रमाबाईंच्या आक्रोशाला सीमा नव्हती. एखाद्या मुलासारखे बाबासाहेब ओक्साबोक्सी रडू लागले. साहेबांचा हा आक्रोश ऐकून चाळीतले सारे लोक त्यांना पहावयास आले. साहेबांचा तो आक्रोश पाहून तेही भावनावश होत अश्रू गाळू लागले. एवढा शिकला सवरलेला माणूस... मुलाच्या दु:खानं रडतोय तो काय! आभाळाएवढं त्याचं मुलावर प्रेम! रमाई तर मासोळी सारखी तडफडत होती.

राजरत्नाचा अंत बाबासाहेबांच्या मांडीवर झालेला. मुलाचा मृतदेह ते काही केल्या आपल्या मांडीवरुन खाली ठेवीनात. त्यांची समजूत घालता घालता त्यांचे आप्तमित्र अगदी मेटाकुटीस आले. राजरत्न त्यांचा जीव की प्राण तो प्रिय मुलगा गेला नि त्यांचे संसारावरील मन उडाले. राजरत्नाच्या मृत्यूमुळे साहेबांचं मन कसं शतश: विदीर्ण झालेलं होतं, हे कोल्हापूरचे त्यांचे एक परमस्नेही श्री. दत्तोबा पवारांच्या पत्रात त्याविषयी लिहितात —

पोयबावाडी : मुंबई

मित्रवर्य

दत्तोबा पवार

स.न.

तीन मुलगे आणि एक मुलगी अशी गोजीरवाणी व वंशाला भूषणभूत होतील, अशी चार लेकरे जमिनीत गाडून आम्हा नवरा-बायकोने आतापर्यंत संसार केला. राजरत्नाच्या या मृत्यूने आम्हा उभयंतावर वज्राघात करुन, संसाराचे अक्षरश: सहारा वाळवंट झालेय... इत्यादी... इत्यादी...

बाबासाहेबांना राजरत्नाच्या मृत्यूमुळं असं का एवढं वाटत होतं? त्याला तसं आणखी एक कारण होतं. ते फक्त त्यांनाच माहित होतं. राजरत्नाच्या वेळी रमाबाई गरोदर असताना, गरोदरपणात त्यांना त्रास होत असताना, बाबासाहेबांच्या निष्णात डॉक्टर मित्रांनी त्यांना एक प्रेमाचा गुप्त सल्ला देऊन ठेवला होता.

बॅरिस्टरसाहेब, तुमची बायको तुम्हाला आणखी काही वर्षे लाभावी अशी इच्छा असेल तर यापुढं बाळंतपणाचा आणखी प्रसंग तिच्यावर तुम्ही लादता कामा नये. कदाचित यापुढं त्यामुळं ती क्षयासारख्या महाभयंकर रोगालासुद्धा बळी पडू शकेल, इतकी तुमच्या बायकोची प्रकृती नाजूक झाली आहे... हे सारं निभावून नेणं केवळ तुमच्याच हातात आहे...

त्यावर बाबासाहेब एवढेच म्हणाले, 'डॉक्टर, मी माझ्या बायकोवर किती प्रेम करतोय, हे त्या परमेश्वरालाच ठाऊक! माझी बायको... माझा जीव की प्राण आहे. तिच्याशिवाय मी जगूच शकत नाही. यावर काय समजायचं ते तुम्ही समजा!'

राजरत्नाच्या मृत्यूनंतर रमाई व बाबासाहेब बरेच दिवस व्रतस्थ अशी, एकमेकांपासून दूर दूर, अलग अलग राहू लागली. त्यात या दरम्यान रमाई सतत आजारीच राहू लागलेल्या. बाबासाहेबांनी रमाईची प्रकृती सुधारावी म्हणून खूप औषधपाणी केले. चांगल्या निष्णात डॉक्टरांच्याकडून त्यांची वेळोवेळी प्रकृती तपासून घेतली. उंची उंची औषधे घेतली. परंतु त्यांच्या प्रकृतीत काही सुधारणा घडेना.

तसा बाबासाहेबांचा जेष्ठ चिरंजीव यशवंत नेहमी आजारी असायचा. त्यामुळं त्याची शिक्षणात व्हावी तशी प्रगती होत नव्हती. पुढं ती होईल, याची याश्वती बाबासाहेबांना नव्हती. आता जन्मलेल्या पुत्र राजरत्न पित्याप्रमाणे मोठ्या हाडा-मासाचा, त्यांच्याच तोंडवळ्याचा होता. जन्मजात मोठेपणाच्या काही खुणाही त्यांनी राजरत्नाच्या अंगावर निरखलेल्या. त्यामुळं राजरत्न खूप शिकेल, मोठा होईल, असं बाबासाहेबांना निश्चित वाटायचं. त्या दृष्टीनं त्याच्या एवढ्या लहान वयातही, त्याच्यावर सुसंस्कार करण्याचे, त्यांचे प्रयत्न चाललेले... पण म्हणतात ना, मनुष्य चिंतितो एक, पण देवाच्या मनात असतं दुसरंच... थोड्याशा आजारात राजरत्न एकाएकी वारला... बाबासाहेबांना जबरदस्त धक्का बसला... राजरत्नाविषयी त्यांनी उभवलेली स्वप्ने उधळली गेली... त्यांना खूप दुःख झालं. रमाबाईसुद्धा त्यामुळं खूप व्याकूळ झालेल्या. त्यांच्याही मनावर गहीरा परिणाम झाला... त्यांनी अंथरुणच धरलेलं—

बाबासाहेबांनी त्यांच्यासाठी पुष्कळ डॉक्टर पाहिले... औषधपाणी केलं. पण गुण काही येईना. आजार काही हटेना. बाबासाहेब हवालदिल झाले. वराळेमामांनी ते ओळखलं. वराळेमामांनी रमाआईंना हवा पालटण्यासाठी व औषधोपचारासाठी म्हणून धारवाडला पुन्हा घेऊन आले. धारवाड रमाबाईंचं जणू आरोग्यधाम झालेलं—

दुसरे दिवशीच वराळेमामा धारवाडातील आयुर्वेदिकतज्ञ डॉक्टरांच्याकडे रमाबाईंना घेऊन गेले. सोबत मामांच्या पत्नी राधाबाई होत्या. नमस्कार, चमत्कार झाल्यावर, वराळेमामा डॉक्टरांना सांगू लागले. ह्या... डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्नी रमाबाई... आम्ही आईसाहेब म्हणतो... यांना संधिवाताचा आजार आहे... नेहमी अंगात ताप असतो... अशक्तपणा वाटतो... मागच्या वेळी, त्यांना मी इथंच उपचारासाठी घेऊन आलेलो... आपले डॉ. परांजपेकडे आम्ही औषधं घेत होतं... त्यांना खूप बरं वाटलं होतं... पण शेवटी जाताना परांजपे मला म्हणाले की, आपण संधीवात विकारावरील तज्ञ डॉक्टर आहात... तेव्हा म्हटलं, या वेळी आपणाकडेच आयुर्वेदिक ट्रीटमेंट घ्यावी...

'खरं आहे ते... त्यात रुग्ण... डॉ. आंबेडकरांच्या... म्हणजे मोठ्या विद्वानांच्या पत्नी... अन् त्या मुंबईहून धारवाडला नि माझ्याकडं येतात... म्हणजे अलभ्य लाभच! चला, तपासू या...' आणि रमाबाईंकडे वळत ते म्हणाले, 'त्यात रुग्ण... डॉ. आंबेडकरांच्या पत्नी... खूप ऐकलंय... ऐकतोय... आम्ही आंबेडकरांच्याविषयी... तुमच्या विषयीही... पण आता... आता तुम्ही आमचं ऐकायचं...'

रमाबाई खाली मान घालूनच बोलल्या, 'चार दिवस जगायचं असेल तर डॉक्टरांचं ऐकलंच पाहिजे.'

'लाखातलं बोलला!' डॉक्टर मोठमोठ्यानं बोलले व हसू लागले. वराळे मामा व राधाबाईही डॉक्टरांच्यासह हसू लागले —

डॉक्टर पुन्हा बोलले, 'म्हणजे जीवन जगण्यासाठी नव्हे... विद्वानांच्या पत्नी शोभता हं...'

एवढं बोलून डॉक्टर रमाबाईंना काळजीपूर्वक तपासू लागले. लक्षणं विचारु लागले... आजाराच्या तक्रारी विचारु लागले... नंतर, प्रिस्क्रिप्शन पेपरवर त्याची नोंद करु लागले... औषधांच्याही नोंदी केल्यानंतर ते वराळेमामांना सांगू लागले, 'वराळे साहेब, रमाबाईंचा आजार आमच्या आवाक्यातील आहे... खात्रीनं बरा करु... पण हा आजार मोठा दुष्ट आहे...

आम्ही त्याला कितीही मारण्याचा प्रयत्न केला, तरी काही काळानं तो परत उसळी मारुन उठतो... परत मग त्याच्यावर औषधांचा मारा करावा लागतो. हा आजार रुग्णाचा जणू जन्माचा सोबतीच असतो...'

आपल्या औषधांच्या कपाटातून एक भरलेली बाटली काढून वराळेमामांच्या हाती देत डॉक्टर म्हणाले, 'हे नारायण तेल आहे... यानं रुग्णाचं सर्वांगाचं मालीश करायचं... आणि ह्या गोळ्या... त्या सकाळी जेवणानंतर दोन, संध्याकाळी जेवणानंतर दोन द्यायच्या... तुमच्या घराशेजारीच लिंबाचं मोठं झाड आहे... त्या लिंबाचा पाला काढायचा... तो घरी आणायचा... उकळत्या पाण्यात तो टाकायचा... चांगली उकळी येईपर्यंत पाणी शेगडीवर तापत ठेवायचं... तो पर्यंत, रुग्ण रमाबाईंना... राधाबाईंनी जमेल तिथपर्यंत फिरायला घेऊन जायाचं... फिरुन आल्यावर, लिंबाच्या त्या उकळत्या पाण्यानं... थोडं थंड पाणी घालून, रुग्णाला यच्छेच आंघोळ घालायची... नंतर त्यांना मोसंबीचा रस, दूध, चहा, कॉफी... असं फक्त तूर्त लिक्किड द्यायचं... अन्य कोणताही जड पदार्थ द्यावयाचा नाही... वेळेवर औषधपाणी घेतल्यानं, पथ्य कडक पाळल्यानंच हा आजार आटोक्यात राहतो... हे लक्षात ठेवायचं... काय...? राधाबाई कळलं का?'

'होय. कळलं की... आईसाहेबांना रोज वेळेवर औषधं देवू... पथ्य कडक पाळायला लावू... सकाळ-संध्याकाळ, रोज त्यांना फिरवून आणीन की... तुम्ही सांगाल तसं...'

आठ दिवसापर्यंत डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणं रमाबाई तंतोतंत वागल्या. त्यामुळं त्यांना थोडं बरंही वाटू लागलेलं... आठ दिवस गेल्यानंतर रमाबाई, राधाबाईंना अगदी काकुळतीस येऊन सांगू लागल्या, 'मास्तरीणबाई, मला ह्या दुधाचा नि मोसंबीचा रस किनई अगदी म्हणजे अगदी कंटाळा आलाय हो... दररोज तेच तेच प्यायचं... घोटवत नाही गळ्यातून खाली...'

'काय करायचं? आपल्या चांगल्यासाठी कधी कधी कडवट घोट घ्यावं लागतात... डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणं वागायला हवं... पथ्य पाळायला हव... रुपयातलं चार आणं तुम्हाला आता बरं वाटतंय...'

'ते खरं हो... पथ्य पाळतेच ना मी.... आता ते जादा वाटतं... नको वाटतं... तरीही दूध, मोसंबीचा रस, त्या गोळ्याही घेतच जाईल... पण मला आता गरम गरम चतकोर भाकर... नि चिमुटभर लसणाची चटणी द्याल का... विनंती करते...'

'काय हे आईसाहेब? मला पेचात टाकताय... तुम्हाला मी चतकोर भाकर नि चटणी दिली नि तुमचं काही कमी जास्त झालं तर बोल मला येईल... नका हो...'

'मास्तरीणाबाई ऐका हो! मी सांगते, मला काही कमी जास्त होणार नाही... आता मी चांगली मैलभर चालून येतेय म्हटलं... माझी प्रकृती चांगली सुधारलीय... माणसाला पोटभर अन्न मिळेल तर तो जगेल नाही तर—'

'नाही तर काय? रमाबाईंच्या ओठांवर हात ठेवीत राधाबाई बोलल्या, असलं अभद्र काही बोलू नका हं आईसाहेब. तुम्ही आमच्या जीव की प्राण आहात! चटणी भाकरीचं काय एवढं... जीव ओवाळून टाकीन मी तुमच्यावरुन! तुमच्याच हितासाठी मी... पण जाऊ दे...'

राधाबाईंना पुढचं काही बोलणं कठीण जात होतं. तरी बोलल्याच- 'जशी तुमची मर्जी- चतकोर का?, चांगली अर्धी भाकर नि त्यावर लसणीची चटणी आणते हं.'

असं म्हणून राधाबाई स्वयंपाक घरात गेल्या नि अर्धी भाकर नि त्यावर लसणीची चटणी ठेवून घेऊन त्या बाहेर आल्या.

रमाबाईंच्या हातावर, कधी नाही ती अर्धी भाकर नि खमंग चटणी पडताच, एखाद्या अधाशाप्रमाणं त्या खाऊ लागल्या. राधाबाई मोठ्या आश्चर्यानं त्याकडे पाहू लागल्या. दोघीही मग एकमेकीकडं पाहून हसू लागल्या. राधाबाई नंतर म्हणाल्या, 'आईसाहेब, केवळ तुमच्यासाठी हे सारं मी केलं... हे गुपीत तुमच्यात नि माझ्यातच हं!'

रमाबाई मान डोलावीत हसत हसत उद्‌गारल्या, 'हां... हां... तुमच्या माझ्यातच, अळीमिळी गुपचिळी!...'

असा हा गुपचूप भाकरी-चटणी खाण्याचा रमाबाईंचा दिनक्रम आठ दिवस अखंड चाललेला.

त्यानंतर एके दिवशी काय झालं! रमाबाई हातातच अर्धी भाकरी नि चटणी घेऊन खात बसलेल्या. राधाबाई त्यांच्या जवळच उभ्या राहून बाहेरुन कोणी येतंय का? कुणी हे बघतंय का? म्हणून बाहेर नजर लावून राहिलेल्या.

तोच त्यांना दुरुनच रमाबाईंचे डॉक्टर नि आपले पतीदेव आपल्या घराकडेच येत असल्याचे त्यांना दिसले. लगेच राधाबाई, रमाबाईंना सावध करुन बोलल्या... 'आईसाहेब... आईसाहेब... आवरा लवकर... आवरा... ते बघा... तुमचं डॉक्टर नि आमचं साहेब इकडंच येत आहेत... आवरा...'

'आवरलेच... हा शेवटचा घास... घाबरु नका... खाणं संपलं...' म्हणून रमाबाई टाळी वाजवीत बोलल्या, 'मास्तरीणबाई, पाणी आणा... लवकर...'

राधाबाईंनी धावत जाऊन त्यांच्यासाठी पाणी आणलं. रमाबाईंनी ते घटाघट प्यालं... नि काही झालंच नाही, अशा आविर्भावात त्या दोघीजणी स्वस्थ बसून राहिलेल्या —

एवढ्यात डॉक्टर व वराळेमामा आले. दोघींना निवांत गप्पा मारीत बसलेल्या पाहून, विशेषत: रमाबाईंची प्रकृती चांगली झाल्याची पाहून, डॉक्टर समाधान व्यक्त करीत म्हणाले, 'कशी काय आता तुमची तब्येत?'

'ठीक आहे?' राधाबाई व रमाबाई एकदम उत्तरल्या.

'असणारच! मी सांगितल्याप्रमाणं ठीक वेळेवर औषधपाणी देणं नि कडक पथ्य सांभाळणं... हे यशासांग चालू ठेवल्यावर, रुग्णाची तब्येत ठीक होणारच!'

मध्येच राधाबाई बोलल्या, 'आता आमच्या आईसाहेब... मैलभर एकट्या चालून आल्या...'

वराळे मामांनी पुष्टी दिली, 'आईसाहेबांची पायाची सूज उतरलीय!'

'वाऽऽ पथ्य-पाणी काटेकोरपणे पाळलेलं दिसतंय!' डॉक्टर

'होऽऽ!' राधाबाई व रमाबाई एकदम उत्तरल्या.

'ठीक... ठीक...' रमाबाईंच्या पायावर बोट रुतवीत डॉक्टर पुढं म्हणाले, 'पायाची सूज एकदम गेलेली दिसते... राधाबाई असं करा... रमाबाईंना दिवसातून दोनदा... चतकोर वा अर्धी भाकरी खावयास द्यायला काही हरकत नाही.'

'काही हरकत नाही?...' रमाबाई व राधाबाई परत एकदम उद्‌गारल्या.

'आता यापुढं आईसाहेबांनी भाकर नि चटणी खाल्ल्यावर तर, त्यांची प्रकृती चांगलीच ठणठणीत होईल... नाही का?...' राधाबाई

'केव्हाही! अन्न हे परब्रह्म आहे. त्याची बरोबरी कोण करणार? आजपासून अर्धी भाकर द्या... दर चार दिवसाला चतकोर भाकरी वाढवत चला... समजलं?'

बाहेर जात जात, थांबत डॉक्टर म्हणाले, 'राधाबाई तुम्ही असं करा... संध्याकाळी माझ्या दवाखान्यावर या... यांना थोडं औषध बदलून देतो... काही पौष्टीक गोळ्या देतो... म्हणजे, रमाबाईंची तब्येत झटपट सुधारेल नि मुंबईला घरी लवकर जातील...'

'येते हं... येताना आईसाहेबांना सोबत घेऊन येऊ का?'

'काही नको... आता मी त्यांना पाहिलंय... प्रगतीच्या मार्गावर आहेत त्या. मग कशाला? बरं येतो...'

असे म्हणून डॉक्टर दूर निघाले. वराळेमामाही त्यांच्याबरोबर निघाले... दोघेही बाहेर पडले. दूरदूर गेले. दिसेनासे झाले —

तेव्हा रमाबाई राधाबाईंच्या हातावर हात मारीत बोलल्या, 'भाकरी-चटणी खाल्ल्यानं काही झालं नाही ना?'

'खरं, आईसाहेब... आज माझा जीव भांड्यात पडला, निर्धास्त झाले... नाहीतर माझा जीव धागधुग करीत होता...'

'म्हटलं, महाविद्वानाची मी बायको आहे! माझंच खरं होणार!...'

दोघीही मग दिलखुलास हसल्या.

— असा प्रकृती प्रगतीचा महिना-दीड महिना गेल असेल... नसेल... एवढ्यात रमाबाईंना बाबासाहेबांचं एक पत्र आलं... बाबासाहेबांचं ते पत्र म्हणजे रमाबाईंना आपल्या साहेबांचं बोलावणेच वाटले. रमाबाईंनी मुंबई जाण्याची घाई केली. वराळेमामांनी त्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेतला. त्यांनी हिरवा कंदील दाखविला.

जाण्यापूर्वी एक दिवस अगोदर... त्या दिवशी घरात दुसरं कोणी नव्हतं. राधाबाई नि रमाबाई दोघीच होत्या... आणि सकाळपासून रमाबाई आपलं तोंड नि अश्रू लपवून रडत असल्याचं राधाबाईंना जाणवलं होतं. म्हणून त्यांनी विचारलं, 'आईसाहेब तुम्ही आज असं तोंड लपवून रडत का आहात? कुणाची आठवण येते आहे काय? मला नाही सांगायचं?'

'तसं काही नाही... आठवण येतेय, आम्हाला असं दु:खाच्या खाईत लोटून गेलेल्या आमच्या बाळाची... आमच्या राजरत्नाची... आमचं हे दु:ख कुणा-कुणाला सांगत नसते... सुख जगात नि दु:ख मनात ठेवावं म्हणतात.'

'पण सांगितल्यानं दु:ख हलकं होतं म्हणतात. आईसाहेब, काही गोष्टी दैवात नसतात हो... तुमचा राजरत्न चांगला होता. देवाला तो आवडला. म्हणून देवानं लवकर नेला... जे गेलं... नेलं, ते ते आपलं नव्हतंच म्हणायचं नि विसरुन जायाचं... या दुनियेत सगळीकडं असं दु:ख भरलं आहे... त्या दु:खानं असं सारखं रडून देह जाळू नका... अशी प्रकृती वाळवू नका. तुमचं अजून वय गेलं नाही... अजूनही तुमच्या पोटी राजरत्न येईल.'

'नाही... नाही... ते आता शक्य दिसत नाही...' असं म्हणून परत रमाबाई हमसून हमसून रडू लागल्या...

'म्हणजे?' राधाबाईंना याचं मोठं आश्चर्य वाटू लागलं. त्याचंही डोळं मग पाणावलं. त्या रमाबाईचं अश्रू आपल्या पदरानं पुसू लागल्या...

'म्हटलं... म्हटलं...' मनातलं बोलण्यासाठी रमाबाईंच्या ओठांवर शब्द उसळून येत होतं. पण ओठाबाहेर ते फुटत नव्हतं. पण राधाबाई त्यांना बोलत्या करीत होत्या —

'बोला... आईसाहेब... मनात असेल ते बोला... आपलं भरलं हृदय मोकळं करा... बोला आईसाहेब... बोला...'

मास्तरीणबाई साहेबांचं मुळात कधी घराकडं लक्ष नाही... आता ते माझ्यावरुनही उडालं आहे...

'काहीतरी काय बोलता, आईसाहेब तुम्ही हे.'

‘खरं ते बोलते... साहेब अलीकडं माझ्याशी तुटक तुटक वागतात. मला टाळतात... ते अलिकडं ऑफिसवरच राहतात, तिथंच झोपतात. घरी येतच नाहीत... पण असं का... ? काहीच कळत नाही.’

‘आईसाहेब त्याला काहीतरी तसं कारण असेल... बाबासाहेब तसे नाहीत... ते फार मोठ्या मनाचे आहेत... तुम्ही नेहमी आजारी असता म्हणून कदाचित...’

‘मलाही तसं वाटतं... पण शंकेचा भुंगा माझं मन पोखरतो आहे हो... म्हणून मी लवकरच जाते आहे मुंबईला... माझं हे दु:ख साहेबांना अजून सांगितलं नाही... त्यांना याबद्दल विचारलं नाही... वेळ आली की, मी जरुर विचारीन...’

डॉक्टरांच्या सल्ल्यामुळं म्हणा वा रमाबाईंच्या आजारीपणाच्या नावाखाली बाबासाहेब न कळत त्यांच्यापासून दूर दूर राहण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करु लागले. पण बाबासाहेब आपणापासून असे दूर दूर का राहताहेत, याचं गूढ रमाबाईंना काही केल्या उकलत नव्हतं. बाबासाहेबांच्या या दुराव्यामुळे रमाबाईंना मनातून खूप दु:ख होत असे. तरी त्या तसे वरुन कधी दाखवत नसत. कधीमधी बाबासाहेब घरी येत, त्या वेळी बाबासाहेबांशी त्या नेहमीप्रमाणं हसत खेळत गप्पा गोष्टी करीत राहत.

‘पुण्यातली तुमची एक केस म्हणे अलीकडं फारच गाजली ?’

‘तुला कुणी सांगितलं हे ? होय... ती ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादावरुन गाजत असलेली अवघड अशी केस होती. ब्राह्मणांच्या बाजूनं निष्णात वकील म्हणून प्रसिद्ध असलेले भोपटकर वकील ते केस चालवीत होत. मी ब्राह्मणेतरांच्या वतीनं, त्यात अखेर दणदणीत विजय मला मिळाला. या विजयामुळं वर्तमानपत्रातून, कोर्ट कचेऱ्यांतून माझी वकिली व माझी केस चांगलीच गाजली...’

एके दिवशी रमाबाईंच्या प्रकृतीची चौकशी करायला आलेले साहेब रमाबाईंना स्वत:च हर्षभरित होऊन सांगू लागले, ‘रामू, काल काय माझी गंमत झाली म्हणून सांगू... माझं पोयबावाडीतलं ऑफिस किती लहानसं आहे, माहीत आहेच तुला. तिथं मी कसा उघडा-बोडका केवळ लुंगी लावून बसलेला असतो... झाले... आपले, कोल्हापूरचे शाहू छत्रपती महाराज, आले की मला तिथं शोधत...

‘काय म्हणता ? शाहू महाराज तुम्हाला शोधत आले ? तुम्हाला ?’

‘हां... हां... माझं ते चिमुकलं ऑफिस... काय माझी धांदल उडाली... कसे बसे अंगावर कपडे चढवले. चटकन् पुढं होऊन, शाहू महाराजांचं मी माझ्या त्या खोलीत प्रेमभरानं स्वागत केलं...’

हे ऐकून रमाबाईच्या पोटात आनंद मावेनासा झाला. त्या आनंदित होऊन म्हणाल्या, ‘साहेब... शाहू महाराजांची पुण्यवंत पावलं आपल्या त्या ऑफिसला लागली... आपलं भाग्य उजळलं होऽऽ साहेब... बघा, मी काय म्हणते ते...’

— डॉक्टरांच्या त्या सल्ल्यापासून बाबासाहेबांनी आपल्या प्रियतम पत्नीच्या स्वास्थ्यासाठी स्वत:हून कठीण संयम व खडतर आत्मदमन करण्याचं मनानं पक्क ठरविलेलं. त्यामुळं त्यांचं घराकडील आकर्षण हळूहळू कमी होत चाललेलं. त्यात त्यांची वकिलीही चांगली चाललेली. घरातल्या माणसांची नित्याची भ्रांत संपून, सुखा-समाधानानं जीवितक्रमणा चाललेली...

बाबासाहेबांनी मग आपलं सारं लक्ष समाजकार्यावर केंद्रीत करायला सुरुवात केलेली. छत्रपती शाहू महाराजांसारखे महापुरुष त्यांना प्रत्यक्ष भेटून समाजाच्या उद्धारासाठी कार्यप्रवण करीत होते. भरीस भर म्हणून, त्याच वेळी सरकारने त्यांना मुंबई विधीमंडळावर सदस्य म्हणून नियुक्त केले. त्या निमित्ताने अस्पृश्य शिक्षकांनी त्यांचा भव्य सत्कार घडवून आणला. त्यात त्यांनी छातीला हात लावून लोकांना सांगितलं, ‘माझ्या अस्पृश्य समाजाचं भवितव्य सुधारण्यासाठी मला शक्य होईल ते सर्व काही मी जरुर करीन. ते एक माझं जिवीत-कार्यच आहे...’ या नियुक्तीमुळे आंबेडकरांना एक नवा हुरुप आलेला —

त्याच वेळी बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवितकार्यातील एक मोठी आणीबाणीची घटना घडण्याचा समय समीप आलेला आणि ती घटना म्हणजे अस्पृश्य समाजाला आपल्या एक निशाणाखाली ‘महाड’ ला एकत्रित करुन, मानवी

हक्कासाठी त्यांना बंड करुन उठावयास लावणे, ही होय. त्यासाठी बाबासाहेब स्वत:च्या स्वास्थ्याची चिंता न करता, जनजागृतीसाठी सारखे इकडे तिकडे सभांना, परिषदांना जात. त्यांच्याकडे लोकांची सारखी रीघ लागलेली असायची. लोक बाबासाहेबांना थोडीशी मन:शांती लाभू देत नाहीत, म्हणून रमाबाई लोकांच्यावर चिडून जात असत. त्यातच बाबासाहेब कित्येक दिवस घरी जातच नसत. म्हणून रमाबाई त्यांच्यासाठी ऑफिसात जेवणाचा डबा पाठवित. परंतु बाबासाहेब कधी जेवत, कधी जेवत नसत. भरलेला जेवणाचा डबा परत आलेला पाहून, रमाई खूप व्यथित होत. दु:खी होत. पती उपाशी म्हणून त्याही उपाशी राहत.

१९ व २० मार्च १९२७ मध्ये महाडला एक परिषद घेतली. या परिषदेत डॉ. बाबासाहेबांचा महाडचे चवदार तळे सत्याग्रह जबरदस्त गाजणार, म्हणून लोकांच्या मुखांतून व वृत्तपत्रांतून सारखे बोलले जात होते. महाड सत्याग्रहात स्त्रियाही मोठ्या प्रमाणावर भाग घेणार असल्याची कुणकुण रमाबाईंच्या कानी आलेली. एके दिवशी बाबासाहेबांना रमाबाई म्हणाल्याच, 'काय होऽऽ तुमच्या या महाड चवदार तळे सत्याग्रहात स्त्रियासुद्धा भाग घेणार आहेत म्हणे.'

त्यावर बाबासाहेब केवळ थट्टनेच म्हणाले, 'हो, मुंबईहून बऱ्याच स्त्रिया त्या सत्याग्रहात भाग घेण्यासाठी येणार आहेत. त्यांचे पुढारीपण तू केले पाहिजेस हं.'

तेव्हा रमाबाई गंभीर चेहरा करुन म्हणाल्या, 'पुढारीपण करण्याचे काम हे पुरुषांचे! आम्ही स्त्रिया तिथे येऊ, पण तुम्हा पुरुषांच्या जेवणाची चोख व्यवस्था करण्यासाठी येऊ.'

तेव्हा परत बाबासाहेब विनोदानेच म्हणाले, 'हे बघ, तिथे तीन-चार हजार आपले लोक जमतील. त्या साऱ्यांच्या जेवणाची व्यवस्था तुला एकटीलाच करावी लागेल ?'

रमाबाईंनी तितक्याच अवसानात उत्तर दिले, 'हो... कितीही लोक येऊ देत... जेवढे अधिक येतील, तेवढा अधिक आनंद मला होईल. माझ्या पतिदेवांनी आरंभलेलं कार्य यशस्वी होईल... मी धन्य धन्य होईन...'

रमाबाईंच्या तोंडून एवढे धीराचे आत्मविश्वासाचे शब्द ऐकावयास मिळतील, त्याची त्या क्षणापर्यंत त्यांना कल्पना नव्हती. ते स्तिमित होऊन, त्यांच्याकडे पाहतच राहिले.

रमाबाई लाडीकपणे म्हणाले, 'साहेब, असं गप्प बसून नाही हं चालणार... मी येणार म्हणजे येणारच... सत्याग्रहात भाग घेणार म्हणजे घेणारच... मला तुम्ही नेलंच पाहिजे.'

या वेळी बाबासाहेब खरोखरच आपल्याला बरोबर महाडला नेतील या कल्पनेत रमाबाई होत्या. रमाबाईंनी आपली जाऊ लक्ष्मीबाई यांनाही त्यासाठी तयार रहाण्यास सांगितलं. दोघींनी आपापले कपडे ट्रंकेत भरुन दोन ट्रंका व दोन बिछान्यांच्या वळकट्या तयार करुन ठेवल्या. कोणत्या क्षणी आपणाला चला म्हणून बाबासाहेब हुकूम करतील, याचा नेम नसल्याने, नित्य तयारीत असलेले बरे, म्हणून त्या दोघींनी सारी जय्यत तयारी केलेली होती.

बाबासाहेब रमाबाईंना चुकवून महाडला गेले नि रमाबाई फार मोठ्या काळजीत पडल्या. साहेबांच्या जिवीताची त्यांना चिंता वाटू लागली. त्यांच्या जीवाला हुरहूर लागून राहिली...

रमाबाई देव्हाऱ्यापुढं जाऊन कुलदैवताला प्रार्थित बसल्या...,

'देवाऽऽ, माझे साहेब मला चुकवून महाडला सत्याग्रह करायला गेलेत. तिथं त्यांच्या जिवीताला धोका आहे म्हणे... देवाऽऽऽ तूच आता त्यांच्यावर तुझ्या कृपेचं छत्र धर... त्यांचा सांभाळ कर... माझे चुडे अभंग राख. देवाऽऽ तूच आता त्यांना महाडमधून, त्याच्या हाताला धरुन, सुखरुप घरी घेऊन ये. मी वाट पाहतोय रेऽऽ त्यांना कधी डोळे भरुन पाहिन असं झालंय... देवाऽऽ देवाऽऽ'

कधी मधी उठून, रामजीबाबांच्या प्रतिमेलासुद्धा रमाबाई हात जोडून अभय मागत होत्या.

साहेब महाडला गेल्याच्या दुसरे-तिसरे दिवशी मुंबईत अफवांचं नुसतं पेव फुटलं होतं. कुणी म्हणे, महाडला खूप मोठी मारामारी झाली. त्यात अस्पृश्यांची पुष्कळ माणसं जबर जखमी झालीत... दलितांचा राजा आंबेडकरसुद्धा जबर जखमी झाले असून, प्रकृती चिंताजनक आहे...

रमाबाईंच्या कानावर हे सारं येत होतं. रमाबाई देवाला साकडं घालीत बसल्या होत्या. हाय खाऊन अंथरुणाला खिळून पडल्या होत्या.

रमाबाईंचा धाकटा भाऊ शंकर या महाड सत्याग्रहाला मुद्दाम गेला होता. त्याला माहीतच होतं, साहेब जर महाड सत्याग्रहाला ताईला चुकवून गेलेत म्हणजे मुंबईत घरी ताईनं जरुर जीवाला धास्ती लावून घेतली असेलच. मुंबईत नाही नाही त्या अफवा पसरविल्या जात असतील. त्या ताईच्या कानावर येतच असतील. ताईनं मग अन्नपाणी सोडलं असेल... देवाला साकडं घालीत, अंथरुण धरलं असेल... महाड सत्याग्रहाचा खरा खरा घडलेला, डोळ्यांनी पाहिलेला असा वृत्तांत आपल्या ताईला सांगण्यासाठी म्हणून शंकर मिळेल त्या वाहनाने लवकरात लवकर, सर्वांच्या आधी मुंबईला जाऊन धडकलेला, आल्याबरोबर तो आपल्या ताईला-रमाबाईला महाड चवदार तळे सत्याग्रहाचा वृत्तांत सांगू लागला.

'ताई... साहेब जबर जखमी वगैरे झालेले नाहीतच. एवढेच नव्हे तर त्यांना एखादा दगडसुद्धा लागलेला नाही... तू त्यांची बिलकूल काळजी करु नकोस, चिंता करु नकोस... मी त्यांच्या पाठीवरच होतो... उठल्यात त्या केवळ अफवा... त्यांत बिलकूल तथ्य नाही... कावळ्याच्या शापाने गुरे मरत नाहीत... दलितांचा राजा आंबेडकर अमर आहे... खरंच ताई, या सत्याग्रहाच्या दिवशी तू तिथं असायला पाहिजी होतीस. आपले साहेब त्या दिवशी किती घणाघाती त्वेषानं बोलले, 'या चवदार तळ्याचे पाणी प्यालो म्हणजे आम्ही अमर होऊ असे नाही. आजपर्यंत या तळ्याचे पाणी आम्ही प्यालो नव्हतो म्हणून आम्ही काही मेलो नव्हतो. इतरांप्रमाणे आम्हीही माणसं आहोत. आमच्या स्पर्शानं तळ्याचे पाणी काळे निळे वा विषारी होणार नाही, हे दाखवून देण्यासाठी हा महाड चा सत्याग्रह आम्हास करावयाचा आहे... चार वर्षापूर्वी महाडच्या नगरपालिकेनं चवदार तळे सर्वांना खुले केले आहे. पण आपल्यांतला कोणीही आजपर्यंत त्यातल्या पाण्याला स्पर्श केलेला नाही. पण आपण त्या पाण्याला स्पर्श करणार आहोत... ते पाणी पिणार आहोत... चवदार तळे जिंकू नाहीतर तुरुंगात जाऊ... चलाऽऽऽ...'

आणि ताई काय आश्चर्य! आपल्या लोकांनी साहेबांच्या भोवती छातीचा कोट करुन एकच दाटी केलेली होती. तिथं नाशिकचे भाऊराव गायकवाड होते... पुण्याचे राजभोज होते, मुंबईचे शिवतरकर होते आणि कितीतरी पुढारी लोक... या साऱ्यांच्या साक्षीने आपल्या साहेबांनी त्या चवदार तळ्यातल्या पाण्याला स्पर्श केला, ते पाणी आपल्या ओंजळीत घेऊन ते घटाघटा प्यायले... आणि काय सांगू ताई, त्या वेळी आपल्या लोकांच्या तोंडून मोठ्या जोशात, गगनाला भिडतील अशा घोषणा दिल्या गेल्या...

'महाड सत्याग्रह की जय', 'हर हर महादेव', 'डॉ. आंबेडकर की जय...' 'डॉ. आंबेडकर कोण आहेत?', 'दलितांचा राजा आहे.' 'डॉ. आंबेडकर अमर रहे...'

...या घोषणांनी जयजयकारांनी महाड गाव दुमदुमून गेलं, त्यामुळं महाडचे कुणबी, मराठे लोक वगैरे आपल्या लोकांवर चिडून उठले. आपलं तळं महारांनी भ्रष्ट केलं, विटाळलं. म्हणून काही सवर्ण हिंदू हातात लाठ्या-काठ्या, दगड घेऊन सभास्थानी आले... हाणा... मारा म्हणत आम्हा लोकांवर तुटून पडले... बघता बघता लोक रक्तबंबाळ होऊ लागले... काहींची डोकी फुटली... पण क्षणभरच! साहेबांनी व पोलीसांनी मध्ये पडून तिथले सारे वातावरण एकदम शांत केले...

भला मोठा सुस्कारा सोडून रमाबाई म्हणाल्या, 'अरेऽऽऽ इकडे अशी आवई उटली हुती की, तिथं साहेबांचा जीव धोक्यात हाय म्हणून... साहेब तिकडं गेल्यापास्नं इथं मी देवापाशी अश्शी धरणं धरुन बसली हाय रेऽऽ... साहेब इथं... माझ्या घरी सुरक्षित येईपर्यंत मी तोंडात पाणी घेणार नाही बघ हां...'

शंकर ताईला समजावीत म्हणाला, 'ताई, तू किती गं देवभोळी नि वेडी... अगं, आपलं साहेब आपल्या साऱ्या समाजाच्या वतीनं, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध एक सेनापती म्हणून लढत आहेत, तेव्हा कधीतरी त्यांना असं

लागणार, खरचटणार, कधी कधी ते जखमीसुद्धा होणार. त्यासाठी तू एवढी हाय खाऊन, कशाला बसतेस?... ताई, तू शूरवीराची धरमपत्नी आहेस... शूरासारखं वागत जा...!'

तरीपण महाड-सत्याग्रहानंतर रायगडवर उद्‌भवलेल्या बाबासाहेबांच्या जीवावरील त्या भयाण प्रसंगानंतर बाबासाहेबांच्या जीविताची नेहमीच चिंता वाटत होती.

१९२८ च्या सुरुवातीस इंदुरचे महाराज सर तुकोजीराव होळकर यांचा 'कुमारी मिलर' या अमेरिकन युवतीशी विवाह करण्याचे घाटत होते. उभ्या महाराष्ट्रात हा विवाह म्हणजे त्या वेळी एक वादाचा प्रश्न होऊन बसला होता. अशा त्या प्रश्नावर निर्णय देण्यासाठी महाराजांच्या धनगर ज्ञातीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रावबहादूर बोले यांना बारामतीस आग्रहपूर्वक आमंत्रण देऊन बोलावले होते. त्या परिषदेस जाण्यासाठी बाबासाहेब तयारी करीत होते. तेव्हा रमाबाईंनी आपल्या सामानाचे गाठोडे बांधले आणि त्या बाबासाहेबांच्या पुढे जाऊन एकदम उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, 'साहेब, घरी राहून तुमच्या जीविताची चिंता वाहत बसण्यापेक्षा, तुम्ही जाल तिकडे मी येण्याचं ठरवलं हाय. तुमच्या जीवनाची मी छाया हाय. छायापरमानं मला राह्याचं हाय यापुढं...'

साहेब क्षणभर आश्चर्यचकित होऊन रमाबाईंच्याकडे पाहत राहिले. म्हणाले, 'रामूऽऽ असं माझ्याबरोबर येऊन छायेप्रमाणं राहून, तू माझं काय संरक्षण करणार आहेस?'

'हांऽऽ! तुमावर पडणारा पहिला वार मी माझ्या छातीवर झेलून घेणार हाय!' रमाई छाती फुगवून मोठ्या आवेशानं बोलल्या.

'हे पहा रामूऽऽऽ' बाबासाहेब तितक्याच आत्मविश्वासानं बोलले, 'माझ्या हातून जोपर्यंत अस्पृश्यांचा उद्धार होणार नाही तोपर्यंत मला कोणी मारु शकणार नाही.'

'तरीपण... माघारी तुमची केवळ चिंता वाहत बसणं, मला आता अक्षी असह्य झालंय होऽऽ! माझा जीव कसा उडून जातो मग. न्हाय मला येऊ द्याच तुमच्याबरोबर!'

रमाबाईचा हा निर्धार ऐकून बाबासाहेब क्षणभर विचारात पडले, पण रमाबाईंच्या तडफदार वृत्तीचा व आपल्यावरील प्रेमाचा त्यांना अभिमानही वाटला. त्यांना येण्यापासून परावृत्त करण्यासाठी तरी ते म्हणालेच, 'अगं वेडेऽऽ मी चाललोय... ही आपल्या समाजाची सभा वा परिषद नाही. बाहेरच्या धनगर जातीच्या लोकांनी आग्रहपूर्वक मला दिलेलं, ते एक प्रेमाचं आमंत्रण आहे... त्यासाठी मी निघालोय... माझ्या कार्यात तू अशी सहभागी होऊ पहातेस, प्रत्यक्ष आपल्या समाज बांधवांची तू सेवा करु पाहतेस, ही चांगलीच गोष्ट आहे... माझे पूज्य गुरु... महात्मा फुले यांच्या कार्यातही त्यांच्या पत्नीचा असाच सहभाग होता. ठीक आहे... यापुढं आपल्या लोकांची जेव्हा सभा असेल, तेव्हा मी जरुर जरुर तुला सोबत घेऊन जात जाईन... हे घे वचन... मग तर झालं?...'

• • •

२०

रमाआई आज उठल्या, त्याच किती प्रसन्नचित्ते... त्यांनी प्रसन्न स्नान केलं, प्रसन्न शुभ्र साडी, शुभ्रच शुभ्र चोळी परिधान केली. कपाळी प्रसन्न कुंकू लावलं, प्रसन्न प्रातःकाळी फुलं कशी मंदमधूर फुललेली दिसतात. तसं रमाईंच्या मुखकमलावर आज मंदमधूर प्रसन्न पावित्र्य पसरलेलं दिसत होतं. साऱ्या वातावरणात त्यामुळं प्रसन्नता घमघमलेली. दरवळलेली.

रमाआई प्रसन्न होऊन देव्हाऱ्याकडं गेली. प्रसन्न मनानं मनसोक्त पूजाअर्चा केली. नंतर त्या त्यांचे पूज्य मामंजी, रामजी सुभेदारांच्या, प्रतिमेपुढं जाऊन प्रसन्न नतमस्तक झाल्या. प्रसन्नपणे म्हणाल्या.

'मामंजी... आपणास एक प्रसन्न बातमी देते वोऽऽ... ज्याच्या राज्यावर सूर्य मावळत न्हाय... अशा राजाच्या अवातनावरुन आपलं सुपुत आपलं साहेब इलायतेला निघालेत... सरकार खर्चानं, सरकारी इतमामानं. मामंजी, सरकारी दरबारी हा आपल्या साहेबांचा केवढा मोठा मानमतराब... मानमतराब वोऽऽ तुमी आज असता तर... तुमाला इतका आनंद झाला असता... इतका झाला असता की, त्यो आनंद तुमच्या पोटात मावलाच नसता वोऽऽऽ सरकार दरबारी एवढा... एवढा मान आपल्या जातीला यापूर्वी हजार वरसांत कंदी कंदी मिळाला नव्हता वोऽऽ आपल्या साहेबांनी तो पहिल्यांदा मिळवला. मामंजी... आपल्या कष्टाचं चीज झालं वोऽऽऽ माझ्या जलमाचं सारथक झालं वोऽऽऽ या परास आणखी काय मिळवावयाचं असतं वोऽऽऽऽऽ या मानूस जलमात येऊन... मामंजी... बाऽऽऽऽबाऽऽऽ'

रमाईंच्या नेत्रकरंडीतून टपटप अश्रूंची फुलं ओघळू लागली... नि मामंजींच्या पवित्र चरणकमलावर ती पडू लागली...

केवळ सायमन कमिशनच्या शिफारशीमुळं भारताची घटना बनविण्यासाठी म्हणून इंग्रज सरकारने लंडनमध्ये पहिली गोलमेज परिषद घेण्याचे ठरविले. १९३० सालची ही घटना, पण त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रावबहादूर श्रीनिवास ह्या अस्पृश्य पुढाऱ्यांना देखील ह्या परिषदेत आमंत्रित करुन, इंग्रज सरकारने भारतीय राजकारणातल्या आत्तापर्यंतच्या इतिहासात कधीही न घडलेलं नवल त्यामुळं घडून आणलं. तसंही नव्हे, हे नवल घडवून आणलं डॉ. आंबेडकरांच्या अपूर्व बुद्धिसामर्थ्यानं, बहिष्कृत हितकारणी सभेच्या त्यांनी पोट तिडकीनं चालविलेल्या चळवळीच्या प्रभावानं आणि तितक्या उत्साहानं, आनंदानं डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्या परिषदेस जाण्याच्या तयारीला लागलेले.

इंग्रज सरकारच्या खास आमंत्रणावरुन, आपले साहेब लंडनला जाताहेत, हे नवल ऐकून रमाबाईसुद्धा किती किती आनंदित झालेल्या. पण... पण... मघापासून प्रसन्नचित्त असलेलं रमाईंचं मन आता... आता उगीचच सैरभर होऊ लागलं... उगीचंच आतल्या आत त्याच्या काळजात गलबलून येऊ लागलं... उरात हुरहुरु लागलं... साहेब लंडनला निघालेत... तीन महिने परतणार नाहीत... तीन महिने... तीन महिन्यांचा प्रदिर्घ विरह...

रमाबाईंनी मग एक दीर्घ श्वास टाकला... मनातल्या मनात स्वतःशीच त्या पुटपुटू लागल्या —

'तीन महिने...! म्हणजे नव्वद दिवस! नव्हे... नव्वद युगं! कशी... कशी कंठायची ही नव्वद युगं!.... सदैव विरहिणीसारखं विरहात झूरण्यासाठी का, देवाऽऽ तू मला जन्म दिला आहेस? अन् खरंच देवा ऽ ऽ काय हे कसलं हे माझं वेडं हृदय! तसंच वेडंखुळं मन...! साहेब... लंडनाला चाललेत मोठ्या मानानं चाललेत... म्हणून आनंदानं बेहोष होऊन थरथर नाचत राहणारं माझंच मन... साहेबांच्या तीन महिन्यांच्या प्रदीर्घ विरहाच्या कल्पनेनं कसं व्यथित होऊन टपटप अश्रू ढाळत आहे... मुळूमुळू रडत आहे... रडणार तरी किती ते? सदैव मुळूमुळू रडण्यासाठीच का, देवाऽऽऽ तू मला हे डोळे दिले आहेस?'

रमाईच्या विरहानं बाबासाहेबही थोडं अस्वस्थ झालेले, पण ते अधिकच बेचैन झालेले.. रमाबाई... यशवंत व लक्ष्मीबाई ह्या साऱ्यांची प्रकृती बरी नव्हती म्हणून डॉक्टरांनी सल्ला दिलेला होता की, ह्या साऱ्यांना हवा पालटण्यासाठी तीन-चार महिने मुंबईच्या बाहेर कुठंतरी पाठविणं आवश्यक होतं म्हणून. परंतु या साऱ्यांना कुठे पाठवावे? हे काही त्यांना बरेच

दिवस सुचलेच नाही. आता तर त्याना तीन महिन्यासाठी लंडनला जायाचं होतं... ते जाणंसुद्धा दोन दिवसावर येऊन ठेपलेलं, त्यामुळं ते अधिकच अस्वस्थ झालेले.

तेवढ्यात धारवाड विद्यार्थी वसतीगृहाचे सुपरिटेंड श्री. बळवंतराव वराळे त्यांनाच निरोप देण्यासाठी म्हणून आलेले, आज आचानक त्यांच्यासमोरच त्यांना दिसले.

वराळे यांना पाहतच, बाबासाहेब एकदम आनंदित झाले आणि आनंदून म्हणाले, 'वराळे आलास... फार बरं झालं. अरेऽऽ रमा, यशवंत आणि लक्ष्मीबाई या साऱ्यांची प्रकृती सध्या बरी नाही. डॉक्टरांनी सांगितलंय की, या साऱ्यांना कुठंतरी मुंबईच्या बाहेर हवा पालटण्यासाठी पाठवणं अत्यंत जरुर आहे. बरेच दिवस यावर मी विचार करतोय.'

पण माझ्यापुढं पडलेला हा प्रश्न काही मला अजून सुटला नव्हता. तू असा आज अचानक समोर दिसलास नि मला उत्तर मिळालं. तुझं ते धारवाड हवेच्या दृष्टीनं ठीक आहे. तू या साऱ्यांना धारवाडला घेऊन जायचंस.'

'जशी बाबासाहेबांची इच्छा... आईसाहेबांची सेवा करायची संधी मला या बालकाला मिळतेय, हे मी माझं मोठं भाग्यच समजतो' वराळेमामा अत्यंत नम्रपणे उत्तरले. वराळेमामा म्हणजे बाबासाहेबांचा कर्नाटकातला कट्टर अनुयायी. रमाआईसाहेब तर त्यांना फारच मान देत असत. सगळे त्यांना वराळेमामा असे म्हणत.

४ ऑक्टोंबर १९३० रोजी बाबासाहेब मुंबईहून लंडनला जावयास निघाले. त्या वेळी रमाआईसाहेबांच्या मनात साहेबांना बोटीवर पोहचवायला जाण्याची, त्यांची तेथील खाण्यापिण्याची व्यवस्था पहाण्याची, फार फार इच्छा झालेली. पण बाबासाहेबांना ते पसंत नव्हते. रमाआईसाहेबांनी ही इच्छा वराळेमामांच्या कानावर घातली. वराळे मामांनी आईसाहेबांना बोटीवर घेऊन जाण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी वराळे मामांनी एक टॅक्सी आधीच ठरवून ठेवलेली.

बाबासाहेब आपल्या परळ ऑफिसमधून आपल्या सर्व सामानासह मोटारीनं बोटीवर जाण्यासाठी निघाल्याचे वराळेमामांनी पाहिलं. लगेच त्यांनी आपल्या टॅक्सीवाल्याला सांगितलं की, 'समोरची मोटार जशी वळेल, तसंच आपल्याला वळायचं. जिथं जाईल तिथं जायाचं.' रमाआई व वराळेमामांच्या टॅक्सीने बाबासाहेबांच्या मोटारीचा पाठलाग सुरु केला. बिलाडॉ पिलरच्या आगबोटीच्या ऑफिसपुढं बाबासाहेबांची मोटार थांबली. यांनीही आपली टॅक्सी थांबविली. चेकिंग करुन घेण्यासाठी वराळे व रमाआईसुद्धा लगेच आत घुसले. या दोघांना तिथं असं अचानक आलेलं पाहिल्यावर, साहेब त्यांच्यावर काही न रागावता, हसतच राहिले.

वराळेमामा वरमून म्हणाले, 'आईसाहेब येत नव्हत्या. साहेबांना निरोप देण्यासाठीच मी धारवाडहून आलोय, तेव्हा मीच म्हटलं, आईसाहेब तुम्हीही चला माझ्याबरोबर. तुचा शुभदायक पदस्पर्श बोटीला झाल्यावर साहेबांचा पुढील प्रवास सुखाचा होईल...'

'वराळे, मी बॅरिस्टर आहे. तुझी वकिली नाही चालणार माझ्यापुढं. या तुझ्या आईसाहेबाला, रमाला या बोटीवर येऊन, माझ्या खाण्या-पिण्याची, झोपण्याची कशी काय व्यवस्था आहे, हे तिला इथं येऊन प्रत्यक्ष डोळ्यांनी पाह्याचं होतं. ती तुला पुढं करुन आलेली आहे... वराळे वकील... बाजू उलटली? चला... प्रत्यक्षच पहा.' साहेबांनी त्यांना आपल्या केबीनमध्ये नेले, तिथली सर्व व्यवस्था दाखवून साहेब रमाआईला म्हणाले, 'पाहिलंस... तू काही माझी काळजी करु नकोस. माझी सगळी व्यवस्था उत्तम आहे...'

एवढ्यात बोटीचा भोंगा वाजला. रमाआईच्या हृदयात कालवाकालव सुरु झाली. त्यांच्या पोळ्यांत पाणी तरारुन आलं. ते दाखवीत साहेब भावनामय होत म्हणाले, 'वराळेऽऽऽ पाहिलंस... पाहिलंस तुझ्या आईसाहेबांच्या डोळ्यात कसं पाणी तरारलं आहे ते... ही... ही सदैव अशी माझी काळजी करीत असते. माझ्यासाठी झूरझूर झुरते... मी कुठं बाहेर गेलो तर ही जेवणसुद्धा घेत नाही. त्यामुळं हिची प्रकृती अशी तोळामासा झालीय... हिला असं पाहिलं की, माझ्या काळजात कालवाकालव

होते... ते हिला काय माहीत? आता तूच तुझ्या आईसाहेबांच्या तब्येतीकडं लक्ष दे. वराळे, तू या साऱ्यांना घेऊन धारवाडला केव्हा जाणार आहेस?'

रमाआईकडे पहात वराळे बोलले, 'आईसाहेब... म्हणतील... उद्या चला, तर उद्या... परवा चला तर परवा... आईसाहेबांचा हुकूम व्हावयाचा अवकाश... बंदा हाजीर आहे त्यांच्या सेवेला...'

'बरं... बरं... केव्हा, कसं जायाचं, हे आता तुमचं तुम्हीच ठरवा. मी आपला चलतो... पत्र पाठवत चल... पत्ता नंतर कळवीन...'

'बाबासाहेब, आपण निश्चिंत जावे... मागील काळजी नसावी.'

'अरेऽऽऽऽ, तुझी ही आईसाहेब नि तिचं तू लेकरु एवढं काळजी घेणारं असल्यावर मी कशाला काळजी करु? अच्छा!'

असे म्हणून बाबासाहेब हसत हसतच तडक आपल्या केबीनच्या दिशेने गेले. वराळेमामा नि आईसाहेब धाड्धाड् पावले वाजवीत खाली उतरुन, धारवाडला जाण्याच्या तयारीला लागले.

— दुसरे दिवशीच निघून रमाआई अगदी सारी मंडळी धारवाडला येऊन पोहोचली. रमाबाई, लक्ष्मीबाई चार दिवस घराबाहेर फिरकल्याच नाहीत. पण नंतर वराळेमामांच्या डॉक्टरांच्या सल्ल्याने त्या मग दररोज संध्याकाळी गावाबाहेर फिरायला जाऊ लागल्या. धारवाड दाट वस्तीचं शहर नव्हतं. हवा मोकळी व स्वच्छ होती. रमाईच्या प्रकृतीला ती मानवू लागली होती.

वराळेमामा तेथील विद्यार्थी वसतीगृहामध्ये व्यवस्थापक होते. त्यांचा बराच वेळ वसतीगृहावर जात असे. फावल्या वेळात समाजकार्य करीत होते.

एकदा ते वसतीगृह पाहण्याची इच्छा रमाआईंनी प्रदर्शित केली. आपल्या अस्पृश्य विद्यार्थ्यांचे वसतीगृह पाहून व आपल्या साहेबांच्या प्रेरणेनेच ते वसतीगृह तेथे स्थापन झाल्याचे पाहून व ऐकून रमाआईंना खूपच आनंद झाला.

धारवाडच्या त्या मुक्कामात रमाआई वसतीगृहातील स्वयंपाकावर स्वत: देखरेख करु लागल्या. कधी कधी स्वत: स्वयंपाक करायलासुद्धा मदत करु लागल्या. कधीकधी विद्यार्थी मुलांना जेवण वाढू लागल्या.

एके दिवशी त्या सकाळी सकाळी उठून वसतीगृहातील स्वयंपाकाला मदत करण्यासाठी म्हणून आल्या. तेव्हा त्यांना असं दिसून आलं की, स्वयंपाकासाठी वसतीगृहाच्या किचन रुममध्ये तेल, मीठ वा डाळपीठ काहीच नव्हते. तसे त्यांनी वराळेमामांना विचारले.

'आज वसतीगृहाच्या किचन रुममध्ये स्वयंपाकाला काहीच सामान नाही? आज विद्यार्थी मुलांना जेवण नाही का द्यायचं? उपाशी ठेवणार आहात काय?'

वराळेमामा गंभीर होत शांतपणे सहज उत्तरले.

'नाही... जेवण दिलं पाहिजे. मुलांना उपाशी कसं ठेवता येईल? पण मी तरी काय करणार? सरकारी ग्रँट अजून मिळालेली नाही. ग्रँट आज मिळेल, उद्या मिळेल या आशेवर गेले तीन महिने वाण्याकडून सर्व माल आम्ही उधारीनेच आणून, मुलांना जेवण घालीत आहोत. पण आज आमचा तो वाणी माल द्यायला तयार नाही... इतर कोणीही धान्य द्यायला तयार नाही... मोठी पंचाईत झालीय... चार-सहा नारळ आणून व पायलीभर चिरमुरे आणून द्यावं म्हणतो, विद्यार्थ्यांना सकाळच्या जेवणाला...'

रमाआई वराळेमामांना म्हणाल्या, 'हे काय भलतंच? छे... छे हा सारा प्रकार मला तुम्ही कालच का नाही सांगितला? या घ्या माझ्या चार सोन्याच्या बांगड्या, ठेवा गहाण मारवाड्याकडे आणि ताबडतोब आणा बघू सामान... आपल्या मुलांना उपाशी का ठेवायच?'

वराळेमामांनी लगेच मारवड्याकडे रमाआईंच्या सोन्याच्या बांगड्या गहाण ठेवल्या. आठ दिवस वसतीगृहाला पुरुन उरेल एवढा माल त्यांनी खरेदी करुन आणला. त्या दिवशी रमाआईंनी साऱ्यांचा स्वयंपाक केला. साऱ्या विद्यार्थी मुलांना आईच्या ममतेनं त्यांनी स्वत:च जेवण वाढलं.

वसतीगृहातील मुलांना मोठं कोडं पडलं की, काल रात्रीपर्यंत धान्याचा एक कणही वसतीगृहाच्या भंडाऱ्यात नसताना आज सकाळीच एका एकी एवढं आठ दिवस पुरुन उरेल एवढं धान्य कोठून आलं? सकाळच्या एवढ्या चमचमीत जेवणाची व्यवस्था कोणी केली? कोण आहे तो दानशूर दाता? मॅट्रिकमध्ये शिकत असलेल्या एका विद्यार्थ्यानं वराळेमामांना याबद्दल विचारलेच. वराळेमामा उत्तरले, 'डोळ्यात काही जातंय असं वाटलं की, पापण्या आपोआप लवतात, त्यांना तसं करायला कुणी सांगावं लागत नाही. खऱ्या दानशूराचं तसंच आहे. तो असं न सांगताच देऊन जातो. आजच्या आमच्या दानशूर दात्या आहेत, तुमच्या आमच्या साऱ्यांच्या मातोश्री रमाबाई आंबेडकर...'

'काय? रमाआईसाहेब आंबेडकर आपण...? रमाआईसाहेब आपण... एवढं केलं?....'

सर्व विद्यार्थी मुलांना रमाआईंच्या ममतेचं, आनंदाचं भरतं आले. रमाआईंच्या भोवती प्रेमानं त्यांनी कडं केलं.

एक विद्यार्थी सद्‌गदित होऊन मध्येच म्हणाला, 'कुणी आई म्हण म्हणून सांगितल्यानं कुणी आई होऊ शकत नाही. आईपण काळजातच असावं लागतं. रमाआईसाहेब, आपण आमच्या आई आहात. आपली आईची ही ममता माया आम्ही जन्मभर विसरु शकणार नाही?'

'असं कसं म्हणतोस? अरेऽऽ आईला कधी कुणी विसरतं का?'रमाआईंनी हसत हसतच साऱ्यांनाच असा प्रश्न केला. सारी विद्यार्थी मुले निरुत्तर होऊन रमाआईंच्याकडे पाहतच राहिली.

एक विद्यार्थी मध्येच स्वयंपूर्ण ओरडला, 'बोलाऽऽऽऽ रमाआईसाहेबऽऽब की जय! रमाआईसाहेब अमर रहेऽऽऽ!'

साऱ्यांनी एका सुरात नि उंच स्वरात जयजयकार केला. तेव्हा रमाआई परत साऱ्यांना उद्देशून म्हणाल्या, 'मुलांनोऽऽऽऽमला रमाआईसाहेब म्हणू नका. पाहिजे तर रमाई म्हणा. मला तुम्हा साऱ्यांची रमाई होता आले तर, मी स्वत:ला धन्य समजेन! त्या साऱ्या विद्यार्थी मुलांना रमाईच्या रुपात त्यांची आईच दिसू लागली. ते सारेजण परत भावमय होत एका सुरात ओरडले.

'आमची आई... रमाईऽऽऽ आमची आई... रमाऽई!'

— त्या रात्री जेवणं झाल्यावर सहज गप्पा मारीत बसल्यावर वराळेमामा म्हणाले, 'वसतीगृहाची मुलं म्हणतात, रमाआईसाहेब फार हुशार आहेत. बोलतात मोजकं पण अगदी समर्पक नि मार्मिक.'

लक्ष्मीबाई उत्तरल्या, 'मुलांचं बरोबर हाय. बाबासाहेबसुद्धा असंच रमाबाईबद्दल म्हणतात, 'रमा, तू अडाणी आहेस, म्हणून बरं आहे. नाहीतर मला तू जास्तच हैराण केलं असतंस.' ओघानं आलं. रमाबाईंची असलीच एक गंमत सांगते. बाबासाहेब त्या येळंला बॅलिस्टर होऊन आलेलं. त्येंची वकिली चांगली चाललेली. पण रमाबाईनं काही डोक्यावरनं शेणीचं भारं वाहून आणायचं सोडलं नव्हतं. तवा शेजारच्या आयाबाया आपसांत कुजबुजायच्या, बघा! ही बॅलिस्टरीनची बायको... डोस्क्यावरनं अजून शेणीचं भारं आणते नि एवढ्या मोठ्या नवऱ्याची इज्जत धुळीला मिळवते... साहेबांनी रमाईंचं हे वागणं ठीक वाटलं नसावं. एके दिवशी साहेब रमाबाईला म्हणालं, 'रमाऽऽऽ आता हे शेणी आणायचं बंद कर बघू. माझी वकिली आता चांगली चालली आहे.' तवा रमाबाई त्यांना म्हणाल्या, 'तुमची लाख वकिली चालोऽ ऽ मला माझा दररोजचा खर्च्या दीड

रुपयाच्या वर जाऊ द्यायचा न्हाय. सोताच्या घराच्या कामाबद्दल वोऽऽ कसली लाज? आपण दादरला घरासाठी जागा बघितलीया. तिथं आपून एक बंगलाच बांधायचा. अशी काटकसरीनं वागून मी त्यासाठी पैसा साठवते हाय म्हटलं. जमलेलं, सारं गड्डुरं एक दिवशी तुमच्याच हाती देणार हाय मी...'

त्यावर सारेजण खळाळून हसले. लक्ष्मीबाईला उत्साह आला. त्या म्हणाल्या, 'आणखी एक यापरास मजेदार किस्सा हाय... तुमाला सांगते. एक दिवशी काय झालं. यशवंताला परीक्षेत कमी मार्क मिळालं म्हणून यशवंताला रागावून साहेबांनी मारले. यशवंत रडाया लागला. तवा रमाबाई मधी पडल्या नि म्हणाल्या, 'हे बघा, माझ्या पोराला तुमी असं मारायचं न्हाय. जलमल्यापास्नं आजारी हाय त्यो. त्यामुळं डोस्कं नाही चालत त्येचं. तुमाइतकं नसंल हुशार त्योऽऽ—

'अगंऽऽऽ अभ्यास कराया नको का?'

'सदा आजारी असतू त्यो. शाळंलाबी जाया मिळत न्हाय. कशाचा अभ्यास करणार?'

साहेब रागानं भडकून बोललं, 'अगंऽऽ तो शिकला न्हायी तर खाईल काय?-'

'का? त्येचा बाप लई शिकलाय. आभाळाएवढा शिकलाय. मग, त्येला काय कमी हाय वोऽऽऽ. त्येचा बाप एवढं मिळवंल, एवढं मिळवल की, माझ्या यशवंतानं मरेपर्यंत बघून खाल्लं तर सरायचं न्हाय. त्यो न्हाय शिकला. त्येचा पोरगा तरी पुढं शिकल की न्हायी?'

'अहाऽऽऽ हाऽऽऽ नातवाची सपनं आतापास्नंच बघाया लागलीस म्हणायचं...'

'का बघू नये? अवोऽऽऽ चार पोरं आपून मातीत गाडून बसलोय. पुढच्याची आशा न्हाय. एवढं एक तरी वाचू दे की... आपल्या वंशाला दिवा...जेवढं शिकल तेवढं शिकू दे... पण जगू दे...' ह्या रमाबाईंच्या अशा बिनतोड वकिलीनं साहेबांचं तोंडच बंद झालं.

ते मग एवढचं म्हणालं, 'हे बघ, तुझ्या या लाडक्या यशवंताला यापुढं मी कधीच मारणार नाही. मग तर झालं...'

'त्या दिवसापास्नं साहेबांनी यशवंतावर कंदी हात टाकला न्हायी की त्याची कंदी कसली चौकशी केली न्हायी... ही अशी हाय... ही बॅलिस्टरीण बाई... रमाबाई...'

त्यासरशी वराळेमामा, त्यांची बायकामुलं नि रमाबाईसुद्धा 'खो खो' हसू लागल्या. रमाआईंचा पायगुण की काय कोण जाणे, पण त्या प्रसंगानंतर दोनच दिवसांनी त्या वसतीगृहाची साऱ्या वर्षाची ग्रँट रोख रखमेनं वराळेमामांना मिळाली. त्यांनी लगेच रमाईंचे गहाण ठेवलेले दागिने सोडवून आणून आभारपूर्वक त्यांचे त्यांना परत केले. रमाई आता वसतीगृहातील विद्यार्थी मुलांत चांगल्या रमू लागल्या. रस घेऊ लागल्या. रमाईंची प्रकृतीसुद्धा चांगली सुधारु लागली.

एवढ्यात बाबासाहेबांचं रमाईस लंडनहून एक पत्र आलं —

प्रियतम रामूस, लंडनः ब्रिटीश पार्लमेंट हाऊस

साऱ्यांच्या खुशालीचे पत्र मिळाले. जानेवारी १९३१ च्या मध्यावर मी मुंबईस परतत आहे. धारवाडची हवा तुम्हा साऱ्यांना मानवल्याचे व तुम्हा साऱ्यांची प्रकृती सुधारत असल्याचे वाचून आनंद झाला. प्रकृती चांगली सुधारली असेल तरच मुंबईस या. उगीच घाई नको.

सर्वांस कुशल

भीमराव

साहेबांचं पत्र आल्यापासून रमाआईंना वाटू लागलं... साहेब मुंबईस परत येत आहेत, म्हणजे आपणास मुंबईत परत गेले पाहिजे. तसे त्या वराळेमामांना समजावून परोपरीनं सांगू लागल्या. वराळेमामा त्यावर एवढचे म्हणू लागले, 'आईसाहेब,

तुम्हा सर्वांची प्रकृती चांगली खडखडीत निरोगी झाल्याशिवाय मुंबईस परतण्याची तुम्ही घाई करु नये, हे चांगलं. बाबासाहेबांचं पत्र तुम्ही वाचा. त्यांनी त्यात स्पष्ट लिहिलंय नि केवळ तुम्हालाच ते लिहिलंय की, प्रकृती चांगली सुधारली असेल तरच मुंबईस या. उगीच घाई नको. आता त्यावर तुम्ही काय ते ठरवा...'

पण रमाआईंनी मुंबईस जाण्याचा हट्टच धरला तेव्हा, वराळेमामांचा नाईलाज झाला. बाबासाहेब मुंबईस येण्याच्या अगोदरच, आईसाहेब धारवाडहून मुंबईस येऊन येऊन पोहचल्या होत्या. मुंबईस आल्यावर बाबासाहेबांची नि रमाईंची पहिली गाठभेट झाली. बाबासाहेबांना त्यांच्या प्रकृतीत थोडीशी सुधारणा दिसली. म्हणून ते रमाईंवर अधिकच रागावून बोलले, 'आता कुठं तुझी प्रकृती सुधारत होती. एवढ्यात तू मुंबईस यायला नको होतं. उगीच घाई केलीस. काय एवढी जरुर होती यायची?'

निरुत्तर रमाई नुसत्या अश्रू ढाळीत उभ्या होत्या. बाबासाहेब त्यांच्यावर परत रागावले, 'का आता रडतेस? चूक तुझी. तुझ्याच हितासाठी... हे... हे मी... सारं बोलतोय... अन् तू रडतेस?'

'रडू नगं तर काय करु? या... या मला मेलीला... स्वतःचं काहीच कंदीच सुचत न्हाय वोऽऽऽ वेडीसारखी घोकतच राहिले... साहेब मुंबईला येणार... मी तिथं नसणार... मग साहेबांचे जेवणाचं सारं हाल हुणार... म्हणून... साहेबांसाठी म्हणून... धावत धावत मी धारवाडहून आले. अन् साहेबांनी मला इथं धारेवर धरलंय!'

'तुला नुसतं साहेबांच्या जेवणाची काळजी... सदा त्या साहेबांचाच ध्यास... अगं तुझ्या त्या साहेबासाठी तरी तू जगायचा प्रयत्न कर... तुझ्या त्या साहेबासाठी तरी तुला स्वतःला जगायला नको का?'

'पण मी तर काय करु वोऽऽऽ त्या साहेबावरनं मी माझा जीव कंदीच ओवाळून टाकलाय!ऽऽऽऽ'

• • •

२१

दिवसा... कधी रात्री... कधी वेळ मिळेल तेव्हा... केवळ वाचन करणं हा बाबासाहेब आंबेडकरांचा एक आवडीचा छंदच होता म्हणा ना! किंवा वाचनाचं त्यांना महाभयंकर व्यसनच जडलं होतं, असं म्हणा ना? जेव्हा कधी तुम्ही त्यांना त्यांच्या अभ्यासिकेत पहाल तेव्हा ते वाचत असलेलेच तुम्हाला दिसतील आणि एकदा का असे वाचनात गढले की, कशाचीच शुद्धबुद्ध त्यांना राहत नसे.

आताच पहा ना, त्यांच्या पत्नी रमाबाई चोरपावलांनी येऊन कितीतरी वेळ त्यांच्या पाठीमागेच उभ्या होत्या, पण त्यांना त्याचं काहीच नव्हतं. ते आपले वाचनात मग्न. समाधी लागल्यासारखे!

चाळीतील त्यांच्या त्या अभ्यासिकेतील टेबलावर टेबल-लँप तेवढा मंद गतीने जळत होता. बाकी भिंतीवरील सगळे दिवे मालवलेले. ते आपले आपल्या वाचनात व्यग्र. ऋषिमुनींसारखे! टेबल लँपच्या मंद प्रकाशात काळ्याभोर कुरळ्या केसांनी, आधीच शोभणारा त्यांचा मुखचंद्रमा रमाईंना आता अधिकच 'नयनरम्य मनोहर' भासू लागला होता. भावविवशतेनं रमाईंना त्यांच्या विलोभनीय केसांचं हलकेच चुंबन घ्यावसं वाटू लागलेलं... पण अलीकडे दोघांत थोडासा अंतराय निर्माण झालेला होता. रमाईंनी मनाला आवर घातला.

बऱ्याच वेळानं साहेबांच्या हे लक्षात आलं की, आपल्या पाठीमागं आपली 'रामू' उभी आहे... न बोलता... स्तब्ध... चूपचाप...

साहेब वाचन थांबवून बोलले,

'काय गं वेडे, अशी काय चोरुन बघत होतीस ? मी काय वाचतो आहे हे बघत होतीस ?'

'हे बघाऽऽ, चोराच्या मनात असतं चांदणं! त्येला सगळीकडं चांदणंच दिसंत.'

'म्हणजे ? मी नाही समजलो!'

त्यात काय समजायचं ते! काल इलायतल्या मॅडमचं तुमाला एक पत्र आलंय नव्हं ? तेच पत्र तुमी या पुस्तकात घालून, चोरुन चोरुन सारखं वाचत होता, नव्हं का ? हे बघाऽऽ, तुमची तशी इच्छाच असंल तर लगीन करुन टाका तिच्याशी. माझी काही आडकाठी न्हाय. हं... हा पाहिजे तर लिहून देते... आता परत चार दिवसानं इलायतला जायाचंच हाय, तवा येताना घिवूनच या की.. अवोऽऽ तुमाला ज्यात आनंद त्यात मलाबी...

'एवढी गं तू मनानं मोठी आहेस, मग त्या नागपूरच्या फळवाली बरोबर तू एवढा का सवतीमत्सर करीत होतीस ?'

'ती नव्हती वोऽऽ तुमाला शोभणारी!'

'पण आपल्या जातीची तर होती.'

'पण तुमाला ते शोभलं नसतं. उगीच नावाला कलंक नको, म्हणून तिला मी...'

'तिला तू पळवून लावलीस, असंच ना ?'

'तसं बी काही न्हायी. तिचं तिलाच एक दिशी समजून चुकलं की, ज्याच्या पाठीमागं आपून लागलोय, त्यो एक आपल्यांतला फार मोठा मानूस हाय म्हणून. अन् ती स्वत:हून तुम्हापास्नं दूर गेली हो... स्वत:हून. आता तर, आपले लोक तुमाला बाबासाहेब बाबा... म्हणत्याती... अन् मला आईसाहेब... रमाई... आई... कुणीकुणी रमाई म्हणत्याती... तवा हे बरं दिसलं नसतं तुम्हाला... अन् जगालाबी...'

बाबासाहेब एकदम आनंदून ओरडले, 'रामू, तू ग्रेट आहेस!'

रमाई मग अधिकच साहेबांच्या जवळ येऊन लाडेलाडे बोलल्या, 'म्हटलं कुणाचं हे पुस्तक ? एवढं गढून वाचताय ?'

'कुणाचं हे पुस्तक ?' बाबासाहेब आश्चर्य करीत उद्‌गारले, 'होऽऽऽ! तुला आता बरंच समजायला लागलंय म्हणायचं!'

'मला अडाणीला वोऽऽऽ त्यातलं काय समजावं ? आपलं उगं उगं विचारलं, तुमच्या समाधानासाठी...' रमाई मंजूळ मंजूळ चिवचिवली.

'मधुन मधून अलीकडे तू शुद्ध शब्द वापरतेस... ठीक ठीक... हे बघ, मी वाचतोय हा एक महान 'कुरल' नामक ग्रंथ आहे. भगवद् गीता इतकाच हा एक मौलिक ग्रंथ आहे. या एका ग्रंथामुळे लिहिणाऱ्याचं साऱ्या जगात जाव झालंय. तिकडे मद्रासकडे हा एक महान संत कवी होऊन गेला. आपल्याच महार जातीचा तो होता.

'आपल्या जातीचा ? एवढा मोठा माणूस ?'

'होऽऽ त्याला तिरुवल्लुवर म्हणत... तिरु म्हणजे संत अन् वल्लुवर... हे त्याचं खरं नाव... असा तिरुवल्लुर.'

'काय म्हणतोय तो या पुस्तकात ?'

'कसं सांगू एका शब्दात ? धर्म, ग्रंथ आणि काम या विषयांवर खूपच मौलिक असे हे त्याचे विचार आहेत. एका वाक्यात सांगायचं म्हणजे अवघडच आहे, तो म्हणतो... 'ज्याच्या हृदयाला प्रेम माहीत नाही, तो वठून गेलेल्या झाडाप्रमाणे

आहे.' 'जुलमाखाली विव्हळणाऱ्यांचे अश्रू राजाचे राज्य बुडवतात...' आणि 'प्रत्येक मोठ्या व्यक्तीच्या यशामागे, स्त्रीचीच प्रेरणा असते... असेही तो म्हणतो...'

'तुम्हाला ते पटतंय?'

'वा! अवश्य पटतंय. माझ्या ह्या एवढ्या यशामागेसुद्धा एका स्त्रिची... रामूऽऽऽ तुझीच... तुझीच प्रेरणा आहे म्हटल... पुढं ऐकलंस का... या कवी वल्लुवराचं, आपल्या बायकोवर तसंच नितांत प्रेम होतं. इतकं की, बायकोच्या निधनानंतर त्यानं संसारत्याग करुन चक्क संन्यास घेतला...'

'वा! याला म्हणतात बायकोवरलं प्रेम!'

साहेब गंभीर होत म्हणाले, 'रामूऽऽ माझ्या अगोदर जर तू गेलीस, तर तर मीसुद्धा असाच संन्यास घेईन हं!'

रमाबाई विचारमग्न होत खंबीरपणे म्हणाली, 'अं हं... तुम्हाला संन्यास घेता येणार न्हायी. दीन-दलितांचा उद्धार केल्याशिवाय तुमाला या जन्मी सुटका न्हायी! त्यासाठी देवानं तुमच्या रुपात अवतार घेतलाय... तुम्हाला संन्यास घेता येणार न्हायी.'

परत बाबासाहेब आनंदून म्हणाले, 'रामूऽऽ, तू ग्रेट आहेस! ग्रेट आहेस!! खरंच ग्रेट आहेस!!'

रमाआईनं विषयांतर करण्यासाठी मध्येच बाबासाहेबांना विचारलं, 'आज तुम्ही महात्मा गांधीजींना भेटायला गेला होता, त्याचं काय झालं?'

'काय होणार? जे होणार होतं, असं गृहीत धरलं होतं, तेच अखेरीस झालं...' मी गांधीजींना स्पष्ट म्हणालो, 'पहिल्या गोलमेज परिषदेत मुसलमान, शीख व अस्पृश्य समाजांना स्वतंत्र हक्क मिळावेत, हे तत्वतः मान्य करण्यात आलेले आहे. तुम्ही काँग्रेसवाल्यांनी फक्त मुसलमानांच्या आणि शिखांच्या हक्कांना संमती दिली आहे, परंतु आम्हा अस्पृश्यांचे काय?'

तेव्हा गांधीजी म्हणाले, 'राजकीय दृष्ट्या अस्पृश्यांना हिंदूपासून निराळे करण्यास माझा विरोध आहे. त्यांना राखीव जागा देण्यासही मी अनुकूल नाही, तसे झाल्यास आत्मघातकीपणाचे ठरेल, असे माझं स्पष्ट स्पष्ट मत आहे...' त्यांचं हे असलं मत ऐकलं. लगेच मी जागचा उठलो नि गांधीजींना म्हणालो, 'आपल्या या स्पष्टवक्तेपणाबद्दल मी आपला आभारी आहे. आपण दोघे कुठे उभे आहोत, हे मला एकदा कळायला हवे होते, ते समजले...'

'पुढं...?'

'गांधीजी आपल्या समाजाला स्वातंत्र्य हक्क सुखासुखी मिळू देणार नाहीत हे आता उघड झाले.'

'मग...?'

'मग काय... आपणाला झगडावे लागेल... त्यांच्या विरोधाला तोंड द्यावे लागेल... कोणतीही गोष्ट ही भीक मागून मिळत नाही. ती लढून, झगडून, प्रसंगी प्राणाचं मोल देऊन हस्तगत करावी लागते... आम्ही हक्क मिळवूच मिळवू.'

'बरं ते जाऊ दे. मला हे सांगा,' रमाईनं विचारलं, 'तुमचं इलायतेला जाणं कंदी ठरतंय?

'या चार-सहा दिवसांतच निघू... तयारी होत आली.'

'काही तुमाला सोबत गोडधोड करुन दिलं तर घ्याल ना?'

'तुझ्या प्रेमभावाचाच मी नित्य भुकेला!'

‘चलाऽऽ कदी कदी तुमी अस्से प्रेमात येता, तर कदी कदी तुमी जमदग्नीचा अस्सा अवतार धारण करता, खूप खूप रागावता... धारवाडहून मी लवकर आले म्हणून किती किती तुमी बोललात ते मला... कित्ती कित्ती रडले मी... अजून रडते मी... अजून रडते...’

‘अगं, तुझा हा नवरा कसा सागरासारखा आहे. वादळ उठलं तरच उसळणार... एरव्ही, कसा शांत शांत... खरं सांगू रामू... तुझा-माझा असा हा संसार पाहिला की, माझ्या डोळ्यासमोर तुकारामाचा व संत कबीराचा संसार उभा राहतो... संत तुकाराम अभंग रचण्यात, भजन करण्यात सदा दंग... त्यातच देहभान विसरलेला, पण त्याची बायको ‘अवली’ मात्र तुझ्यासारखी केवळ संसारात रमणारी. संत तुकारामाचं संसारात लक्षच नव्हते... तुकारामाचा सारा संसार त्याची बायकोच चालवायची... म्हणून तुकोबांनी भलीमोठी ‘अभंगगाथा’ रचली. उदंड पद्ये लिहिली... गुळाबरोबर त्याची गोडी असावी, तशी संत कबीराबरोबर त्याची पत्नी ‘लोई’ असे. कबीराने तिला प्रेमानं राम जनिया म्हणावं. मी कसं तुला ‘रामू’ म्हणतो तसं. संत कबीर दोहे रचित, गात, त्याद्वारे लोकांना ज्ञानामृत पान घडवीत गावोगाव भटकत असे. त्याची पत्नी ‘राम जनिया’ घरी शेले विणी. कबीराचा घरसंसार चालवी. त्यामुळे कबीराने हजारोंनी ‘दोहे’ लिहिले. अभंग गुंफले. गावोगावी जाऊन ते मुक्तकंठाने गायले. त्याच्या उपदेशाने लाखोंची जीवनं उद्धरली गेली... म्हणून तो आणि त्याचे दोहे जगात गाजले, अमर झाले... माझाही हा संसार असा तसाच... पण रामूऽऽ तू संसार चालवितेस, म्हणून मी एवढ्या केसीस लढवितो, राजकारण खेळतो, विधीमंडळ पार्लमेंट्स गाजवितो... अस्पृश्यृद्धाराचं कार्यही करतोच... रामू... मला कधी कधी वाटतं, परमेश्वर अशा ‘नवरा-बायकोच्या’ जोड्या आधी करुनच मग त्यांना खाली पाठवितो व त्यांच्याकडून असं भव्य-दिव्य काम तो करवून घेतो... रामूऽऽ तुझ्यामुळंच माझ्याही आयुष्यात असंच काहीतरी मोठं कार्य, त्या परमेश्वराला घडवून आणायचं असेल... म्हणून ही ‘आमची जोडी... आधी वर करुनच... मग खाली पाठवलीय...’

‘इश्श! असं काहीतरी काय बोलताय?’

आणि मग बाबासाहेब स्वतःच मोठमोठ्याने हसू लागले... आणि काही आठवल्यासारखं करुन परत म्हणाले, ‘रामू... उद्या तुझं भाषण आहे... माहीत आहे ना?’

‘होऽऽऽ मी जाईन उद्या तिथं... तिथं मी काय नि कशी बोलले, हे नंतर कळेलच की तुम्हाला. म्हटलं, रामजी सुभेदाराची सून हाय मी! कच खाणाची न्हाय...’

‘होऽऽऽ रामू, तू खरंच ग्रेट आहेस! तुला मी यश चिंततो!’

दुसरा दिवज उजाडला. मोठ्या उत्साहात, जोमात. आज रमाआई समाजात प्रथमच भाषण करणार होत्या. त्यांनी सर्व घरकाम लवकर आटोपले. संध्याकाळ झाली. तेवढ्यात, महिला मंडळातील दोन महिला कार्यकर्त्या रमाईंना नियुक्त सभा मंडपाकडे घेऊन जाण्यासाठी आल्या. देवाच्या, मामजींच्या (रामजीबाबांच्या) व पतिदेवाच्या प्रतिमेला नमस्कार करुन रमाई भाषणाला निघाल्या. त्यांनी बोलण्याची चांगली तयारी केली होती. रमाईंनी भाषणाला सुरुवात केली.

(रमाईचे भाषण वाचण्यासाठी आम्ही प्रकाशित केलेले ‘माता रमाईचे भाषण’ हे स्वतंत्र पुस्तक पहावे. किंमत फक्त १० रुपये : प्रकाशक)

आणि त्या दिवसापासून रमाईसाहेब उत्कृष्ट भाषण देतात, हे साऱ्या मुंबईत झाले. रमाईच्यावर साऱ्या दलित जनतेचं जीवापाड प्रेम. साऱ्या पद्दलितांच्या त्या ‘रमाई’. त्यात ‘त्या चांगलं भाषण देतात’ असं समजल्यावर दलितांच्या विशेषतः ‘महिला मंडळा’च्या आनंदाला उधाण आलेलं. रमाआईसाहेबांना भाषणासाठी मुंबईच्या काना-कोपऱ्यातून आमंत्रणावरुन आमंत्रणं येऊ लागली. पण १५ ऑगस्ट १९३१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी लंडनला गेले नि

रमाआईंनी अंथरुण धरले. खूप इच्छा असूनही त्यांना सभा-संमेलनाला हजर राहता येईना. तरीसुद्धा बरं वाटलं की जरुर येणार असं खात्रीपूर्वक आश्वासन त्या प्रत्येकाला देऊन ठेवत होत्या.

अशा अवस्थेत असतानाच केवळ आठ दिवसांनी त्यांना साहेबांचं पत्र आलेलं दिसलं. 'एवढ्यात साहेबांचं पत्र?' असं म्हणून रमाईंनी ते पत्र मोठ्या आश्चर्यानं फोडलं. उघडून पहाते तर, ते पत्र साहेबांनी एडन बंदरावरुन लिहिलेलं होतं —

एडन बंदर

प्रियतम रामूस,

अ. आ.

सोबत 'जनता' पाक्षिकासाठी लिहिलेल्या पत्राची एक नक्कल खास तुझ्या अवलोकनार्थ पाठवीत आहे. रामू, माझं सारं जीवन तुझ्या पुढंच आहे. ते तूच घडवीत आहेस. तुझ्या प्रेरणेने ते घडत आहे. यावर तुझं मत कळव तू अर्धशिक्षित आहेस, पण खूप हुशार आहेस... जणू मुरलेला मुरांबा आहेस. माझी प्रकृती ठीक आहे. तुझ्या प्रकृतीविषयी लिहित चल. तुझ्याजवळ आता पैसे असतात. औषध घेण्यात काटकसर करु नकोस.

सर्वांना कुशल

भीमराव

मा. संपादक 'जनता' पाक्षिक

मुंबईः

समुद्राच्या लाटांच्या घनगंभीर गर्जनेमुळे मनुष्याची इतरांशी बोलण्याची इच्छा होत नाही. तो गंभीर होतो, आपणही तसेच गंभीर होऊन विस्मृतीच्या तळाशी बसलेल्या आठवणींशी खेळू लागलो...

माझ्या मित्रांना व सहवासातल्या मंडळींना वाटते की, माझा स्वभाव काव्यमय नाही. तो काव्यमय नसला तरी माझा आयुष्यक्रम, माझे जीवन म्हणजे एक प्रचंड असे काव्यच बनत चालले आहे. 'हिंदुस्थानातील एका अस्पृश्याचे, महाराचे पोर पुढे गोलमेज परिषदेत बसेल आणि राष्ट्राची भवितव्यता निर्माण करण्याच्या चर्चेत प्रामुख्याने भाग घेईल, हे कोणाला तरी शक्य वाटले नसेल का? कल्पनेची भरारी लुळी पडावी, तिलाही आकलन करता येऊ नये, इतकी ही घटना काव्यमय व चमत्कृतीपूर्ण नाही का?....'

इतरांना तर शक्यच नाही, पण बडोदा महाराजांच्या औदार्याने प्रथम मी जेव्हा शिक्षणासाठी न्यूयॉर्कला जाण्यासाठी निघालो, तेव्हासुद्धा पुढे असे काही घडेल– विद्यार्जन करुन स्वतःचे हित साधण्याच्या उद्देशाने सुरु झालेला माझा जीवनक्रम इतक्या अल्पावधीत माझ्या मुक्या व पददलित जनतेच्या आयुष्यक्रमाशी आणि सुखदुःखांशी एकजीव होण्याइतका तो सार्वत्रिक व महत्वपूर्ण बनेल- ह्याला मला स्वतःलाही अंधुकदेखील कल्पना नव्हती.

'माझ्या जनतेच्या मजविषयीच्या या अलोट प्रेमाला मी पात्र आहे, असे मला कधीही वाटत नाही. ज्याला दैव अगर भवितव्य म्हणतात, त्या भवितव्यतेचाच हा खेळ असून तिच्या पूर्वसंकेतानुसार... माझ्या जनतेच्या उद्धाराचे एक साधन म्हणून व निमित्त म्हणून परमेश्वराने आज मला हाताशी धरले आहे, असे वाटते. पूर्वसंकेतानुसार मजवर पडलेल्या या जबाबदारीला, मी स्वतःला सर्वतोपरी पात्र बनवावे, हे मला माझे एक आद्यकर्तव्यच वाटत आहे...'

पोयबावाडी : मुंबई

प्रिय साहेबांना,

तुमचे पत्र मिळाले. वाचून समाधान झाले. तुमी लिहिलंय, त्यातलं अक्षर न् अक्षर खरं आहे. आपले इच्छित सारे खरे होत आहे. देवाने तुमची माझी जोडी जमविली असावी, ती अशाच पूर्वसंकेतानुसार-तुमच्या हातून काहीतरी भव्य कार्य करवून घेण्यासाठी. तुमीसुद्धा जाताजाता मला असेच म्हणाला होता. आठवत असेलच. असो. आम्ही सारे खुशाल आहोत. काळजी नसावी. माझी प्रकृती ठीक आहे. तुमच्या प्रकृतीस जपावे. तुमच्या आगमनाकडे डोळे लावून बसलेली...

तुमचीच

रामू

रमाबाईंनी पत्र लिहिलं. पुनः पुन्हा वाचून लिफाफ्यात घातलं आणि आत हाक घातली, 'लक्ष्मीबाईऽऽ साहेबांचा लंडनचा मागील पत्ता, शोधून काढा बघू. साहेब तिथं पोहचेपर्यंत माझं हे पत्र त्यांच्या पाठोपाठ त्यांना जाऊन तिथं मिळालं पाहिजे... कसं?'

'रमा, तू आता फार चतुर झालीयास हं. बॅलिस्टरीन बाई तू!'

अन् दोघीही जावाजावा दिलखुलास हसल्या!

• • •

२२

२९ जानेवारी १९३२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना घेऊन येणारी लंडनची बोट ठीक सकाळी सहा वाजता मुंबई धक्क्याला लागली. नि साऱ्यांच्या हृदयात आनंदाचं उधाण आलं.

भल्या पहाटेपासून त्यांचे जवळचे इष्टमित्र, त्यांचे एकनिष्ठ अनुयायी, नातेवाईक व इतर हितचिंतक त्यांच्या आगमनाची मोठ्या उत्सुकतेने वाट पाहत होते. प्रत्येकजण हातात शोभिवंत हार घेऊन, पहाटेच्या थंडीत तिष्ठत शांतपणे उभे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दर्शनार्थ तुफान गर्दी लोटली होती. त्या गर्दीतच त्यांची पत्नी सौ. रमाबाई आंबेडकर डोळ्यांत प्राण आणून आणि हातात सुगंधी फुलांचा हार घेऊन आपल्या पतिदेवाची वाट पाहत उभ्या होत्या. साहेबांना केव्हा एकदा डोळं भरुन पाहिन असं त्यांना झालं होतं.

तेवढ्यात बाबासाहेबांची पुण्यमय पावलं जमिनीला लागली. बाबासाहेबांना पाहताच जमलेल्या साऱ्यांनी मोठ्या उत्साहाने गगनभेदी घोषणा द्यावयास सुरुवात केली. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय! डॉ. आंबेडकर कोण आहे? सात कोटी दलितांचा राजा आहे. डॉ. आंबेडकर अमर रहे!'

प्रथम समता सैनिक दलाने त्यांना मानवंदना दिली. लगेच हार घालण्यासाठी त्यांच्या भोवती एकच गर्दी उसळली. बाबासाहेबांवरच्या आत्यंतिक भक्तीचे, प्रेमाचे आणि निष्ठेचे प्रतीक असे ते हार... बाबासाहेबांच्या गळ्यात पडत होते. या साऱ्या गर्दीपासून रमाआई दूरच उभ्या होत्या. आपल्या साहेबांवरील आपल्या लोकांचे ते अफाट प्रेम त्या प्रथमच पाहत होत्या. पाहता पाहता त्यांचे भाबडे डोळे आनंदातिशयाने पाझरु लागले.

रमाआईंनी सर्वात शेवटी बाबासाहेबांना हार घातला. तो हार घातला तोसुद्धा त्यांच्या पायतळी नजर लावूनच. रात्रंदिवस ज्या मूर्तीची सेवा-काळजी मनोभावे केली, त्या निकट मूर्तीकडे डोळे भरुन पाहण्यास त्यांची लज्जा व संस्कार परवानगी देत नव्हते जणू.

पण हे पवित्र हृदयंगम दृश्य 'जनता' चे त्या वेळचे संपादक श्री. सहस्त्रबुद्धे यांच्या चाणाक्ष नजरेनं अचूक टिपलेलं होतं. आणि मग अभिनंदनाच्या सभेत सहस्त्रबुद्धे यांनीच अवचितपणे रमाईंना सगळ्यांच्या शेवटी साहेबांना हार घालण्याचं आणि तो हार गळ्यात घालत असताना, पायतळी बघण्याचं कारण काय असा प्रश्न विचारला.

पण रमाआईंना क्षणभर अवघडल्यासारखं झालं. सभेत बोलावं तर चांगलं बोलता येणार नाही, न बोलावं तर 'साहेबांची' प्रतिष्ठा कमी होईल. तशा रमाआईसाहेब फार चतुर व शहाण्या होत्या.

क्षणात त्यांच्या अंगात वीज सळसळल्यासारखं झालं. त्या ताडकन् उठल्या नि सभेत बोलू लागल्या —

(रमाईचे हे भाषण सुद्धा वाचण्यासाठी आम्ही प्रकाशित केलेले 'माता रमाईचे भाषण' हे स्वतंत्र पुस्तक पहावे. किंमत फक्त १० रुपये : प्रकाशक)

स्वागतासाठी उत्तर देण्यासाठी म्हणून बाबासाहेब उठले. आपल्या लोकांचे आपल्यावरील हे अलोट प्रेम व कृतज्ञता भावना पाहून ते गहिवरले. काही क्षण त्यांच्या तोंडातून शब्दच फुटेना. काही वेळाने दाटल्या कंठाने ते म्हणाले,

'गोलमेज परिषदेतील कामगिरीच्या यशाचा धनी मी नव्हे, त्या यशाचे धनी येथे जमलेले माझे असंख्य बंधू-भगिनीच सर्वस्वी आहेत. गोलमेज परिषदेतील माझी कामगिरी पाहिल्यावर हिंदूंची भावी पिढी - मी राष्ट्राची चोख कामगिरी बजावली - असाच निर्वाळा देईल. आता मी जास्त काही बोलत नाही. तथापी मघाच्या वक्त्या सौ. मोहितेबाईंनी सौ रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्याविषयी खूप सांगितलं. पण ह्यातलं काहीएक मला अजूनपर्यंत तुमच्या या आईसाहेबांनी सांगितलेलं नव्हतं. (हंशा!) तुमची आईसाहेब मोठ्या 'भाग्याची भागीरथी' आहे हेही मला आजच कळलं. (हंशा!) बाकी आहे खरी भाग्याची भागीरथी!'

(प्रचंड हंशा, टाळ्या नि गगनभेदी घोषणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर की जय! सौ. रमाबाई भीमराव आंबेडकर की जय!)

रमाआईसाहेब आजच साहेबांची एवढी मोठी सभा प्रत्यक्ष पहात होती... साहेबांची सभेत बोलण्याची शैली प्रथमच ऐकत होती... आनंदानं त्यांचे हृदय भरुन येत होतं. त्यातच त्यांना मामंजीची आठवण दाटून येत होती, दाटून येत होती!

त्या दिवशी रमाबाई आंबेडकर काय नेसल्या आहेत, हे कुणाला काहीच समजलं नाही. इतक्या बेमालुमपणे त्या नेसल्या होत्या. पण डॉ. बाबासाहेबांना ते चांगलं समजलं होतं. म्हणून ते मनोमनी पत्नी रमाबाईंवर रागावले होते. पण चारचौघात त्याबद्दल काही बोलताही येत नव्हतं. सत्कार-समारंभ उरकताच, बाबासाहेबांनी रमाबाईला जरा एका बाजूला घेऊन हळूच विचारलं —

'अगं पण हे... हे तू काय नेसली आहेस तरी काय?'

'काय म्हणजे? कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी तुम्हाला सन्मानार्थ दिलेला जरतारी रेशमी फेटा...'

'फेटा जरतारी रेशमी असला म्हणून काय बाई-माणसानं तो असा साडीसारखा नेसायचा असतो काय?'

'लाज झाकायला कसंलही वस्त्र चालतं... माझ्याजवळ तीन चार पातळं होती. पण ती सारी, कशी विटलेली... वीरं गेलेली... रंग उडालेली अशी... तिथंच कपाटात हा... नेसलेला गर्भरेशमी जरतारी फेटा मला दिसला... खणात कसा चमचम करीत होता... बघून माझं डोळंच दिपलं... लगेच काढून मी घेतला... खालवर निरखला... जराच कमी लांबी रुंदीनं पातळाएवढाच भरला. मी तो नेसला... बरोबर नेसला... कुणाला कळलं का, हा फेटा आहे नि तो मी नेसला आहे म्हणून? झालं तर... आजचा आपला हा मंगल सोहळा, यावरच साजरा झाला—'

'अगं पण... आपल्या नणंदेकडून, मंजुळेकडून एखादं तिथं चांगलं पातळ मागून घ्यायचं होतंस? तिनं तुला दिलं नसतं का? हे... हे... काय?'

'नणंद असो वा कोणी असो... असं दुसऱ्याचं मागून, जरतारी शालू नेसून, मिरवण्यापेक्षा माझं स्वतःच साधं-भादं लुगडं देखील मला अधिक मोलाचं वाटतं... ते माझं स्वतःचं असतं मालकीचं?'

'एवढं स्वाभिमानी असू नये माणसानं?'

'मी अभिमानी नाही, स्वाभिमानी जरुर तर... साहेब, आम्हा बायकांचं शास्त्र, तुम्हा पुरुषांना माहीत नसतं... मी नणंदेचं पातळ नेसलं असतं, तर सगळ्या बायकांत तुमची ही बहीण मंजुळा म्हणाली असती... तो... तो रेशमी शालू... माझी भावजय रमा नेसलीय ना...? तो माझाच आहे बरं का? तिला नेसायला पातळच नव्हतं... तिनं माझ्याकडं मागितलं नि मी

दिला दिलं... थाट बघा बॅरिस्टरीनबाईंचा— अशी उणी दुणी बोलली ऐकण्यापेक्षा हा माझा स्वतःचा भरजरी फेटाच मला आवडला. खरं म्हणजे, बाईच्या जातीला... कपाळाला भलं मोठं कुंकू व गळ्यात काळ्या मण्याचं मंगळसूत्र असलं की, पुरं असतं... नाही का?'

'रमा, तुझे हे विचार मला खूप आवडले... अलीकडं तू हळूहळू शहाणी होऊ लागली आहेस हं... मघाशी भाषण छान दिलंस.'

नवऱ्याच्या या गंमतीच्या व कौतुकाच्या बोलण्यावर रमाबाई फक्त हसल्या.

धक्क्यावरील सत्काराचा कार्यक्रम आटोपल्यानंतर, सर्व जमलेल्या मंडळींचा निरोप घेऊन बाबासाहेब, रमाबाईसह घरी आले. घरी आले... तर घरी जेवण तयार नव्हतं...

'अगं, घरात जेवणाचं... काहीच कसं काय नाही?'

'कसं असणार हो...? धारवाडला हवा पालटण्यासाठी औषधोपचारासाठी वराळे मास्तरांच्या कडेही मी गेलेली... इथं लक्ष्मीबाई, नि मुलं... मिळवणारा फक्त माझा लहान भाऊ शंकर... तो किती काय मिळवणार? कसा तरी निर्वाह चाललाय हे विशेष... मास्तर-मास्तरीण आपल्याकडेच उतरलेत.'

'अरेरेऽऽ... म्हणजे...? मग तुम्ही लोक अजून जेवला आहात की नाही? हे पाच रुपये घे... शंकरला दे आणि त्याला सांग, धान्य, भाजीपाला व स्वयंपाकाचं सारं सारं सामान ताबडतोब घेऊन ये. झटपट जेवण करा. खरंच, रमाऽऽ काय हे आपलं जीवन...?'

'साहेब, आपलं हे जीवन असंच राहणार नाही हं? एक दिस... सुखाचा दिस उगवंल... माणूस आशेवर जगतो. असं निराश होऊन हिंमत हरु नये...'

'बघ... बघ... हळूहळू तू शहाणी होऊ लागली आहेस हं!'

'अहो, ढवळ्याजवळ पवळा बांधला वाण नाही, पण गुण लागणारच की...'

दोघंही मग समाधानानं एकमेकांकडं बघून, गालांतल्या गालांत गोडसं हसतात! गोडसं!!

... डॉ. आंबेडकरांच्याच घरी बाहेर व्हरांड्यात बसून, साहेबांचे मेहुणे शंकरमामा व एक कार्यकर्ता पुण्याच्या एका प्रमुख वर्तमानपत्रात आलेला मजकूर वाचीत बसलेले —

... डॉ. आंबेडकरांचे अस्पृश्य वर्गावर प्राणापलीकडे प्रेम. आपल्या समाजाच्या हिताची ते आपल्या प्राणापेक्षा अधिक काळजी घेत. सर्व देश त्यांच्यावर या वेळी उलटलेला, तरी देखील ते रेसभरही ढळले नाही. अशा प्रसंगी महाराष्ट्रीय बाण्याप्रमाणे ते बोलले, 'तुम्ही हे लक्षात ठेवा की, मी माझ्या पुण्य कर्तव्यापासूमन रेसभरही ढळणार नाही. आणि माझ्या अस्पृश्यवर्गाच्या न्याय्य नि सनदशीर हक्कांचा मी कदापी घात करणार नाही. मग बेहत्तर, तुम्ही मला नजीकच्या दिव्याच्या खांबावर फाशी दिलेत तरी!...'

'कोण ते एवढ्या मोठ्यानं वाचतंय?' असं म्हणून स्वयंपाकघरातून रमाईसाहेब धावत बाहेर आल्या. आणि वाचत बसले त्यांच्यावर विजेसारख्या तुटून पडत कडाडल्या,

'कोण ते एवढ्या मोठ्यानं वाचतंय? फाशी दिले तरी... फाश... फाशी... साहेब, फाशी गेले तर तुमाला न्हाय त्याचं सुतक लागणार... कोण शंकर...? तू एवढ्या मोठ्यानं वाचतोस? आपल्या साहेबांवर आकाश कोसळलंय... साऱ्या देशात त्यांच्यामुळं तंग वातावरण झालंय... त्येचं तुला काहीच नाही? साऱ्या चाळीला ऐकू जावं, एवढ्या मोठ्यानं तू वाचतोस? तुला लाज...'

'ताईऽऽ येथे मी हळू वाचले काय किंवा मोठ्यानं वाचले काय... यानं काय फरक पडणार हाय? हे वर्तमानपत्र हाय...पुण्याचं. त्यांनी ही छापलेली बातमी आतापर्यंत साऱ्या महाराष्ट्रात, घराघरांत मुंबईच्या चाळीचाळीतून झाली असेल... ज्याच्या ज्याच्या तोंडात हाच विषय असेल...'

'पण तू घरचा माणूस... रमाबाईंसाहेब मध्येच बोलल्या, 'तू तरी असे तारे तोडू नगंस ? जगाच्या तोंडाला कोण हात लावणार ? पण आपण तेल नगं ओताया... गांधीबाबानं पुण्याला मरेपर्यंत उपवास धरलाय... त्याच्यामुळं आपल्या साहेबावर सारा देश उलटलाय... म्हणून आपणबी उलटायचं ? त्यांच्या जीवाच्या काळजीनं माझा ऊर फाटायला लागलाय बघ...'

'ताई, तू उगीच आपल्या डोक्याला त्रास करुन घेतेस. अगं, हे राजकारण हाय... राजकारणाचे डावपेच हायतं... डावाला डाव द्याला लागतो... प्रतिस्पर्धी कच्चा दिसला की, त्येंची चितपट होते... डाव अंगावर येतो... तुला नाही त्यातलं काय समजायचं ?'

'अहाहाऽऽ मला काय समजायचं न्हायी म्हणतोस ? आता लई शहाणा लागून गेलास की न्हायी ? आरं, रोज रोज साहेबांना धमकीची पत्रं येतात... काल तो पोस्टमन मला म्हणाला, बाईसाहेब तुमच्या नवऱ्याला जपा... त्यांचा जीव लई धोक्यात हाय. त्यानं मला टोपलीभर पत्रं दिलीत... त्यात साऱ्यांनी लिवलंय... तुमचा हाथं खून करतो... तिथं खून करतो... गांधीबाबा म्हणत्यात तसं मुकाट्यानं कबूल केलंस तर बरं, न्हाय तर तुझी दिसशील तिथं खांडोळी करु...'

'ताई, कावळ्याच्या शापानं गाई मरत नाही.'

'आरं, हा कावळ्याचा शाप नाही. सैतानाचा हाय. देवापरासबी सैतान लई मोठा असतू... बघायची हायीत का त्या सैतानाची पत्रं... ? काल दिवसभर मी नि लक्ष्मीबाई वाचीत बसलू होतू... डोळ्याला सारखी धार लागली हुती... हृदयात काय झालं असंल, होत असंल ? पण शंकर, साहेबांच्यावर हे वादळ का म्हणून उठवलंय असं ? काय केलंय असं साहेबांनी ?'

'ताई, तुला ते सारं ऐकायचं आहे ? मी माझ्या मनानं काही सांगत नाही, पुण्याच्याच एका दैनिकामधील संपादकीय मजकूर तुला मी वाचूनच दाखवतो, म्हणजे सारं काही तुझ्या लक्षात येईल... ऐक —'

'...१४ ऑगस्ट १९३२ च्या सुमारास ब्रिटीश पंतप्रधानांनी भारतातील अल्पसंख्यांकाच्या प्रश्नावरील आपला निवाडा जाहीर केला आहे. या निवाड्यास व शीख लोकांबरोबर अस्पृश्य वर्गास ('स्वतंत्र मतदार संघ' देऊन) राखीव जागा देऊन, त्यांना आपले प्रतिनिधी, त्यांनीच निवडण्याचे त्यांना हक्क दिलेले आहेत. पण यापूर्वीच 'अस्पृश्यांना जर स्वतंत्र मतदार संघाचे हक्क दिलेत तर आपण त्यासाठी प्राण पणास लावून त्या गोष्टीला विरोध करु,' अशी गांधीजीनी ब्रिटीश मंत्रीमंडळाला तंबी दिलेली होती म्हणून असा हा निवाडा ऐकताच, गांधीजीने त्याविरुद्ध प्राणांतिक उपोषणाचे भयंकर अस्त्र उपसले आहे. गांधीजींच्या या विरोधामुळे नि निर्धारामुळे संबंध देशात मोठी खळबळ उडाली आहे. देशातील झाडून सारी वृत्तपत्रे म्हणू लागली आहेत, 'हिंदु'धर्माच्या कसोटीची वेळ आली आहे. हिंदु समाजात हाहा:कार उडाला आहे. या स्वतंत्र मतदार संघाचा निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यावर साऱ्या भारताचे डोळे लागून राहिले आहेत. पुण्यात 'येरवडा जेल'मध्ये गांधीजींनी उपोषण चालू ठेवले आहे. डॉ. आंबेडकर आदी देशातील प्रमुख पुढारी पुण्याला जमून यावर तोडगा शोधून काढत आहेत. तेवढ्यात डॉ. आंबेडकरांच्याविरुद्ध प्रचाराची मोहीम सुरु करण्यात आलेली आहे. 'सैतान,' 'देशद्रोही,' 'ब्रिटीशांचा हस्तक'... अशा शेलक्या शिव्यांनी त्यांची देशभर संभावना केली जात आहे. एवढेच नव्हे, खुनाच्या धमक्यांची रोज शेकडोंनी पत्रे डॉ. आंबेडकरांना येत आहेत, असे विश्वसनीयरीत्या समजते. पण आंबेडकर उभ्या ठाकलेल्या प्रसंगाला मोठ्या धैर्याने तोंड देत आहेत, असे आतापर्यंतच्या चर्चेच्या अहवालावरुन दिसते. – बोल ताई... मघाशी तू माझ्यावर रागावली होतीस, मी 'हे' मोठ्यानं का वाचत बसलोय म्हणून ? तुला वाटणारं हे गुपीत आहे, पण ते साऱ्या देशभर केव्हाच उघड झालंय... तूच सांग ?'

'ते जाऊ दे रे... मी म्हणते, तू आत्ताच्या आता पुण्याला जावंस, साहेबांचा शोध घ्यावास... माझा कुठं जीव लागेना...'

'पण ताई, पुण्याला मी कुठं जाणार ? साहेब, कुठं उतरलेत, कुठल्या हॉटेलात राहिलेत, इथं मुंबईत कुणा कुणाला माहीत नाही. पुणं... मुंबईच्या खालोखालचं मोठं शहर... कुठं शोधणार ?'

'ते... ते... धारवाडचे वराळेमामा... आलेत, पुण्याला म्हणं... त्येंची पाठराखण कराया... बॉडी गार्ड म्हणून...'

'वराळेमामा आलेत? ताई, मग साहेबांना शोधलं... वराळेमामांच्या पुण्याच्या आईल्याआश्रात गेल्यावर, सारी माहिती मला मिळेल... साहेबांना मग शोधलं म्हणून समज... मिळंल त्या ट्रेननं जातो पुण्याला. गेलंच पाहिजे...'

... रमाई पाठमोऱ्या शंकरकडे पाहत उभ्या होत्या. एवढ्यात त्यांच्या जाऊबाई लक्ष्मीबाई तिथं आल्या. पाठमोरा होऊन जाणाऱ्या शंकरकडं पाहत त्यांनी रमाईला विचारलं, 'कुठं गेला हा शंकर?'

साहेबांच्याकडं पाठविला मी त्याला. पुण्याला. साहेब जिथं असतील, तिथनं शोधून काढायला. साहेबांचा कुठंच थांगपत्ता न्हाय. कुठं गुप्त झाल्यात कुणालाच ठावं न्हाय. पण माझा जीव अक्षी टांगणीला लागलाय नव्हं!

त्यावर लक्ष्मीबाई म्हणाल्या, 'रमा, एक आनंदाची बातमी... आता मुंबईकडे गेले हुते. वाटंत, आपलं ते संत ग्यानबुवा महाराज भेटलं की. ते मला म्हणालं, रमाआईसाहेबांवर साक्षात पांडुरंगाची किरपा झालीया. तवा, बाबासाहेबांचा बोल बी कुणी बाका करु शकणार न्हाय. उद्याच... उद्याच साहेब घरी सुखरुप येत्याल. आलंच पाहिजी. यशाची पताका खांद्यावर घेऊन... कीर्तीचं मंगल कलश मिरवीत मिरवीत मनाचा मोठेपणा घेऊन, उद्या आलंच पाहिजी. प्रत्यक्ष पंढरीचा पांडुरंग माझ्या स्वप्नात येऊन सांगून गेलाय. माझा ह्यो बोल खरा झाला तर येत्या कार्तिकी एकादशीलाच आईसाहेबांनी पंढरपूरला यायला हवं. साहेब उद्या येणार म्हंजी येणार!'

'आपलं साहेब खरोखर उद्याच घरी सुखरुप आलं तर पंढरपूरला जायाची माझी तयारी हाय... पांडुरंगा हा सबूद...' रमाई वचन दिल्याप्रमाणं निश्चयानं बोलल्या.

'मी बी ग्यानबुवांना तसंच सांगितलं. आणखी म्हटलं, आमच्या रमाची पण लई दिसापास्नं तशी इच्छा बी हाय!' लक्ष्मीबाई बोलली.

'जाऊबाई, लई बेस केलं. माझ्या डोकीवरलं हे वझं तुमी घेतलंत?'

'म्या कसलं घेतलंय? त्या ग्यानबुवा महाराजांनी म्हणा—'

— रमाबाई खाटेवर खिळूनच होत्या. अगोदर त्या आजारी, त्यात साहेबांची ही काळजी. काळजीमुळं त्यांना खाणंपिणं जात नसे. त्यात त्यांचा कडक उपास-तापास व्रत असेच. वर्तमानपत्रातील मजकूर वाचून, लोकांच्या उडणाऱ्या अफवा ऐकून, धमकीची पत्रं वाचून, रमाआईंच्या स्त्रीहृदयाचा थरकाप होई. साहेबांच्या जीवाला धोका पोहचू नये म्हणून, त्यांचे धर्मनिष्ठ सश्रद्ध मन देवाची प्रार्थना करी. देवाला साकडं घाली. नवस करी. परंतु तरीही *साहेबांना अशा सामाजिक वा राजकीय चळवळीपासून विन्मुख करण्याचा थोडाही विचार संसारी स्त्री म्हणून, त्यांच्या मनात कधी येत नसे. हेच रमाआईंच्या चारित्र्याचं विशेष होय.*

तीन दिवस झाले, साहेब पुण्याला गेलेले. तीन दिवस या पतिपरायण साध्वीनं तोंडात पाणी घेतलं नव्हतं. रात्रंदिवस त्यांना केवळ साहेबांचा ध्यास लागून गेलेला. संत ग्यानबुवा महाराजांनी आज 'साहेब घरी येणारच-' म्हणून भविष्य केल्यानं, रमाआईंचं सारं लक्ष साहेबांच्या वाटेकडे लागलेले.

— आणि काय आश्चर्य ! शंकरमामा, वराळेमामांच्या बरोबर बाबासाहेब संध्याकाळी पोयबावाडीच्या घरी आलेदेखील! साहेबांना पाहून त्यांना अत्यानंद झाला. चातकानं मेघाची वाट पहावी नि मेघानं अकस्मात येऊन वर्षावर करावा, तसं काहीसं रमाआईंना वाटलं. त्या आनंदाच्या भरात खाटेवरुन ताडकन् उठल्या. त्यासरशी एकदम तोल जाऊन कोसळणार तोच बाबासाहेबांनीच पुढं होऊन त्यांना सावरलं. रमाईंना धरुन त्यांची परत त्यांना खाटेवर अलगद निजवलं. वराळेमामा व शंकरमामा मागच्यामागेच बाहेर व्हरांड्यात जाऊन बोलत बसले.

बराच वेळ रमाई-बाबासाहेब दोघंही एकमेकांकडे पाहतच राहिलेले, कुणी कुणाशी बोलतच नव्हतं. त्यांचे डोळेच जणू शब्दाविण संवाद साधत होते. बऱ्याच वेळानं रमाईंनी विचारलं,

'काय झालं पुण्याला गेल्याचं?'

'काय होणार? तू आता वर्तमानपत्र वाचतेस ना? ते वृत्तपत्र काय म्हणतंय ते पहा, 'स्वतंत्र मतदार संघाची कवचकुंडले काढून घेऊन, गांधीजीनी आंबेडकरांना हतबल केले!' बाबासाहेबांनी मजकूर वाचला.

पडल्या पडल्या रमाई दुसऱ्या वृत्तपत्राचं 'हेडींग' वाचू लागल्या, 'गांधीजींचा प्राण वाचवून आंबेडकर महात्मा ठरले!'

—आणि रमाई बाबासाहेबांच्याकडे नुसत्या पाहत राहिल्या. बाबासाहेबसुद्धा बराच वेळ काहीच न बोलता त्यांच्याकडे पहातच राहिले. खोलीत निरव शांतता पसरली.

एवढ्यात काय झालं कुणास ठाऊक, हळव्या रमाआईंच्या डोळ्यांतून आसवांची माळ ओघळू लागली.

साहेबांनी हळूच रमाईंचे डोळे पुसले. बोलले, 'अरेऽऽ असं रडायला काय झालं? वास्तविक तू आनंदाने हसायला पाहिजेस... पुणे करार थोडा बहुत यशस्वी करुन मी आलोय. हास बघू. हास.'

'रडणंच कपाळी असल्यावर, हसणं कसं साधणार?' रमाबाई कळवळून बोलल्या, 'साहेब तुमी मला जास्त दिवस जगू देत न्हाय हं!'

हळूहळू साहेबांच्या डोळ्यात पाणी उभं राहू लागलं. आतडे पिळवटून म्हणाले, 'रामू, तू जास्त दिवस जगावीस म्हणून मी काय त्याग करतोय, हे माझ्या जीवालाच ठाऊक!'

साहेबांच्या ह्या बोलण्यानं रमाईंना मोठं आश्चर्य वाटलं. आपणाला साहेब दूर लोटीत आहेत, म्हणून रमाईच साहेबांच्यावर चिडून उठलेली आणि साहेब तर आपल्याविषयी मोठ्या त्यागाच्या गोष्टी करीत आहेत. नवल करीत त्यांनी विचारलं, 'म्हणजे मी नाही समजले?'

'त्यात काय समजायचं? ते सारं तुला नि मला काय ते ठाऊक आहे.'

'मला काही ठावं नाही... मला एवढंच ठावं हाय की, पतीकडून जर पत्नीला प्रेमामृताचं पान करायला जर मिळत नसेल तर... तर ती तडफडून कोमेजून, मरुन जाईल.'

'प्रेमामृत म्हणजे केवळ वासनामय प्रेम नव्हे आणि वासनामय प्रेम म्हणजे सर्वच सर्व काही नव्हे. एक कवी म्हणतो -

"जीवाचे जगणे असेच असते सापेक्ष प्रेमावरी

डोळेभेट दुरुन, भाव अथवा आशाही त्याला पुरे।"

आपल्या प्रियेचे नेत्र जणू अमृत-सुधा बरसणारे कलश असतात. तिच्या प्रेममय प्रेमाची एक नजरदेखील, प्रियकराचं सारं जीवन प्रेमानं भरुन टाकतात...'

'साहेब, मी तुमची बायको आहे. तुमची माझी जन्माची सोबत आहे. प्रेम कधी आपल्या प्रियावर अन्याय करीत नसतं.'

'मी काय तुझ्यावर अन्याय केलाय? कसला?'

या वेळी मात्र रमाईंचा रागाचा पारा बराच वर चढला. त्या रागानं बोलल्या, 'ते काय माझ्याच तोंडून ऐकायचं आहे काय तुम्हाला? ऐका तर... आज सहा वर्षे होत आली... तुम्ही मला टाळताहात... कित्येक दिवस तुम्ही घरीसुद्धा येत नाही... काही वेळ, घरी आला, तर सर्वांशी उभ्या उभ्याच बोलून लगेच पसार होता... का हा दुरावा? काय माझ्या हातून चूक झाली? का तुम्हाला मी आता आवडत नाही? काय झालंय ते तरी सांगा? असं जिवंतपणी पत्नीला साऱ्या सुखाला पारखं करणं हे क्रौर्य आहे... ही अमानुषता आहे...'

'रामू...!' बाबासाहेब शांतपणे उत्तरले, 'रामू, मला हे माहीत होतं, असं हे एके दिवशी नाटक होणार होतं म्हणून. तू माझ्यावर खूप खूप रागावणार... माझ्या वर्तनाबद्दल संशय घेणार... मला कठोर शब्दांनी जाब विचारणार... हे सारं मी गृहीत धरुन होतोच... तुझी यात काही चुक नाही!'

'मग? मग चूक कोणाची?'

'चूक दोघांचीही नाही!'

'असं कसं होईल? तुमची मी पत्नी आहे. कारणाशिवाय तुम्ही माझ्या पत्नीत्वाचा अवमान करीत आहात... हो तुम्ही... तुम्ही दोषी आहात... चूक तुमची आहे!'

'बरं... क्षणभर तसं धरुन चालू. रामू, तुला आठवतंय राजरत्नाच्या निधनानंतर तू खूप आजारी पडली होतीस... त्या वेळी मी तुला घेऊन एका फार मोठ्या तज्ञ डॉक्टरकडं गेलो होतो. डॉक्टरांनी तुला तपासलं नि मला बाजूला नेऊन त्यांनी माझ्या कानात सांगितलं...

बाबासाहेब आज प्रथमच आपल्या हृदयाचे पीळ उघडून दाखवू लागलेले... 'बॅरिस्टरसाहेब...' तो तज्ञ डॉक्टर मला सांगू लागला, तुमची बायको तुम्हाला आणखी काही वर्षे लाभावी, असं तुम्हाला वाटत असेल तर यापुढं तिच्यावर बाळंतपणाचा आणखी प्रसंग तुम्ही लादता कामा नये. नाहीतर, ती भयंकर रोगाला बळी पडण्याचा संभव आहे... कदाचित त्यात ती दगावेलसुद्धा... आता हे सारं निभावून नेणं तुमच्या केवळ संयमावर अवलंबून आहे...' मी म्हणालो, 'माझ्या बायकोवर मी किती प्रेम करतोय, हे त्या परमेश्वरालाच ठाऊक!...'

हे ऐकत असताना रमाईंच्या हृदयसागराला आनंदाची भरती येऊ लागली होती... प्रेमातिशयानं तो उचळंबून हेलावू लागला होता. बाबासाहेब सांगतच होते,

'डॉक्टर, माझी बायको मला जीव की प्राण आहे. तिच्याशिवाय मी जगूच शकत नाही. माझ्या बायकोनं माझ्यासाठी आतापर्यंत खूप केलं आहे. मी आज हा जगाला दिसतोय हे केवळ तिच्याच कष्टाचं फळ आहे. तिला आणखी आयुष्य लाभावं, माझ्या जीवनात तिनं मला आणखी साथ द्यावी, माझ्या कमाईत तिनं आणखी सुखानं रहावं म्हणून मला हा त्याग केलाच पाहिजे. मला हा संयम पाळलाच पाहिजे, तरच माझ्या बायकोच्या माझ्यावरील अनंतर उपकारांचा उतराई मी होऊ शकेन. डॉक्टर मी कृतज्ञ आहे, कृतघ्न नाही.'

या वेळी बाबासाहेबांच्या डोळ्यांतून जणू आसवांचे मोती सांडत होते. रमाई हवालदिल झाली होती. तरी बाबासाहेब शांतपणे आता रमाला सांगत होते, 'रमा... घरी येऊन उभ्याउभ्या साऱ्यांना बोलून, लगेच मी परत जात असतोय ना, ते एवढ्यासाठीच. रामू, तुला नुसतं पाहून जाण्यासाठी मी घरी येत असतो गं... शरीरभोग म्हणजे सर्वकाही नव्हे, तुला तसं तुसतं पाहण्यानंही मला तितकंच स्वर्गसुख लाभतंय म्हणून... रमा.. तू माझ्यावर रागव वा मला काहीही म्हण. मला हा संयम माझ्या रमासाठी, मला जीवापलीकडे पाळायला पाहिजे. माझ्यातल्या माणूसपणाची ती साक्ष आहे. तू मात्र मला समजून घे... गैरसमज करुन घेऊ नकोस...'

'नाही साहेब... नाही... नाही... नाही...' असं म्हणत रमाईनं उठून साहेबांना मिठी मारली. बोलली, 'साहेब, ही फक्त मिठी... फक्त मिठी एवढीच. तुमच्या संयमाच्या आड मी यापुढं कधी येणार नाही... कधीच येणार नाही... साहेब, तुम्ही माणूस नाही, महामानव आहात... तुम्ही थोर आहात... देवाहूनही थोर आहात...'

ओठांच्या पाकळ्यांतून शब्दाचा सुगंध दरवळत होता. त्यातून प्रेम कस्तुरीचा परिमळ वातावरणात घमघमत होता.

रमाई सुगंधी स्वरात साहेबांच्या कानात कुजबुजू लागल्या. 'साहेब, माझी चूक झाली... उगीच संशय घेतला... तुम्हाला कधी नाही ते रागावून बोलले. साहेब तुम्ही माणूस नाही, मनुष्यरुपात देव आहात. देव... देवादिकांहूनाही हा मोह आवरता आला नाही... तुम्ही... तुम्ही खरंच महान आहात साहेब... तुमच्या माझ्यावरील या अगाध प्रेमानं मी आज दिपून गेलेय वोऽऽऽ दिपून गेलेय...'

एवढ्यात वराळेमामा व शंकरमामांनी साहेबांच्या अभ्यासिकेत डोकावून पाहिले. रमाई लगेच म्हणाल्या, 'या वराळेमामा, या... ये शंकर... आत ये... साहेब माझी एक इच्छा आहे. आज तुम्ही इथं घरीच जेवायचं नि मग ऑफिसवर जायाचं...'

'जसा गृहलक्ष्मीचा हुकूम', बाबासाहेबांनी गमतीनं बोलले.

'हुकूम नाही, विनंती.' रमाई

'बरं... बरं... पण काय रे वराळे, कार्यकर्त्यांची बाहेर रीघ दिसत नाही कशी ?'

'आपण मुंबईत आलाय हे अजून कोणालाच माहीत नाही,' वराळेमामा बोलले.

मध्येच रमाई बोलल्या, 'वराळेमास्तर, साहेबांना तुमचा पत्ता कुठंच लागेना... दररोज मला धमकीची पत्रं यायची... आंबेडकरांना इथं मारतो... आंबेडकरांना तिथं मारतो... अशी महाभयंकर पत्रं यायची. माझा जीव टांगणीला लागायचा. नाही नाही ते भयंकर विचार मनात, डोळ्यात यायचे... रात्र रात्रभर झोप लागायची नाही की भूक... सदैव जीव बेचैन. एक एक दिवस सैतानासारखा उगवायचा. दिवसभर छळायचा... रात्रभर रडवायचा. मग मी पांडुरंगाशी नवस करायची... माझे साहेब... जिथं असतील, तिथं सुखरुप ठेव देवा! आणि तो पंढरीचा पांडुरंग माझ्या नवसाला पावला हाय... साहेब, आपण रागावणार नसाल तर बोलते हं...'

'बोल ना, मी रागावण्यासारखं तुझं म्हणणं काय आहे, ते तरी मला कळू दे.'

रमाबाई बोलण्याचं धाडस करीत बोलली.

'साहेब, फार दिवसापासून माझी एक इच्छा आहे... आपण दोघांनी मिळून, पंढरीच्या विठोबाच्या दर्शनाला जावं... आतापर्यंत तुमच्या साऱ्या संकटातून पंढरीरायानं, तुमचं रक्षण केलंया... मागं मी पंढरपूरला गेले होते.. तवा एक नवस मी केला होता... तुम्हाला विलायतलं शिक्षण घेण्याची संधी आपोआप चालून यावी म्हणून... नि केळुसकर गुरुजींनी बडोदे सरकारला भेटून, ती संधी आपोआप तुम्हाला मिळवून दिली... देव सारं काही प्रत्यक्ष काही करीत नसतो... तो अशाच माणसाच्या रुपानं, आपल्या सहाय्यासाठी धावत असतो... तेव्हा म्हणते... आपण दोघांनी मिळून नवस फेडाया पंढरीला जाऊ या का?'

'असं असं... म्हणजे मी जे काही केलं, मिळवलं ते तुझ्या त्या पंढरीच्या विठोबाच्या सहाय्यानं... असं ना? तुझी ही भोळी भाबडी श्रद्धा मी जाणतो... त्याबद्दल मला काहीच म्हणायचं नाही... समज, तुझं नवस फेडण्यासाठी म्हणून, आपण दोघं पंढरपूरला गेलो तर... तर आपल्याला त्या मंदिरातील विठोबाचं दर्शन मिळेल का?'

'संत चोखोबा नि सोयरामाईप्रमाणं आपण बाहेरच उभं राहून, विठोबाच्या मंदिराच्या कळसाचं दर्शन घेऊन येऊ या...'

'रमा, असं वेड्यासारखं काही बोलू नकोस. मला ते मुळीच पसंत नाही... दररोज तुला मी उपदेशाचे, सुधारक विचाराचे धडे देत असूनही, तू मला असं विचारतेस? म्हणजे नळे फुंकले सोनार, इकडून तिकडून गेले वारे... असंच ना?'

रमाबाईंना आपल्या बोलण्यातली चूक कळून आली. त्या बोलल्या, 'साहेब माफ करा... भावनेच्या भरात... मनातलं मी नकळत बोलून गेले... माफ करा.'

'तसं नाही... तो तुझा आतला आवाज बोलला... तू खरी देवभोळी अंधश्रद्धाळू आहेस... तो तुझा दोष नाही, तुझे संस्कार आहेत तसे. तुझ्या या सश्रद्ध भावनेस मला दुखवायचं नाही...'

'माफ करा साहेब, आपली वेडी!'

'तुला माहीत आहे, आपल्या समाजातील लोकांना मंदिर प्रवेश मिळवून देण्यासाठी मी किती ठिकाणी, किती किती प्रयत्न केलेत, किती दगडफेक, किती माराहण, अपमान सहन केलेत... पण इथल्या पाषाणह्रदयी हिंदू लोकांना, पुजाऱ्यांना आणि मंदिरातल्या त्या देवांनाही अजून आमची दया येत नाही. रमा, मनुष्य कितीही अंधश्रद्धाळू असला तरी त्यास योग्य ते मार्गदर्शन लाभल्यास, तो योग्य त्या मार्गावर येऊ शकतो... हिंदुसमाज असा निर्दय का? पाषाणह्रदयी का झाला? त्यासाठी तुला मी महात्मा फुल्याचं चरित्र सांगितलंय, मी त्यांना गुरु ठिकाणी मानतो, हे ही सांगितलं... त्यांची पत्नी प्रथम अडाणी होती, अंधश्रद्ध होती, तिच्यात कसं परिवर्तन झालं, हेही सांगितलंय... पण... अजून तुझ्यात परिवर्तन—'

'साहेब, माफ करा म्हणते ना? माझं आज डोळं उघडलेत... तुम्ही एक विचाराने, मी दुसऱ्याच... असं पती-पत्नीत होता कामा नये... तुमच्याबद्दल माझ्या मनात अढी होती, ती आज साफ झाली आहे... साहेब, तुम्ही खरंच थोर आहात... त्या देवाहूनही थोर आहात... मला क्षमा करा... यापुढं मला आता सावित्रीबाई फुल्यांच्याप्रमाणं वागायचं आहे... तुमच्या पाऊलावर

पाऊल टाकून चालायचं आहे... या आजारीपणातून बरे होऊ दे... म्हणजे मी प्रत्यक्ष करुनच दाखवते... साहेब, मला माफ करा... यापुढं पंढरपूरला मी जाणार नाही... खरंच, पंढरपूरला जाणार नाही!'

'अगं, त्या पंढरपूरला जाण्याची एवढी कशाला धडपड करतेस? आपल्या दलित समाजाची, नि:स्वार्थपणे अशी आपणच सेवा करु की, इथं... इथं मुंबईलाच आपली आपण एक नवीन पंढरीच वसवू... मुंबईच्या त्या पंढरपुरात... पंढरपुरातील गोपूरात...' 'मी विठोबा नि तू रखमाई होऊन युगे न् युगे विटेवरी भक्तांसाठी तिष्ठत उभे राहू... चंद्रसूर्य असेपर्यंत. म्हणतात, नर करणी करे तो नर का नारायण हो जाता है।' एवढ्यात एक कुत्र्याचं पिल्लू डॉ. बाबासाहेबांच्या पायाट घोटाळू लागलं —

लगेच त्या कुत्र्याच्या पिल्लाला जवळ उचलून घेऊन बाबासाहेबांनी विचारलं, 'रमा, हे कुत्र्याचं पिल्लू तू कोठून आणलंस? का कुणी तुला ह्याची भेट दिली?'

'हो, तसंच. एका ख्रिश्चन बाईनं आणून दिलंय. वडाळ्याची आहे ती. रोजेस तिचं नाव. तुम्हाला ती चांगली ओळखते. मानते. तुम्हाला कुत्र्याचं वेड हाय. म्हणून ती स्वत: येऊन हे पिल्लू तुम्हाला बक्षीस म्हणून देऊन गेलीय. आपल्या मागील कुत्र्याचं नाव टॉबी होतं... तेव्हा याचंही नाव टॉबी ठेवलंय... त्या कुत्र्याची आठवण म्हणून.'

'वाऽऽ सुंदर... सुंदर... नाव... हॅलोऽऽ टॉऽऽबीऽऽ टॉऽऽबीऽऽ...' असं म्हणत म्हणत बाबासाहेब रमाईच्या अगदी जवळ जात, मोठ्या आनंदानं त्यांच्या कानात हळूच सांगू लागले.

'राऽऽमूऽऽ माय डियर... आज एक फार मोठी आनंदाची गोष्ट तुला सांगायचीय... पश्चिम दादरला, हिंदू कॉलनीत आपण एक बंगला बांधणार आहोत ना... त्याचा शुभारंभ... भूमीपूजन उदईक तुझ्याच शुभहस्ते होणार आहे.

'नव्हं... नव्हं... तसं नव्हं... आपणा दोघांच्या शुभहस्ते ते होणार आहे... सत्यशोधक पद्धतीप्रमाणे...'

'सत्य शोधक पद्धतीप्रमाणं...? हां... हां... होत आहे... होत आहे... एका माणसाचं परिवर्तन होत आहे!'

• • •

२३

आज दिवस उगवला. धन्य सोनियाचा...

हो, सूर्याची उत्साहवर्धक कोवळी प्रकाशकिरणे धरतीवर दाटलेला तम बाजूला सारीत होती... धरती उजळ करीत होती...

हो, कुणा भागिरथीच्या मनाच्या गंधकोषात आठ-दहा वर्षे जपलेल्या स्वप्नाला आज मनोहारी आकार येत होता... नव्हे, ते स्वप्न साकार होत होतं...

मुंबई, दादर विभागातील हिंदू कॉलनी परिसरात राजगृह नामक एक नवीन देखणी व टोलेजंग वास्तू दिमाखानं उभी असलेली आज साऱ्यांना दिसत होती. दिपवत होती.

ही वास्तू केवळ देखणीच नव्हती, ते एक जगातलं आश्चर्य होतं. ही वास्तू पाहणारा संभ्रमात पडायचा की, हे कोण्या श्रीमंताचं भव्य घर नसून, एखाद्या महान पंडिताचं भव्यदिव्य ग्रंथागार तर नव्हे ना? इथं घरासाठी भांडी-कुंडी, ताटी-वाटी दिसत नसून, केवळ ग्रंथालयाप्रमाणं इथं पुस्तकांची दाटी-वाटी तेवढीच काय ती दिसतेय. या अजब वास्तूला त्याच्या रचनाकारानं किती समर्पक असं नामांकन दिलेलं होतं - 'राजगृह'

आज सुर्योदयाबरोबर त्या वास्तूत गृहप्रवेश घाटत होता. वास्तूभर शुभमंगल म्हणून आंब्याच्या डहाळ्या लावल्या होत्या. प्रमुख दारावर मानाचे सोनेरी तोरण चमचम करीत होतं. केळीचे शुभ्र समजले जाणारे खांब प्रत्येक दरवाजासमोर

लावून, त्यांच्या भव्य कमानी केल्या होत्या. प्रमुख दरवाजावर बसून वाजंत्री सनई-चौघड्याचे शुभ मंगल सूर वातावरणात उधळीत होत. वातावरणात मंगलमयतेचा सुगंध दरवळत होता.

त्या वास्तूची 'गृहलक्ष्मी' रमाबाई भल्या पहाटेपासून तिथं 'गृहप्रवेशासाठी' म्हणून उपस्थित असलेल्या. सोन्याच्या साखळीतलं मणी-मंगळ-सूत्र गळ्यात घालून आलेल्या, कपाळावर मोठा कुंकुमतिलक लावून, हातात हिरवा चुडा चढवून आलेल्या... सच्छील माणसाच्या मनासारखी स्वच्छ निर्मळ शुभ्र साडी, त्यावर पांढरा शुभ्र ब्लाऊज व पायात रजत रंगी जोडवी घातलेल्या त्यांना असं पाहताना, साक्षात देवी सरस्वतीच जणू धरेवर अवतरल्याचा भास होत होता. त्यांच्यामुळं त्या वास्तूला अधिक उजळा मिळत होता, वातावरण अधिकच मंगलमय भासत होतं.

एवढ्यात त्या वास्तूचे अजब रचनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या इष्टमित्रांसह, चाहत्यांसह व आपल्या खास समाजकार्यकर्त्यांसह तिकडेच येत असल्याचे कुणीतरी येऊन सांगितलं. 'साहेब आले... साहेब आले,' म्हणताच तेथील साऱ्यांची धावपळ सुरु झाली. लगेच रमाई देखील मुख्य दरवाजावर पंचारती घेऊन बाबासाहेबांना ओवाळण्यासाठी सज्ज उभ्या राहिल्या. साहेब दारात ठाकताच रमाई त्यांच्यावरुन पंचारती ओवाळू लागल्या. तेव्हा त्यांना लक्ष्मीबाई हळूच सांगू लागल्या, 'अगं रमा, ओवी म्हण एखादी ओवी. शुभवेळी पंचारती ओवाळताना ओवी म्हणायची असते. रमाई साऱ्यांना ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाल्या,

"भरतार देवावानी
त्येची अस्तुरी मी जाईजुई
राजगृहात शोभती
जशी विठ्ठल रखुमाई..."

'वाहव्वाऽऽऽ जाईजुईऽऽऽ विठ्ठल रखुमाईऽऽऽ!' असे म्हणून जमलेल्या पाहुण्यांनी इष्टमित्रांनी मोठ्या आनंदाने, मोठ्या हर्षभराने, जोशात टाळ्या वाजवीत त्यांच्या बोलास साथ दिली. आणि रमाई नि बाबासाहेबांनी राजगृहात प्रवेश करुन, आपल्या पुण्यपदांनी राजगृह पुनीत केला. पुन्हा टाळ्या वाजल्या.

आतील दरवाजाच्या मध्यभागी पु. रामजी सुभेदारांची प्रतिमा लावलेली, त्या प्रतिमेला भलामोठा ताजा गुलाबाच्या फुलांचा सुगंधी हार घातलेला... तिथं रमाईंना थांबवीत बाबासाहेब म्हणाले, 'रमा... इकडे ये... तुझ्या मामंजींना आधी ओवाळ... ही सारी कृपा... त्यांच्या कष्टातून... प्रयत्नातून...'

रमाईनं मोठ्या मनोभावे त्या प्रतिमेला ओवाळलं. साहेबांनी वंदन केलं. म्हणाले, 'रामू, गावात घर नाही, रानात शेत नाही, अशा स्थितीतून आज आपण राजगृहात प्रवेश करीत आहोत... ही सारी किमया माझ्या बाबांची... त्यांच्या सुनेची...'

त्या हृदय भरल्या आवाजात म्हणाल्या, 'साहेब, आज दिवस सोनियाचा, भाग्याचा उगवला आहे... मी भाग्याची भागिरथी... आज खरीखुरी भाग्याची ठरली आहे... ते मामंजीमुळं... तुमच्यामुळं...'

वडिलांच्या आठवणीनं साहेबांच्या डोळ्यांत पाणी भरुन आलं. त्यांनी डोळे पुशीत सहज रमाईंच्याकडे पाहिलं. त्यांच्याही डोळ्यांत आसवांनी गर्दी केलेली...

या गृहप्रवेशासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून बाबासाहेबांचे एकनिष्ठ अनुयायी व प्रमुख कार्यकर्ते तेवढेच हजर होते. विशेष म्हणजे रमाईंच्या खास विनंतीवरुन पोयबावाडीच्या इंप्रुव्हमेंट चाळीतील सर्व महिला प्रामुख्याने प्रमुख आसनांवर स्थानापन्न झाली होती.

गृहप्रवेशाच्या समारंभानंतर, आलेल्या पाहुण्यांसाठी, इष्टमित्रांसाठी अल्पोहाराचा कार्यक्रम सुरु झाला होता. हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने चालू असताना एक गोड गळ्याचा गायक, स्वयंस्फूर्त पुढं आला आणि एक स्फुर्तीप्रद गाणं अभिनयासह, तालासुरात अगदी नाचून, गाऊन दाखवू लागला —

"महाराचं प्वार बिट्या लई हुशयार
बिट्या लई हुशयार
साऱ्या जगात असं न्हायी हुनार
आरं बघ बघ बघ... !
गरिबीत वडलानं साळा शिकावली
विलायतला जाऊन त्यानं इद्या मिळावली
कायद्याचं झालं लई मोठं बालिस्टर
बिट्या लई मोठं बालिस्टर
साऱ्या जगात असं न्हायी हुनार
आरं बघ बघ बघ... !

गायकाच्या गाण्यावर खूष होऊन मध्येच रसिक श्रोते त्याच्यावर 'वाहव्वा!' 'भले बहाद्दर!' अशी स्तुति-सुमने उधळू लागले. सारख्या चेतनायुक्त टाळ्या पडू लागल्या. गायकालाही मग अधिकच स्फुर्ती चढली. तो आणखीन मोठ्या अवसानात, नाचून नाचून ठासून ठासून गाऊ लागला.

गवरनेर वाहीसराय गोरा अधिकारी
त्याच्यासंगं गॉट मॉट बोलतोय भारी
इंग्लिश सायबावानी घालतंया इजार
दादा घालतंया इजार
साऱ्या जगात असं न्हायी हुनार
आरं बघ बघ बघ... !"

ज्यांच्या अप्रतिम कर्तबगारीवर हे गाणं रचलं गेलं होतं ते महाभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे गाणं चालू असताना प्रत्यक्ष तिथं उपस्थित होते, त्यामुळे गाण्याला विशेष रंग भरला होता. बाबासाहेब सुद्धा मधून मधून सुस्मित वदनानं त्या गाण्याला हसून-डोलून उत्तेजित करीत होते. हे गाणे ऐकत असताना श्रोतृगणाची अंत:करणे अक्षरश: हेलावून गेली होती.

हे गाणे रमाआईसाहेबांना तर खूपच आवडले. त्यांनी आनंदून आपल्या शंकरला जवळ बोलावून बजावून सांगितलं,

'हे बघ, ह्याच गवयाला परत बोलावून, हेच गाणं परत राजगृहात माझ्यापुढं झालं पाहिजे. मला हे गाणं फार आवडलंय रे...'

मग चालला निरोपसमारंभ... बाबासाहेब एका एकाला बोलत बोलत त्याच्यासमवेत दरवाजापर्यंत येऊन हसतमुखानं निरोप देत होते... पोयबावाडीतील महिलांना निरोप देताना, रमाआईचं भाबडं, वत्सल हृदय उचळंबून आलं. दाटल्या कंठानं त्या बोलल्या, 'माझ्या माया-भगिनींनो, लेकी-सुनांनो! पोयबावाडीच्या चाळीत तुम्ही साऱ्यांनी मला हृदयापासून मदत केली. माझं दु:ख तुम्ही वाटून घेत होता. हातभार लावून माझं कष्ट तुम्ही हलकं करु पाहत होता. मला ते सारं दिसत होतं. कळत होतं. तुमचे ते उपकार मी जलमभर विसरणार नाही. तुम्ही राजगृहात यायचं. 'राजगृह' आपल्या बाबासाहेबांचा, तुमच्या रमाईचा आहे म्हणून हक्कानं यायचं, आईबाच्या घरी लेकी कशा येतात तशा तुम्हाला माहीत आहेच... माझी तब्येत ही अशी सदा तोळामासा असते... हे ध्यानात घेऊन यायचं... बायांनोऽऽ साऱ्यांना निरोप घेऊन एक दिवशी वर जायाचं असतं. तुम्हा साऱ्यांचं प्रेम घेऊन, लोभ घेऊन मला जायाचं आहे... म्हणून तुम्ही मला विसरु नगा... तुमचा प्रेमाचा हात आखडू नका–'

त्या महिलांतील एकजण अगदी भारावून उत्तरली, 'आईसाहेब, तुम्ही असं बोलू नका. तुम्ही आमच्या जोडलेल्या आई नाहीत, आमच्या जीवाभावाला बघणाऱ्या आमच्या सख्ख्या आई आहात... तुमच्या मातृप्रेमानं जलसिंचनानं आम्हा

साऱ्यांची खुरटलेली, वठलेली जिंदगी परत फुलते आहे, खुलत आहे. तुमच्या प्रेमाविना ती परत खुरटून जाईल, वठून जाईल. आईसाहेब, तुम्ही असं बोलू नका... आमचं काळीज फाटून जातंया बघा. आईसाहेब, तुमची मुर्ती, तुम्ही आमच्या उरात आहात. मारुतीरायाप्रमाणं आमचंही ऊर फाडून बघितलं, तर तुम्हाला तिथं दिसंल, तुम्ही दोघं जोडीनं उभी, रामसीतावानी, विठ्ठल रखुमाईवानी! आमची आयुष्य घेऊन परमेश्वर तुम्हाला उदंड आयुष्य देवो... आईसाहेब, असं बोलू नका... तुमचा पान्हा चोरु नका...'

— सकाळी सातचा सुमार असावा.

नित्याप्रमाणं देवापुढं बसून रमाईंची सकाळची प्रार्थना चाललेली. यशवंत, मुकुंद दोघं मिळून एका सुरात श्लोक म्हणत होते. रमाई देवावर फुलं वाहत होत्या. नतमस्तक होत होत्या. पूजनात मग्न होत्या. लक्ष्मीबाई स्वयंपाकघरात व्यग्र होत्या.

एवढ्यात मराठी शाळा मास्तरासारखा दिसणारा एक इसम रमाईंच्याकडे सकाळी सकाळी आला. खाली स्वयंपाक घरातच डोकावून पाहत त्यानं विचारलं, 'रमाआईसाहेब कुठं आहेत?'

'काय काम आहे त्यांच्याकडं?' लक्ष्मीबाईनं त्यास विचारले.

'सिंहगडावरुन मी आलोय!'

'साहेब तर सिंहगडावर विश्रांतीसाठी गेलेत.'

'तिथूनच मी आलोय. आईसाहेबांना जरा बोलावता का?'

एवढा घाबरलेला सिंहगडावरुन आलेला इसम म्हणजे साहेबांकडून काहीतरी निरोप घेऊन आलेला असणार म्हणून लक्ष्मीबाई धावतच देवघरात गेल्या. म्हणाल्या, 'रमा... रमा... सिंहगडावरुन, साहेबांच्याकडून एक इसम तुला भेटायला आलाया...'

'सिंहगडावरुन? साहेबांच्याकडून आलाया?' असे विचारत रमाई घाईघाईनं देवघरातून बाहेर आल्या. समोर त्या इसमाला पाहताच त्यांनी विचारले, 'साहेबांनी पाठवलं तुम्हाला?'

'तसं नाही. पण साहेब मोठ्या संकटात सापडले होते, ते सांगायला आलोय तुम्हाला... तुम्ही काळजी करताय म्हणून समजलं म्हणून धावत आलोय...'

'म्हणजे? काय झालं तरी काय असं? या, आत या.'

तो इसम आत येऊन बसला. लक्ष्मीबाई, मुकुंद व यशवंतही त्याच्याभोवती बसून आतुरतेनं ऐकत बसली. रमाई आपल्या बिछान्यावर बसून ऐकू लागली. तो इसम सांगू लागला.

'आईसाहेब, परवाचा दिवस काही चांगला उगवत नव्हता. बाबासाहेबांच्यावर फार मोठा प्राणघातक हल्ला होणार होता जी... तिथं मी होतोच. माझ्या या डोळ्यांनी मी सारं काही पाहिलं. या कानांनी मी सारं ऐकलं. आपली आणखी माणसं बाबांच्या सोबत तिथं अजून आहेतच. काडीची काळजी नको कराया, असं ते प्राणसंकट घडून आलं अवचित्. टळलंबी अवचित्. तेव्हा, आईसाहेब मला काही केल्या तिथं रहावेना. वाटलं, धावत जावं नि तुमच्या कानावर घडलेला सारा सारा प्रकार पहिल्या प्रथम घालून, पहिला मान मिळावा म्हणून इथपर्यंत मी धावत आलो जी...'

'म्हणजे? इतक्या लांबून... सिंहगडावरुन... तुम्ही पायीच... धावत पळत आलाय?' ऐकत बसलेल्या यशवंतानं मोठ्या कुतूहलानं विचारलं.

यशवंतला गप्प बसवीत रमाई म्हणाल्या, 'यशवंत तू गप्प बस बघू. सांगा हो, काय झालं ते आधी सारं सांगा.'

तो इसम सांगू लागला, 'आईसाहेब, दोनच दिवस झालं असतील बघा त्याला. सकाळी सकाळी साठ-सत्तर धर्मवेडे सवर्ण हिंदू माथेफिरु, साहेब राहतात तिथं हातात लाठ्याकाठ्या घेऊन आले की... नि एकदम साहेबांच्या अंगावर चवताळून ते साहेबांना धमकावून बोलू लागले.

'तुमी जातीनं महार असून, हाथं आमच्या हिंदूंच्या भवानीमातेच्या देवळाच्या जवळ तुमी कसं राहिलात? त्या जवळच्या आमच्या पवित्र कुंडातलं पाणी तुमी पित असतात म्हनं? यामुळं... आम्हा हिंदूचं भवानीचं देऊळ बाटवलंत तुम्ही! पवित्र कुंडातलं पाणी शिवून ते नासवलंत तुमी! सारा सिंहगड बाटवलात, विटाळलात तुमी! तुमाला खलास का करु नये, हे सांगाल का? बोला–'

मध्येच एक गुंड ओरडला, 'महार कितीबी शिकला तर त्यो बामन न्हाय होत!'

बाबासाहेब शांतपणे उत्तरले, 'बाबांनो! मला ते माहीत आहे म्हणून महार म्हणूनच मी जगत आहे. कसं ते आता तुम्हीच पहा. माझ्या या राहत्या ठिकाणापासून तुमचं ते भवानीमातेचं देऊळ कितीतरी अंतरावर, कितीतरी लांब आहे. माझ्या अंगाला स्पर्श करुन जाणारा वारादेखील तिथं जात नसेल. तुमच्या त्या पवित्र कुंडाकडे तर मी फिरकत देखील नाही. त्या कुंडातलं पाणी आणण्यासाठी तुमच्यापैकी एक मराठी-कुणबी पैसे देऊन, माझं पाणी भरण्यासाठी मी ठेवला आहे. तो रोज सकाळी येऊन, पाणी भरुन जातो. म्हणजे... तुमच्या त्या पवित्र कुंडाला माझा स्पर्श होतच नाही. तुमचा तो पवित्र कुंड विटाळला जात नाही. आणि मी एकटा हा एवढा सारा सिंहगड कसा काय बाटवू शकतो? या गडावर माझ्याशिवाय दुसरा कोणी महार माणूस राहतच नाही की काय? सिंहगडावर महार आहेत. चांभार आहेत. मांग आहेत. मला वाटतं, तुम्हाला कुणीतरी माझ्या अनंत वैऱ्यांनी माझ्याविरुद्ध काहीतरी खोटं सांगून तुम्हाला असं भडकावून इथं पाठवून दिलेलं दिसतंय.'

सारे गुंडपुंड एकमेकांच्या चेहऱ्याकडं पाहत राहिले. बाबासाहेब बोलतच राहिले, 'बाबांनो, छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळी या सिंहगडाच्या राखणीचं, जोखमीचं काम महार लोकच करीत होते. रायगडाचा किल्लेदार रायनाक हा महारच होता. शिवाजी महाराजांच्याकडे काही किल्लेदार, शिलेदार व सुभेदार महारच होते. म्हणून शिवाजी महाराज असे कधी म्हणत नव्हते की, या किल्ल्याचा किल्लेदार महार आहे म्हणून माझा सारा किल्लाच बाटला... विटाळला... फार काय सांगू.'

बॅरिस्टर बाबासाहेबांनी नाना प्रकारांनी निरनिराळी उदाहरणे देऊन, त्या गुंडापुंडाची चांगली समजूत घातली. आलेले सारे स्पृश्य हिंदू गुंड फजिती होऊन एकमेकांकडे पाहू लागले. त्यातला एक वयस्क गुंड म्हणाला,

'आंबेडकर म्हणत्यात ते अक्षी बराबर हाय. पटतंय. गावची शिव तिथं लक्ष्मीचं देऊळ, तसंच गाव तिथं म्हारवाडा हा असतोच. म्हणून त्येनं सारा गाव बाटत न्हाय. इटाळत न्हाय. आमीच येडझवं. आमच्या डोस्क्यात हे आलंच न्हाय. आमची डोकी म्हंजी साबणाची नुसती खोकीच... कुणीबी येऊन कायबी सांगावं नि आमी भटकून उठावं... चोर सोडून संन्याशाला फाशी द्यावं... चला रं परत...' बाबासाहेबांच्याकडं वळून तो म्हणाला, 'तुमाला चुकीनं कडू बोलल्याचं गोड करुन घ्या... चुकलं आमचंच...'

बाबासाहेबांच्या प्राणावर बेतलेलं संकट, बाबासाहेबांच्या चतुराईनं टळलं...

उशीवर सारखं आपलं डोकं आपटीत, तळमळत, तडफडत रमाबाई बोलू लागल्या, 'संकट टळलं... संकट टळलं...'

तुमी कायबी म्हणा पन आपल्या साहेबांचा जीव अक्षी धोक्यात हाय बघा... संकट टळलं... असं म्हणताच येणार न्हायी... आणखी कुठंतरी साहेब तळ्यावर पाणी प्यावयास गेले नि तिथला मुसलमान पहारेकरी 'धेडानं तळं बाटवलं' म्हणून साहेबांच्या अंगावर धावून आला. तेव्हा त्यास साहेब असंच म्हणाले, 'मी मुसलमान झालो तर, ह्या तळ्यावर पाणी पिण्यास प्रतिबंध करशील काय?'

मुसलमान पहारेकरी म्हणाला, 'तरी प्रतिबंधच मला करावा लागेल... जग रहाटीप्रमाणं चालावं लागतं म्हणून...'

'पण तुझ्या धर्माची शिकवण काय आहे? असं म्हणत म्हणत मुसलमान धर्मावर त्यांनी एक मोठं भाषणच दिलं. तेही संकट साहेबांच्या अशाच चतुराईनं टळलं... पण... पण... संकट एकदा टळलं... दोनदा टळलं... तीनदा टळलं... म्हणून संकट कायमचं टळलं, असं म्हणता येणार न्हाय.'

रमाआई स्वत:ला त्रागा करुन घेत, बिछान्यावर या कुशीवरुन त्या कुशीवर सारख्या तळमळत राहिल्या. तडफडत राहिल्या आणि देवाला प्राथित राहिल्या.

'देवाऽऽ देवाऽऽ माझी तडफड आता लवकरच थांबव... लवकर थांबव... मला हे आता ऐकाया होत नाही... मला हे आता सहन होत नाही...'

रमाईंची ती तडफड पाहून पुत्र यशवंताला त्या सिंहगडावरुन आलेल्या माणसाचा मनस्वी राग आला. त्यास बाजूला नेऊन यशवंत म्हणाला, 'साहेबांच्यावर आलेलं संकट टळलं होतं ना? मग एवढ्या लांबून धावत येऊन ते आईला सांगायचं काय कारण होतं का?' पाहिलंत, आईसाहेबांना असलं काही ऐकताना किती त्रास होतोय ते? किती तळमळ होतेय, किती वेदना होतात... अगोदर आई आजारी, त्यात तुमचं हे... कृपा करुन पुन्हा असं काही सांगाया येऊ नका...'

— अन् ती सकाळ उजडली ती अशीच!

त्या दिवशी सकाळी रमाई देवपूजेसाठी, दैनंदिन प्रार्थनेसाठी नित्याप्रमाणे अंथरुणातून उठूच शकल्या नाहीत. असं आता अधूनमधून नित्य घडत होतं. बाबासाहेबांनी रमाईची प्रकृती सुधारावी म्हणून खूप औषधपाणी केलं. चांगले चांगले निष्णात डॉक्टरांना दाखविलं. परंतु कुठं काही गुण येत नव्हता.

न थकता, अविश्रांत काम करणाऱ्या डॉ. बाबासाहेबांचे शरीरसुद्धा विश्रांतीसाठी हपापू लागले, अधीर होऊ लागले होते. त्यामुळेच प्रकृती स्वास्थासाठी म्हणूनच साहेब आठ-दहा दिवसांपूर्वीच त्यांचे वसईचे खास डॉक्टर मित्र श्री. सदानंद गाळवणकर यांचेकडे रहावयास यांचेकडे रहावयास गेले होते. १९३५ च्या मे महिन्यातील तिसऱ्या आठवड्यातील ते दिवस असावेत.

आणि अशा आजारपणामुळेच अलीकडे रमाईंनी अंथरुणच धरलं होतं. ह्या आजारातून आपण उठू, ही आशाच आता त्यांनी सोडली होती.

त्यामुळेच, त्यांचा मुलगा यशवंत व पुतण्या मुकुंद या दोघांनी रमाईंच्या खुशीखातर मोठ्या निश्चयानं सकाळी उठून स्नानसंध्या करुन, रमाई आईच्या नित्याच्या देवपूजेत वा दैनंदिन प्रार्थनेत, त्यांच्या गैरहजेरीत, कधी खंड पडू दिला नव्हता. त्यामुळे आपल्या आजारी भाविक वृत्तीच्या आईला बरं वाटावं, त्यांना समाधान लाभावं, म्हणून त्या दोघा बंधुद्वयांची ही सारी तप्तरतेनं धडपड चाललेली.

आजही रमाई अंथरुणातून उठू शकली नाही. तरीही त्या बंधूंनी असंच सकाळी उठून, स्नानसंध्या करुन, मनोभावे देवपूजा करुन देवाची प्रार्थना ते एकसाथ, एका सुरात नि उंच स्वरात म्हणत होते,

"आस ही तुझी फार लागली। दे दयानिधे बुद्धी चांगली
देऊ तू नको दुष्ट वासना। तूचि आवरी आमुच्या मना।।..."

दोघं उंच स्वरात गात असलेला हा श्लोक रमाईंना त्यामुळे ऐकावयास येत होता. त्यांच्या मनाची कळी फुलली होती, खुलली होती.

आज तर त्या दोघा बंधूंनी कमालच केली. देवपूजा आटोपल्यानंतर ते दोघेही अगदी तन्मयतेनं एकसाथ, मोठ्या तालासुरात एक गाणं म्हणत, रमाईच्या 'बेडरुम'कडे, बिछान्याकडे येऊ लागले. रमाई बिछान्यावरुन उठून बसत, गात येत असलेल्या आपल्या दोघा लाडक्या चिरंजीवांच्याकडे मोठ्या आनंदानं नि अभिमामानं पहात राहिल्या. ते दोघं त्यांच्यासमोर येऊन, गात उभे राहिले —

"अम्हा दिधला जन्म ज्या माऊलीने।
तसे वाढविले प्रीतीने पित्याने।
शक्य नाही ऋण फेडणे तयांचे।
मानु त्यांच्या आज्ञेत सौख्य साचे।।..."

हे गाणं संपताच, दोघा बंधूंनी एकसाथ रमाईंच्या पायावर डोकं ठेवून, त्यांना वंदन केलं. रमाई खूष होऊन बोलल्या, 'वाहव्वा! छान... छान माझ्या लाडक्या बाळांनो, अलीकडं तुम्ही नित्यनियमानं पूजाअर्चा, श्लोक आदी देवधर्म करीत आहात, हे पाहून मला फार फार आनंद होत आहे... आमची आतापर्यंतची शिकवण वाया गेली नाही म्हणायची...'

मध्येच मुकुंद म्हणाला, 'आई, तुमची हृदयापासूनची शिकवण कशी वाया जाईल. मूर्ती घडविण्यासाठी शिल्पकारानं दगडावर घातलेला प्रत्येक घाव वाया गेलेला नसतो. अशा अनेक घावांतून इच्छित मूर्ती घडत असते. पाळण्यात असल्यापासून, आईच्या अंगाखांद्यावर मूल खेळत असतानाच, मुलाच्या मनात आईबापाकडून त्याच्या विकासाची बीजं पेरली जातात. मुलाच्या मनात ती बीजं अंकुरली जातात, वाढतात. मूलही त्याबरोबर वाढतं... आई, आईबापांच्याकडून मिळालेली ही ईश्वरी शिकवण मुलं कशी विसरतील?'

'मुकुंद... तुझी ही तयारी...' आनंदित होऊन रमाबाई बोलू लागल्या,

'यशवंता, तुझ्यासाठी, तुझ्या शिक्षणासाठी साहेबांच्या बरोबर मी भांडत राहिले... मी आई असून, अडाणी असल्याने, तुझ्यावर शिक्षणाचे अधिक संस्कार करु शकले नाही. तुमच्या वडीलांनी, साहेबांनी आपल्या समाजाच्या उद्धाराचं कार्य घेतल्यानं, त्यांनाही तुझ्याकडे विशेष लक्ष देता आलं नाही... त्याबद्दल आम्हाला क्षमा करा. पण तुम्हाला चांगला माणूस बनविण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'नको... आई असा खेद करुन घेऊ नकोस!', यशवंत बोलला.

'आई किती कष्ट उपसले आहेस तू आमच्यासाठी. ते सारं मी माझ्या डोळ्यानं पाहिलंय. तुझ्याबरोबर मी राहिलोय. एवढ्या मोठ्या बॅरिस्टरची तू धर्मपत्नी, पण तुझं वागणं, बोलणं नि रहाणं, किती साधंसुधं, खेडवळ स्त्रीसारखं भोळंभाबडं. केवळ साहेबांच्यासाठी तू जन्मभर धडपडलीस —'

'धडपड...! आपण सारी धडपडणारी माणसं... आमीबी माणसं आहोत, म्हणून इतर माणसांच्या पंगतीला बसण्यासाठी आम्ही जन्मभर धडपड केली... करीत आहोत. साहेब आपले पुढारी... शून्यातून सूर्य निर्माण करु पाहणारे... आपले साहेब नि आम्ही त्यांची तितकीच निष्ठावंत माणसं... यशवंत... मुकुंद... एक दिवस आपल्या साहेबांचा हा महान प्रयत्न साधेल नि आपल्या साऱ्यांची जीवने उजळून निघतील... साहेबांनी, तुमच्या बाबांनी आपल्या चळवळीचं हे रोपटं मोठ्या प्रयासानं लावलं आहे. त्याची फळं त्यांच्या हयातील कदाचित त्यांना चाखावयास मिळणार नाहीत. पण... तुम्ही... तुम्ही त्या रोपट्याला आपल्या निष्ठेचं पाणी घालून वाढवायचं आहे... तुम्हाला त्याची गोड फळं जरुर चाखावयास मिळतील... वडीलांचं हे काम पुरं करणं मुलांचं कर्तव्य असतं... अरेऽऽ मी बोलता बोलता कुठं वहावत गेलं... पहा, मला धाप लागलीय... एवढी कशी मी बोलले... एखाद्या पुढाऱ्यासारखी....'

या वेळी रमाईचा कुत्रा टॉबी त्यांच्या खाटेखाली आला... नि त्यांच्या पायाशी आपले पाय घासू लागला, तिकडे पाहत यशवंत बोलला, 'आई, तू पुढाऱ्यांची पुढारी आहेस...'

'आई, आम्ही तुमच्या आज्ञेत आहोत. तुमचं राहिलेलं अपुरं काम आम्ही पुरं करु...' मुकुंद उत्स्फूर्तपणे बोलून गेला.

'छान... छान....!' रमाई आनंदानं म्हणाल्या, 'मला तुमच्याशी असं खूपच बोलायचं होतं... तुम्हाला खूप खूप सांगायचं होतं, हृदयात तुम्हाला साठवून ठेवायचं होतं... परमेश्वरानं माझं ऐकलं... तुमच्याशी पोटभर बोलावयास मिळालं... यशवंता, मुकुंदा मला नाही वाटत... यापुढं जादा दिवस जगेन असं... तुम्ही माझ्याजवळ या... माझ्या हृदयाशी बिलगून बसा...'

दोघाही मुलांच्या अंगावरुन रमाईंचा मोरपिसारासारखा हात फिरु लागला. त्यांचा आवडता टॉबी कुत्राही त्यांच्या पायाशी बसून शेपटी हलवू लागला. रमाईंच्या उरात पान्हा दाटून आला. त्यांचे डोळे आसवांनी भरुन आले. त्या दाटल्या गळ्यानं परत बोलल्या,

'मी थोड्या दिवसांची मेहमान आहे रेऽऽऽ' मघापासून रमाईनं आवरुन धरलेला बांध फुटला, तो घळघळ वाहू लागला.

‘आई, तू अशी रडू नकोस गं... तू आम्हाला म्हणत असतेस... माणसानं उरात रडू ठेवून, तोंडावर हसू फुलवावं... अन् तू रडतेस?’

‘नाही रेऽऽ हे पहा, पुसले मी डोळे. मला खूप आनंद झालाय... माझी मुलं माझी शिकवण पाळताहेत... बाळांनो, असंच श्रद्धेनं जगात जगा... आपल्या साहेबांची प्रतिष्ठा कमी होईल असं कधी वागू नका... असं काही करु नका... तुम्ही दोघं असंच राम-लक्ष्मणासारखं रहा...’

‘आई, आम्ही दोघं तुझ्या शब्दात राहू. साहेबांना दुःख होईल, असं काही कधीही करणार नाही. आई, आमची एवढीच इच्छा आहे... आम्ही लवकर मोठं व्हावं... तुम्हा दोघांना श्रावणासारखं, पुंडलिकासारखं सांभाळावं...’ मुकुंद बोलला.

यशवंत व मुकुंद दोघेही रडू लागली... यशवंत डोळे पुशीत बोलला, ‘आई, तुला काही होणार नाही... तू सुनमुख अजून पाहणार आहेस... तुझ्या अंगाखांद्यावर तुझी नातवंडे अजून खेळणार आहेत... तुझ्या कष्टाचं चीज झाल्याचं तू अजून पाहणार आहेस... आईऽऽ आईऽऽऽ...’

व्याकुळ यशवंत... रमाईच्या कुशीत हरणशावकाप्रमाणं आपलं मस्तक घुसळीत होता. मुकुंद रमाईच्या गळ्यात पडून अश्रू ढाळीत होता. खाटेखालचा टॉबी कुत्राही आता रमाईच्या पायाशी अंग घासीत होता... त्यांचे पाय चाटीत होता.

• • •

२४

त्याच रात्री रमाईंना जास्त झाले. रात्रीचे बारा वाजलेले. शंकरमामाने धावाधाव केली. तेवढ्या रात्री डॉक्टरांना त्यानी बोलावून आणलं. डॉक्टरांनी इंजेक्शन दिलं. म्हणाले, ‘उद्या मी येईन. इंजेक्शन दिलं आहे. भरपूर विश्रांती घेऊ द्या त्यांना. झोपल्या तर झोपू द्या. आंबेडकरसाहेब कुठं गेलेत?’

‘बाहेर गेलेत, शंकरनं सांगितलं. त्यांचीसुद्धा प्रकृती अशीच... हवा पालटण्यासाठी ते बाहेर गेलेत. कोणी म्हणतात पनवेलला गेलेत कुणी म्हणतात वसईला.’

‘हरकत नाही, जवळच आहेत. इंजेक्शन दिलं आहेच. आधी त्याचा इफेक्ट मला पाहू द्या... उद्या मी स्वतःच येऊन पाहीन.’

डॉक्टर निघून गेले. रात्रभर रमाई स्वस्थ झोपल्या. शंकर व लक्ष्मीबाई रात्रभर जागत राहिली. यशवंत-मुकुंद बराच वेळ जागे राहिले. पण नंतर बसल्याजागीच पेंगाळून कलंडले.

सकाळी आठ-साडे आठ वाजता रमाई उठल्या. बऱ्या दिसल्या. गुलगुल बोलल्या. पण तोंड धुताना, त्यांना एक-दोन वांत्या झाल्या. चहा घेऊन, त्या स्वस्थ पडून राहिल्या.

अकरा वाजल्यानंतर परत अंगात ताप भरु लागल्यासारखं झालं.

बाहेर उन्हं तापू लागली. तसतसा ताप वाढू लागला. श्वासोच्छवास जोरानं होऊ लागला. शंकरमामा व लक्ष्मीबाई परत काळजीत पडले. वाट बघून शंकरमामा डॉक्टरांना बोलावयास निघाला. तोच डॉक्टर स्वतःच आले. त्यांनी रमाईची प्रकृती काळजीपूर्वक तपासली. परत त्यांनी एक इंजेक्शन दिलं. म्हणाले, ‘काळजी करण्याचं कारण नाही. ताप वाढेल तसा... ही एक एक गोळी घ्या... संध्याकाळी मी येईन.’

दुपारी एक नंतर रमाईचा ताप वाढू लागला... डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे शंकरनं लगेच गोळी दिली... गोळी घेऊन रमाई झोपल्या.

रमाआईसाहेब आजारी असल्याचे, त्यांना आता जास्त झाल्याचीही बातमी हळूहळू त्यांच्याकडे नित्य येणाऱ्या लोकांत पसरु लागली. रमाईला पंढरीला घेऊन जाणारे ग्यानबुवा महाराज व त्यांचे दोन भजनी शिष्य प्रथम धावून आले. पोयबावाडीच्या रमाईच्या खास मैत्रिणी त्यानंतर आल्या गेल्या. राजगृह भरु लागला. वर्दळू लागला. रमाईच्या भोवती हळूहळू दाटी होऊ लागली.

रमाईनी मध्येच डोळे उघडून पाहिले. त्यांना ग्यानबुवा आलेले दिसले. त्यांना त्या म्हणाल्या, 'महाराज आपण आलात?'

'होय आईसाहेब... आपल्या सेवेला...'

'महाराज, हळूहळू देवाचं भजन म्हणत चला... तेवढंच देवाचं नाव कानावरुन जाईल... मला बरं वाटेल...'

'बरोबर हाय. आईसाहेब... बसतो आपल्या पायाशी...' बुवा हळू आवाजात गाऊ लागले —

"बैसलिया ठायी म्हणतात राम राम। काय होय श्रम, ऐसे सांगा।।
खरे बोलता कोण लागती सायास। काय वेच यास, वेचे सांगा।।
तुका म्हणे देव जोडे याजसाठी। आणिक ते आटी नलगे काही।।"

ऐकता ऐकता रमाईंचा डोळा लागला. ग्यानबुवांनी भजन थांबविलं. सगळीकडं शांतता पसरली.

रात्री आठ वाजता डॉक्टर आले. अर्धवट जागृतीत, अर्धवट झोपेत रमाई होत्या. डॉक्टरांनी त्यांना तपासलं. ताप हटेना. लक्षण बरं दिसेना. तरी डॉक्टर म्हणाले, 'शंकर काळजी करायची नाही. प्रकृती सुधारेल. तरी आता आंबेडकर साहेबांना बोलावून घ्यायला काही हरकत नाही. ह्या गोळ्या आहेत. तीन तासानं एक एक द्यायची. रोग्यावर बारीक लक्ष ठेवायचं. कमा–जास्त झालं तर मला लगेच बोलवायाचं.'

डॉक्टरांच्या अशा बोलण्यानं शंकर मनातून थोडा चमकला... डॉक्टरांनी साहेबांना बोलावयास सांगितलंय... रोग्यावर बारीक लक्ष ठेवायला सांगितलंय...

रमाईंचा डोळा लागला. त्यांच्या बिछान्याजवळ ग्यानबुवा हळू आवाजात भजन गुणगुणत असलेला. रात्रीचे दहा वाजलेले. शंकर ग्यानबुवाला म्हणाला, 'बुवा, रात्रीचं दहा वाजलं. रात्र बरीच झाली. भजन थांबवा. आता आपण जावा. पाहिजे तर उद्या या.'

'न्हायी... न्हायी... आम्हाला असं जाता येणार न्हायी... आईसाहेबांना सोडून आता आमाला जाता येणार न्हायी... आमाला चहापाणी... जेवण काही काही नको...' ग्यानबुवा व त्यांचे शिष्य असंच म्हणाले व आईसाहेबांच्या बिछान्याजवळ बसून देवाचं भजन हळू आवाजात गाऊ लागले. पण रमाईंचा डोळा लागल्यानं, शांतचित्त बसलेले.

परत रमाईंना जाग आली. बोलल्या, 'शकर... अरेऽऽऽ शंकर... महाराज गेले की काय?'

खाटेजवळ बसलेले ग्यानबुवा ताडकन उठून रमाईंच्या जवळ गेले. म्हणाले, 'आईसाहेब, मी न्हायी गेलो. हाथंच तुमच्या पायाशी हाय. तुमाला झोप लागली म्हणून भजन थांबविलेलं. म्हणू का?'

'अगदी हळूहळू भजन म्हणत रहा. देवाचं नाव घेत रहा... शंकर, अरे त्या गवयाचं ते गाणं ऐकायचं राहिलंच की... बोलाव बघू त्या गवयाला... ते गाणं मला आत्ताच्या आता ऐकायचं हाय...'

'ताई... पण आता रात्र फार झालीय गं... तो गायक तिकडं लांब चेंबूरला राहतो. पाहिजे तर उद्या घेऊन येईल...'

'पण मला हे गाणं आत्ता ऐकायचं होतं रेऽऽऽ' रमाईच्या डोळ्यांत या वेळी एकदम पाणी भरलेलं, शंकरनं प्रत्यक्ष पाहिलं. शंकर मनोमनी चरकला. समजूत काढायची म्हणून बोलला.

'ताई, ते गाणं मी गुणगुणलं तर चालेल का गं?'

'अ... तू? हं चालेल की... पण ते गाणं त्या गवयाकडूनच ऐकायचं हाय मला... तू आता गा... पण उद्या त्याला घेऊन ये हं! न विसरता हं म्हण... मी ऐकते...' शंकर दाटल्या गळ्यानं गाऊ लागला.

"महाराचं प्वार बिट्या लई हुशयार
बिट्या लई हुशयार
साऱ्या जगात असं न्हायी हुनार
आरं बघ बघ बघ...!
गरिबीत वडलानं साळा शिकावली
विलायतला जाऊन त्यानं इद्या मिळावली
कायद्याचं झालं लई मोठं बालिस्टर
बिट्या लई मोठं बालिस्टर
साऱ्या जगात असं न्हायी हुनार
आरं बघ बघ बघ...!"

शंकरचा एक चरण म्हणून होतो न होतो, इतक्यात रमाआईला परत झोप लागली. शंकरनं आपलं गाणं थांबवलं.

रात्री बारानंतर रमाईचं अंग अधिक तापल्यासारखं शंकरला वाटलं. थर्मामीटर लावून शंकरनं रमाईचा ताप पाहिला. १०४ डिग्रीच्या पुढे पारा धावलेला दिसला. त्याच्या काळजात एकदम धस्स झालं. लक्ष्मीबाई, ग्यानबुवा व त्यांचे शिष्य... सारेच चिंतेत पडले. लक्ष्मीबाईचं रमाईच्या कपाळावर कोलन वॉटरच्या पट्ट्या ठेवण्याचं काम अखंड चालू होतं. शंकरनं मधून मधून रमाईला औषधाची गोळी देणं चालू केलं होतं. नामस्मरणसुद्धा चालूच होतं.

रात्री दोनच्या सुमारास परत रमाईंना जाग आली... ती बडबडतच. रमाई तापात बडबडल्यासारख्या सारख्या बडबडू लागल्या. लक्ष्मीबाई, शंकर, ग्यानबुवा सारेच मग घाबरले. रमाई बोलता बोलता ताडकन् खाटेवर उठून बसल्या... रमाईंनी डोक्यावर पदर घेतला. खाली मान घालून नम्रपणे बोलू लागल्या.

'अगोऽऽऽ बाई! आपलं मामंजी आले... लक्ष्मीबाई बघ, आपलं मामंजी आले... शंकर... शंकर... अरे, साहेबांचे वडील आले... पण हे साहेब कसे अजून आले नाहीत? परळच्या ऑफिसवर तर जाऊन बघून येऽऽऽ मामंजी... असं दूर उभे का... या या... जवळ या... इथं बसा... मामंजी... मी तुमच्या शब्दात... तुमच्या इच्छेप्रमाणे आपल्या साहेबांना खूप शिकायला मी मदत केली... आपलं साहेब, इतकं शिकलं, इतकं शिकलं... त्याच्याइतकं या जगात कोण शिकलंच न्हायी... मामंजी... त्यांना मी संसारात अडकवून ठेवलं न्हाय... संसाराच्या काळजीची जराबी झळ त्यांना लागू दिली न्हाय म्या... संसाराचा सारा भार मी पेलला. एकटीनं पेलला. या या खांद्यावर... या या हातावर... हा... आपलं साहेब... आपल्या समाजाच्या उद्धाराचं आता कार्य करीत हायीत... सारा आपला समाज आता साहेबांना पुढारी समजतोय... हां... आपला राजा समजतोय... हां... आपला देव समजतोय... मामंजी, या मनुष्य जलमात येऊन, जेवढं मिळवायचं तेवढं आमी सारं मिळवलंय होऽऽ आता देवाची मर्जी...'

ग्यानबुवा लक्ष्मीबाईंना बाहेर नेत त्यांच्या कानात हळू आवाजात सांगू लागले. 'लक्ष्मीबाई... पाहिलंत, रमाईंचं प्राण न्यायला प्रत्यक्ष यमदूत त्यांच्या मामंजींच्या, रामजी सुभेदारांच्या रुपात, आलेला आहे. रमाईंना ते फक्त दिसत आहे... रमाईच त्यांच्याशी बोलत आहेत... लक्ष्मीबाई, गंगातीर्थ आताच पाजा रमाईंना... त्यांचा आत्मा आता कधी उडून जाईल ते कळणार नाही...'

शंकरमामा गोंधळून म्हणाला, 'ग्यानबुवा, तुम्ही काय म्हणतात, हे मला काही कळेनासं झालंय.'

'अरेऽऽऽऽ!' ग्यानबुवा सांगू लागले, 'देव एखाद्याचा प्राण नेण्यासाठी त्या व्यक्तीच्या अती आवडत्या अशा व्यक्तीच्या रुपातच, आपल्या यमदूताला पाठवून देत असतो. मामंजीवर रमाईंचा अतिलोभ होता, म्हणून देवानं यमदूताला

मामंजीच्या रुपातच पाठविलाय... त्या असं त्यांच्याशी बोलत बोलतच... त्यांच्याबरोबर जाणार... आत्मा जाणार... देह इथंच राहणार...'

आणि ग्यानबुवा अक्षरशः ओक्साबोक्सी रडू लागले... सारेच आश्चर्यचकीत...

रमाई खाली मान घालून त्या मामंजींशी बोलतच होत्या —

'मामंजी... आमी तुमच्या शिकवणप्रमाणं देवपूजा... प्रार्थना... अजून चालू ठेवली हाय... तुमची नातवंडं यशवंत मुकुंद यांनीसुद्धा तुमच्या पायावर पाय ठेवून चालल्यात... चला, देवघरात... तुम्हाला मी सारं सारं दाखवते... चला... चलाऽऽऽऽ आँ... आँ... मामंजी...? मामंजी, तुमी कुठं गेला? कुठं गेला? मामंजी, तुमी परत गेलाच... साहेबांना न भेटताच...'

रमाई बिछान्यावर पडून स्फुंदून स्फुंदून उडू लागल्या...

— रमाईचं अंग थंडगार पडलेलं... पण श्वासोच्छवास जोरात चललेला – रमाई पडल्या पडल्या पुटपुटल्या, 'शंकर... शंकर... डॉक्टर...'

'काय ताई? काय ताई? बोल! डॉक्टरांना बोलवू?' शंकरमामा मोठ्या आनंदानं म्हणाला, 'ग्यानबुवा माझी ताई, माझ्याशी बोलली... डॉक्टरांना बोलव म्हणाली...'

'आश्चर्य! आश्चर्य!!' ग्यानबुवा आश्चर्यचकित होऊन बोलला, 'रमाआईंनी प्रत्यक्ष यमदूताला परत पाठवला... आईसाहेबांची व त्यांच्या पतिदेवाची भेट नाही... म्हणून प्रत्यक्ष यमदूत आलेला परत गेला... कलियुगातलं हे मोठं आश्चर्य... रमाईंच्या पातिव्रत्याचा हा अगाध महिमा... मामंजीच्या रुपात आलेला यमदुतही रमाईंनी परतविला... संकट टळलं... संकट टळलं...'

शंकर आनंदानं नाचत बोलला, 'बुवाऽऽऽ संकट टळलं... किती वाजले बघा... पहाटे पाच वाजायला आले?... चालेल... घेऊन येतो डॉक्टरांना... ताईनी सांगितलं... घेऊन येतो मग डॉक्टरांना! बुवाऽऽऽऽ संकट टळलं...!'

पहाटे पाच वाजले तरी शंकरमामाने डॉक्टरांना बोलावून आणलेच. रात्रभर रमाआई तापात बडबडत होत्या, असं त्यानं डॉक्टरांना सांगितलं.

एवढ्या भल्या पहाटेसुद्धा डॉक्टर आपल्या रमाईंना बघावयास येत असल्याचं पाहून ग्यानबुवा व त्यांचं शिष्य आनंदाच्या भरात बोलले, 'डॉक्टर साहेऽऽऽब, आऽऽले, डॉक्टर साहेब आले.'

आपलेच डॉक्टरसाहेब आले म्हणून बिछान्यावर आडव्या झोलल्या रमाई तशा अशक्तपणातही उठून बसल्या... दाराकडे आधाशासारख्या पाहू लागल्या. उतावीळ होऊन बोलल्या, 'डॉक्टर साहेऽऽब, आले, आपले साहेऽऽब आले?'

दुसऱ्याच क्षणी त्यांना दिसलं की, दव्याचे डॉक्टर आपल्याकडे येत आहेत... आपले साहेब नव्हे... परत रमाईंनी मोठ्या निराशेनं बिछान्यावर अंग लोटून दिलं.

डॉक्टर आले. त्यांनी रमाईंना तपासले. एक इंजेक्शन दिलं व म्हणाले, 'एक इंजेक्शन आता मी दिलं आहे. ताप आता कंट्रोलमध्ये राहील. काल दिलेल्या गोळ्या सांगितल्याप्रमाणे देत रहा. आंबेडकरसाहेबांना बोलावणं पाठवलंय ना?'

'हो!' शंकर उत्तरला. मनुष्य पाठवला आहे. पण साहेब कसे अजून आले नाहीत. आज जरुर येतील.

डॉक्टर बाहेर जात जात शंकरला हळू आवाजात म्हणाले, 'आवडत्या माणसाच्या सहवासासारखा रोग्याला दुसरा मोठा धन्वंतरी नाही, दुसरा डॉक्टर नाही. पतिदेवासाठी व्याकुळ झालेल्या रमावहिनींना पतिदेवाचा प्रत्यक्ष सहवास हाच त्यांच्या साऱ्या रोगावर जालीम उपाय ठरणार आहे.'

आज दुपारी चार वाजेपर्यंत साहेबांची वाट पाहतो, नाहीतर मी जातो नि घेऊन येतो.

डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे आज दुपारी पाचपर्यंत ताप कंट्रोलमध्ये होता. स्वतः शंकर मग साहेबांना घेऊन येण्यासाठी वसईला निघाला. निघण्यापूर्वी त्यानं थर्मामीटर लावून ताप पाहिला. ताप वाढत असल्याचे त्याच्या लक्षात आलं. तो

क्षणभर विचारात पडला. लक्ष्मीबाई त्याला म्हणाली, 'हे बघ शंकर, साहेब आज जरुर येतील. तू काही वसईला जाऊ नकोस. रमाचा ताप परत वाढू लागलाय. तू असलाच म्हणजे आम्हाला धीर येतोय. मोठा आधार वाटतो.'

लक्ष्मीबाई म्हणजे साक्षात् सेवाभावाची सजीव मूर्ती होती. रमाच्या आजारात तिच्या डोळ्याला डोळा नव्हता. तिचं पोट भूक विसरलं होतं. शंकरला धावपळीला दम नव्हता. कष्टाला सीमा नव्हती.

• • •

२५

पोयबावाडी येथील चाळीतल्या रमाईंच्या मैत्रिणी त्यांच्या तब्येतीची चौकशी करायला येत जात होत्या. साहेबांची मित्रमंडळीही येत होती, राजगृह भरला भरला भासे. पण त्यावर उदासिनतेची दाट छाया पडलेली दिसे.

शनैः शनैः रमाईंचा ताप वाढू लागला. हळूहळू रमाईंच बडबडणं परत सुरु झालं. कपाळावर ठेवलेली कोलनवॉटरची पट्टी बाजूला फेकून देत रमाई बडबडू लागल्या.

'काय तुमी हे चालवलंय माझ्याशी? शंकर... साहेब अजून कसे आले नाहीत? वाट बघून बघून डोळे की रे शिणले माझे... प्राण कंठाशी आले... अजून साहेब कसे येत नाहीत ते? साहेबांकडे कुणाला पाठवलंय? का कुणी गेलंच नाही अजून? कालपास्नं सांगते मी तुम्हाला. कान फुटलेत तुमचे? शंकर तू का गेला नाहीस, साहेबांना आणायला? त्यासाठी तुझी वडील बहिण मासोळीवानी तडफतेय... त्याचं तुला काहीच नाही? महाराज, तुमचं भजन का बंद केलंय?'

'हळूहळू भजन म्हणतोय, आईसाहेब!' ग्यानबुवा कंठ दाटून बोलला.

रमाई वातात कळवळून पिळवटून बोलल्या होत्या. त्यामुळं साऱ्यांची हृदयं व्याकूळ झालेली. प्रत्येकाचे डोळे पाण्यानं भरलेले.

मध्येच रमाई विचार करीत पडत. परत उसळून उठत. परत काही विचारपूस करीत...

'आपल्या टॉबी कुत्र्याला दूध पाजलं का? मुकं जनावर हाय ते, ते काय दूध म्हणून तुमा कुणाला बोलणार हा? टॉ...बी... टॉऽऽबी, वसईहून त्याचे साहेब आले म्हंजे मला विचारतील टॉबीला दूध पाजलं का? मग मी त्यांना काय उत्तर देणार?... मी साहेबांशी कंदी खोटं बोलले नाही... खोटं वागले नाही... आमची दोघांची जोडी कशी शंकर-पार्वतीची... साहेब म्हणजे माझा 'बिनमरणाचा नवरा...' मी सात कोटी दलितांच्या राजाची... मी राणी... मी राणी... राजाची राणी... त्या राजाराणीचा तो आवडता टॉऽऽऽबी...'

'ताई, उगीच बडबडू नकोस... टॉबीला आम्ही का विसरु? त्याच्या साहेबाची आम्हाला का भिती नाही?' शंकर बोलला.

मग तुझ्या त्या साहेबांची मोटार तर नाही ना, नादुरुस्त झाली? मग असा उशीर का? मी एवढी त्यांची... दोन दिवस... डोळ्यात प्राण आणून वाट बघतेय, पण त्यांना काहीच नाही. साहेब कंदी कंदी असे पाषाणहृदयी वाटतात... तर कंदी कंदी मऊ मऊ बिलबिलीत काळजाचे...

'ताई... ताई... तू जरा गप्प पडून रहा बघू... आपल्या या लहान भावाचं शंकरच, तू कधी ऐकून घेणार आहेस की नाही?'

'तू तुझ्या वडील बहिणीचं ऐकणार आहेस की नाही? कालपास्नं बघते, तू व लक्ष्मीबाई माझ्या उशाशी बसून आहात, बाहेर बगीच्यात फुलझाडांना पाणी घातलंय का कुणी? साहेब वसईहून आले नि बगीच्यात त्यांनी पाहिलं, त्यांना तिथं

सुकलेली फुलझाडं दिसली, तर किती रागावतील ते! तस्से भलते रागीट हायीत वोऽऽ त्यांची मी पत्नी म्हणून मला त्यांचा स्वभाव चांगला माहीत हाय, जमलं तर सूत नाहीतर मोठं भूत... होऽऽऽ भूऽऽत... भूऽऽऽत...'

आधीच काळजीनं साऱ्यांची तोंड उतरलेली, त्यात रमाईची ही असली जीवघेणी बडबड... ऐकणारांची हृदय पिळवटून टाकीत होती. दूर... दूर कोपऱ्यात यशवंत व मुकुंद आईचं हे बडबडणं ऐकून मुळूमुळू रडत होते. रमाच्या या बडबडीनं रमा वेडी होतीय की काय असं लक्ष्मीबाईंना वाटू लागलं.

तेवढ्यात कोणीतरी बोलले, 'बाबासोहब आले... बाबासाहेब आले...'

रमाई इकडे तिकडे डोळे फिरवून पाहू लागली. साहेब कुठं दिसतात का म्हणून तिचे आतूर डोळे त्यांना धुंडू लागले... वातातली बडबड विसरली.

२६ मे १९३५ रोजी संध्याकाळी बाबासाहेब वसईहून मुंबईस आले.

खरंच, बाबासाहेब आले. थेट रमाईच्या जवळ धावतच गेले.

रमाई वेड्यासारख्या त्यांच्याकडं पाहतच होत्या. त्यांना पाहून त्यांचा आजारच गेला. साहेबही चकीत होऊन पाहतच राहिले. आपल्या सुंदर पत्नीची गुलाब फुलासारखी टवटवीत गुलाबी काया आता कशी अगदी कृश, पांढरीफटक व अस्थिपंजर अशी झालेली. ते पाहून, साहेबांच्या उरात एकदम भडभडून आलं. त्यांच्या मनात मनस्वी कालवाकालव झाली.

रमाई हर्षभरीत होऊन बोलू लागल्या. 'तुमी गेला... किती बाई तरी मी तुमची वाट पाहिली. तुमचाच ध्यास. मरते की काय मी ? वेडी बायकांची जात. त्यांचा जीव त्यांच्याजवळ नसतोच मुळी. तो असतो घुटमळत त्यांच्या पतीभोवती...'

'मला काय कल्पना... तू इतकी आजारी पडली असशील म्हणून... हवा पालटण्यासाठी, विश्रांतीसाठी मी गेलेलो. तुला त्यानंतर मी आजच पाहिलं. माझ्या काळजाच्या चिंध्याचिंध्या झाल्या... किती आजारी पडलीयास तू... एवढ्यात... एवढी अस्थिपंजर झालीस तू ?'

'नित्याच्या आजाराबरोबर, तुमचा लागलेला मला ध्यास. त्या मेल्या ज्योतिषानं मला सांगितलं ते... सारखं आठवत होतं मला. पति घरी नसताना तुला मरण येईल. आता तुम्ही आलात माझी चिंता मिटली.'

'खुळी कुठली... हे मनातलं भूत काढून टाक बघू.'

'तरी साहेब, मला आता तुमच्याजवळ अस्से बसून रहावेसे वाटते हो... तुमापासून जराही दूर असू नये, असं वाटतं होऽऽऽ, पण तुमच्या अंगावर असा हात टाकून, तुमच्यात विलीन होऊन, मरुन जावंसं वाटतं होऽऽऽऽ'

बाबासाहेबांचा हात हातात घेत रमाई कळवळून बोलू लागली, 'तुमचा या हातात अस्सा माझा हात ठेवून, अस्स झोपावसं वाटतं. तुमच्या त्या मांडीवर झोपावसं वाटतं... मांडीवर तस्संच पडून मरुन जावंसं वाटतं...'

'रमा, मनात असं काही तरी आणू नकोस गं... असा मनस्ताप करुन घेऊ नकोस... तू शांत झोप बघू. मी तुला थोपटून झोपवितो. तू शांत शांत झोप...'

बाबासाहेब रमाला हळूवारपणे थोपटू लागले. आणि रमाला शांत झोप लागली.

तेवढ्यात त्यांचे नित्याचे 'फॅमिली डॉक्टर' आले. म्हणाले, 'साहेब, आपण आल्याचं समजलं. म्हटलं, चला आपणास भेटून यावं. आंबेडकरसाहेब, तुमच्या गैरहजेरीत मी स्वतः येऊन रमावहिनींना तपाशीत होतो. प्रकृती तशी नाजूकच आहे. काळजी घ्यायला पाहिजे. आजची रात्र वैऱ्याची आहे, त्यातून निभावलं की संकट टळलं म्हणायचं... खरं तर तुम्हीच त्यांच्या साऱ्या रोगावर रामबाण आहात... आमच्या गोळ्या इंजेक्शनची मात्रा त्यांच्यावर चालेना झालीय... तुम्हीच आता त्यांचे औषध...'

बाबासाहेब हळूच हसून म्हणाले, 'खरं आहे ते डॉक्टर... माझ्याशिवाय, माझ्या सुखाशिवाय तिला स्वतःचे सुखदुःख काही वाटतंच नाही... उठता बसता माझाच विचार... माझाच ध्यास...'

'साहेब, भाग्यवान आहात तुम्ही. एवढं तुमच्यावर अपरंपार प्रेम करणारी पत्नी तुम्हाला लाभली...'

'ते ठीक आहे होऽऽऽ पण माझी साथसोबत ती यापुढंही करेल ना? मला तर ते आता शक्य दिसत नाही...' असे म्हणून आंबेडकर ओक्साबोक्सी रडू लागले. ते पाहून डॉक्टर चकीत झाले. बोलले, 'दुनियेतली सारी वृत्तपत्रे तुम्हाला 'कठोर काळजाचा' म्हणून संबोधतात. त्या तुम्हास - आज चक्क असं ओक्साबोक्सी रडताना पाहतोय! आश्चर्य!'

'मी नाही रडत डॉक्टर, तिचं माझ्यावरील उलोट प्रेम मला असं रडवतं... बाहेरच्या लोकांनी मला वा माझ्या समाजाला कधी साधी माणुसकी दाखवली नाही, प्रेमाचा ओलावा कधी दाखवला नाही, त्या बाहेरच्या कठोर काळजाच्या लोकांशी वागताना, मी कदाचित् कठोर काळजाचा होत असेन. त्याला माझा नाईलाज आहे. मी एक माणूस आहे... साधु-संन्याशी नाही...'

'जशास तसे हा न्याय. खरं आहे ते. अच्छा. जादा वेळ घेत नाही तुमचा. आज रात्रभर तुम्ही जागे रहा. रात्र वैऱ्याची आहे...' असे बजावून डॉक्टर निघून गेले.

एव्हाना रात्रीचे दहा वाजले होते. रमाईला शांत झोप लागलेली होती. मुलं यशवंत व मुकुंद दूर कोपऱ्यात झोपली होती. लक्ष्मीबाई, ग्यानबुवा, त्यांचे शिष्य, पोयबावाडीच्या दोन स्त्रिया, त्याच खोलीत पण जरा लांब लांब अशी आडवी पडलेली होती. शंकरमामा दाराकडेला आरामखुर्ची टाकून नुसता पहुडला होता. साऱ्यांची तोंड काळजीनं ग्रस्त झालेली... पण कुणाच्याच डोळ्यातं झोप नव्हती.

बाबासाहेब रमाईंच्या बिछान्याला लागूनच आपली खूर्ची टाकून, त्यांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव न्याहाळीत बसले होते.

सगळीकडे कशी सामसूम झालेली. त्या निरम शांततेत, बाबासाहेबांच्या मनात अनेक सुप्त आठवणी परत चावळून उठू लागल्या होत्या...

'...आपण दोघे एकमेकांची आहोत...'

'जन्मोजन्मी एकमेकांची आहोत, नव्हे, तुकारामाची बायको 'आवली,' कबीराची बायको 'रामजनिया'.... तशी भीमरावाची बायको 'रमा'... संत तुकारामाची संसारी बायको 'आवली' होती, म्हणून तुकारामानं भलीमोठी 'अभंग गाथा' लिहिली, संत कबीराची बायको रामजनिया 'शेले' विणून संसार चालवी. म्हणून कबीरानी हजारोंनी 'दोहे' लिहिले. रामू... मला वाटतं, परमेश्वर अशा 'नवरा-बायकोच्या' जोड्या करुनच मग त्यांना खाली पाठवून, त्यांच्याकडून अशी महान कार्ये करुन घेत असावा. तुझ्या माझ्या जोडीमार्फत देवाला काहीतरी मोठं कार्य घडवून आणायचं असेल...'

रमाईंची ती इच्छा... ती इच्छा त्यांनी आपल्या काळजाच्या कप्प्यात जपून ठेवली आहे...

'साहेब, हिंदूंच्या पाषाणहृदयात कंदी पाझर फुटणार नाही, म्हणून तुमी धरम बदलण्याची भाषा करताय... धरम जरुर बदला. पण साहेब, तुमी कोणताही धरम बदला... पण तो तुमचा धरम इथलाच असावा. बाहेरचा नसावा. तो धरम देवावर श्रद्धा ठेवणारा असा असावा... होणारं ते होत असतं... पण गरीब माणसाच्या आशेला तेवढाच आधार... आशेवर गरीब जगत असतो... नाहीतर जगण्यासारखं काय असतं त्यांच्या आयुष्यात... ?'

'मी बायको आहे तुमची. मलाही काही भावना आहेत, पती म्हणून तुमचंही काही कर्तव्य आहे. हे कर्तव्य तुम्हाला बजवायचं नव्हतं... तर माझ्याशी लग्न केलं तरी कशाला?'

'रामू... या प्रश्नाला माझ्याजवळ उत्तर नाही.'

'प्रत्येक प्रश्नाला उत्तर हे असतंच साहेब.'

'काही वेळा अनुत्तरीत प्रश्न घेऊन जगावं लागतं माणसाला...'

'लोक म्हणतात, आंबेडकर फार दैववान माणूस आहे... पण माझ्या इतका दुर्दैवी माणूस या दुनियेत सापडणार नाही. लोकांना काय माहीत... आम्ही नवरा-बायको असूनसुद्धा गेली आठ-नऊ वर्षे आम्ही व्रतस्थ राहिलोय... मी एवढा कपाळकरंटा की, माझ्या कुटुंबाला मी सुख देऊ शकलो नाही... कुटुंबाचं सुख मी घेऊ शकलो नाही... वाटतं, आपल्याला

समाजाचा संसार थाटायचा होता, तर स्वत:चा संसार मी मांडायला नको होता... मी लग्न का केले? माझ्यावर एवढं प्रेम करणाऱ्या, माझ्यासाठी जन्मभर कष्ट उपसणाऱ्या रामूला मी काय सुख दिले...?'

हे सर्व आठवताना, बाबासाहेबांचं हृदय दुभंग झालं. डोळ्यातून आपोआप टप्टप् अश्रू गळू लागले... टप्टप्... टप्टप्...

ते अश्रूंचे थेंब बरोबर रमाईंच्या गालावर पडत होते. त्यानं रमाई जागृत झाल्या. रमाईंनी हळूच डोळे उघडले...

२७ मे १९३५ चा दिवस उजडला. सुप्रभाती नाजूक टवटीत फुलानं जसं पाकळीपाकळीनं उमलावं तसं रमाईंनी हळूच डोळे उघडले. आपल्या उशाशी बसलेल्या साहेबांना पाहून रमाईची कळी अधिकच फुलली, खुलली. रमाई त्यांच्याकडं एकटक पाहत होत्या. जणू साहेबांचं रुप त्या आपल्या हृदयात साठवून ठेवीत होत्या.

बाबासाहेब रमाईंच्या कानात बोलले, 'राऽऽमूऽऽऽ, अशी काय खुळ्यासारखी बघतेस? तुला काय, पाहिजे आहे काय?'

'हांऽऽ.. पाऽऽणी!' रमाई मखमली आवाजात बोलल्या. उगीचच, साहेबांनी स्वत:च्या हातानी मोठ्या प्रेमानं रामूला त्या दिवशी पाणी पाजलं. रमाई खूष झाल्या. आत हृदयात त्यांच्या उकळ्या फुटू लागल्या. पुन्हा त्या साहेबांकडे एकटक पाहू लागल्या. साहेबांनी हळूवार विचारले, 'आणखी काय पाहिजे?'

'औषध!' आता तर रमाई अमृताहून गोड बोलल्या.

साहेबांनी स्वत:च्या हातांनी, मोठ्या प्रेमाने रमाईंना त्यांचं औषध त्यांनी तोंडी लावलं. रमाई त्यामुळं अधिकच खूष झाल्या. बोलल्या,

'साहेब, मी आता अमर झाले. तुमच्या हातचं पाणी प्याले, म्हणजे गंगातीर्थ प्याले. तुमच्या हातानं औषध घेतलं. म्हणजे मी अमृतपान केलं... मी अमर झाले!'

'खरंच, रामू तू ग्रेट आहेस. माझ्यावरील तुझ्या ह्या अलोट प्रेमापुढं, माझं प्रेम फिक्कं पडतंय गं. मी माझ्यातच इतका गुरफटून गेलो की, पापणी वर करुन तुझ्याकडं नुसतं पहायलासुद्धा मला जमलं नाही गं... रामू, तुझा मी अनंत अपराधी आहे...'

— कितीतरी वेळ असा, रमा-भीमाचा सुख-संवाद चालू होता. त्यांच्या संवादात प्रेमाचा सुगंध दरवळत होता. त्याचा घमघमाट वातावरणात पसरला होता.

असं बोलता बोलता बाबासाहेबांचे डोळे भरुन आलेले...

'साहेब... ना... ना... असं डोळं भरु नका गडे... असं तुमी दु:खी झाल्यावर मी दु:खी होईन... साहेब, खरं सांगू... तुमचं माझ्यावरील अलोट प्रेम पाहूनच, तुमच्यासाठी मी जलमभर कष्ट उपसलं... कष्ट उपसू शकले... कष्ट उपसण्यात मला कंदी शीण आला नाही... सारं सारं मी प्रेमानं करु शकले... तो हा दिवस पाहण्यासाठी...'

आणि रमाई परत साहेबांकडे एकटक पाहू लागली... अगदी एकटक.

'तो दिवस पाहण्यासाठी... म्हणजे?'

'तो दिवस मी आज पाहत आहे. ते पहा... माझा पतिराजा, या देशाचा राजा झाला आहे... त्याच्या अंगावर राजाचा भरजरी... गर्भरेशमी... चोपदार पोषाख चढविला आहे... 'आस्ते कदम... आस्ते कदम' म्हणून भालदार चोपदार ललकाऱ्या देत आहेत... घरादारातून, इमल्या-माड्यावरुन रस्त्याच्या दुतर्फा गर्दी करुन, या देशाची जनता मोठ्या आनंदानं मोठ्या प्रेमानं तुमच्यावर फुलं उधळीत आहे... तुम्हाला मानाची सलामी देत आहेत. शिंग-तुतारी फुंकल्या जाय आहेत... मी... मी पंचप्राणाची आरती करुन, तुम्हाला ओवाळीते आहे... 'राजगृह'चं भाग्य उजळून निघालं आहे... साऱ्या दलित समाजाचं तोंड उजळ झालं आहे... अन् मोठ्या आनंदानं मी तुम्हाला ओवाळीते आहे... ओवाळते आहे... ओवाळते आहे...'

अन् एकदम रमाईच्या छातीत जोरात कळ आली. असह्य वेदनांनी रमाई बिछान्यावर गडबडा लोळू लागल्या. तडफडू लागल्या...

बाबासाहेब घाबरुन ओरडले, 'राऽऽऽमू... काय झालं एकाएकी ?'

रमाई काही न बोलता नुसत्या तळमळू लागल्या, विव्हळू लागल्या. बाबासाहेबांनी मग जोरात हाक घातली, 'शंऽऽकर... शंऽऽकर...'

शंकर धावतच साहेबांच्या पुढं येऊन उभा राहिला. साहेब बोलले, 'शंकर जा... लवकर जा, डॉक्टरांना घेऊन ये... तुझ्या ताईची तब्येत परत बिघडली... एकाएकी... जा...'

वाऱ्यासारखा शंकर धावला. जमलेल्या लोकांच्या चेहऱ्यावर आता दाट चिंतेचे ढग पसरले. सारे चिंताग्रस्त उभे. मनोमनी देवाची प्रार्थना करीत. करुणा भाकीत, ग्यानबुवांनी नामस्मरणचा जप चालविलेला.

रमाईच्या जीवाची तगमग होत होती. प्रति क्षणाला ती वाढतच होती. साहेब घाबरुन रमाईला विचारीत होते, 'राऽऽमू... राऽऽमू... बोल... काय होतंय तुला ? पाणी देऊ ? का औषध देऊ ? काय देऊ रामू तुला ?'

रमाई तडफडतच एक एक शब्द बोलल्या, 'साहेब... आता मला काही काही नको... मला सारं सारं काही मिळालं... मी आता संतुष्ट आहे. तृप्त आहे... डॉक्टरांना कशाला बोलावता आता... थोड्या क्षणाची मी मालकीण आहे... माझं डोकं आता तुमच्या मांडीवर घ्या...'

पत्नीसाठी विव्हळ झालेले बाबासाहेब रमाईचं डोकं मांडीवर घेऊन बसले.

लक्ष्मीबाई डोळे पुशीत बोलल्या, 'गौराबाई रमाला कुंकू लावा. करंडा तिथंच असंल बघा. सुवासिन हाय ती...'

गौराबाईनं करंडा घेऊन प्रथम स्वत:च्या कपाळी कुंकू लावलं. नंतर रमाईंच्या कपाळी लावलं. कुंकू लावून होताच, पतिव्रता साध्वी रमाई, त्या तशातही एखाद्या देवीसारख्या तेजस्वी दिसू लागल्या.

'साहेब, असं रडू नका हं... माझ्या पतिदेवाच्या मांडीवर मला मरण येत आहे... माझं हे मरण म्हंजी अहेव मरण आहे. भरल्या चुड्यांनी मी देवाघरी जाते आहे... कपाळी कुंकू लेवुन, सवासिन म्हणून जाते हाय... साहेब... मोक्षाची मी धनीण झाली आहे... मग असं रडता का... मला हसत निरोप द्या... माझी शपथ आहे... असं रडू नका...'

रमाबाईंनी आपला कृश हात वर करुन, साहेबांचे सतत वाहणारे अश्रू पुसण्याचा निष्फळ प्रयत्न केला, पण त्यांचा तो हात खळकन् खाली गळून पडला. साहेबांची तेज:पुंज मूर्ती हृदयात ठेवण्याचा प्रयत्न करीत असतानाच, रमाईची नेत्रद्वारे खाडकन् झाकली गेली.

बाबासाहेब काय समजायचे ते सारे समजून चुकले. अंगात होतं नव्हतं सारं बळ एकवटून ते ओरडले, 'राऽऽमूऽ राऽऽऽमूऽऽ'

घड्याळात बरोबर सकाळचे नऊ वाजले होते...

पहाडासारखे अचल बाबासाहेब, एखाद्या वेलीसारखे उद्ध्वस्त होऊन, रमाईच्या अंगावर उन्मळून पडले. वेड्यासारखे ओरडू लागले, 'राऽऽमूऽ राऽऽमूऽ.' राऽऽमू राऽऽऽमू ही त्यांची ती आर्त किंकाळी साऱ्या 'राजगृहात' घुमत राहिली. कितीतरी वेळ.

डॉक्टर व शंकर धावत धावतच राजगृहात आले. पण त्यापूर्वीच रमाईचं प्राणोत्क्रमण झालेले. जळता जळता कापूर नाहीसा व्हावा, तशा रमाई गेल्या. पंचतत्वात विलीन झाल्या.

अजून बाबासाहेब रमाईच्या अंगावर पडून स्फुंदून स्फुंदून रडतच होते.

त्यांच्या इष्टमित्रांनी त्यांना रमाईच्या अंगावरुन दूर करण्याचा प्रयत्न केला, पण साहेब काही केल्या काही ऐकेनात. साहेब दाटल्या गळ्याने बोलले,

'आम्हा दोघांना माझ्या वडिलांनी, दैवाने असं जन्मोजन्मीचे साथी म्हणून एकत्र केलं असताना, आम्हाला दूर करणारे तुम्ही कोण रे ?'

साहेबांचे हे बेंबीच्या देठापासून पिळवटून आलेले 'उद्‌गार' ऐकून, त्यांची इष्टमित्र मंडळीही त्यांच्याबरोबर धाय मोकलून रडू लागली. आकांत करु लागली. राजगृह शोक-सागरात बुडाला! 'टॉबी' कुत्राही एका बाजूला बसून अश्रू गाळीत होता.

रमाईंच्या निधनाची वार्ता हां हां म्हणता साऱ्या मुंबईत झाली. अस्पृश्य समाजातील, गिरण्यांतून व कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगारांनी स्वयंस्फूर्तीनं आपापली कामे ताबडतोब बंद केली आणि झाडून सारेजण राजगृहाजवळ गोळा होऊ लागले.

मुंबईतला सारा अस्पृश्य समाज आपल्या लाडक्या आईच्या वियोगाने अश्रू ढाळीत दादरच्या राजगृहासमोर उभा होता.

स्मशानात नेण्याची लोक तयारी करु लागले. तेव्हा बाबासाहेब त्यांना म्हणाले, 'रामूला पांढरे पातळ आवडत असत. तिला शेवटचे चांगले पांढरे शुभ्र पातळ आणा.'

लोक म्हणाले, 'सौभाग्यवतीला शेवटचे पातळ म्हणून हिरवे पातळच द्यावयाचे असते. हिरवे पातळ, हिरवा चुडा आणलाच पाहिजे.'

बाबासाहेबांनी त्यास मूकसंमती दिली. आपले शब्द मागे घेतले.

रमाईंची अंतिम यात्रा राजगृहापासून वरळीच्या स्मशानाकडे दुपारी दोन वाजता निघाली. या प्रेतयात्रेत जवळजवळ ४० ते ५० हजारांच्यावर जनसमुदाय सामील झालेला होता. महान रमाआईंची ही महान अंतिम यात्रा!

स्वत: बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पी. जी. सोळंकी, देवराव नाईक हे एका मोटारीत बसलेले होते. दुसऱ्या मोटारीत त्यांचे खास सहकारी शिवतरकर, कमलाकांत चित्रे, दत्ता प्रधान वगैरे पुढारी मंडळी होती. तीन-चार अन्य मोटारींतून घरची व जवळच्या नात्याची मंडळी बसली होती. त्यात रमाईंचा टॉबी कुत्राही होता.

स्वत: मडकेबुवा, ग्यानबुवा व समता सैनिक दल अफाट जनसमुदायाला ओरडून दिशा दाखवीत असे. रमाईंचा एकुलता एक चिरंजीव यशवंत हाती शिंकाळे घेऊन पुढे रडत रडत चालला होता.

• • •

२६

प्रेतयात्रा अगदी शांततेनं चालली होती. प्रेतयात्रेतील प्रत्येजण अक्षरश: रडत होता. स्वत:ची आई वारल्याप्रमाणे प्रत्येकजण अश्रू ढाळीत होता. प्रत्येकजण कळवळून ओरडत होता. 'आईऽऽऽ आईऽऽऽ आईऽऽऽऽऽ एवढ्यात आम्हाला कशी गं टाकून गेलीस... मोठ्या मायेची... आमची आई, मोठ्या हृदयाची... आमची आई... आमची रमाईऽऽ आमची रमाऽऽ'

— आणि त्या विराट प्रेतयात्रेत मोठ्यानं ओरडून घोषणा दिल्या जात होत्या - 'साध्वी रमाई अमर होवोत... राजमाता रमाई अमर होवोत... मातोश्री रमाई भीमराव आंबेडकर अमर रहे!'

प्रेतयात्रा वरळी स्मशानभूमीजवळ आली. जमलेल्या अफाट जनसमुदायाला उभे राहण्यालासुद्धा वरळीची स्मशानभूमी अपुरी पडली. काही लोक बाहेरच उभे राहून पाहत होते.

एकीकडे चिता रचली जात होती. त्याच वेळी चितेला लागून 'शोकसभा' आयोजित करण्यात येत होती.

प्रथम बोलले आवडते समाससेवज श्री. देवराव नाईक —

'कोट्यावधी दीन-दलितांच्या रमाई माऊली, आज दि. २७ मे १९३५ रोजी अंस्तगत झाली. जी माऊलीहून मवाळ, पाणीयाहूनही पातळ, मायेची कल्लोळ अशी आपली रमाई आज आपल्यांतून गेली आहे. हृदयात असं भडभडून येतं आपल्या रमाआई किती महान होत्या, हे मी एका वाक्यात सांगू शकतो. एका बाजूला सारा भारत देश व महात्मा गांधीजी नि दुसऱ्या बाजूला केवळ एकटे बाबासाहेब... अशा विरोधातसुद्धा पुणे-कराराच्या वेळी नजीकच्या दिव्याच्या खांबावर मला फाशी दिलीत, तरी बेहत्तर, अस्पृश्यांच्या न्याय हक्कांचा मी कदापि घात करणार नाही, असे निधड्या छातीने बोलणारे कठोर बाबासाहेब... जागतिक कीर्तीचे महामुत्सद्दी ब्रिटीश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्यासारख्यांना देखील वादविवादात सळो की पळो करुन सोडणारे निर्भय वृत्तीचे बेडर बाबासाहेब... आपल्या पत्नीच्या निधनाने, आमच्या रमाईच्या मृत्यूने मात्र घायाळ होऊन, एखाद्या बालकाप्रमाणं आज धाय मोकलून रडत असताना, अश्रू ढाळताना पाहून इथे स्पष्ट होते की, आमच्या रमाआईसाहेब किती महान् होत्या...'

दुसऱ्यांदा बोलले, बाबासाहेब निष्ठांवत सहकारी सीतारामपंत शिवतरकर —

'सांगायचं म्हणजे, आमच्या रमाईसाहेब अत्यंत धर्मभोळ्या, देवभोळ्या होत्या. त्या नेहमीच उपासतापास करायच्या. त्या पौर्णिमेचा उपास नित्यनियमानं करायच्या. बाबासाहेबांनाही कधी कधी त्या उपवास करायला लावायच्या. गेल्या चार-पाच वर्षात डॉक्टर साहेब चार-पाच वेळा तरी विलायतेला गेले-आले असतील. त्यांच्यासाठी इकडे आमच्या रमाईसाहेब उपवास करायच्या. आपले पतीदेव सुखरुप घरी परत येवोत, म्हणून नवस करायच्या. मला माहीत नाही, डॉक्टरसाहेब देव मानतात की नाही, पण मला एवढं माहीत आहे की, बाबासाहेब रमाईसाहेबांना मात्र देवापेक्षाही अधिक मानतात. मानत होते. पतीसाठी अहोरात्र काळजी वाहणाऱ्या, आमच्या रमाईसाहेब म्हणजे साक्षात् एक महान पतिव्रता होत्या. मूर्तीमंत सतिसावित्री होत्या...'

मध्येच ग्यानबुवा नामक एक गृहस्थ बोलले, 'रमाआईसाहेब ह्या महान पतिव्रता होत्या. कलियुगातील त्या सती-सावित्री होत्या, असं आत्ताच तुम्ही शिवतरकरसाहेबांनी सांगितलेले ऐकलंच. ते अक्षरश: खरं आहे. त्याचा खराखुरा पडताळा आता तुम्हाला सांगत आहे. गेले दोन दिवस मी रमाआईसाहेबांच्या राजगृहावर त्यांच्या सेवेला होतो. कालच रमाईसाहेबांचे प्राण न्यावयास त्यांच्याच मामंजीच्या रुपात यमदूत आलेला होता. आम्हाला मामंजीच्या रुपातला यमदूत दिसला नाही. पण रमाईसाहेबांना तो दिसला. त्यांच्याशी त्या बोलल्या ते मात्र आम्ही ऐकलं. पण एका खऱ्या पतिव्रतेचा, तिच्या पतिराजाच्या दर्शनासाठी चाललेला प्राणांतिक आटापिटा, तगमग, तळमळ त्या यमदूताला बघवलं नसावं किंवा रमाईच्या पातिव्रत्याचं सामर्थ्यच एवढं असावं की, रमाईंचा प्राण न नेता, हात हलवीत यमदूताला माघारी जावं लागलं असावं. संध्याकाळी साहेब वसईहून आले. साहेबांच्या दर्शनानं ब्रह्मानंद झाला. त्या तृप्त झाल्या. कालची संबंध रात्र भीमा-रमा पति-पत्नीची अगदी तृप्त भेट झाल्यावरच आज सकाळी ठीक नऊ वाजता यमदूत अदृश्य स्वरुपात आला नि रमाईंचा प्राण घेऊन गेला. रमाईंच्या या पातिव्रत्यानं एक दिवसासाठी का होईना, प्रत्यक्ष काळ... यमदूत परत पाठविला... म्हणून, रमाई ह्या या कलियुगातील खऱ्या सती-सावित्री होत...'

चिरंजीव 'यशवंत' ने आईच्या चितेस अग्नी दिला. चिता पेटली. ते पाहताच बाबासाहेब आतून पेटले. पेटलेल्या चितेकडे ते धावले. हंबरडा फोडून ओरडले,

'जी जन्मभर माझ्यासाठी चंदनासारखी झिजली, ती माझी जीवनसाथी, मला असं एकट्याला मागं सोडून कशी चाललीस ? कशी ? मग मी मागं कशाला राहूऽऽऽ ?'

त्यांना अडविण्यासाठी काही लोक त्यांना आडवे आले. तेव्हा ते मोठ्यानं ओरडून म्हणाले,

'सोडा मला... तिच्याबरोबरच, तिच्याच चितेवर मलाही आहुती द्या... मलाही तिच्याबरोबर मरु द्या. सोडा मला... सोडा मला...' बाबासाहेब सारखे चितेकडे धावू लागले. लोकांनी त्यांना गराडा घालून बंदिस्त केले. पण बाबासाहेब सारखे रडत होते. उचळंबून बोलत होते, 'मलाही तिच्याबरोबर मरु द्या होऽऽ... मलाही मरु द्या हो ऽऽ...'

— स्मशानात अग्नीसंस्कार व इतर अंत्यविधी झाल्यानंतर जमलेल्या सर्व इष्टमित्रांसह सर्व आप्त व नातलग मंडळी बाबासाहेबांच्या बरोबरच राजगृहात परत आली.

जमलेली सर्व मित्रमंडळी, त्यांचे नातलग आप्तलोक साहेबांची समजूत घालू लागले. सांत्वन करु लागले. पण त्यांच्या डोळ्यांतून वाहणारे अखंड अश्रू काही खंडीत होऊ शकले नव्हते. उमाळ्यावर उमाळे येतच होते.

अखेर सर्वांना निरोप देऊन, रात्री बाबासाहेब आपल्याच अभ्यासिकेत जाऊन बसले. त्या रात्री त्यांनी कसलेच जेवण घेतले नाही.

दुसऱ्या दिवसाची सकाळ उगवली. पण साहेब अभ्यासिकेत बसून राहिले. संबंध दिवस बाहेर आलेच नाहीत. अभ्यासिकेत बसूनच, जरुर तर चहा व अल्पोपहार घेत असत.

बाहेर सांत्वनासाठी अनेक थरांतील लहानथोर मंडळी भेटावयास येत होती. पण अभ्यासिकेतून बाहेर पडावयास बाबासाहेब बिलकूल तयार नव्हते. अभ्यासिकेच्या सर्व दारं खिडक्या त्यांनी बंद करुन घेतलेल्या होत्या. कोणासही भेटावयास ते तयार नव्हते.

दुसरे दिवशी सकाळी काही लोक शंकरमामासह साहेबांच्या अभ्यासिकेच्या बाहेर येऊन उभे राहिले. त्यांतील एकजण बोलला, 'साहेब... साहेब... आज 'अस्थी सावडण्याचा' विधी करायचा हाय. आपण त्यासाठी यायला पाहिजे.'

'त्यासाठी माझी काय एवढी जरुरी आहे? यशवंत, मुकुंद ह्या तिच्या मुलांना घेऊन जावा. ती आता सज्ञान आहेत. त्यांच्या हस्तेच सारे विधी करुन घ्या. त्यासाठी काय लागेल, ते शंकर मामांकडून मागून घ्या. यथासांग सारे करा. तिचा जीव इथे कशात अडकून राह्यला नको. सारे विधी, यथासांग करा!'

'साहेब, मी शंकर...' रमाईंचा धाकटा भाऊ दाटल्या कंठानं बोलला.

'शंकर, हे तू सारं सारं बघायचं. अंत्य-विधी करायला कोण जाणारा आहे रे? तो आपला महारभट, शंभु मोरेच ना?'

'होय साहेब!' शंकरमामाचे डोळे पाणावलेले.

'जावा मग... मला असा त्रास द्यायला परत येऊ नका. समजलं? शंकर, कुणालाही मी भेटत नाही, म्हणून स्पष्ट सांगायचं. समजलं?' साहेब वैतागून म्हणाले.

'पण साहेब, नागपूर, अमरावती, नासिक, नगर, सांगली, सातारा व सोलापूर येथून लांबलांबून आपले लोक आपल्या सांत्वनासाठी येत आहेत. साहेब... साहेब, बाहेर शोकाचा, दुःखाचा महासागर उसळलाय होऽऽ' रमाईंचा भाऊ शंकरमामा कळवळून बोलत होता.

'आत इथं, माझ्या या उरात, माझ्या हृदयात शोकाचा महासागर उसळलाय, त्याचं काय?'

'तो सागर... अगस्तीप्रमाणं तीन घोटांत पिऊन टाका. नि तुम्ही बाहेर या... बाहेर या...'

'जा.. जा... अगस्ती होण्याचा मला उपदेश करतो आहेस? अन् तू... तुझ्या डोळ्यांत तर कृष्णा-कोयना धोऽऽधो वाहताहेत, त्याचं काय? जा... जा. तू आपलं काम कर. मी सांगतोय तसं कर. सारे विधी झाल्यावर संध्याकाळी हजामाला घेऊन ये. मुंडण करायचंय माझं...'

'जी साहेब...' असं म्हणून शंकरमामा भरुन आलेले डोळे पुशीत निघून गेला.

— दुसरे दिवशी साहेबांनी सकाळी उठून स्नान केलं. आधीच शिवून ठेवलेली ती 'भगवी कफनी' आज त्यांनी परत अंगात घातली आणि ते आरशासमोर जाऊन उभे राहिले. मुंडण केल्यामुळे डोकं फारच मोठं दिसत होतं. त्यात त्यांची ती उदास, भकास, करुण मुद्रा न्याहाळताना तर साक्षात 'एक विरक्त संन्याशी' - आपल्यासमोर उभा असल्याचा त्यांना भास होऊ लागला. अन् विजेप्रमाणे एक विचार त्यांच्या मनातून चमकून गेला... पत्नीच्या निधनानं संन्याशी झालेला... कोण बरं तो? तो... तो... हां... हां... तो... तो... तो तामिळनाडूचा संत तिरुवल्लूवर... हां संत तिरुवल्लूवर... आठवलं... आपल्या पत्नीला, रामूला आपणही त्यावरुन असंच म्हणालो होतो... 'माझ्या अगोदर तू गेलीस तर मी सुद्धा... मीसुद्धा असाचा संन्यास

घेणार... हो, ह्याच तिरुवल्लूवरसारखा...' मग आता ठरलं तर, आपणही संन्यास घ्यायचा, तिरुवल्लूवरसारखा संन्यास घ्यायचा... सर्वस्वाचा त्याग, तो खरा संन्यास... वैराग्य हाच खरा त्याग...

बाबासाहेबांनी आपल्या अभ्यासिकेतच स्वत:ला कोंडून घेतले. अंगात ती भगवी कफनी घालून, संन्यस्त वृत्तीने ते आतल्या आतच राहू लागले. ते कोणाशी बोलेनात. भेटेनात. पण नित्य तोंडानं ते सारखे पुटपुटू लागले...

"नको नको मना गुंतु मायाजाळी।

काळ आला जवळी, ग्रासवया।।..."

त्या दिवशी अस्पृश्यांतली तीन-चार प्रतिष्ठीत पुढारी मंडळी, साहेबांच्या खास मर्जीतली अशी, त्यांना भेटावयास आलेली. शंकरमामाला वाटलं, आजचा हा छानसा मोका खासा आलेला आहे. याच्यापुढं विशेष काढून बघावं, त्यांना मग शंकरमामानं सांगितलं, 'आज सात दिवस होताहेत, साहेबांनी आपल्या खोलीत स्वत:ला कोंडून घेतलंय. साहेब कुणालाच भेटत नाहीत.'

'पण असं आता किती दिवस चालणार?' त्यांतला एकजण म्हणाला.

'ते काही सांगता येणार नाही. पण यावर एक युक्ती आहे. दोन वर्षांपूर्वी ही युक्ती करुन बघितलीय... एकदा काय झालं... साहेब महाडला जात असताना, वाटेत नदीला पूर आल्यानं, त्यांना तिथंच थांबावं लागलं. साहेब तर अस्पृश्य, तिथल्या स्पृश्य हिंदूंनी त्यांना अन्न-पाणी दिले नाही. पूर ओसरेपर्यंत अन्नपाण्यावाचून साहेब अक्षरश: तडफले. अत्यंत दु:खाने वैतागाने त्या वेळी साहेबांनी घरी येऊन असंच स्वत:ला कोंडून घेतलं होतं. शेवटी साहेबांचे खास मित्र रावबहादूर सी. के. बोले यांना बोलावून आणलं. ते आले... तेव्हा कुठे साहेबांनी दार उघडलं. या वेळीही आपण रावबहादूर सी. के. बोले यांनाच बोलावलं पाहिजे. उद्या आठ दिवस होतात. तरी आज रात्री आपण बोले साहेबांना सारेजण मिळून भेटू या व उद्या सकाळी त्यांना इथं घेऊन येऊ या...! म्हणजे 'साहेब' जरुर जरुर दार उघडतील. कसं?'

'जरुर... रात्री आपण जाऊ या... साहेबांनी जर अशी डोक्यात राख घालून ठेवली, तर आमच्या समाजाचं पुढं मग काय होणार?'

— सातव्या दिवसाची सर्वच रात्र साहेब रामूच्याच आठवणी काढून काढून रडत अश्रू ढाळत बिछान्यावर पहुडलेले. रात्रभर त्यांना झोप अशी आलीच नाही. सकाळी... सकाळी उशिरा त्यांना झोप लागलेली... अन् त्यानंतर थोड्याच वेळात त्यांच्या स्वप्नात त्यांच्या प्रिय व पूज्य पत्नी रमाबाई आलेल्या... रमाबाई आलेल्या... रमाबाई... साहेबांच्या त्या भगव्या कफनीकडे... त्यांनी केलेल्या चमनगोट्याकडे पाहून त्या हसू लागल्या... मोठमोठ्यानं त्या हसू लागल्या.

'साहेब... अखेर तुम्ही जातीवर गेला.'

'जातीवर गेला? म्हणजे?'

'तो कवी तिरुवल्लूवर तुमच्याच जातीचा ना?'

'हो? पण त्याचा इथं काय संबंध? माझ्याशी काय संबंध?'

'संबंध? अहो, त्या तुमच्या तिरुवल्लूवरासारखं तुम्ही करुन बसला आहात? त्या संत कवीनं पत्नीच्या निधनानांतर संन्यास घेतला. तुम्हीही तेच केलंत होऽऽ. पण त्या वेळी मी तुम्हाला बजावलं होतं की, तुमच्या त्या संत तिरुवल्लूवरांनी संन्यास घेतला तसा तुम्हाला संन्यास घेता येणार नाही. दीन दलितांचा उद्धार केल्याशिवाय तुम्हाला या जन्मी तरी सुटका नाही. तुमच्या रुपात प्रत्यक्ष देवानंच त्यासाठी हा अवतार घेतला आहे होऽऽ. आमची साऱ्यांची तशी श्रद्धा हाय होऽऽ!'

'हे तुझं- आमचं या कल्पनेचं, अंधश्रद्धेचं बोलणं आहे. प्रत्यक्षात देव असं म्हणालाय?'

'देव प्रत्यक्ष कधी बोलत नसतो होऽऽ. तो आपल्या मनातील, सारं माणसाकडून करवून घेत असतो. साहेब, आपलं हे जीवन म्हणजे केवळ स्वत:चं, स्वत:साठी नसतं होऽऽऽ. ते साऱ्या समाजाचंही असतं. ज्या समाजात आपण जन्मलो त्या समाजाचं हित साधणं, हे आपलं एक परमकर्तव्यच असतं ना?'

'राऽऽमू! तू हे बोलतेस? एवढी तू शहाणी केव्हा गं झालीस? एवढं शुद्ध मराठी तू बोलतेस?'

'म्हणजे? या, रामूला तुम्ही समजता तरी कोण? जगातल्या एका महान विद्वान पुरुषाची, मी एक धर्मपत्नी आहे म्हटलं? वयाच्या नऊ वर्षापासून त्या विद्वानाच्या सतत सहवासात मी आहे. त्यांच्या संगतीच्या कस्तुरीनं माझ्यासारख्या या ढेकळाला असा सुगंध लागल्याशिवाय कसा राहील? माझं तुम्ही ऐकून घेतलंच कधी?...'

'रामूऽऽऽ तुझे हे विचार ऐकून मला खूप खूप आनंद झालाय गं. खरं म्हणजे, मला आता कशाकशातच राम वाटत नाही. असं संन्याशी होऊन तुझ्या आठवणीने सतत जळत राहून असं जगण्यापेक्षा मेलेलं बरं. असं आता वाटतं गं मला.' साहेब कळवळून बोलले.

'साहेब, आता तुम्हा विद्वानाला म्या आडाणीनं काय समजावून सांगावं? पण माझ्या केवळ पत्नीच्या प्रेमानं असं पागल होऊन, अशी साऱ्या दुनियेवर लाथ मारायची नसते हो. अशानं तुमचं नि माझं प्रेम महान ठरणार नाही होऽऽऽ' रमाई आतडं पिळवटून सांगू लागली.

'राऽऽमूऽऽ, तुझ्या या विचारांनी मी आज दिपून गेलोय गं! हे कुणी शिकवलं तुला?'

'पण मला हे सारं तुम्हीच तर शिकवलंत ना? असा तुमचा कोणता विचार होता की, तो तुम्ही मला ऐकविला नाही? तुमच्या विचार-सागरात, मी बुडून निघालीय! मी आपली सहधर्मचारिणी होत आहे- होते! साहेब, डॉ. भीमराव रामजी आंबेडकरांचा हा जन्म, हा केवळ त्यांच्या एका पत्नीच्या प्रेमासाठी नाही, तो कोटी कोटी पददलितांच्या उद्धारासाठी आहे. तुमची 'रमा' एक पण समाज अगणित. एक व्यक्तीपेक्षा समाज केव्हाही मोठा. या देशात 'पतितपावन' श्रीराम आले, श्रीकृष्णही 'अवतार' घेऊन आले, पण यांपैकी कुणीच ह्या अस्पृश्यांचा उद्धार केला नाही. तुम्हाला तो करावयाचा आहे. तुमचा अवतार त्यासाठी आहे. अवतारी पुरुषानं असा संन्यास घ्यायचा नसतो... साहेब... काय बी करा, पण मामंजीचं स्वप्न खरं करुन दाखवा...'

'रामूऽऽ, तू ग्रेट आहेस! खरंच रामू... अन् मी नेहमीच म्हणत आलोय, तू अजून थोडी जर शिकली असतीस तर, छत्रपती शाहू महाराजांनी तुला 'वकिलीची सनद'च दिली असती, अम् मग माझ्यासारख्या बॅरिस्टरांनादेखील तू अस्सं पेचार धरुन, अक्षरशः फाडून खाल्ली असतीस गं... अगदी कच्चं... कच्चंऽऽ... अन् ते खरं आहे! तुझ्या मामंजीचं, माझ्याविषयीचं स्वप्न पूर्ण करुन दाखवीन...'

'अगदी खरं?' परत रमाईंनी निक्षून विचारलं.

'अगदी खरं... तुझी शपथ... अगदी खरं!' साहेबांनी शपथेवर सांगितलं.

'साहेब, तुम्हाला आठवतंय? आताच्या सारखंच, दोन वर्षापूर्वीसुद्धा तुम्ही स्वतःला असंच कोंडून घेतलं होतं... महाडला कामानिमीत्त जाताना, वाटेत नदीला अचानक महापूर आला. त्यामुळे तुमाला पलीकडं... पुढं जाताच आलं नाही. तिथेच अलीकडेच एक रात्र-एक दिवस अडकून पडावं लागलं. तुम्ही अस्पृश्य म्हणून तिथल्या निर्दय स्पृश्य हिंदूंनी तुम्हाला साधं पाणीसुद्धा दिले नाही. नदीचा पूर ओसरेपर्यंत अन्न-पाण्याविणा तुम्ही तिथं अक्षरशः तडफडला. पण तिथं तुमची कुणालाच दया आली नाही. तेव्हा असंच आताच्या सारखंच घरात तुम्ही स्वतःला कोंडून घेतलं होतं. आठवतं ते...? पण नंतर त्या खोलीबाहेर पडताना, मोठ्या संतापानं, त्वेषानं त्या वेळी तुम्ही मला म्हणाला होता...'

....'रामू दुर्दैवानं मी अस्पृश्य जातीत जन्माला आलो, हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही. नुकत्याच झालेल्या महाडच्या सभेत असं म्हणाला... जागृतीचा विस्तव विझू देऊ नका... हे... सारं... हे... तुमचं बोलणं... तुम्हाला हे खरं करुन दाखवायची वेळ आता आलेली आहे. साहेब, हे महान कार्य तुमची वाट पाहत आहे. ते तुम्ही आधी करायला पाहिजे. संन्यास घेऊन, समाजापासून दूर जाऊन, समाजाला विसरणं हे तुमचं खरं कर्तव्य नाही. समाजातच राहून, समाजाचा उद्धार करणे, हे तुमचं खरं कर्तव्य आहे... उतरा भगवी कफनी, फेकून द्या तो हातातला सोटा... अन् या... या खऱ्या कर्तव्याच्या कार्याला लागा. योजलेलं ते कार्य तडीस न्या. त्याशिवाय आपल्याला व आपल्या

समाजाला यापुढं तरुणोपाय नाही... माणुसकी नाही... अन् मुक्तीही नाही... उठा... उठा... आपले सारे लोक तुम्हाला बाबा म्हणतात. मला आई म्हणतात. रमाई म्हणतात. असा संन्यास घेऊन, आपण त्यांना जर असं वाऱ्यावर सोडलं तर आपण आपलं कर्तव्य केलं असं होईल का? आपण त्यांचे खरेखुरे आई-बाबा होऊ या... त्यातच आपल्या या जीवनाचं सार्थक आहे... आपण या मुंबईतच दुसरं पंढरपूर वसवू या... तुम्ही विठोबा नि मी रुक्मिणी...'

'रामूऽऽ खरं आहे तुझं हे म्हणनं.. अगदी खरं आहे! रामू... खरंच तूच माझी प्रेरणा... ध्येय... शिखराचा मार्ग सोडून भरकटत जाऊन पाहणाऱ्या मला, तू आज योग्य मार्गावर आणलंस...'

'हे खरं आहे ना? मग आपल्या या अडाणीचं आता एवढंच ऐकायचं. यापुढं आपल्या या कर्तव्यासाठी आपण प्राणपणानं जगायचं. तुम्ही हे संन्याशाचं वेड टाकून द्यायचं... कोंडून घेणं सोडायचं, तुमची ती भगवी कफनी, तो कमंडलू... तो सोटा फेकून द्यायचा नि ते आठ दिवस बंद असलेले दार आता उघडायचं... उठा... दार उघटा... उठा म्हणते ना मी? दार उघडा... तुमच्या कर्तव्याला सामोरे जा... उठाऽऽ...'

'अगं... अगं उठतो मी... दार उघडतो. पण त्या अगोदर ही कफनी हा सोटा ह्या खिडकीबाहेर कस्सा फेकून देतोय, ते तर बघ... हे बघ...'

पण स्वप्नातील अशा हालचालीनं बाबासाहेबांना जाग आली. मघापासून त्यांना पडलेलं रमाचं, त्यांच्या प्रिय पत्नीचं स्वप्न... एकदम विरुन गेलं... अदृश्य झाले... साहेब मग एकदम विव्हळ झाले. व्याकूळ झाले. विचारमग्न झाले... कासावीस झाले. पण क्षणभरच! दुसऱ्याच क्षणी ते ताडकन् उठले. अन् रमाईंनी सांगितल्याप्रमाणे, कर्तव्याला जागण्यासाठी, आठ दिवस बंद असलेलं दार उघडण्यासाठी ते दाराकडे धावले... मोठ्या उत्साहानं, आनंदानं...

अगदी त्याच क्षणी —

रावबहाद्दूर बोले, बाबासाहेबांना हाका घालीत त्यांच्या अभ्यासिकेचे दार ठोठावणार, तोच स्वतः बाबासाहेबांनीच स्वतःहून दार उघडले.

सर्वजण आश्चर्यचकीत होऊन एकमेकांकडे पाहत राहिले.

रावबहाद्दूर बोले व दारासमोर जमलेल्या आपल्या मित्र-मंडळींशी हस्तांदोलन करीत बाबासाहेब मोठ्या आनंदानं आणि प्रसन्न वदनानं बोलू लागले,

'मित्र हो! माझ्या पत्नीनं, माझ्या रमानं आज माझ्या स्वप्नात येऊन माझ्या मनात दाटलेला अंधकार उजळून टाकला. माझ्यात डोळ्यांत तिनं आज अचानक चांगलं झणझणीत अंजन घातलं. मी घेतलेलं हे संन्याशाचं वेड तिनंच आज मला सोडायला लावलं. हे दार आता मला तिनंच उघडायला लावलं. माझ्या कर्तव्याचा खरा मार्ग मला आज तिनंच दाखवून दिला... आजपासून परत मी तुमच्यात आलो, तुमचा साऱ्यांचा झालो. ते केवळ रमामुळं... रमामुळं... मला आता महान क्रांतीची घोषणाच करावी लागेल... महान क्रांतीची घोषणा...'

हे ऐकून साऱ्यांनाच मग मोठा आनंद झाला.

दारासमोर जमलेले बाबासाहेबांचे सारे मित्रगण, कार्यकर्ते मग मोठ्या आनंदानं, मोठ्यानं गरजले, 'रमाआई अमर होवोत! रमाई अमर रहे!!'

त्या गगनभेदी आवाजानं सारा आसमंत दुमदुमून निघाला. दुमदुमून निघाला.....

•••••